म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २४१७
IRBK-0102417
IRBK-0102417
IRBK-0102417

नोंद नं. १०४१८
२५५१०

अ. वि. गृह प्रकाशन नं. ३७

# सुरस भारत कथा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २४९८ नों दि.
वि. ९१.२।। ... क्र.

आवृत्ति पहिली

IRBK-0102417
IRBK-0102417

सन १९४६ ] किंमत २-८-० [ शक १८६८

प्रकाशक,
वि. गं. केतकर,
व्यवस्थापक अ. वि. गृह प्रकाशन,
६२४, सदाशिव पेठ,
पुणें शहर

" नास्ति सत्य समो धर्मो न सत्याद्विद्यते परम् "
आदिपर्व, ७४–१०७.

मुद्रक,
वि. गं. केतकर, व्यवस्थापक,
लोकसंग्रह छापखाना
६२४, सदाशिव पेठ,
पुणें शहर

# —दोन शब्द—

**‘ नारायणं नमस्कृत्य...... ’**

‘ नारायणाला नमस्कार करून—’ मी व्यास–पौर्णिमेला प्रसिद्ध होणाऱ्या सुरस महाभारत कथेविषयीं दोन प्रास्ताविक शब्द सांगतों. जगांतील बृहत्काव्यांतील अग्रेसर असलेल्या व एकाद्या ज्ञानसागराप्रमाणें सर्व शास्त्रांचा व अनुभवाचा जनक अशा या ग्रंथाला कोणत्या ना कोणत्या तरी ज्ञान-ग्रहणाच्या साधनांनीं परिचित नसलेला असा एकही माणूस हिंदुस्थानांत सांपडणार नाहीं. इतका सर्वपरिचित असा हा ग्रंथ असूनही ‘पुनः गावें ऐसेचि करी ’ अशी त्याची ख्याती आहे. ‘ तप्तं तप्तं पुनरपिपुनः काञ्चनं कान्तवर्णम् ’ या उक्तीप्रमाणें कितीही वाचला तरी ज्याची गोडी वाढतेच अशा या महाभारत ग्रंथाच्या सटीक भाषांतराच्या कितीतरी प्रती महाराष्ट्र-भाषेंत झालेल्या आहेत. प्रौढांसाठीं, स्त्रियांसाठीं व बालांसाठींही निरनिराळ्या आवृत्त्या छापलेल्या आहेत. मात्र या ग्रंथाची व्याप्ती एकतर फार मोठी असल्यानें, साकल्यानें याचें एक आवर्तन पूर्ण करावयाचें म्हटल्यास सहजच त्याला एक दोन महिन्यांचा अवधि लागावयाचा ! आणि तोही ज्याच्यामागें व्याप किमपि नाहीं अशा लोकांना ! बरें, छोटी आवृत्ती वाचावी तर तिच्यांतील माहिती अपुरी वाटते व त्यानें मनाचें समाधान होत नाहीं. सध्याचा काळ हा घाईचा व गडबडीचा असल्यानें थोडक्यांत ‘सुरस कथा’ वाचावयास मिळतील तर हव्या आहेत. व म्हणूनच महाभारताची ही आटोपशीर आवृत्ती काढण्याचें आम्हीं ठरविलें. आणखीही एक मुद्दा आहे व तो म्हणजे किंमतीचा. मोठ्या भारताची किंमत जड वाटणार व छोट्याची किंमतच वाटणार नाहीं—तेव्हां दोन वा तीन रुपयांपर्यंत मिळणारें पुस्तक ‘ बेताचें ’ असें वाटणें सहाजिकच आहे.

या ग्रंथासंबंधीं बोलावयाचें झाल्यास ग्रंथास सुरवात पांडवकथेपासून केलेली आहे. कथेमध्यें संदर्भासाठीं शीर्षकें जाड टकाक्षरांत वेगळीं दर्शविलीं आहेत व त्यांची नोंद अनुक्रमणिकेंत केली आहे. हेतु हा कीं

भारत कथेंतील एकादा दुवा अनुक्रमणिकेवरून पाहातां एकदम सांपडावा. पांडवकथा संपल्यावर शेवटीं उपकथांचाही मनोरम भाग जोडलेला आहे. मात्र ज्या कथा साधारण वाचकांच्या नेहमींच्या परिचयाच्या आहेत उ० शकुन्तला आख्यान, सावित्री आख्यान, नलदमयंती आख्यान वगैरे, त्यांच्या कथा संक्षिप्त करून दिलेल्या आहेत. भारतांतील प्रसिद्ध पुरुषांच्या नांवाची सूचि शेवटीं जोडली आहे. त्यावरून वीरांच्या संदर्भाचा लगेच धागा सांपडेल.

अशा रीतीनें शक्यतों सुरस भारत कथा हें पुस्तक स्वयंपूर्ण होईल अशी खबरदारी घेतली आहे. महाराष्ट्रभाषाभिमान्यांना हा प्रयत्न पटो एवढीच इच्छा आहे. या वेळीं हेंही नमूद करून ठेवावेंसें वाटतें कीं, या सुरस भारत कथेप्रमाणेंच हिंदूंना व अखिल जगाला ललामभूत असलेला असा श्रीवाल्मीकिप्रणीत रामायण हाही महाग्रंथ या प्रकारच्या आवृत्तींत आम्ही वाचकांस सादर करणार आहोंत. सत्य संकल्पाचा दाता प्रभु रामचंद्र !

विद्याभवन,
व्यास पौर्णिमा,
१४ जुलै १९४६

वि. गं. केतकर.
कार्याध्यक्ष
पुणें अ. वि. गृह, पुणें २

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठांक | विषय | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| हरि : ॐ ! | १ | द्रौपदीचें सांत्वन | ४० |
| व्यासजन्मकथा | २ | अर्जुनाला शंकराकडून अस्त्रप्राप्ति | ४२ |
| मानव वंश | ४ | तीर्थयात्रा | ४६ |
| भीष्म प्रतिज्ञा | ४ | भीमाचा गर्वपरिहार | ४९ |
| राज्याला धनी मिळाला | ५ | पांडव–श्रीकृष्ण भेट | ५२ |
| पांडवांचा जन्म | ६ | कौरवांना कैद | ५३ |
| 'चारुनि विषान्न भीमा... | ८ | दुर्योधनाचें उपोषण | ५५ |
| धनुर्विद्याभ्यास | ९ | वैष्णव यज्ञ | ५६ |
| कुंतीनें ओळखिलें | ११ | हरिणांची धर्मराजास विनंती | ५७ |
| कणिक नीति | १२ | दुर्वासाकडून पांडवांचा छळ | ५८ |
| लाक्षागृहवास | १२ | जयद्रथाची फजिती | ५९ |
| बकासुरवध | १४ | मार्कंडेयांचा उपदेश | ६१ |
| द्रौपदी स्वयंवर | १५ | कर्णाचें दातृत्व | ६१ |
| पांचाची पत्नी | १६ | यक्षप्रश्न | ६२ |
| नियम मोडला | १९ | पांडवांचा अज्ञातवास | ६४ |
| सुभद्रा हरण | २० | कीचकवध | ६६ |
| मयसभा | २२ | पांडवांचा शोध | ६९ |
| राजसूय यज्ञ | २३ | बृहन्नडेचा पराक्रम | ७० |
| जरासंध वध | २४ | अज्ञातवासाची समाप्ति | ७२ |
| अग्रपूजेचा मान कोणाला | २७ | कृष्ण शिष्टाई | ७८ |
| कौरव पांडव द्यूत | २९ | कर्ण व कुंती यांचा संवाद | ८४ |
| द्रौपदी वस्त्रहरण | ३४ | युद्धाची तयारी | ८६ |
| शाबास द्रौपदी | ३५ | युद्धनियम | ८९ |
| फिरून दुर्दैवाचा फेरा | ३६ | युद्धास प्रारंभ | ९० |
| सूर्याची थाळी | ३९ | 'हा सूर्य हा जयद्रथ' | ९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| कर्णाला सेनापतीपद मिळालें | ९६ | कुवलाश्वाचे पुत्र | १४० |
| दुर्योधनाचें पलायन | ९९ | च्यवन व सुकन्या | १४० |
| दुर्योधनावर पुष्पवृष्टि | १०२ | जरिता व मंदपाल | १४१ |
| पांडव–आप्तवध | १०३ | तपती व संवरण | १४२ |
| मृतांचें श्राद्ध | ११० | दधीचीचा परोपकार | १४२ |
| युधिष्ठिराला राज्याभिषेक | १११ | दीर्घतमाख्यान | १४३ |
| अश्वमेध यज्ञ | ११५ | दभाचा निरास | १४३ |
| धृतराष्ट्राचा वानप्रस्थाश्रम | ११९ | निवातकवच व अर्जुन | १४४ |
| धृतराष्ट्राचा अंत | १२२ | नीलराजा व अग्नि | १४४ |
| यादवांचा शेवट | १२३ | परशुरामाचा पराक्रम | १४४ |
| पांडवांचा स्वर्गवास | १२५ | भगीरथ व गंगा नदी | १४५ |
| धौम्य व त्याचे शिष्य | १२८ | भीष्मजन्म | १४७ |
| उत्तंकाची गुरुदक्षिणा | १२८ | मनु व मत्स्यरूपी ब्रह्मदेव | १४७ |
| परीक्षिति व सुशोभना | १२९ | माधवीची कथा | १४८ |
| परीक्षितीला सर्पदंश | १३० | मुद्गलाची सत्त्वपरीक्षा | १४९ |
| जनमेजयाचें सर्पसत्र | १३० | मांडव्य कथा | १४९ |
| पुलोमेचें तेज | १३१ | यवक्रीताचा अत्याचार | १५० |
| रुरु व प्रमद्वरा | १३२ | शिबिराज कथा | १५० |
| जरत्कारु पतिपत्नी | १३२ | सुंदोपसुंद | १५१ |
| कद्रू व विनता | १३३ | शाल्ववध | १५१ |
| गरुडाचें गर्वहरण | १३४ | श्वेतकेतूची माता | १५२ |
| खांडववन दहन | १३५ | लोमकपुत्र जंतु | १५२ |
| नहुषाचें इंद्रपद | १३५ | स्कंद व देवसेना | १५३ |
| अष्टावक्र–कथा | १३६ | शकुन्तला आख्यान | १५४ |
| अगस्त्य–लोपामुद्रा | १३७ | ययाति कथा | १५५ |
| ऋष्यशृंगाची कथा | १३७ | पुरूंची उत्पत्ति | १५७ |
| और्वकथा | १३९ | नलदमयन्ती | १५७ |
| कल्माषपाद | १३९ | सावित्री आख्यान | १५८ |

२३५५
१०-२-१०
उप्र| २२

# सुरस भारत कथा

## हरिः ॐ !

लो. टिळकांनीं ‘ आर्यांचें उत्तर ध्रुवाकडील वसतिस्थान ’ या ग्रंथांत असें सिद्ध केलें आहे कीं, आज भरतखंडांत असणारे आर्य लोक फार प्राचीन काळीं उत्तर ध्रुवाच्या आसपास राहात होते. पण पुढें तेथें अतिशय बर्फ पडल्यामुळें या लोकांना तेथें राहणें अशक्य झालें. तेव्हां तें वसतिस्थान सोडून ते लोक खालीं दक्षिणेकडे सरकत सरकत कांहीं पश्चिमेकडून इराणाच्या बाजूनें व कांहीं हिमालय पर्वताच्या घाटांतून किंवा पर्वताला ठिकठिकाणीं वळसा घालून भरतखंडांत आले. पुढें त्यांची वस्ती पसरून कांहीं लोक गंगा यमुना नद्यांच्या कांठानें राहिले, कांहीं वर हिमालयाच्या पायथ्याशीं राहिले आणि कांहीं पूर्वेस बनारसकडे गेले.

अशा रीतीनें उत्तरेकडून आलेले लोक सर्व एकदम आले नाहींत. क्रमानें एका मागून एक असे कालांतरानें आले. तसेंच या येणाऱ्या लोकांत अनेक वंशांची प्रजा होती. यांत मुख्य वंश दोन समजले जातात. एक सूर्यवंश व दुसरा चंद्रवंश. हीं नांवें कदाचित् त्या देवतांच्या उपासनेमुळें पडलीं असावींत. उपास्य देवतांचीं नांवें उपासकांच्या वंशानीं व कुळांनीं घेणें स्वाभाविक आहे. या दोन वंशांच्या लोकांत रंगरूप, चालीरीती यांच्या संबंधानें पुष्कळ भेद त्यांचा वेगळेपणा ओळखूं येण्यासारखे होते. त्यांची कालगणनाहि वेगळी होती.

यांत प्रथम सूर्यवंशी भरत कुळांतले लोक आले. ते गौरवर्ण सुरूप असे होते. त्यांच्यावरून या देशभूमीला भरतखंड हें नांव पडलें असावें. मागाहून आलेले चंद्रवंशीय लोक वर्णानें काळे असावेत. या दोनहि वंशांचें मूळ वेदापर्यंत जात असावें. यामुळें त्यांचा उल्लेख व कांहीं माहिती वेदांत सांपडते. ते इंद्र, अग्नि यांचीहि उपासना करीत. या दोन वंशांतील लोकांचीं प्रमुख नांवें: यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु, पुरू अशीं होतीं. तसेंच प्रमुख राजव्यक्तींचीं नांवें सुदास, चंद्र, बुध, पुरूरवा, आयु, नहुष, ययाति अशीं होतीं. पण त्या नांवांशीं आपणांस कांहीं विशेष कर्तव्य नाहीं. या दोनहि वंशांतील लढाऊ लोक भरतखडांतील पूर्वींच राहात असलेल्या अनार्य लोकांशीं व तसेंच आपआपसांतहि लढत. महाभारतांत वर्णिलेलें कौरव-पांडवांचें युद्ध अशांपैकींच होतें. लौकिकांत त्या युद्धाला कौरव–पांडवांचें युद्ध म्हणतात, आणि एका अंगें धर्म भीम अर्जुन नकुळ सहदेव हे पांच पांडव आणि दुसऱ्या अंगें दुर्योधन दुःशासन इत्यादि शंभर कौरव यांच्यामध्यें झालें. पण वस्तुतः पांडव हेहि कौरवच होते. कारण ते पांच व हे शंभर हे कुरु वंशांतलेच. फार काय सख्खे चुलत भाऊच होते. शंभरांचा बाप धृतराष्ट्र, व पांचांचा बाप पंडु हे सख्खे भाऊ व विचित्रवीर्याचे पुत्र होते. म्हणून आपण यांच्या जन्मापासूनच कथेचा प्रारंभ करूं.

**व्यासजन्मकथा**

फार पुरातन काळीं उपरिचर वसु नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याची व इंद्राची मैत्री होती. यामुळें इंद्रानें त्याला चेदी नांवाचा देश दिला. हेतु असा कीं, त्या वेळीं त्या बाजूला धर्माचें रक्षण करील असा कोणी प्रबळ व धार्मिक राजा नव्हता; आणि उपरिचर राजानें मनावर आणलें तर तो धर्माचें प्रतिपालन चांगलें करील. त्याप्रमाणें उपरिचरानें चेदि देशाचें राज्य घेतलें. हा देश अत्यंत संपन्न होता. सुंदर होता. तेथील जमीन अत्यंत सुपीक होती. ती फार नांगरावी लागत नसे. थोडीशी शेतीची मेहनत करतांच पुष्कळ धान्य पिके. यामुळें दीन अनाथ लोकांचेंहि चांगल्या रीतीनें पोषण होई. देशांतील लोकहि अत्यंत धार्मिक व नीतिमान असत. कुटुंबें सुखी असत. त्या देशाच्या जमिनींत सोनें रत्नें असत. त्यामुळें संपत्ति

पुष्कळ असे व लोक तिचा उपयोग धर्मकार्याकडे करीत. ज्या त्या वर्गाचे लोक आपापल्या धर्माप्रमाणें चालत यामुळें त्यांच्यामध्यें भांडण तंटे होत नसत. असे उत्तम प्रकारें त्यानें राज्य चालविलेलें पाहून इंद्रानें त्याला एक स्फटिकाचें विमान व वैजयन्ती माला दिली. ही माला गळ्यांत असली म्हणजे त्याच्या शरीरावर कोणत्याही शस्त्राचा किंवा अस्त्राचा घाव होत नसे. तशीच इंद्रानें त्याला एक लाकडाची सुंदर काठी दिली होती. तिचा उपयोग करून त्यानें इंद्राच्या नांवानें गुढी पाडव्याचा सण सुरू केला. म्हणजे वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं ती गुढी उभारून तिला सुंदर वस्त्रें नेसवावीं, अलंकार घालावे, फुलांच्या माळा घालाव्या, आणि तिची पूजा करून आनंदानें उत्सव करावा. तेव्हांपासून या देशांत वर्ष प्रतिपदेचा उत्सव सुरू झाला. या राजाला पुढें पांच मुलगे झाले. त्यांना त्यानें वेगवेगळीं राज्यें दिलीं. आणि तेव्हांपासून तो विमानांत बसून आकाशांत संचार करी किंवा तेथें इच्छेप्रमाणें वास्तव्यहि करी. एकदां शुक्तिमति नदीला कोलाहल पर्वतानें अडवून तिचा अपमान केला. तेव्हां राजानें तिची मुक्तता केली. शुक्तिमतीला स्त्री असतां नदीचें आणि कोलाहलाला पर्वताचें रूप घेतां येत असे व तीं दोघें त्या रूपांत क्रीडा करीत. या शुक्तिमतीला कोलाहलापासून दोन मुलें झालीं. त्यांपैकीं मुलग्याला उपरिचर राजानें आपला सेनापति केलें. आणि मुलीला आपली राणी केली. तिचें नांव गिरिका. ती परम सुंदर होती. एकदां हा राजा मृगया करीत अरण्यांत गला असतां अद्रिका नांवाच्या एका अप्सरेशीं त्याची गांठ पडली. तेव्हां तिचें पाणिग्रहण करून त्यानें यमुनातीरावर कांहीं काळ घालविला. पण या अप्सरेला एक शाप होता, तो असा कीं, तिला वारंवार यमुना नदींत सुसरीचें रूप घेऊन राहावें लागे. अशा स्थितींत तिला दोन मुलें झालीं. तीं तिनें राजाला अर्पण केलीं. व स्वतः देवलोकाला गेली. राजानें मुलग्याचें नांव मत्स्य असें ठेविलें व मुलीचें नांव सत्यवती असें ठेविलें. परंतु ती सुसरीच्या पोटांतून निघाली म्हणून तिला त्यानें एका नावाड्याला अर्पण केलें व तिला मुलीप्रमाणें वागीव अशी आज्ञा केली. सत्यवती ही सुसरीच्या उदरांतून जन्मली व आतां तर नावाड्याच्याच घरीं वाढली. तिला मासे धरणाऱ्या कोळ्यांच्या संगतींत राहावें लागे. स्वतः तीहि मासे धरणें वाळविणें विकणें इत्यादि गोष्टी करी म्हणून तिच्या

अंगाला पाण्यांतील माशासारखी घाण येत असे. पण ती अत्यंत सुंदर असून नदीवर नाव चालविण्याच्या कामीं बापाला साहाय्य करी. तेव्हां नावेंतून प्रवास करणारे लोक तिचें रूप पाहून मोहित होत. एके दिवशीं पराशर ऋषींना तिच्या नावेंतून जाण्याचा प्रसंग पडला. आणि न होणार तें झालें. त्यांनाही तिचा मोह पडला. आणि सत्यवती अविवाहित असल्यामुळें तिनेंहि त्या तेजस्वी ऋषीला वरिलें. तेव्हां ऋषींनीं तिला आशीर्वाद दिला कीं, तुझ्या अंगाची मासळीची घाण तर जाईलच पण तुझ्या अंगाला सुगंध येऊन तो एक कोसपर्यंत लोकांना कळेल. या पराशर ऋषीपासून या सत्यवतीला मुलगा झाला. त्याचें नांव व्यास. त्याचा जन्म यमुनाद्वीपांत झाला म्हणून त्याला द्वैपायन असें म्हणूं लागले. तो पुढें अत्यंत विद्वान् झाला. इतका कीं, त्यानें वेदांची व्यवस्था त्याच्या निरनिराळ्या शाखा करून लावली, हेतु हा कीं, त्यामुळें वेदाचें अध्ययन सुलभ व्हावें. व्यासांना शुकाचार्य या नांवाचा सुप्रसिद्ध पुत्र होता व सुमंतुजैमिनी, पैल व वैशंपायन, हे शिष्य होते. या सर्वांना व्यासांनीं वेद शिकविले.

## मानव वंश

प्राचीन बर्हि नांवाचा राजा होता. त्याला प्राचेतस दक्ष झाला. दक्षाला वीरिणी नांवाच्या स्त्रीपासून सहस्र पुत्र झाले, पण मुलाकडून त्याचा वंश वाढला नाहीं. मुलीकडून मात्र वाढला. कश्यप ऋषीला दक्षानें दहा मुली दिल्या. त्यांत दाक्षायणि आदिती ही श्रेष्ठ होती. पुढें कश्यपाच्या धाकट्या मुलाला यम आणि मनु हे पुत्र झाले. या मनुपासून झालेल्या वंशाला मानव वंश म्हणतात. मनूची आठवी कन्या इला नांवाची होती. तिला पुरूरवा नांवाचा मुलगा झाला. पुरूरव्याचा विवाह ऊर्वशी नांवाच्या अप्सरेशीं झाला. तिच्या पोटीं नहुप जन्मला. त्याचा मुलगा ययाति हा सुप्रसिद्ध सार्वभौम राजा झाला.

## भीष्मप्रतिज्ञा

कुरुवंशांत शंतनु नांवाचा एक मोठा राजा होऊन गेला. तो सर्वगुणसंपन्न होता. एकदां त्याची आणि मनुष्यरूप घेतलेल्या गंगा नदीची गांट

पडली. तेव्हां आपला कांहीं हेतु साधण्याकरितां, तिनें शंतनूशीं लग्न करण्याचें मान्य केलें. तिच्यापासून शंतनूला सुप्रसिद्ध तेजस्वी भीष्म हा मुलगा झाला. भीष्माचा जन्म झाल्यानंतर गंगा शंतनूला सोडून गेली. या वेळीं शंतनु तरुण छत्तीस वर्षांचा होता. तथापि दुसरें लग्न करण्याचा विचार त्यानें केला नाहीं. तरी त्याला उत्तम पुत्राप्रमाणें उत्तम स्त्री मिळावी असें त्याच्या भाग्यांत लिहिलें होतें. एके दिवशीं यमुनेच्या कांठीं एक धीवरकन्या म्हणजे कोळयाची मुलगी सत्यवती नांवाची त्याच्या दृष्टीस पडली. तिच्या अंगाला अत्यंत मोहक असा सुगंध येत होता. तिच्यावर मोहित होऊन शंतनूनें तिच्या बापाकडे जाऊन मागणी घातली. बापाला तें इष्टच वाटलें. कारण मुलगी राजाच्या घरीं पडणार पण त्याला भीति अशी वाटली कीं आपली मुलगी बोलून चालून कोळ्याची ! समजा, राजानें श्रेष्ठ कुळांतल्या आणखी एखाद्या मुलीशीं लग्न केलें तर राज्य जाणार तिच्या मुलांना आणि आपण तर राजाचे आजोबा होऊं इच्छितों ! या विचारानें शंतनूला अशी अट घातली कीं, तूं या मुलीच्या पोटीं जन्मणाऱ्या मुलग्यालाच राजा करशील तर मुलगी देतों. शंतनूला ही अट प्रथम मान्य झाली नाहीं. तो खिन्न होऊन घरीं गेला. तेव्हां भीष्मानें त्याच्या खिन्नतेचें कारण विचारलें. तेव्हां सर्व वृत्त लक्षांत येऊन भीष्म म्हणाला, “ बाबा, तुम्ही कोळयाची ही अट एकदम निःशंकपणें मान्य करा. येऊन जाऊन मी तुमचा वडील मुलगा म्हणून ही अट पुरी होण्याला आड येणार असेंच ना ! तर मी ही पहा प्रतिज्ञा करितों कीं, ‘ या कोळ्याच्या मुलीपासून तुम्हाला जो मुलगा होईल तोच राजा होईल ’ मग तर झालें ना ! ” ही प्रतिज्ञा कोळयाला पटली. कारण भावी राजा होणाऱ्या राजपुत्रानेंच राज्यत्याग केला. पण तो म्हणाला “ तूं एक राज्य टाकून दिलेंस. कबूल. पण तुझे मुलगे तसेंच करतील याचा काय भरंवसा ? ” तेव्हां कोळयाची तीहि शंका दूर व्हावी म्हणून भीष्मानें सर्वांसमक्ष दुसरी अशी प्रतिज्ञा केली कीं, मी सर्व जन्मभर अविवाहितच राहीन. लग्न करणार नाहीं. तेव्हां मग सर्व शंका फिटून कोळयानें आपली मुलगी सत्यवती शंतनूला दिली.

## राज्याला धनी मिळाला

पुढें त्यांना चित्रांगद नांवाचा एक, व विचित्रवीर्य नांवाचा दुसरा

असे दोन मुलगे झाले. ते लहान असतांच शंतनु मृत्यु पावला. तेव्हां भीष्मानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें चित्रांगदाला राज्यावर बसविलें. पण लवकरच एका युद्धांत एका गंधर्वानें चित्रांगदाला ठार मारलें. तेव्हां भीष्मानें विचित्रवीर्याला. राज्यावर बसविलें आणि आपण केवळ कारभारी या नात्यानें राहून राज्य उत्तम प्रकारें चालविलें. पुढें विचित्रवीर्य मोठा झाल्यावर त्याच्या लग्नाचा विचार सुरू झाला. इतक्यांत काशीराजानें आपल्या तीन मुलींचें स्वयंवर एकदम करण्याचें ठरविलें. तेव्हां भीष्म त्या स्वयंवराला गेला. तेव्हां तेथें त्या मुलींनीं हा पहा आजन्म ब्रह्मचारी राहाणारा स्वयंवराला आला ! असें म्हणून भीष्माची थट्टा केली, तेव्हां भीष्मानें त्या तिघींना उचलून रथांत घालून घरीं आणल्या. त्याला कांहीं राजे आडवे आले. पण भीष्मानें त्यांचा पराभव केला, आणि त्या तीनहि मुली आपला धाकटा भाऊ विचित्रवीर्य याला अर्पण केल्या, आणि आतां लग्नाचा समारंभ होणार तों त्यांतली थोरली मुलगी अंबा भीष्माकडे गेली, व हात जोडून प्रांजलपणानें म्हणाली, 'महाराज मीं मनानें शाल्व राजाला वरिलें आहे.' तेव्हां भीष्मानें उदारपणानें तिला शाल्वाकडे जाण्याची संमती दिली. मग उरल्या दोघी अंबिका व अंबालिका. त्यांचें विचित्रवीर्याशीं लग्न लागलें.

पण दुर्दैवानें विचित्रवीर्यालाहि तरुणपणींच मृत्यु आला. मग आतां काय करावें ? राज्याला धनी कोण ? तेव्हां राज्यांतील विद्वान् धर्मज्ञ लोकांची संमति घेऊन, सत्यवतीनें आपला पूर्वींचा पुत्र व्यासऋषी याला निमंत्रण केलें, आणि विचित्रवीर्याच्या दोघां विधवांचा त्याच्याशीं पुनर्विवाह केला. नंतर या पुनर्विवाहापासून अंबिकेला पुत्र झाला पण तो जन्मांध निघाला. त्याचें नांव धृतराष्ट्र. फिरून चिंता उत्पन्न झाली ती अशी कीं, जन्मांध हा राज्यपदावर बसूं शकत नाहीं. तेव्हां व्यासापासूनच अंबालिकेला पांडु नांवाचा मुलगा झाला होता. त्याला भीष्मानें राज्यावर बसविलें. तसेंच सत्यवतीची एक दासी होती तिला व्यासांपासून विदूर नांवाचा मुलगा झाला त्याला त्याच्या सेवेला दिलें.

## पांडवांचा जन्म

अशा रीतीनें राज्याला पांडू हा धनी मिळाला. त्याची राजधानी

हस्तिनापूर ही शंतनूच्या वेळेपासूनच होती. पण तिचा उदय आतां होऊं लागला. भीष्मानें पांडू राजा व हस्तिनापूरची प्रजा यांचें मुलांसारखें पालन केलें. पुढें कुंतीभोजनामक राजाची पृथा नामक मुलगी होती. तिच्या स्वयंवराला तरुण पांडू गेला. तेव्हां त्याचें रूप पाहून राजकन्येनें पांडूला वरिलें. या पृथेचें नांव कुंती असें होतें. तेंच पुढें सासरीं चालू झालें. पण कुंती ही गुणांनीं उत्तम असली तरी वर्णानें किंचित् काळीसावळी होती. म्हणून पांडूला दुसरी स्त्री करून देण्याचें ठरलें. तेव्हां मद्र देशच्या राजानें आपली सुंदर मुलगी माद्री ही पांडूला दिली. इकडे धृतराष्ट्राला त्याची पत्नी गांधारी हिच्यापासून दुर्योधन, दुःशासन इत्यादि मुलगे झाले. त्यांना कौरव म्हणत. तशीच दुःशीला नामक एक मुलगी झाली. नंतर पांडू राजा बरोबर सैन्य घेऊन परदेशाचे राजे जिंकण्याकरितां निघाला, व लवकरच दिग्विजय करून परत आला. मग शांततेच्या काळीं श्रमपरिहाराकरितां आपल्या दोघी स्त्रिया कुंती व माद्री यांना घेऊन तो हिमालय पर्वतावरील एका रम्य ठिकाणीं जाऊन राहिला. पांडू राजा असतांहि तो हिमालयावर आपल्या आवडत्या जागीं राहूनच राज्यकारभार करी. एके दिवशीं तो शिकारीला गेला. तेव्हां मृगाचें रूप घेतलेल्या एका ऋषीचा त्यानें कांहीं अपराध केला. यामुळें ऋषीनें त्याला असा शाप दिला कीं 'यापुढें तुला स्त्रीचा स्पर्श झाल्याबरोबर मृत्यु येईल.' तो शाप ऐकून पांडू व त्याच्या स्त्रिया या सर्वांना अतिशय दुःख झालें. पण शापापुढें काय करणार ! म्हणून तो टाळण्याकरितां पांडूनें तपश्चर्येला प्रारंभ करून आपला देह अतिकृश केला. तथापि आपल्याला संतती नाहीं याचेंच पांडूला फार दुःख होऊं लागलें. म्हणून त्यानें थोरली पत्नी कुंती हिला अशी आज्ञा दिली कीं, 'तूं मंत्रसिद्धी करून घे, आणि निरनिराळ्या देवतांना पाचारण करून पुत्रोत्पादन करून घे.' त्याप्रमाणें कुंतीला यमधर्मापासून युधिष्ठिर, ज्याला पुढें धर्म हें नांव मिळालें तो झाला. वायुदेवतेपासून तिला भीम, इंद्र देवतेपासून अर्जुन, असे मुलगे झाले. त्याचप्रमाणें अश्विनी कुमारांच्या कृपेनें माद्रीला नकुल व सहदेव हे दोन मुलगे झाले. हे पांचहि मुलगे जवळ जवळ सारख्या वयाचे होते. पण होणारें टळत नाहीं त्याप्रमाणें एके दिवशीं पांडूला माद्रीचा स्पर्श झाल्याबरोबर तो पूर्वीचा शाप सफळ झाला, आणि पांडूला मृत्यु आला. तेव्हां हा आपला दोष असें समजून ती

असे दोन मुलगे झाले. ते लहान असतांच शंतनु मृत्यु पावला. तेव्हां भीष्मानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें चित्रांगदाला राज्यावर बसविलें. पण लवकरच एका युद्धांत एका गंधर्वानें चित्रांगदाला ठार मारलें. तेव्हां भीष्मानें विचित्र-वीर्याला. राज्यावर बसविलें आणि आपण केवळ कारभारी या नात्यानें राहून राज्य उत्तम प्रकारें चालविलें. पुढें विचित्रवीर्य मोठा झाल्यावर त्याच्या लग्नाचा विचार सुरू झाला. इतक्यांत काशीराजानें आपल्या तीन मुलींचें स्वयंवर एकदम करण्याचें ठरविलें. तेव्हां भीष्म त्या स्वयंवराला गेला. तेव्हां तेथें त्या मुलींनीं हा पहा आजन्म ब्रह्मचारी राहाणारा स्वयंवराला आला! असें म्हणून भीष्माची थट्टा केली, तेव्हां भीष्मानें त्या तिघींना उचलून रथांत घालून घरीं आणल्या. त्याला कांहीं राजे आडवे आले. पण भीष्मानें त्यांचा पराभव केला, आणि त्या तीनहि मुली आपला धाकटा भाऊ विचित्रवीर्य याला अर्पण केल्या, आणि आतां लग्नाचा समारंभ होणार तों त्यांतली थोरली मुलगी अंबा भीष्माकडे गेली, व हात जोडून प्रांजलपणानें म्हणाली, 'महाराज मीं मनानें शाल्व राजाला वरिलें आहे.' तेव्हां भीष्मानें उदारपणानें तिला शाल्वाकडे जाण्याची संमती दिली. मग उरल्या दोघी अंबिका व अंबालिका. त्यांचें विचित्रवीर्याशीं लग्न लागलें.

पण दुर्दैवानें विचित्रवीर्यालाहि तरुणपणींच मृत्यु आला. मग आतां काय करावें? राज्याला धनी कोण? तेव्हां राज्यांतील विद्वान् धर्मज्ञ लोकांची संमति घेऊन, सत्यवतीनें आपला पूर्वीचा पुत्र व्यासऋषी याला निमंत्रण केलें. आणि विचित्रवीर्याच्या दोघां विधवांचा त्याच्याशीं पुनर्विवाह केला. नंतर या पुनर्विवाहापासून अंबिकेला पुत्र झाला पण तो जन्मांध निघाला. त्याचें नांव धृतराष्ट्र. फिरून चिंता उत्पन्न झाली ती अशी कीं, जन्मांध हा राज्य-पदावर बसूं शकत नाहीं. तेव्हां व्यासापासूनच अंबालिकेला पांडु नांवाचा मुलगा झाला होता. त्याला भीष्मानें राज्यावर बसविलें. तसेंच सत्यवतीची एक दासी होती तिला व्यासांपासून विदूर नांवाचा मुलगा झाला त्याला त्याच्या सेवेला दिलें.

## पांडवांचा जन्म

अशा रीतीनें राज्याला पांडू हा धनी मिळाला. त्याची राजधानी

हस्तिनापूर ही शंतनूच्या वेळेपासूनच होती. पण तिचा उदय आतां होऊं लागला. भीष्मानें पांडू राजा व हस्तिनापूरची प्रजा यांचें मुलांसारखें पालन केलें. पुढें कुंतीभोजनामक राजाची पृथा नामक मुलगी होती. तिच्या स्वयंवराला तरुण पांडू गेला. तेव्हां त्याचें रूप पाहून राजकन्येनें पांडूला वरिलें. या पृथेचें नांव कुंती असें होतें. तेंच पुढें सासरीं चालू झालें. पण कुंती ही गुणांनीं उत्तम असली तरी वर्णानें किंचित् काळीसावळी होती. म्हणून पांडूला दुसरी स्त्री करून देण्याचें ठरलें. तेव्हां मद्र देशच्या राजानें आपली सुंदर मुलगी माद्री ही पांडूला दिली. इकडे धृतराष्ट्राला त्याची पत्नी गांधारी हिच्यापासून दुर्योधन, दुःशासन इत्यादि मुलगे झाले. त्यांना कौरव म्हणत. तशीच दुःशीला नामक एक मुलगी झाली. नंतर पांडू राजा बरोबर सैन्य घेऊन परदेशाचे राजे जिंकण्याकरितां निघाला, व लवकरच दिग्विजय करून परत आला. मग शांततेच्या काळीं श्रमपरिहाराकरितां आपल्या दोघी स्त्रिया कुंती व माद्री यांना घेऊन तो हिमालय पर्वतावरील एका रम्य ठिकाणीं जाऊन राहिला. पांडू राजा असतांहि तो हिमालयावर आपल्या आवडत्या जागीं राहूनच राज्यकारभार करी. एके दिवशीं तो शिकारीला गेला. तेव्हां मृगाचें रूप घेतलेल्या एका ऋषीचा त्यानें कांहीं अपराध केला. यामुळें ऋषीनें त्याला असा शाप दिला कीं 'यापुढें तुला स्त्रीचा स्पर्श झाल्याबरोबर मृत्यु येईल.' तो शाप ऐकून पांडू व त्याच्या स्त्रिया या सर्वांना अतिशय दुःख झालें. पण शापापुढें काय करणार ! म्हणून तो टाळण्याकरितां पांडूनें तपश्चर्येला प्रारंभ करून आपला देह अतिकृश केला. तथापि आपल्याला संतती नाहीं याचेंच पांडूला फार दुःख होऊं लागलें. म्हणून त्यानें थोरली पत्नी कुंती हिला अशी आज्ञा दिली कीं, 'तूं मंत्रसिद्धी करून घे, आणि निरनिराळ्या देवतांना पाचारण करून पुत्रोत्पादन करून घे.' त्याप्रमाणें कुंतीला यमधर्मापासून युधिष्ठिर, ज्याला पुढें धर्म हें नांव मिळालें तो झाला. वायुदेवतेपासून तिला भीम, इंद्र देवतेपासून अर्जुन, असे मुलगे झाले. त्याचप्रमाणें अश्विनी कुमारांच्या कृपेनें माद्रीला नकुल व सहदेव हे दोन मुलगे झाले. हे पांचहि मुलगे जवळ जवळ सारख्या वयाचे होते. पण होणारें टळत नाहीं त्याप्रमाणें एके दिवशीं पांडूला माद्रीचा स्पर्श झाल्याबरोबर तो पूर्वीचा शाप सफळ झाला, आणि पांडूला मृत्यु आला. तेव्हां हा आपला दोष असें समजून ती

माद्री पांडूच्या मृत देहाबरोबर सती गेली. तेव्हां कुंतीलाच माद्रीच्या मुलांचें पालनपोषण आपल्या मुलांसारखें करावें लागलें व तें तिनें केलेंहि ! मग कुंतीसह हे पांच पांडुपुत्र, व पांडूच्या अस्थि घेऊन हिमालयांतील ऋषी हस्तिनापूरला गेले.

नगरचे सर्व लोक या सर्वांना सामोरे गेले. त्यांनीं मोठ्या समारंभानें आपल्या राजाच्या अस्थि हस्तिनापुरांत आणल्या. कुंती, धृतराष्ट्र, भीष्म यांनीं पांडूचें व माद्रीचें श्राद्ध केलें. आणि शेवटीं सर्व प्रकारचे पवित्र व सुगंधी पदार्थ आणि उंचीं वस्त्रें घालून त्या अस्थींचें दहन करण्यांत आलें. वास्तविक अस्थींचें दहन कसलें ? परंतु आपल्या हातानें मृताचें दहन झालें असें सर्वांना समाधान वाटावें एवढाच त्यांत हेतु होता.

अशा रीतीनें धृतराष्ट्राचीं मुलें व पांच पांडव हे एका घरांत जमले. तेव्हां व्यासांना अंतरदृष्टीनें असें दिसलें कीं, या मुलांत पुढें कलह माजून तो विकोपाला जाणार. तेव्हां त्यानें आपली आई सत्यवती इला आपल्या दोघी सुना अंबिका अंबालिका, यांना घेऊन अरण्यांत जाऊन राहण्याचा सल्ला दिला. आधींच पांडू वारल्याचें दुःख, व पुढें भावी कलागतीचें दुःख तें हवें कशाला ? हा उपदेश पटून त्या तिघी स्त्रिया अरण्यांत तपश्चर्येकरितां निघून गेल्या, आणि कांहीं दिवसांनीं तेथेंच मरण पावल्या.

इकडे हे चुलत भाऊ, प्रथम लहान वयाचे म्हणून खेळ खेळण्यांत अगदीं निमग्न असत. परंतु त्या खेळांतहि प्रथम चुरस वाढली व तिचा शेवट द्वेषांत झाला. अनेक प्रकारचे खेळ चालू असतां भीम व अर्जुन हे अत्यंत निष्णात व कुशल असे ठरूं लागले, व दुर्योधन, दुःशासन हे कमी पडूं लागले. आणि दुर्योधन जसजसा वयानें मोठा झाला तसतशी त्याला अशी बुद्धि होऊं लागली कीं, हस्तिनापूरचें हें राज्य सर्व आपणां एकट्याला मिळावें आणि पांडवांना कांहीं मिळूं नये. पण पांडव जिवंत राहिले तर ते नुसते बरोबरीचे नव्हे तर वरचढ ठरणार. म्हणून कसेंहि करून त्यांना ठार मारून नाहींसें करावें अशी दुष्ट बुद्धि दुर्योधनाला सुचूं लागली.

## ‘ चारुनि विषान्न भीमा....’

त्याप्रमाणें एके दिवशीं हीं सर्व मुलें गंगास्नानाला व जलक्रीडेला गेलीं.

या क्रीडेकरितां सुंदर सभामंडप तयार केला होता, त्यांत मेजवानीचाहि बेत केला होता. ती संधि साधून दुर्योधनानें कांहीं नोकरांना लांच देऊन त्यांच्या कडून भीमाच्या अन्नांत विष कालविलें. तें भीमाला खातांना उमगलें नाहीं. पुढें सर्व मुलें जलक्रीडेकरितां पाण्यांत शिरलीं. पुष्कळ वेळ पोहल्यावर भीमाच्या अंगांत विष भिनलें. बेशुद्धी येतेशी पाहून तो गंगातीरावरच आडो-शाला निजला. हें पाहून दुर्योधनानें त्याला लतांनीं बांधून पाण्यांत लोटून दिलें. भीम शरीरानें जड असल्यामुळें जोरानें पाण्याच्या तळाशीं गेला. त्यामुळें तेथें असलेले कांहीं सर्प त्याच्या अंगाखालीं चिरडले तेव्हां त्यांनीं व इतरांनीं भीमाच्या अंगाला कडकडून दंश केले. पण चमत्कार असा झाला कीं, या सापांचें विष हाच दुर्योधनानें चारलेल्या विषावर उतारा ठरला, व भीम सावध झाला. तेव्हां त्याला भिऊन ते साप आपला राजा वासुकी, त्याच्याकडे रक्षणाकरितां गेले. पण वासुकीचा व कुंतीचा आप्तपणा होता तो माहीत असल्यामुळें, भीम हा शत्रु नसून आपलाच आहे असें वासुकीनें ओळखलें. तेव्हां सर्वांना आनंद झाला व त्यांची भीति पळाली. मग वासुकीनें पाताळांत सांठवून ठेविलेला अमृतकुंडांतला रस भीमाला प्यावयाला दिला. तो पिऊन भीम अधिकच बलवान झाला. आणि पाताळांतच आठ दिवस झोंप काढून नंतर हस्तिनापुराला परत आला. इकडे भीम नाहींसा झाला, पण 'तो कसा' याविषयीं पांडवांची कांहीं कल्पना चालेना. आणि दुर्यो-धन तर आनंदानें मौन धरूनच बसला होता. भीमाचा शोध लागेना तेव्हां कुंती फार दुःखी झाली. पण आठ दिवसांनीं आपण होऊनच भीम प्रकट झाला. त्यानें आईला भावांना सर्व खरा प्रकार सांगितला. मात्र ही खरी गोष्ट तूर्त कोणीं कोणाजवळ बोलूं नये असें त्यांनीं शहाणपणानें आपआप-स्यांत ठरविलें. आणि जसें कांहीं झालेंच नाहीं अशा बहाण्यानें पूर्वीचा क्रम सुरू झाला.

## धनुर्विद्याभ्यास

मुलें मोठीं होऊं लागलीं तसतशी त्यांच्या शिक्षणाची काळजी भीष्माला व धृतराष्ट्राला वाटूं लागली. तेव्हां त्यांनीं प्रथम कृपाचार्यांकडून सर्व मुलांना धनुर्वेद शिकविला. इतक्यांत सुप्रसिद्ध शस्त्रास्त्रविद्येंतील आचार्य द्रोण, भार-

द्वाजाचा मुलगा, हस्तिनापुरास कांहीं हेतूनें येऊन राहिला होता त्याच्या स्वाधीन हीं सर्व मुलें करण्यांत आलीं. धनुर्विद्येच्या अभ्यासाकरितां लागणारी एक विस्तीर्ण जागा पाहून तेथें सोईचें शालागृह व वसतिगृह बांधून तें विद्यालय बनविलें. हीं सर्व मुलें व इतर कांहीं मुलें यांसह द्रोणाचार्य तेथें जाऊन राहिले आणि त्यांनीं आपापल्या विद्यांचें शिक्षण सुरू केलें. या मुलांत वृष्णी, अंधक, कर्ण इत्यादि इतर मुलेंहि होतीं. क्रमानें विद्याभ्यास होत असतां, दुर्योधन, भीम, अर्जुन व कर्ण हेच विद्येंत अधिक प्रवीण होतील, त्यांतूनहि भीम हा बळानें श्रेष्ठ ठरेल आणि कर्ण व अर्जुन यांची जवळजवळ बरोबरी होईल अशीं चिन्हें द्रोणाचार्यांना दिसूं लागलीं. तेव्हां आणखी खोलांत जाऊन द्रोणाचार्यांनीं निरनिराळ्या रीतींनीं प्रमुख शिष्यांची परीक्षा घेतली. 'माझ्या शत्रूला कोण जिंकील त्यानें तशी प्रतिज्ञा करावी' असें म्हणतांच इतर विद्यार्थी गोंधळून गेले. अर्जुन तेवढा धीटपणें पुढें झाला, व त्यानें प्रतिज्ञा केली. शरसंधान करितांना खरा एकाग्र कोण होतो याहि परीक्षेंत अर्जुनच उत्तीर्ण झाला. तेव्हां द्रोणाचार्यांनीं त्याला एकट्याला ब्रह्मशिरास्त्र शिकविलें.

विद्यालयांतील शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर सर्व जण हस्तिनापुराला परत आले. तेव्हां मुलांनीं मिळविलेली विद्या घरचीं माणसें व नागरिक यांच्या दृष्टीला घालून त्यांजकडून त्यांचें कौतुक करवावें या हेतूनें, नगराबाहेर एक अत्यंत शोभिवंत अशी रंगभूमि तयार करण्यांत आली. तेथें प्रत्येकानें स्वतंत्रपणें आपलें चातुर्य प्रकट केलेंच, पण जोड्या लावून मुलांमुलांत सामनेहि करविण्यांत आले. त्यांतहि अर्जुनाची सरशी दिसून आली. एका सामन्यांत अर्जुन व कर्ण यांची चुरस लागली. इतक्यांत दैवयोगानें कर्णाचा मानलेला बाप जो सूत (कोळी) त्याला कर्णाचें कौतुक वाटून त्यानें कर्णाजवळ जाऊन त्याला पुत्राप्रमाणें आलिंगन दिलें, व धन्यतेचे उद्‌गार काढले. तेव्हां कर्ण हा अर्जुनाशीं सामना करण्याला योग्य असा राजपुत्र नाहीं अशी कांहीं पक्षपाती लोकांनीं तक्रार केली. परंतु दुर्योधन व कर्ण यांचा प्रथमपासून जिव्हाळ्याचा स्नेह जमलेला असल्यामुळें, कर्णाची मानहानि होऊं नये म्हणून दुर्योधनानें कर्णाला जागच्या जागीं अंग देशाचें राज्य देऊन अभिषेकहि केला !

तात्पर्य, प्रहर दोन प्रहरची मोठी करमणूक नागरिकांना झाली. घरच्या

नायकांना मुलांच्या शस्त्रास्त्रविद्येतील प्रवीणता पाहून कौतुक वाटलें. असे उत्तम शिष्य आपणाला मिळाल्याबद्दल द्रोणाला धन्यता वाटली. अशा शिष्यांना योग्य शिक्षण दिल्याबद्दल सर्वांनीं द्रोणाला धन्यवाद दिले. परंतु परिणामीं मुलांमुलांतील, भावांभावांतील, द्वेषानें चांगलेंच मूळ धरिलें. पांडवांना आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली. उलट, पुढील भांडणांत कर्णासारखा एक बलाढ्य वीर आपल्या पक्षाला मिळाला असें दुर्योधनाला समाधान वाटलें.

## कुंतीनें ओळखिलें

रंगभूमीवरील हे खेळ चालू असतां दैवयोगानें एक गोष्ट मात्र हृदय-स्पर्शी झाली. ती अशी कीं, रंगभूमीवर आलेल्या कर्णाला कुंतीनें हा आपला मुलगा म्हणून ओळखलें. परंतु तो फार दिवसांनीं दृष्टीस पडल्याचा आनंद तिला प्रकट करवेना. यामुळें सुखदुःखात्मक भावनांनीं मन व्यापलेली अशी कुंती रंगभूमीवरून घरीं गेली.

या मोठ्या राजघराण्यांत त्या मुलांना शिक्षण देऊन भीष्म धृतराष्ट्र यांच्याकडून द्रोणांनीं शाबासकी मिळविलीच. पण या शिक्षणकार्याचा उप-योग स्वतःच्या एक हेतु साधण्याकडे करून घेण्याचें द्रोणानें योजिलें. त्याचा प्रकार असा. द्रोण हस्तिनापुरास येण्यापूर्वी पांचाल देशाचा राजा द्रुपद यानें द्रोणाचा अपमान केला होता. त्याचा सूड उगवण्याच्या कामीं आपण या आपल्या वीर क्षत्रीय शिष्यांचें साहाय्य घ्यावें असा विचार द्रोणाच्या मनांत आला. आणि या शिष्यांनीं देण्याच्या गुरुदक्षिणेचा प्रश्न निघाला तेव्हां द्रोण शिष्यांना म्हणाले 'मला तुमच्याकडून एकच दक्षिणा पाहिजे ती ही कीं तुम्ही माझा शत्रु जो द्रुपद राजा याला पकडून माझ्या स्वाधीन करावें.' आपली विद्या कसोटीला लावण्याची ही एक चांगली संधि मिळाली असें पाहून त्या सर्वांनींहि होय म्हटलें. त्यांना घेऊन द्रोण द्रुपदावर चालून गेला. त्यांत प्रथम दुर्योधनादि कौरव पुढें सरसावले पण मार खाऊन परत आले. मग अर्जुन पुढें गेला. त्यानें द्रुपदाच्या सैन्याचा पराभव केला. त्याच्या रथावर चढून द्रुपदाला बंदिवान केलें, आणि द्रोणाच्या समोर आणलें. तेव्हां

द्राजाचा मुलगा, हस्तिनापुरास कांहीं हेतूनें येऊन राहिला होता त्याच्या स्वाधीन हीं सर्व मुलें करण्यांत आलीं. धनुर्विद्येच्या अभ्यासाकरितां लागणारी एक विस्तीर्ण जागा पाहून तेथें सोईचें शालागृह व वसतिगृह बांधून तें विद्यालय बनविलें. हीं सर्व मुलें व इतर कांहीं मुलें यांसह द्रोणाचार्य तेथें जाऊन राहिले आणि त्यांनीं आपापल्या विद्यांचें शिक्षण सुरू केलें. या मुलांत वृष्णी, अंधक, कर्ण इत्यादि इतर मुलेंहि होतीं. क्रमानें विद्याभ्यास होत असतां, दुर्योधन, भीम, अर्जुन व कर्ण हेच विद्येंत अधिक प्रवीण होतील, त्यांतूनहि भीम हा बळानें श्रेष्ठ ठरेल आणि कर्ण व अर्जुन यांची जवळजवळ बरोबरी होईल अशीं चिन्हें द्रोणाचार्यांना दिसूं लागलीं. तेव्हां आणखी खोलांत जाऊन द्रोणाचार्यांनीं निरनिराळ्या रीतींनीं प्रमुख शिष्यांची परीक्षा घेतली. ' माझ्या शत्रूला कोण जिंकील त्यानें तशी प्रतिज्ञा करावी ' असें म्हणतांच इतर विद्यार्थी गोंधळून गेले. अर्जुन तेवढा धीटपणें पुढें झाला, व त्यानें प्रतिज्ञा केली. शरसंधान करितांना खरा एकाग्र कोण होतो याहि परीक्षेंत अर्जुनच उत्तीर्ण झाला. तेव्हां द्रोणाचार्यांनीं त्याला एकट्याला ब्रह्मशिरास्त्र शिकविलें.

विद्यालयांतील शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर सर्व जण हस्तिनापुराला परत आले. तेव्हां मुलांनीं मिळविलेली विद्या वरचीं माणसें व नागरिक यांच्या दृष्टीला घालून त्यांजकडून त्यांचें कौतुक करवावें या हेतूनें, नगराबाहेर एक अत्यंत शोभिवंत अशी रंगभूमि तयार करण्यांत आली. तेथें प्रत्येकानें स्वतंत्रपणें आपलें चातुर्य प्रकट केलेंच, पण जोड्या लावून मुलांमुलांत सामनेहि करविण्यांत आले. त्यांतहि अर्जुनाची सरशी दिसून आली. एका सामन्यांत अर्जुन व कर्ण यांची चुरस लागली. इतक्यांत दैवयोगानें कर्णाचा मानलेला बाप जो सूत (कोळी) त्याला कर्णाचें कौतुक वाटून त्यानें कर्णाजवळ जाऊन त्याला पुत्राप्रमाणें आलिंगन दिलें, व धन्यतेचे उद्‌गार काढले. तेव्हां कर्ण हा अर्जुनाशीं सामना करण्याला योग्य असा राजपुत्र नाहीं अशी कांहीं पक्षपाती लोकांनीं तक्रार केली. परंतु दुर्योधन व कर्ण यांचा प्रथमपासून जिव्हाळ्याचा स्नेह जमलेला असल्यामुळें, कर्णाची मानहानि होऊं नये म्हणून दुर्योधनानें कर्णाला जागच्या जागीं अंग देशाचें राज्य देऊन अभिषेकहि केला!

तात्पर्य, प्रहर दोन प्रहरची मोठी करमणूक नागरिकांना झाली. घरच्या

वायकांना मुलांच्या शस्त्रास्त्रविद्येतील प्रवीणता पाहून कौतुक वाटलें. असे उत्तम शिष्य आपणाला मिळाल्याबद्दल द्रोणाला धन्यता वाटली. अशा शिष्यांना योग्य शिक्षण दिल्याबद्दल सर्वांनीं द्रोणाला धन्यवाद दिले. परंतु परिणामीं मुलांमुलांतील, भावांभावांतील, द्वेषानें चांगलेंच मूळ धरिलें. पांडवांना आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली. उलट, पुढील भांडणांत कर्णासारखा एक बलाढ्य वीर आपल्या पक्षाला मिळाला असें दुर्योधनाला समाधान वाटलें.

## कुंतीनें ओळखिलें

रंगभूमीवरील हे खेळ चालू असतां दैवयोगानें एक गोष्ट मात्र हृदयस्पर्शी झाली. ती अशी कीं, रंगभूमीवर आलेल्या कर्णाला कुंतीनें हा आपला मुलगा म्हणून ओळखलें. परंतु तो फार दिवसांनीं दृष्टीस पडल्याचा आनंद तिला प्रकट करवेना. यामुळें सुखदुःखात्मक भावनांनीं मन व्यापलेली अशी कुंती रंगभूमीवरून घरीं गेली.

या मोठ्या राजघराण्यांत त्या मुलांना शिक्षण देऊन भीष्म धृतराष्ट्र यांच्याकडून द्रोणांनीं शाबासकी मिळविलीच. पण या शिक्षणकार्याचा उपयोग स्वतःचा एक हेतु साधण्याकडे करून घेण्याचें द्रोणानें योजिलें. त्याचा प्रकार असा. द्रोण हस्तिनापुरास येण्यापूर्वी पांचाल देशाचा राजा द्रुपद यानें द्रोणाचा अपमान केला होता. त्याचा सूड उगवण्याच्या कामीं आपण या आपल्या वीर क्षत्रीय शिष्यांचें साहाय्य घ्यावें असा विचार द्रोणाच्या मनांत आला. आणि या शिष्यांनीं देण्याच्या गुरुदक्षिणेचा प्रश्न निघाला तेव्हां द्रोण शिष्यांना म्हणाले ‘ मला तुमच्याकडून एकच दक्षिणा पाहिजे ती ही कीं तुम्ही माझा शत्रु जो द्रुपद राजा याला पकडून माझ्या स्वाधीन करावें.’ आपली विद्या कसोटीला लावण्याची ही एक चांगली संधि मिळाली असें पाहून त्या सर्वांनीहि होय म्हटलें. त्यांना घेऊन द्रोण द्रुपदावर चालून गेला. त्यांत प्रथम दुर्योधनादि कौरव पुढें सरसावले पण मार खाऊन परत आले. मग अर्जुन पुढें गेला. त्यानें द्रुपदाच्या सैन्याचा पराभव केला. त्याच्या रथावर चढून द्रुपदाला बंदिवान केलें, आणि द्रोणाच्या समोर आणलें. तेव्हां

द्रोणानेंहि मन मोठें करून त्याला कोणतीहि शिक्षा केली नाहीं. त्याचें अर्धें राज्य त्याला परत दिलें व जुनें मित्रप्रेम पुनः प्रस्थापित केलें.

## कणिक नीति ✻ ✻ ✻

या आणि इतर पराक्रमांनीं अर्जुनानें सर्व कौरवपांडवांतील श्रेष्ठ वीर अशी कीर्ति मिळविली. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, धृतराष्ट्र पूर्वी पांडवांवर आपल्या मुलांसारखें प्रेम करीत होता, आणि त्यामुळें धर्माला युवराजपद द्यावें असेंहि त्यानें ठरविलें होतें, पण तो त्याचा विचार बदलूं लागला. पांडव पराक्रमी व सत्ताधीश झाले तर दुर्योधनादि आपल्या मुलांचें काय होईल याची चिंता त्याला वाटूं लागली. त्यानें कणिक नांवाच्या विद्वान् ब्राह्मणाचा सल्ला घेतला. हा ब्राह्मण राजनीति, लोकव्यवहार, मनुष्यस्वभाव या गोष्टी उत्तम जाणणारा होता. त्यानें धृतराष्ट्राला असा कानमंत्र सांगितला कीं, 'स्वार्थसाधू मनुष्यानें आपला हेतु मनांत गुप्त ठेवावा, शत्रूशीं तोंडावर फार गोड बोलत जावें पण मनांत कपटाच्या योजना चालू ठेवाव्या.' हा उपदेश धृतराष्ट्राला पसंत पडून यापुढें पांडवांशीं तसें वागावयाचें त्यानें ठरविलें. आजपर्यंत पांडवांशीं वैर करण्याची गोष्ट दुर्योधनानें काढली कीं, ती धृतराष्ट्राला खपत नसे. राग येई. पण यापुढें असें होऊं लागलें कीं पांडवांना त्रास देणें, त्यांचा नाश करणें, अशाविषयीं कांहीं योजना दुर्योधनानें पुढें आणल्यास धृतराष्ट्र तिला संमति देऊं लागला.

पुढें दुर्योधनानें शकुनीच्या साहाय्यानें असें योजिलें—कीं, पांडवांसह कुंतीला कोठें तरी आगींत जाळून मारावें. पण दासीपुत्र विदुर धृतराष्ट्राच्या घरीं राहात असे. तो कौरवांच्या आश्रयाला असला तरी मनांतून पांडवांचें कल्याण चिंतणारा होता. त्याला या गुप्तकटाची बातमी समजली.

## लाक्षागृहवास ✻ ✻ ✻

जवळच वारणावत नांवाचें एक नगर होतें. त्यांत जाऊन राहावें असें पांडवांच्या मनांत आहे असें जाणून, धृतराष्ट्रानें त्याला दुष्ट हेतूनें संमति दिली व त्या नगरींत पांडव जाऊन राहिल्यावर तेथें त्यांना जाळून मारावें असें दुर्योधनानें योजिलें. पुरोचन नांवाचा एक राक्षसी मनुष्य दुर्योधनाचा

परम मित्र होता. त्याला बोलावून दुर्योधनानें पांडवांना राहण्याकरितां एक घर बांधण्यास सांगितलें. त्याचें बांधकाम सर्व लाखेसारख्या ज्वालाग्राही, म्हणजे ठिणगी पडतांच पेटेल अशा, सामानानें बांधावें असें ठरविलें. इकडे पांडवांना यांतील कांहींच माहीत नव्हतें. पण ते वारणावताला निघाले तेव्हां या लाखेच्या घराची बातमी विदुराला समजल्यावरून त्यानें ती हळूच धर्म-राजाच्या कानांत सांगितली. ती कुंतीलाहि कळाली. पण यांतील बाहेर कांहीं उमगूं न देतां पांडव वारणावतांत जाऊन त्या लाखेच्या घरांतच राहिले. मनांत हेतु हा कीं कपटानेंच कपटाचा पराभव करूं. मग विदुरानें पाठवि-लेल्या एका जाणत्या मनुष्याच्या साहाय्यानें धर्मानें तळघरांतून दूरवर जाणारी एक वाट खोदून काढली व तिच्या साहाय्यानें अमावास्येच्या आदल्या रात्रीं ते सर्व—पांडव व कुंती त्या गुप्त वाटेनें बाहेर पडले. पलीकडे गंगातीरावर त्यांच्याकरितां विदुरानें एक नाव आधींच तयार करून ठेवली होती. तींत बसून ते गंगापार झाले. इकडे एक भिल्लीण आपल्या पांच मुलांना घेऊन त्या लाखेच्या घरांत येऊन त्या रात्रीं निजली होती. पण कोण निघून गेलें कोण आंत आहे हें माहीत नसल्यानें, पुरोचनानें त्या लाखेच्या घराला आग लावली. आणि ती विझल्यावर आंत सांपडून मेलेल्या त्या भिल्लीणीचीं व तिच्या पांच मुलांचीं प्रेतें हींच कुंतीचीं व पांडवांचीं प्रेतें असें समजून पुरोचनानें ती बातमी हस्तिनापुरला पोंचविली. तेव्हां धृतराष्ट्र दुर्योधन यांनीं वरकरणीं मोठ्या दुःखाचें सोंग केलें. शोक केला. डोळ्यांतून पाणी काढलें. आणि मोठ्या दिमाखानें मृतांचें उत्तरकार्यहि केलें. राजधानींतल्या लोकांना मात्र पांडव खरेच मेले असें वाटून त्यांनीं फार शोक केला. विदुराला खरें काय तें माहीत असल्यामुळें त्यानेंहि वरकरणी शोक केला, पण पांडव वचावल्याचा आनंद मनांत मानून तो धृतराष्ट्रादिकांना हंसत होता.

गुप्तपणा राखण्याकरितां पांडव एकदम घोर अरण्यांत शिरले. प्रवास करीत असतां त्यांना श्रमानें मूर्च्छा येई. भूक लागे. प्यायला पाणी वेळेवर मिळत नसे. जमिनीवर पडून झोंपावें लागे. या अरण्यांत हिडिंब नांवाचा राक्षस व त्याची बहीण हिडिंबा होती. राक्षसाला पांडवांचा वास येऊन त्यांना पकडून नेण्याकरितां भावानें बहिणीला पाठविलें. भावांना व आईला झोंप घेण्यास सांगून भीम जागा राहून पहारा करीत होता. तो हिडिंबेच्या दृष्टीस

पडला. त्याचें तें शरीर व कांती पाहून तिचें मन त्याच्यावर बसलें. तिनें एका सुंदर तरुण स्त्रीचें रूप घेतलें व भीमाजवळ येऊन म्हणाली 'माझा तूं स्वीकार कर. आपण दोघे पळून दूर जाऊं. म्हणजे या अरण्यांत जो एक दुष्ट राक्षस आहे त्याच्यापासून तुझा बचाव होईल.' इतक्यांत बहिणीचा शोध काढीत हिडिंब राक्षस स्वतःच तेथें आला. तेव्हां त्याचें व भीमाचें युद्ध जुंपलें. त्यांत हिडिंब मरण पावला. मग भीमानें हिडिंबेवरहि हात उगारला असें पाहतांच ती कुंतीला शरण गेली. तेव्हां तिच्या व धर्माच्या मागण्यावरून भीमानें तिला आपली बायको करून घेतली. पांडव निर्भयतेनें त्या अरण्यांत राहूं लागले. भीमापासून हिडिंबेला एक मुलगा झाला. त्याचें नांव घटोत्कच असें ठेवलें. नंतर पांडवांना व्यासाचें दर्शन घडलें व व्यासांच्या उपदेशावरून पांडव तें अरण्य सोडून एकचक्रा नांवाच्या नगरांत जाऊन राहिले.

## बकासुरवध

या नगरींत त्यांनीं एका ब्राह्मणाच्या घरीं बिऱ्हाड केलें. नित्यक्रम असा कीं, मुलें भिक्षा मागून धान्य आणीत तें कुंती शिजवून त्यांना घाली. तें खाऊन मग ते पांडव रानावनांत जाऊन शिकार किंवा करमणूक करून वेळ घालवीत. एके दिवशीं भीम घरीं आला. तेव्हां त्याला घरांत ब्राह्मणाच्या कुटुंबांतील मुलें माणसें रडताहेत असें दिसलें. तेव्हां कुंतीकडून त्याचा शोध काढतां त्याला कळलें तें असे : त्या नगराचा राजा बक नांवाचा राक्षस इतर रीतीनें चांगला असला तरी त्याला माणसाचें मांस खायला आवडे. म्हणून 'नगरांतल्या लोकांनीं आपापल्या पाळ्या ठरवून एक मनुष्य राजाला खाण्याकरितां पुरवावा,' असा नियम त्यानें लावून दिला होता. ती पाळी आज या ब्राह्मणाच्या कुटुंबावर आली. हें पांडवांना प्रथमच कळलें. कुंतीला फार वाईट वाटलें. तेव्हां भीम म्हणाला, 'थांबा. या कुटुंबांतल्या कोणा माणसांएवजीं आज मीच जातों. आणि मला राक्षसानें खाण्याएवजीं मीच त्याला मारून टाकतों. म्हणजे या कुटुंबाचेंच काय या सगळ्या नगराचें दुःख नाहींसें होईल.' त्याप्रमाणें ठरलें. आणि भीम व बक राक्षस यांची गांठ पडल्यावर भीमानें त्याला ठार मारून रात्रीं त्याचें प्रेत नगराच्या मुख्य द्वाराजवळ आणून

टाकलें. लोकांना तें पाहून प्रथम कांहीं कळेना, पण मग सर्व हकीकत त्यांना समजली. एकचक्रा नगरच्या प्रजेचें भय कायमचें नाहींसें झालें. तेव्हां त्यांनीं एक ब्रह्मोत्सव केला.

नंतर एके दिवशीं पांचाल देशाहून एक ब्राह्मण पांडव राहत त्या घरीं आला. त्याकडून त्यांना असें कळलें कीं पांचाल देशाचा राजा द्रुपद यानें आपली मुलगी कृष्णा—द्रौपदी—इचें स्वयंवर योजिलें आहे. पांडवांना वाटलें कीं एकचक्रा नगरींत कंटाळा येण्याइतका मुक्काम झाला तेव्हां पांचाल नगरीला जाऊन स्वयंवराची मौजहि पाहावी. कोठेंतरी तूर्त गुप्त वेषानेंच राहायचें खरें! कुंतीलाहि हा विचार पसंत पडला. त्याप्रमाणें ती सर्व मंडळी निघाली. वाटेंत सोमाश्रयायण नांवाच्या तीर्थावर चित्ररथ गंधर्व क्रीडा करीत होता. त्यानें पांडवांना पाहातांच, आपल्या क्रीडेंत विघ्न आणलें म्हणून रागानें त्यांच्यावर शस्त्र उचललें. तेव्हां अर्जुनानें त्याचा पराभव केला. पण गंधर्व स्त्रीच्या विनंतीवरून चित्ररथाला प्राणदान दिलें. चित्ररथानेंहि उलट उपकार म्हणून अर्जुनाला चाक्षुणी नांवाची विद्या दिली. अर्जुनानें गंधर्वाला अग्नि अस्त्र दिलें. गंधर्वानें अर्जुनाला दिव्य घोडे दिले. अशा रीतीनें मार्गातील विघ्न टळून उलट अस्त्रलाभ व अश्वलाभ झाल्यानें आनंदित होऊन पांडव उत्कोचक तीर्थावर गेले. तेथें त्यांची व धौम्यनामक ऋषीची गांठ पडली. त्या ऋषींची योग्यता लक्षांत आणून आपला कुल पुरोहित म्हणजे उपाध्याय होण्याविषयीं पांडवांनीं ऋषीला विनंति केली व त्यानेंहि ती मान्य केली. मग द्रौपदीच्या स्वयंवराला जाण्याकरितां पांडव पुढें निघाले.

## द्रौपदीस्वयंवर

पांचाल नगरींत पांडवांनीं ब्राह्मण वेषानें एका कुंभाराच्या घरीं बिऱ्हाड केलें. तेथेंहि ते भिक्षाच मागत. मग बाहेर पडून हिंडणें झाल्यावर त्यांना पांचाल द्रुपद राजानें स्वयंवराकरितां उभारलेला प्रचंड शोभिवंत मंडप दिसला. स्वयंवराकरितां येण्याचा कोणीहि नामांकित असा राजा शिल्लक राहिला नव्हता. दुर्योधनादि कौरव राजपुत्र, श्रीकृष्णादि यादव राजपुत्र, तसेंच गांधार, मद्र, भोज देशचे राजेहि आले होते. पण स्वयंवर जिंकणें कठिण झालें होतें. कारण ती जिंकण्याची अट अशी होती कीं मुद्दाम तयार

केलेल्या एका प्रचंड धनुष्याला दोरी लावावी, त्यावर पांच बाण चढवावे, आणि एका फिरत्या चक्राच्या भोंकांतून ते बाण मारून एक फिरता मासा वर छताला अडकविला होता तो तोडून पाडावा. द्रुपदाचा मुलगा धृष्टद्युम्न हा आपली बहीण याज्ञसेनी (कृष्णा, द्रौपदी) इला मंडपांत घेऊन आला तेव्हां स्वयंवराच्या अटीची घोषणा झाली. पण ती ऐकतांच कांहीं राजपुत्र जागच्या जागीं थबकून बसले. कांहींनीं निराश होऊन गुडघ्यांत मान घातली. कांहीं धनुष्यापर्यंत जाऊन तें प्रचंड धूड पाहून परतले. कांहींना तें फिरतें चक्र पाहून घेरी आली. कांहींनीं धनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला पण तें उनेंच करतां येईना. कांहींनीं दोरी चढविण्याचा प्रयत्न केला त्यांत हात कापले. दोरी चढविलेलें धनुष्य सांवरेना म्हणून कोणी उलथून पडले. शिशुपाल, जरासंध, शल्य यांची तीच गति झाली. कर्णानें धनुष्याला हात घालतांच द्रौपदी गर्जून म्हणाली, 'हा कर्ण कोळ्याचा मुलगा आहे. क्षत्रिय नाहीं. मी याला वरणार नाहीं.' तेव्हां अपमान होऊन तो आपल्या जागेवर परत गेला. त्यानें मात्र कदाचित् पण जिंकला असता.

असो. नंतर ब्राह्मणांच्या मेळ्यांतून उठून अर्जुन धनुष्याकडे निघाला. तो तापसी ब्रह्मचाऱ्यासारखा दिसत होता. एकीकडून कृष्ण बळरामांनीं त्यांना ओळखलें तेव्हां त्यांना मनांतून आनंद झाला. अर्जुनानें मोठ्या लीलेनें धनुष्याला दोरी व बाण लावून तें मारून तो मासा खालीं पाडला, आणि द्रौपदीला घेऊन त्या मंडपांतून सर्वांकडे विजयी दृष्टीनें पाहात तो निघून गेला. आपला अपमान झाला म्हणून रागानें अनेक राजे पांडवांवर धावले. पण भीम व अर्जुन यांच्या पराक्रमानें त्यांचा मोड झाला. इतर ब्राह्मणहि पांडवांच्या साहाय्याकरितां आपलीं हरिणाजिनें फडफडावूं लागले!

## पांचांची पत्नी

शत्रूंचा मोड करून पंच पांडव द्रौपदीसह परत आपल्या झोपडीशीं आले. या सर्व कृत्याला फार काळ लागल्यामुळें कुंती काळजी करीत बसली होती. ते आलेलें पाहातांच तिला आनंद झाला. तिला वाटलें कीं फार वेळ हिंडून यांनीं आज मोठी भिक्षा आणली. आणि ती म्हणाली 'आलांत, बरं झालं! आणलेली भिक्षा तुम्हां पांच जणांत वांटून घ्या नेहमींसारखी.'

पण आज भिक्षा नसून मुलांनीं स्त्री जिंकून आणली आहे हें पाहातांच आपण बोलून गलों याचें तिला वाईट वाटलें. धर्महि अर्जुनाला म्हणाला 'तूं जिंकून आणलीस ती नवरी एकटाच घे.' पण अर्जुन म्हणाला 'आईचा शब्द खोटा पडतां कामा नये. म्हणून ती आपणां पांचहि जणांची धर्मपत्नी होईल.'

नंतर पांडवांच्या घराचा शोध काढीत बरोबर द्रुपदाला घेऊन श्रीकृष्ण व बळराम तेथें आले. त्यांनीं कुंतीला नमस्कार केला. कुंती म्हणाली ' अरे, आम्ही गुप्तपणें ब्राह्मण वेषानें हिंडत आहों. मग आमचा पत्ता तुम्हांला कसा लागला?' द्रुपद म्हणाला ' त्यांत काय कठीण ? तेजस्वी माणसें झांकता झांकत नाहींत.' पण अजूनहि पांडवांनीं असेंच गुप्त राहाणें इष्ट आहे असें ठरवून, व पांडवांचा निरोप घेऊन, कृष्ण बळराम परत गेले. त्या रात्रीं धृष्टद्युम्न यानें एक युक्ति केली. हे तेजस्वी ब्राह्मण खरे कोण याचा कांहीं शोध लागावा म्हणून तो रात्रीं अंधारांत झोपडीजवळ येऊन गुप्तपणें बसला व आंतील सर्व बोलणें चालणें त्यानें ऐकलें. त्यावरून त्याची खात्री झाली कीं हे पांडवच होत. तें त्यानें परत जाऊन द्रुपदाला सांगितलें. त्यालाही आनंद झाला. कारण द्रौपदी अर्जुनाला द्यावी असें मनांत असतां कांहीं काळापूर्वी पांडव लाखच्या घरांत जळून मेले असें त्यानें ऐकलें होतें. मग त्यानें दुसरे दिवशीं त्या सर्वांना राजवाड्यांत मेजवानीला बोलावलें, आणि सर्व वेळ त्यांच्यावर बारीक दृष्टि ठेवून ते ब्राह्मण नसून क्षत्रिय आहेत अशी खात्री झाल्यावर त्यानें त्या पाहुण्यांना स्पष्ट प्रश्नच केला. धर्मानें सर्व खरें होतें तें सांगितलें. तेव्हां आपली मुलगी पडायची तिथेंच पडली असें पाहून त्याला संतोष झाला. पण एक स्त्री पांचांची पत्नी कशी होणार अशी शंका द्रुपदानें काढली. तिचेंहि निवारण धर्मानें केलें. तो म्हणाला, 'आम्ही जुन्या चालीचे लोक. आईच्या तोंडून चुकून शब्द गेला तरी तो खरा करणें इतकेंच आम्ही जाणतों.' इतक्यांत व्यास ऋषीहि तेथें आले. त्यांनीं पांच पांडव व द्रौपदी या सर्वांच्या पूर्व जन्माचा दैवी वृत्तांत सांगितला. तेव्हां जें झालें तें असेंच व्हावयाचें होतें आणि झालें तें योग्यच झालें अशी द्रुपदाची खात्री झाली. शिवाय व्यासाच्या आशीर्वादानें द्रौपदी प्रतिदिवशीं नव कुमारीच होत असे. असो. सर्व शंकानिवृत्ति झाल्यावर धौम्य पुरोहितानें लग्नविधि

२

यथासांग करवून प्रत्येक पांडवाकडून द्रौपदीचें वेगवेगळें पाणिग्रहण करविलें. द्वारकेकडून श्रीकृष्णानें मोठा मौल्यवान आहेर पाठविला.

मग पांडवांनींच द्रौपदीच्या स्वयंवराचा पण जिंकला अशी बातमी बाहेर फुटली. तोंपर्यंत पांडव हे जळून मेले अशीच सर्वांची समजूत असल्यानें या नव्या वार्तेनें जिकडे तिकडे लोकांना आश्चर्य वाटलें. दुर्योधनादि कौरव अत्यंत चिंतायुक्त झाले. धृतराष्ट्र वरकरणीं पांडव जीवंत आहेत असें ऐकून आनंद झाल्याचें दाखवी पण मनांतून तो फार खिन्न झाला. दुर्योधनादिकांनीं तर पांडवांचा नाश कसा होईल याचा पुन्हां विचार सुरू केला. कसेंहि असलें तरी पांडवांना परत घरीं बोलावणें आतां प्राप्तच झालें म्हणून धृतराष्ट्रानें त्या कामीं विदुराची योजना केली. विदूर गेला व त्यानें द्रुपदाच्या संमतीनें पांडवांना परत आणलें. मग न्यायबुद्धि व व्यवहारज्ञान यांचा देखावा करून धृतराष्ट्र पांडवांना म्हणाला "बाबारे, तुम्ही मला मुलांसारखेंच आहां. पण कुटुंबकलह हा वाईट असतो व टळत नाहीं तरी आतां असें करा; मी तुम्हांला अर्धे राज्य देतों तें घ्या. मात्र तुम्ही वेगळे राहणें हेंच बरें याकरितां यापुढें येथें न राहतां खांडवप्रस्थाला जाऊन राहावें हें बरें. पांडवांनाहि हा विचार पसंत पडला. कारण कौरवांशीं आपण होऊन विनाकारण कलह चालू ठेवावा हें त्यांना नको होतें. त्यांनीं उपद्रव दिलाच तर प्रतिकार. नाहीं तर त्याच्याशीं आपलें काय कर्तव्य आहे? असा पोक्त विचार करून पांडव खांडवप्रस्थाला निघून गेले.

मग तेथें त्यांनीं नव्या नगर स्थापनेचा बेत योजून त्याची आंखणी मापणी केली. कांहीं दिवसांनीं तें नगर बांधूनहि झालें. त्यांत नवी वस्ती केली. सुखानें राहाण्याच्या व रक्षणाच्या सर्व सोई केल्या. व्यापारी येऊन त्यांनीं बाजार पेठा सजविल्या. क्रीडोद्यानें, कृत्रिम सरोवरें केलीं. आमराया लावल्या. मंदिरें बांधलीं. अशा रीतीनें पूर्वी पांडव गंगेच्या कांठीं राहात होते ते आतां यमुनेच्या कांठचे रहिवासी झाले. पांडव नव्या राजधानींत सुस्थापित झाल्यावर श्रीकृष्ण बळराम हे येऊन चार दिवस राहून त्यांच्याशीं अनेक विषयावर बोलून द्वारकेला परत गेले. मागाहून नारदमुनी येऊन गेले. त्यांनीं पांडवांना एका विशेष गोष्टीविषयीं उपदेश केला कीं द्रौपदी ही पांचापतींची पत्नी म्हणून तिच्या संबंधांत तुम्हां भावाभावांमध्यें भेदभाव

जितका न होईल व एकोपा राहील तितकें चांगलें. कारण पूर्वी सुंदोपसुंद हे राक्षस भाऊ आधींच बलाढ्य व ऐक्यभावानें अधिक उन्मत्त झाल्यामुळें त्यांच्यामध्यें फूट पाडण्याकरितां हीच एक युक्ति करावी लागली कीं, दोघां भावांचें एकाच स्त्रीवर मन बसावें आणि त्या चुरशीमुळें त्यांनीं एकमेकांचा घात करावा. या उपदेशाप्रमाणें पांडवांनीं आपणांकरितां असा नियम केला कीं आपणांपैकीं कोणीहि एक द्रौपदीशीं बसून एकांत करीत असेल तेव्हां दुसऱ्या कोणीं तिकडे जाऊं नये.

## नियम मोडला !

पण योग असा आला कीं, हा नियम अर्जुनाला मोडावा लागला. एक दिवस एक ब्राह्मण पांडवांच्या राजधानीला आला, व अर्जुनाकडे जाऊन रडत रडत असें सांगूं लागला कीं, 'माझ्या गाई चोरांनीं पळविल्या. त्यामुळें माझी यज्ञकर्में अडून बसलीं आहेत. तरी त्या मला परत मिळवून द्याव्या.' अर्जुनानें लगेच त्याला आश्वासन दिलें आणि आपलें धनुष्य व बाणाचा भाता आणण्याकरितां तो शस्त्रें ठेवण्याच्या जागीं गेला. तों तेथें धर्म व द्रौपदी हीं एकांतीं बोलत बसलीं होतीं. तो तसाच पुढें होऊन त्यानें आपलीं आयुधें आणलीं. चोरांचा पाठलाग करून गाई सोडवून आणून ब्राह्मणाला दिल्या. पण एकांताविषयींच्या नियमभंगाचें पाप लागलें. त्याचें प्रायश्चित्त घेण्याकरितां, धर्म नको नको म्हणत असतां, अर्जुन हा वनवासाकरितां बाहेर पडला. आणि गंगेकाठच्या प्रदेशांत गेला. एके दिवशीं गंगेंत स्नान करून बाहेर पडणार तोंच उलूपी नामक एका नागकन्येनें त्याला पाहिलें, आणि त्याच्या रूपावर मोहीत होऊन तिनें त्याला पाताळांत ओढून नेलें. तेव्हां त्यानें एक रात्र तिच्या घरीं मुक्काम केला. उलूपी संतुष्ट झाली व तिनें त्याला वर दिला कीं, यापुढें तुला कोठेंहि पाण्यापासून धोका होणार नाहीं, व सर्व जलचर तुला वश राहतील.

नंतर अर्जुन अनेक प्रदेश हिंडत, तीर्थक्षेत्रें यांना भेट देत देत थेट पूर्वेस मणीपूरच्या राजधानीला पोंचला. नगरा बाहेर त्याला मणीपुरच्या राजाची मुलगी चित्रांगदा ही दिसली. तिच्या रूपावर मोहीत होऊन तिच्या बापाकडे जाऊन तिच्या करितां अर्जुनानें मागणी घातली. ती त्या राजानें

मान्य केली.पण एक अट घातली कीं, तुझ्यापासून चित्रांगदेला जो पुत्र होईल. तो (म्हणजे माझा नातू) तूं मला द्यावा. कारण मला पुत्रसंतान नाहीं. माझ्या राज्याला माझ्या मागें कोणी धनी हवा. अर्जुनानें ती अट मान्य केली. आणि तेथें चित्रांगदेसह तो तीन वर्षें राहिला. या अवधींत त्याला मुलगा झाला. अर्जुनानें तो आपल्या सासऱ्याला अर्पण केला व चित्रांगदेची संमति घेऊन अर्जुन तेथून निघाला.

## सुभद्राहरण

नंतर अशाच यात्रा करीत करीत अर्जुन पश्चिम समुद्राशीं गोकर्ण क्षेत्रावर आला. तेथून पुढें प्रभास क्षेत्रीं आला. तेव्हां श्रीकृष्णहि त्याला भेटण्याकरितां आला. भेटी झाल्यावर कृष्णाच्या निमंत्रणावरून दोघेहि रैवतक पर्वतावर राहण्यास गेले, व नंतर द्वारकेस गेले. तेथें असतां जवळच्या रैवतक पर्वताचा वार्षिक उत्सव सुरू झाला. उत्सवाची सर्व शोभादायक अंगें नटलीं होतीं. सर्व यादव स्त्री पुरुष उत्सवाला आले होते. त्यांत कृष्णाची उपवर बहीण सुभद्रा आली होती. तिला पहातांच अर्जुन मोहित झाला. हें पाहून कृष्णाला मनांतून आनंद झाला. कारण यावेळीं सुभद्रेच्या लग्नाच्या वाटाघाटी चालू असून बळरामाच्या मनांत ती दुर्योधनाला द्यावी असें होतें. उलट कृष्णाच्या मनांत ती अर्जुनाला द्यावी असें होतें. पण वडील भावापुढें धाकट्याचें काय चालणार ! अर्थात् अर्जुन आला तो योग्य वेळींच आला असें झालें, आणि कृष्ण अर्जुनाला मसलतींत घेऊन म्हणाला 'जुळलें. तुला सुभद्रा हवी आहे व मी ती तुलाच देणार आहे. उद्यां तिचें स्वयंवर उभें राहिलें तर काय होईल हें कोणी सांगावें ' तेव्हां उत्तम उपाय हाच कीं तूं तिला रथांत घालून पळवूनच ने म्हणजे झालें त्या योजनेंत मीच तुला साहाय्य करीन.' मग उत्सवांतील पर्वत पूजेला सुभद्रा गेली आहे असें पाहून अर्जुन मृगयेच्या मिषानें रथांत बसून बाहेर पडला. आणि पर्वताकडून सुभद्रा परत नगराकडे निघाली असतां तिला त्यानें उचलून रथांत घातलें व एकदम इंद्रप्रस्थाची वाट धरली. या अत्याचाराची बातमी सुभद्रेबरोबरच्या माणसांनीं द्वारकेंत जाऊन कळविली. तेव्हां बळरामानें नगारे वाजवून सैन्य जमा केलें. कृष्णाला विचारतां तो शांतपणें म्हणाला 'अर्जुनानें सुभद्रा

यांत कांहींच बिघडलें नाहीं. आतां तुम्ही सर्व जातां तर जा, पण युद्ध न करतां अर्जुनाची समजूत घालूनच त्याला घेऊन या. उगीच त्याच्याकडून पराभव करून आपली अपकीर्ती इंद्रप्रस्थापर्यंत जाऊं देऊं नका.'

त्याप्रमाणें सामोपचाराचीं बोलणीं होऊन अर्जुन द्वारकेला परत आला. मग त्याचें यथाविधि मोठ्या थाटानें लग्न झालें. नंतर कांहीं दिवसांनीं सुभद्रेला घेऊन तो खांडवप्रस्थाला गेला. धर्मराजाला या लग्नाची बातमी आधींच कळली होती. द्रौपदीला मात्र ती प्रथमच कळली. तेव्हां ती थट्टेनें लहानसा टोमणा मारून त्याला म्हणाली, 'ठीकच आहे. नवी नवरी मिळाली म्हणून सासुरवाडीला बरेच दिवस रमला. दुसरा प्रेमपाश आवळून घट्ट बसला म्हणजे पहिला थोडासा शिथिल व्हायचाच.' अर्जुनानेंहि तिची प्रांजलपणें क्षमा मागितली. नंतर सुभद्रा गोपकन्येचा वेष घेऊन द्रौपदीकडे गेली व नमस्कार करून म्हणाली 'मी तुमची सवत नव्हे दासी आहे.' तेव्हां द्रौपदीनेंहि तिचें सुंदर स्वरूप पाहून तिला प्रेमानें आलिंगन दिलें. नंतर बळराम व कृष्ण मोठमोठे आहेर बरोबर घेऊन खांडवप्रस्थाला गेले. आणि त्यांनीं ते अहेर वधूवरांना व इतर पांडवांना अर्पण केले. ब्राह्मणांदिकांना दानें दक्षिणा देऊन संतुष्ट केलें. उलट धर्मानेंहि कृष्णाबरोबर आलेल्या सर्व यादवांचा सत्कार करून उलट आहेर दिले. मग बळराम तेवढा परत द्वारकेला गेला. कृष्ण मागें राहिला. कारण त्याला अर्जुनाबरोबर शिकार, जलक्रीडा वगैरे करमणुकी करावयाच्या होत्या. या सुमारास सुभद्रेच्या पोटीं अभिमन्यु हा जन्मला. त्याचा चेहरा थोडासा कृष्णाच्या म्हणजे आपल्या मामाच्या वळणावर होता. द्रौपदीलाहि प्रत्येक पांडवापासून एकेक असे पांच पुत्र झाले. मग कृष्ण व अर्जुन यांनीं एकत्र खूप करमणूक केली. त्यांत गाणें बजावणें, शिकार करणें, थट्टा विनोद करणें इत्यादि सर्व प्रकार होते.

या सुमारास त्यांच्याकडे एके दिवशीं एक लठ्ठ उदराचा, पिंगट निळ्या वर्णाचा, दाढी मिशा वाढलेला एक ब्राह्मण आला. तेव्हां त्याला भोजनाचें आमंत्रण दिलें असतां तो म्हणाला, "मी खाणें सोडलें आहे. मला अतिशय तूप पिऊन अजीर्ण झालें आहे." कारण तो भिक्षुक नसून स्वतः अग्नि होता. आणि इतके यज्ञ यापूर्वी झाले कीं, त्यांतील तूप पिऊन पिऊन त्याचा मेद वाढला. 'मग तुम्हांला हवें तरी काय ?' असें विचा-

रितां ब्राह्मणरूपी अग्नि म्हणाला ' मला हें खांडववन खावयाला द्या म्हणजे मी त्यांतील सर्व सजीव निर्जीव पदार्थ खाऊन टाकीन व त्यामुळें माझा मेद झडेल. मी पूर्वी हा प्रयत्न केला होता पण या वनांत राहणाऱ्या तक्षक नागाच्या स्नेहामुळें आग पेटली कीं, इंद्र वरुणाकडून पाऊस पाडतो आणि तो विझून जाते.'' तेव्हां कृष्णार्जुन म्हणाले, ' ठीक आहे. ते आतां आम्ही पाहून घेऊं. तूं हें वन जाळण्याला प्रारंभ कर.' तें ऐकून अग्नि संतुष्ट झाला. आणि त्यानें अर्जुनाला गांडीव धनुष्य दिलें. मग खांडववन जळूं लागलें. तेव्हां मोठी भीति उत्पन्न झाली. आंतील वृक्ष जळून जमीनदोस्त होऊं लागले. आणि आंतील प्राणी सैरावैरा धावूं लागले पण कृष्णार्जुनांनीं त्यांना हुसकून परत त्या आगींतच घालविलें. पक्षी अर्थातच मरून पडले आणि अरण्यांतील विहिरी सरोवरें यांचें पाणी तापल्यामुळें सर्व जलचरहि मेले. हें पाहून इंद्रानें पाऊस पाडण्याला सुरुवात केली. तेव्हां त्याचे व कृष्णार्जुनांचें युद्ध झालें. इंद्राच्या पक्षपातानें गंधर्व यक्ष हेहि अर्जुनाशीं लढूं लागले परंतु कृष्णार्जुनांनीं त्या सर्वांचा पराभव केला. शेवटीं आग विझण्याच्या सुमारास दडून बसलेला मयासूर म्हणजे राक्षसांचा शिल्पी बाहेर पडला व कृष्णार्जुनांच्या पायां पडून त्यानें अभय मिळविलें. पंधरा दिवस खांडव वन जळत होतें. शेवटीं त्या वनचरांपैकीं अश्वसेन, मयासूर, व चार शारङ्ग पक्षी एवढेंच जिवानिशीं सुटले. खांडववन जाळून टाकण्यांत खांडवप्रस्था॰ समीप असलेली दुष्ट व हिंस्र प्राण्यांची वस्ती नाहींशी करावी आणि अरण्य साफ करून नव्या इमारती वगैरे बांधण्याला जागा करावी असा दुहेरी हेतु पांडवांचा होता. तो अग्नीच्या साहाय्यानें सफळ झाला. आणि या अग्निप्रलयांतून वाचलेला दिव्य शिल्पी त्या साफ झालेल्या जागीं हरतऱ्हेच्या बांधकामाच्या नवीन योजना करण्याला आयताच उपयोगी पडला.

## मयसभा

मग कृष्णार्जुन नदीच्या कांठीं जाऊन विश्रांति घेत बसले. तेव्हां मयासूर उभा राहून हात जोडून म्हणाला, "तुम्ही मला जीवदान दिलें तरी तुमची कांहीं सेवा करावी अशी माझी इच्छा आहे.'' अर्जुन प्रथम म्हणाला, "तसें कांहीं नाहीं. हा उपकार कसला? पण मयासुरानें अधिक आग्रह केल्यावर तो

म्हणाला, "तर मग धर्मराजाला आवडेल अशी एक सुंदर सभा निर्माण करून दे. अशी कीं, या लोकीं किंवा स्वर्ग लोकींहि तशी सभा कोणास पहाण्यास मिळू नये." मयासुरानें तें कबूल केलें आणि त्या सभेचा नकाशा तयार करून मोठ्या सुमुहूर्तावर यथाविधि पायाचा दगड बसविला. हा पाया दहा हजार हात लांब रुंद. एवढा विस्तीर्ण आंखला गेला होता.

मग कृष्ण द्वारकेला परत गेला. जातांना त्यानें आपल्या सर्व मित्रांना आलिंगन दिलें व सुभद्रेला आशीर्वाद देऊन चांगला उपदेशहि केला. इकडे मयासुरानें कांहीं काळानें बिंदु सरोवरावर जाऊन तेथून सभा सुंदर व विभूषित करण्याला अनेक रत्नें, रंग, चूर्णे, इत्यादि सामान आणलें. तसेंच कांहीं प्रकारच्या गदा वगैरे युद्ध साहित्यहि आणलें. देवदत्त नांवाचा दिव्य शंख आणला. पैकीं गदा भीमाला दिली आणि शंख अर्जुनाला दिला. सभा इतकी सुंदर निर्माण झाली कीं, तिचें वर्णनच होऊं शकत नाहीं. त्यांत एक विशेष गोष्ट त्यानें अशी केली कीं, एक बिनपाण्याचें बनावट सरोवर तयार केलें, त्यांतील कमळें, जलचर हीं सगळीं रत्नमय होतीं. दुसरें एक सरोवर असें बनविलें कीं, त्यांत खरोखरीचें पाणी असतां तें कोरडें वाटावें. या सर्व कृतीला चौदा महिन्यांवर काळ लागला. मग धर्मराजानें त्या सभेची वास्तुशांत यथाविधि केली आणि सभेंतील निरनिराळ्या भागीं देवतांची स्थापना केली. त्या प्रसंगी शेंकडों ऋषी, तापसी, राजे, स्नेहांकित क्षत्रिय इत्यादी आले होते. गंधर्व व अप्सरा यांनीं येऊन नृत्य गायनांचे कार्यक्रम केले. तात्पर्य पृथ्वीवर हा स्वर्गच निर्माण झाला.

## राजसूय यज्ञ

मग एके दिवशीं नारद मुनींची स्वारी तेथें अवतीर्ण झाली. तेव्हां त्यांना धर्मानें विचारिलें कीं, तुम्ही त्रिखंड हिंडतां तर माझ्या मयसभे-सारखी सभा कोठें पाहिली काय? तेव्हां नारद म्हणाले, "अशी सभा पृथ्वीवर नाहीं हें खरें, परंतु इतर लोकांत कांहीं आहेत" असें म्हणून त्यांनीं इंद्रसभा, वरुणसभा, यमसभा, कुबेरसभा इत्यादि सभांचें वर्णन केलें. परंतु फिरून सांगितलें कीं, पृथ्वीवर अशी सभा दुसरी नाहीं तेव्हां धर्मराजाल धन्यता वाटली. शेवटीं जातांना स्वर्ग लोकांतील पांडु राजाचा निरोप म्हणून नारदानें

धर्माला असा सांगितला कीं, तूं आतां आपल्या भावांसह राजसूय यज्ञ कर. हा यज्ञ करणें थोडें अवघड आहे. कारण त्यांत पुष्कळ विघ्नें येतात व पुढें घोर युद्धें होतात. तथापि हा यज्ञ करणें हेंच तुला आतां श्रेयस्कर आहे. इतकें बोलून नारद द्वारकेला निघून गेले. नंतर धर्मराजानें आपले भाऊ, मंत्री व राजमंत्री या सर्वांना एकत्र करून राजसूय यज्ञ करण्याविषयीं त्यांचे अभिप्राय विचारिले तेव्हां सर्वांनीं त्याला संमतीच दिली. ऋत्विज व धर्मज्ञ लोकांनींहि संमति दिली. उपाध्याय धौम्य यांनींहि संमति दिली. तथापि कृष्णाच्या संमतीशिवाय कांहीं करावयाचें नाहीं असा धर्मराजाचा निश्चय असल्यामुळें त्यानें दूत पाठवून श्रीकृष्णाला द्वारकेहून बोलाऊन आणलें व मी काय करूं हें खऱ्या मनानें सांग अशी त्याची विनवणी केली. तेव्हां कृष्ण म्हणाला कीं, धर्मा तुझ्या अंगीं सार्वभौम राजाचे गुण आहेत. सर्व यादव वीरांचे तुला साहाय्य आहे. तसेंच ठिकठिकाणीं कांहीं राजे प्रबळ व पुंड झाले आहेत. त्यांनाहि धाक लावण्याची वेळ आली आहे. म्हणून तूं या यज्ञाचा निश्चय कर. मात्र त्यांत येणाऱ्या संकटांचा परिहार करण्याची योजना वेळींच कर. हें शेवटचें वाक्य ऐकून धर्मराज मनांतून थोडा डळमळला; व यज्ञ करूं नये याकडे त्याचें मन झुकूं लागलें. विशेषतः जरासंधाची त्याला भीति वाटूं लागली. कारण त्याला जिंकल्याशिवाय सार्वभौमत्व कसें सिद्ध होणार. हें पाहून भीम व अर्जुन दोघांनींहि धर्माला धीर देऊन उत्तेजित करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, "आपणांजवळ सर्व साधनें भरपूर आहेत. आम्हीहि सामर्थ्यवान आहों. ईर्षा धरून यज्ञ मांडून सर्व शत्रूंशीं युद्ध करण्याला तयार होऊं मग काय व्हायचें तें होईल ! क्षत्रियोचित कर्म न करून भगव्या छाट्या परिधान करणें हेंच नशिबांत असेल तर तें पुढें घडून येईलच."

## जरासंध वध

मग यज्ञाचा निश्चय ठरला. पण प्रथम जरासंधाचा पराभव केला पाहिजे हें जाणून कृष्णार्जुन व भीम ह्यांनीं ती योजना हातीं घेतली आणि जरासंध ज्या देशाचा राजा होता त्या मगध देशाकडे निघाले, पण त्यांनीं क्षत्रिय वेष टाकून ब्रह्मनिष्ठ स्नातक ब्राह्मणांचा वेष घेतला. निघतांना धर्मराजानें त्यांना आशीर्वाद दिला व मोठ्या कौतुकानें त्यांजकडे पाहिलें व

धन्यता मानिली. नंतर कृष्णार्जुन व भीम जरासंघाच्या राजधानीशीं आले. पण ते राजद्वारानें न जातां चैत्यक पर्वतावरून आंतल्या अंगाला उतरले व तेथें ठेवलेल्या प्रचंड नौबदी त्यांनीं फोडून टाकल्या. मग ते तिथे नगरांत शिरले. जातांना त्यांनीं माळ्यापासून फुलें हिसकावून घेतलीं व तीं डोक्यावर अंगावर घालून अंगाला चंदन व अगरू फासून सर्व नागरिक त्यांच्याकडे कौतुकानें पहात असतां त्यांनीं राजवाड्यांत प्रवेश करून जरासंधाची गांठ घेतली. अर्जुन व भीम यांनीं मौनव्रताचें सोंग केलें. कृष्ण म्हणाला, "हे यती तुझ्याशीं मध्यरात्रीनंतर बोलतील." जरासंधानें त्यांना यज्ञशाळेंत उतरण्यास जागा दिली. मध्यरात्रीनंतर जरासंध त्यांच्या भेटीला गेला व म्हणाला "मी तुम्हांला चांगलें ओळखलें. तुम्ही ब्राह्मणांचें निवळ सोंग घतलें आहे. तेव्हां आतां तुम्ही कां आला हें खऱ्या मनानें स्पष्ट सांगा." तेव्हां कृष्ण म्हणाला "आम्ही विजयश्रीच्या हेतूनें आलों आहों. तुझें आदरातिथ्य आम्हांला घ्यावयाचें नाहीं." जरासंध म्हणाला, "पण तुम्ही माझें वैर करावें असें मी काय केलें आहे." कृष्ण म्हणाला, "तूं व्यक्तिशः आमचें कांहीं अहित केलें नाहींस. पण जगाचें अनहित व ईश्वराचा अन्याय केला आहेस कारण तूं अनेक मूर्धाभिषिक्त राजे कैदेंत घातले आहेस. आणि तूं हे बंदिवान क्षत्रिय राजे शंकराला बळी देण्याकरितां आणले आहेस. अरे, मूर्धाभिषिक्त राजा हा काय देवतेचा बळी होऊं शकतो? नर यज्ञ करून मारण्याला योग्य? त्यांचा वध वांचविण्याकरितां आम्ही येथें आलों आहों. व या कामीं आमचे प्राण गेले तरी चालतील. पण तुझ्याशीं लढूं व त्यांना सोडवूं. तुझा उन्मत्तपणा आम्ही सहन करणार नाहीं. तूं या राजांना बंधमुक्त तरी कर नाहींतर युद्धाला उभा राहा." हें ऐकून जरासंधानें युद्धाचें आव्हान स्वीकारिलें. आपला पुत्र सहदेव याला राज्याभिषेक केला. आणि निर्वाणपदावर उभा राहून भीमसेनाशीं लढण्याचें पसंत केलें. हें युद्ध बहुतेक मल्लयुद्धासारखेंच झालें. तें तेरा दिवस चालू असल्यामुळें त्यांत मल्लविद्येंतले सर्व प्रकार प्रकट झाले. त्यांचीं प्रचंड शरीरें मधुनमधून जमिनीवर कोसळत तेव्हां पर्वतावर वज्र पडल्याचा आघात होई. शेवटीं कृष्णानें सूचना करितांच भीमानें जरासंधाला उचलून खालीं फेंकून दिलें, व छातीवर गुडघा ठेवून एक तंगडी ओढून त्याचें शरीर फाडलें. आणि

ते दोन तुकडे उलटे पालटे करून नगराच्या वेशींत ठेवून दिले. नंतर कोंडून ठेवलेल्या सर्व राजांची मुक्तता केली. तेव्हां त्यांनींहि कृतज्ञपणें कृष्णार्जुनाला, भीमाला अनेक अमूल्य रत्नें अर्पण केलीं. 'युधिष्ठिर राजा राजसूय यज्ञ करणार आहे त्याला या व सहाय्य करा' असें सर्व राजांना सांगून बजावून ते तिघे गिरिव्रज नगरांतून निघून गेले, आणि जातांना त्यांनीं जरासंध पुत्राला अभय दिलें. पुढें कृष्ण द्वारकेला निघून गेला. त्यानें सूचना दिल्याप्रमाणें धर्माला घरीं ठेवून, उरलेले चौघे बंधू रथ व सेना घेऊन यज्ञाकरितां लागणारीं द्रव्यसंपत्ती मिळविण्याकरितां चौदिशेला निघाले. अर्जुनानें कुलिंद, शाकलद्वीप, प्राक्ज्योतिप इत्यादि देश जिंकले. परंतु त्यांच्यावर आपली सत्ता न बसवितां केवळ कारणमात्र करभार घेतला. तसेंच इतर अनेक देशांत जाऊन, राजेलोक एकत्र करून, त्यांजकडून धर्म-राजाचें अधिपत्य कबूल करविलें व खंडणीदाखल द्रव्य घेतलें. याप्रमाणें अर्जुनानें सर्व उत्तर दिशा जिंकली. भीमानें पूर्व दिशेला स्वारी करून असाच पराक्रम केला व द्रव्य मिळविलें. सहदेवानें दक्षिण दिशा जिंकली आणि नकुलानें पश्चिमेकडे दिग्विजय केला. तात्पर्य उत्तरेस हिमालय, काश्मीर, पूर्वपश्चिमेला समुद्रतीर आणि दक्षिणेला फिरून सागरतीर येथपर्यंत पांडवांचा दिग्विजय झाला. सर्वांचे मिळून द्रव्य अगणित जमलें. नंतर कृष्ण द्वारकेहून परत येऊन यज्ञाच्या तयारीला सुरुवात केली. धर्माची इच्छा अशी कीं, स्वतः कृष्णानेंच यज्ञदीक्षा घ्यावी. तो काय, आपण काय, एकच! तथापि कृष्णानें तें मान्य केलें नाहीं. मात्र यज्ञांत पडेल तें काम करण्याचें अभिवचन दिलें. यज्ञांत धौम्य हा पुरोहित झाला. व्यासानें ब्रह्मत्व स्वीकारिलें. सुसाम मुनि उद्गाता झाला. याज्ञवल्क्य अध्वर्यु झाला. तात्पुरत्या अशा अनेक यज्ञशाला बांधल्या आणि यज्ञकर्माचा संकल्प केल्यावर राजेरजवाडे इत्यादिकांना निमंत्रणें पाठविलीं. यज्ञाच्या कामीं कौरवांना वग-ळावें असा धर्माचा विचार नव्हता. आणि कौरवांनाहि वाटलें कीं, आपण बाजूला बसणें बरें दिसणार नाहीं. तेव्हां दुःशासनाला स्वयंपाकघरची देखरेख, अश्वत्थाम्याला पाहुण्यांचें स्वागत, कृपाचार्याला दक्षिणा व दान-कर्म, विदुराला कोषाधिपतित्व, दुर्योधनाला अहेर स्वीकारणें, अशीं कामें वांटून देण्यांत आलीं. श्रीकृष्णानें ब्राह्मणांचे पाय धुण्यापुसण्याचें काम पत्करिलें!

## अग्रपूजेचा मान कोणाला ॐ ॐ

सर्व नगरभर गर्दी उसळली. स्वयंपाकघरांतून धुराचे लोट वर चालले. वाद्यांना खळ पडेना. वर आकाशांत विमानें हिंडत होतीं. पंक्ती उठत होत्या. वेदघोष सुरू होता. ब्राह्मणांचे वस्त्रपल्लव धनानें भरून जात होते. अशी प्रास्ताविक तयारी झाली. मग प्रश्न निघाला कीं, अग्रपूजेचा मान कुणाला द्यावा? नारदमुनींनें तर हेरलेंच कीं, या मुद्दयावर हटकून कलह होणार आणि हटकून तसेंच झालें. अग्रपूजेच्या मानाकरितां भीष्मानें श्रीकृष्णाचें नांव सुचविलें. तेव्हां शिशुपालानें त्या गोष्टीला हरकत घेतली. तो म्हणाला, "कृष्ण हा राजासुद्धां नाहीं. एक मोठा संपन्न गवळी आहे झालें. येथें स्वतः भीष्म आहेत, द्रोणाचार्य आहेत, त्यांना वगळून कृष्णाची अग्रपूजा कां?" असें बोलून शिशुपाल सभेंतून उठून जाऊं लागला. तेव्हां स्वतः भीष्मानेंच श्रीकृष्णाचें गुणवर्णन करून शिशुपालाची समजूत पट-विण्याचा प्रयत्न केला. पण शिशुपालानें तें कांहीं न ऐकतां इतर राजांना म्हणजे आपल्या स्नेहीराजांना सभेंतून उठून युद्धाला उभें राहाण्याची विनंति केली. आणि त्या सर्वांनीं एकांगीं जाऊन कृष्णाची अग्रपूजा सिद्धीला जाऊं द्यावयाची नाहीं अशी प्रतिज्ञा केली. दुसऱ्या बाजूला पांडव बंधु युद्धाला तयार झाले. मग कोणीं शिशुपालाची अमंगल जन्मकथा पुढें काढली. कृष्ण व शिशुपाल हे आते मामेभाऊ. अर्थात् हा आपसांतील कलह होता. म्हणून कृष्णाची आत्या शिशुपालाची आई हिनें हा कलह मिटविण्याविषयीं प्रार्थना केली. पण भांडण मिटेना. शिशुपालानें भीष्मांचा न करावी ती निर्भत्सना केली. त्याला 'पापी म्हातारा' असेंहि म्हटलें, 'म्हाताऱ्यावर गवत घालून पेटवून द्या' असेंहि एकानें म्हटलें. शेवटीं शिशुपालानें कृष्णाला युद्धाचें प्रत्यक्ष आव्हानच दिलें. तेव्हां कृष्ण रागावला. त्यानें शिशुपालाचें अवगुण वर्णन करून सर्वांना सांगितलें. आणि परस्पर उखाळ्या पाखाळ्या निघ-ण्याची सीमा झाल्यावर कृष्णानें सुदर्शन चक्र फेकून शिशुपालाचें मस्तक उडविलें. यामुळें त्या यज्ञभूमींत अन्त्यसंस्काराचें एक अमंगल कार्य करावें लागलें. पण पुढें यज्ञ निर्विघ्नपणें शेवटाला गेला. आणि सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें अहेर वगैरे देऊन त्यांची रवानगी करण्यांत आली. मग

व्यास मुनि आपल्या आश्रमाला गेले. तेव्हां त्यांना भावी दुःस्वप्ने पडूं लागलीं होतीं, व त्यांची सूचनाहि त्यांनीं किंचित् देऊन ठेविली. तें ऐकून धर्मराज त्याच्या स्वभावाप्रमाणें गर्भगळित झाला. आणि आपल्या हातून काय काय अनिष्ट गोष्टी होणार याच्या चिंतेनें ग्रासून गेला. आणि यापुढें तरी सर्वांशीं गोड बोलत जा, कोणाचा अपमान करूं नका अशी आज्ञा त्यानें आपल्या बंधूंना केली.

इकडे दुर्योधन शकुनी इत्यादी कौरव इन्द्रप्रस्थाला न जातां मागें राहिले. ते मयसभा पहाण्याला गेले. पण तेथील कृत्रिम चमत्कार ध्यानांत न आल्यामुळें, कोठें पाणी नसतां कपडे वर उचलून घेऊन, तर कोठें पाणी असतां तें न उमगतां त्यांत पडून गटंकळ्या खाऊन, दुर्योधनानें स्वतःला हास्यास्पद करून घेतलें. पांडव बंधु आपणाला हंसले असें पाहून दुर्योधन मनांतून जळूं लागला. पण वरकांती त्यानें कांहीं दिसूं दिलें नाहीं. त्याच्या मनांत द्वेषाबरोबर पापबुद्धि वाढूं लागली. शकुनीशीं मात्र हलक्या आवाजानें तो आपलें मनोगत प्रकट करीत होता. दैवाला दोष लावीत होता व शेवटीं 'मला कांहीं तरी पांडवांचा सूड घेण्याची मसलत सांग' अशी शकुनीला विनवणीहि केली. तेव्हां शकुनीनें सांत्वनपर भाषण केलें. शकुनी म्हणाला, "उगीच कां कष्टी होतोस? तुला काय कमी आहे? मनावर घेशील तर आपल्या सर्व आप्तमित्रांच्या साहाय्यानें पृथ्वी जिंकशील. मात्र पांडवांना जिंकावयाचें तर कपटानेंच जिंकलें पाहिजे." आणि मग शकुनीनें आपली योजना सांगितली. तो म्हणाला, "धृतराष्ट्राची परवानगी तेवढी मिळव म्हणजे आपण धर्मराजाला द्यूत खेळण्याला बोलावूं. तो द्यूताचा नादी असल्यामुळें तें निमंत्रण स्वीकारील. आणि तसें झालें म्हणजे मी कपट द्यूत खेळून पांडवांचें सर्व कांहीं पणाला लावून हिरावून घेईन." मग ते सर्व मिळून धृतराष्ट्राकडे गेले. शकुनीनें युक्तीनें अशी गोष्ट काढली कीं, "दुर्योधन हा चिंतेनें अगदीं निस्तेज व कृश होत चालला आहे. तरी त्याचें दुःख समजाऊन घेऊन उपाय योजनेला संमति देण्याचा अधिकार तुमचाच आहे." इतकें बोलून शकुनीनें धृतराष्ट्राच्या मनश्चक्षूपुढें पांडवांचें ऐश्वर्य आपल्या कुशल वाणीनें रंगवून मांडिलें. आणि मग तें वैभव हरण करण्याची आपली युक्ति सांगितली. धृतराष्ट्र म्हणाला, "विदुर हा

शांत डोक्याचा सल्लागार आहे. त्याला याविषयीं विचारूं." त्याप्रमाणें विदुराला बोलावून मंत्री या नात्यानें त्याला सल्ला विचारिला. विदुर म्हणाला, "नको नको, हें द्यूत म्हणजे कलहाचें मूळ आहे, मृत्यूचें द्वार आहे, अधःपाताचा अंकुर आहे, नाशाचा वज्रलेख आहे. पण द्यूतच खेळावयाचें तर अगदीं स्नेहबुद्धीनें रिकाम्या वेळीं घरीं बसून खेळ खेळतात तसें खेळा." धृतराष्ट्रानें त्याला तोंडदेखली संमति दिली व स्नेहानेंच द्यूत होईल असें सांगून विदुरालाच पांडवांकडे निमंत्रणाला पाठविलें. तेव्हां विदुर धर्मराजाकडे गेला, व औपचारिक रीतीनें बोलूं लागला. तथापि त्याच्या तोंडावरची चिंता मावळेना. पण करतो काय? आणला तसा निरोप कळविणें त्याला प्राप्तच होतें. युधिष्ठिर म्हणाला, "मला द्यूत खेळायला आवडतें खरें पण एकंदरीनें तें वाईटच. तेव्हां तुम्ही काय सल्ला देतां? मी जावें कीं न जावें?" विदुर म्हणाला, "माझ्या परिस्थितीनें मला आज केवळ दूत व निरोप्या बनविलें आहे. तेव्हां मला कशाला विचारतोस? तुला बरें वाटेल तेंच कर." तेव्हां, "मनाला ती गोष्ट पटत नसतांहि कोणाचें आव्हान, निमंत्रण नाकबूल करावयाचें नाहीं या प्रतिज्ञे-मुळेंच मी या प्रसंगीं तें स्वीकारितों." असें मनाचें कसें तरी समाधान करून धर्मराज व पांडव हस्तिनापुराला निघाले. धर्माबरोबर द्रौपदी प्रमुख स्त्रियाहि गेल्या होत्या, पण हें जाणें सुखाचें नव्हतें. धर्मराज या वेळीं दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडला होता. त्याला कालगतीचें बोलविणें आलें होतें.

## कौरव पांडव द्यूत

हस्तिनापुराला गेल्यावर धर्मानें धृतराष्ट्र, दुर्योधनादि कौरव, इतर भाऊबंद यांच्या भेटी घेतल्या. द्रौपदी गांधारीच्या भेटीला गेली. गांधारीनें तिला आशीर्वाद दिला. पण द्रौपदीचें वैभव पाहून कौरवांच्या स्त्रियांना मत्सर वाटला. तथापि सर्वांनीं एकत्र जेवण केलें. मोठी मेजवानी झाली. गायनादी करमणुकीचे प्रकार झाले. लौकिक उपचारांत कांहीं कमी पडलें नाहीं. ती रात्र सुखांत गेल्यावर दुसरें दिवशीं द्यूत पाहाण्याला राजे व इतर मानकरी व प्रतिष्ठित नागरिक सभेमध्यें आपआपल्या जाग्यावर बसल्यावर शकुनीनें पट मांडला. तेव्हां शेवटचा प्रयत्न म्हणून धर्मानें शकुनीला म्हटलें,

"बाबा द्यूतांत क्षात्रपराक्रम नाहीं, नीति नाहीं, शिवाय आडमार्गानें कपटानें द्यूतांत जिंकणें हें तर अधमपणाचेंच होय. म्हणून अजून तरी तूं आपलें आव्हान मागें घे. कारण आव्हान केलेंस कीं मला तें स्वीकारिलेंच पाहिजे." शकुनी म्हणाला, "द्यूताची ही निंदा व्यर्थ होय. दोष असेल तर तो फांशाकडे आहे खेळणाराकडे नाहीं. शिवाय विजयाची इच्छा ही नीच कशी मानावी ? कारण वादामध्यें विद्वान् अविद्वानाला जिंकतो. त्यांत वाव-दुकीचें कपट असतेंच. आतां पराजयाला तूं भीत असशील तर ती गोष्ट वेगळी." पण हें ऐकल्याबरोबर वेड्या धर्मराजाला ईर्षा उत्पन्न झाली व तो पुढें सरसावला व म्हणाला, "मी दुर्योधनाशीं खेळणार कीं कुणाशीं ?" दुर्योधन म्हणाला, "माझ्या वतीनें शकुनी खेळल फक्त पणाला जें काय लावावें लागेल तें मी पुरवीन."

मग खेळाला प्रारंभ झाला. पण तो खेळ कसला ! धर्मराजानें पणाला लावलेल्या एकेक वस्तूचें नांव घ्यावें आणि शकुनीनें फांसे टाकतांच मागितलेलें दान पडावें आणि त्यानें हें पहा मी जिंकलें असें मोठ्यानें ओरडावें असा सर्व एकांगी प्रकार सुरू झाला. धर्मानें मागितलेलें एकहि दान पडलें नाहीं, यामुळें प्रथम रत्नजडित हार, नतर सुवर्णांनीं भरलेल्या पेट्या, यशस्वी रथ, ताईत, हार, उरोभूषणें, कंठभूषणें इत्यादि अति-मौल्यवान् अलंकार शकुनीनें जिंकून घेतले. मग अश्व, गज, वाहानें पणाला लाविलीं. मग दास, दासी गुलामाप्रमाणें पदरीं बाळगलेले वीर इत्यादी शकुनीनें जिंकून घेतले. हें पाहून विदुराला स्वस्थ बसवेना. त्यानें परोपरीनें दुर्योधनाची निंदा करून, 'अजून तरी द्यूत थांबीव,' अशी धृतराष्ट्राची विनंति केली. तुझ्या पुत्रांचा मोह तुला आवरत नाहीं, पण त्यांच्यामुळें उद्यां तुझा घात होईल हें लक्षांत ठेव. पांडवांच्या कोपाला पात्र होऊं नको दुर्योधनाला मत्सराची धुंदी चढली आहे. तेव्हां तसाच प्रसंग आला आहे म्हणून तूं त्याचा त्यागहि कर. कावळा देऊन टाकून मोर घे. कोल्हा खर्ची घालून सिंह घे. दुर्योधनाचा त्याग करून पांडव आपलेसे कर. माजलेल्या बैलानें आपलें शिंग मोडून घ्यावें असा घातकी प्रकार दुर्योधन मस्तीमुळें करीत आहे. तात्पर्य शकुनीला येथून घालवून दे म्हणजे अजून ठीक होईल असा उपदेश विदुरानें उघड केला. तेव्हां दुर्योधन रागाऊन त्याला म्हणाला,

" तूं केवळ दासीपुत्र. मोठ्या नीतीच्या गोष्टी कशाला सांगतोस ? आजवर आम्ही तुझा प्रतिपाळ केला ते उपकार कृतघ्न होऊन फेडूं नकोस. मला व माझ्या बाबांना आपलें हित चांगलें कळतें तें सांगण्याला तूं नको. तुला कोण विचारायला आला होता तुझा अभिप्राय ? तूंच आमच्या घरांतून जाईनास कसा ! व्यभिचारिणी स्त्री केव्हांतरी घरांतून जावयाचीच. तसाच कृतघ्न मनुष्य." अशा रीतीनें दुर्योधन, विदुर, धृतराष्ट्र यांचा परस्पर निषेध सुरू होता. पण इकडे द्यूत सुरूच होतें. पुढें आठवणींतले होतें तें सर्व धर्मराजानें घालविल्यावर आतां आणखी काय पणाला लावावें याची त्याला आठवणच करावी लागली. मग त्यांत उरलें सुरलें सर्व द्रव्य, भूमि इत्यादींची आहुती पडली. शकुनीला फांसे टाकावयाचें व जिंकलें असें म्हणावयाचें याशिवाय दुसरें कामच उरलें नाहीं. पुढें धर्मानें पांचवा भाऊ सहदेव पणाला लावला. मग नकुल लावला. मग शकुनी म्हणाला " आतां काय भीम व अर्जुन पणाला लावणार ? " पण या प्रश्नानें धर्मराजाला कांहीं बोध झाला नाहीं. आणि खरोखरच त्यानें भीम व अर्जुन पणाला लावले व शकुनीनें ते जिंकून घेतलें. शेवटीं एकटा धर्मराज उरला. पण भाऊ पणाला लावल्यावर स्वतःला लावणें ओघानेंच आलें. तरी शकुनीनें त्याला टोमणा मारलाच व म्हणाला, " जवळचे उरलेले सांधी कोपऱ्यांतलें द्रव्य वांचवावें म्हणून तर तूं स्वतःला इतक्यांतच हरविलेस कीं काय ? पण नाहीं अजून एक पणाला लावण्याचें राहिलें आहे. ती तुझी पत्नी द्रौपदी." पण आतां धर्मराज भानावर होता कुठें म्हणून तो म्हणून गेला ' होय. द्रौपदी हेंच माझें आतां उरलेलें धन. ती मी आतां पणाला लावतों.' शब्द ऐकतांच सर्व प्रेक्षक हादरून गेले आणि ' धिक्कार असो धर्मराजा तुला ' असे शब्द त्यांच्या तोंडून निघाले. वास्तविक धृतराष्ट्राला तरी हें पटूं नये. दुर्योधनाला पटो आणि तें पटलेंहि. पण आश्चर्य हें कीं, द्रौपदी पणाला लावलेली पाहून आलेली आनंदाची उकळी धृतराष्ट्राला लपवितां आली नाहीं. शेवटीं ' ही पहा जिंकली द्रौपदी ' असें शकुनी ओरडतांच, दुर्योधन विदुराला म्हणाला, " हां चला विदुरकाका, तुमचें निरोप्याचें, दूताचें काम. जा आणि द्रौपदीला घेऊन या." पण विदुर सत्याला जागला. तो दुर्योधनाला म्हणाला, " तूं मूर्ख आहेस. तुला इतकें तरी कळावें कीं, धर्म-

राजानें तिला पणाला लावली ती स्वतःला पणाला लावून हरल्यानंतर तिला पणाला लावण्याला याला तिच्यावर स्वामित्व राहिलेंच नव्हतें.'' पण दुर्योधनानें त्याचा धिःक्कार केला व म्हणाला, " आहे ठाऊक विदुर काका. सान्या मुलखाचा भित्रा. बडबड मात्र हवी तेवढी. असा रडत राऊत काय कामाचा ? '' असें म्हणून तें काम दुर्योधनानें आपल्या सारथ्याला सांगितलें. त्याप्रमाणें तो सारथी गेला. त्याला द्रौपदी म्हणाली, " असला भलता निरोप आणणाऱ्या तुला व पाठविणाऱ्या दुर्योधनाला लाज कशी वाटत नाहीं. आपली धर्मपत्नी कोणी पणाला लावतो काय ? शिवाय धर्मानें स्वतःला प्रथम हरविलें ? हें तूं जाऊन धर्मराजालाच विचार.'' सारथ्यानें त्याप्रमाणें केलें. तेव्हां द्रौपदीचा प्रश्न ऐकून धर्मराज तटस्थ बसला. त्याच्या तोंडून शब्द निघेना. तेव्हां दुर्योधन म्हणाला. " जा पुन्हां द्रौपदीकडे. तिला म्हणावें तेथेंच बसून प्रश्न काय विचारतेस ? सभेंत ये आणि विचार.'' सारथ्यानें तोहि निरोप मोठ्या कष्टानें जाऊन सांगितला. तेव्हां द्रौपदी म्हणाली, " धर्मराज राहोत, पण माझा प्रश्न भीष्मादि सभासदांना तूं विचार.'' तोहि निरोप त्यानें येऊन सांगितला. पण भीष्मादिक तरी काय बोलणार ? ते खालीं मान घालून बसले. शेवटीं अशानें भागत नाहीं असें पाहून दुर्योधनानें तें काम दुःशासनाला सांगितलें. तो माजलेला पशू द्रौपदीकडे जाऊन म्हणाला. " चल, चल, आम्हीं तुला जिंकलें आहे. आतां तुला कौरवांची दासी होऊन राहिलें पाहिजे.'' हें ऐकून द्रौपदी भ्याली व कौरव स्त्रिया बसल्या होत्या तिकडे जाऊं लागली. तेव्हां दुःशासनानें पाठोपाठ जाऊन तिचे केस धरून ओढली व तशीच ओढीत व गदागदां हलवीत सभेंत आणली. द्रौपदी म्हणाली " मी रजस्वला असून माझ्या अंगावर अवघें एकच वस्त्र आहे. मी तिकडे येणार नाहीं.'' दुःशासन म्हणाला, " तूं आतां दासी माणूस तुला आतां एक वस्त्र असावें, कीं दोन असावींत कीं मुळींच नसावें हें तुझे धनी ठरवितील.'' तेव्हां द्रौपदी करुण स्वरानें ओरडूं लागली. हांका मारूं लागली. तिनें शेजारी बसलेल्या आपल्या पतींकडे पाहिलें पण ते खालीं मान घालून बसलेले. कर्ण तर हसूंच लागला. तेव्हां भीष्म म्हणाला, " बाई काय करावयाचें ? नवरा स्वतःला गमावून बसला व दुसऱ्याचा दास झाला तरी त्याचें आपल्या बायकोवरचें स्वामित्व नष्ट होत नाहीं. शिवाय धर्मच स्वतः तुला हारवून बसला तेव्हां आम्हीं काय बोलणार ?''

शकुनीच्या कपटाची तक्रार या सभेपुढें धर्मराजानें केली तर गोष्ट वेगळी. द्रौपदी म्हणाली, " शकुनीचें कपट उघड आहे, धर्मराज या कपटाचा प्रश्न काढीत नसतील तर तो मी काढतें. कौरवांनाहि सुना लेकी आहेतच. त्यांनीं तरी माझ्या प्रश्नाचें उत्तर द्यावें." शेवटीं भीमसेनाच्यानें राहवेना. तो धर्मराजाला एकेरी संबोधून म्हणाला. " दुष्टा, तूं हें आपल्या अधिकाराच्या बाहेर काम केलेंस. एकादा हलकट द्यूतकार असतो तोहि आपल्या नाटकशाळेला पणाला लावीत नाहीं. थांब. तुझे हातच जाळून टाकतो. सहदेवा ऊठ आणि थोडा विस्तव घेऊन ये पाहूं." तेव्हां अर्जुन मध्यें पडून त्यानें भीमाला थोडें चुचकारिलें व म्हणाला " धर्मानें भलतें केलें खरें, पण प्रतिज्ञापालन तरी केलें एवढेंच म्हणावयाचें". चमत्कार असा कीं, कौरवांपैकींच एक भाऊ विकर्ण, त्याच्यानें हा अन्याय पाहवेना. तो म्हणाला, " काय चमत्कार पहा! भीष्म, द्रोण, विदुर हे द्रौपदीच्या प्रश्नाला उत्तर न देतां स्तब्ध आहेत. तेव्हां तुम्ही इतर राजे लोक तरी उत्तर द्या. तुम्हांलाहि याचें उत्तर देतां येईल," पण तेहि राजे खालीं मान घालून बसले. विकर्णानें पुनः पुनः तोच प्रश्न केला असतां ते कोणी उत्तर देईनात असें पाहून रागानें तो म्हणाला ' मीं सांगतों मला काय वाटतें तें. मुळांत हें आव्हान केलेलें कपटद्यूत. धर्म 'व्यसनी म्हणून त्याची बुद्धि नष्ट झाली. त्यानें द्रौपदी पणाला लावली ती स्वतः हारविल्यावर. शिवाय द्रौपदीवर एकटया धर्माचा हक्क पोचत नाहीं. इतर भाऊ हरले असले तरी त्यांचा व धर्माचा अधिकार सारखाच." हें भाषण ऐकून मात्र राजे लोकांनीं तोंड उघडलें आणि विकर्णाला संमतीदर्शक शाबासकी दिली. पण तें न खपून कर्णानें पुढें होऊन विकर्णाचा धिःकारपूर्वक निषेध केला व म्हणाला, " तुला काय कळतें मूटभर पोराला? भीष्म द्रोणादि मूर्ख आणि तूं तेवढा शहाणा काय? तूं कौरव असतां असें प्रतिकूल बोलतोस तस्मात् तुला आपले बांधव वृक्ष तोडण्याला सहाय्य करणारा कुऱ्हाडीचा लाकडी दांडा कां न म्हणावें आणि द्रौपदी तरी काय अशी लागून गेली आहे महाप्रतिव्रता. पांचांची मिळून एक स्त्री, ती आणि वेश्या यांत काय फरक! ती एकवस्त्र काय विवस्त्र काय? तिला काय अब्रू? घ्या काढून त्या सर्व पांडवांची वस्त्रें!" झालें यावर वाद संपला. पांडवांनीं आपल्या अंगावरचीं वस्त्रें काढून ठेवून ते बाजूला बसले. मग पाळी आली द्रौपदीची. तेव्हां दुष्ट दुःशासन पुढें होऊन द्रौपदीच्या

## द्रौपदी वस्त्रहरण

वस्त्राला हात घालून ओढूं लागला. तेव्हां श्रीकृष्णाला आठवून त्याचा धांवा करण्याशिवाय तिला कांहीं उपाय उरला नाहीं. तिनें हातानें तोंड व डोळे झांकून घेतलें व तोंडानें, मनानें कृष्णाला हांका मारण्याला प्रारंभ केला. तेव्हां चमत्कार असा झाला कीं, दुःशासनानें एक वस्त्र ओढून फेडावें तों आंत दुसरें तयार ! हा दैवी चमत्कार पाहून सभेंतील लोक घाबरून गेले. भीमानें उभा राहून प्रतिज्ञाच अशी केली कीं, "या दुःशासनाला मारून त्याचें रक्त न पीईन तर नांवाचा भीमच नव्हे ! अधोगतीला जाईन !" दुःखानें द्रौपदी कोसळून पडली. ती पुनः पुनः तोंडानें सभेला विटंबना थांबविण्याची प्रार्थना करीत होती. बाजूला ओढून फेडलेल्या लुगड्यांची रास पडली होती. पण तिच्या अंगावरचें वस्त्र कायम. जागच्या जागींच राहिलें होतें. भीष्म म्हणाला "आतां धर्मानेंच काय तो निर्णय द्यावा." दुर्योधन म्हणाला, "बाकीच्या पांडवांनीं वाटलें तर आपल्या भावाला खोटा ठरवावा. मग पाहतां येईल. त्यांनीं त्याला खोटा ठरविला तर तूं दासीपणांतून मुक्त होशील." झालें ! या मायावी भाषणावर भुलून कांहीं राजांनीं दुर्योधनाला महाधर्मात्माहि ठरविलें. इतके ते मूर्ख. पण भीम सारखा उसळून हात चोळीत ओरडून म्हणे "काय करूं रे ? हा वडील भाऊ पडला. नाहीं तर त्याचा तमाशा पाहिला असता. किंवा हा वडील भाऊ ना ! देऊं दे मला आज्ञा म्हणजे मी पहा या कौरवांचे येथेंच कांडांत काढतों कीं नाहीं तें." पण दुर्योधन मदानें धुंद झालेला त्यानें भीमाला हसून त्याला उत्तर म्हणून आपली गोरी मांडी उघडी करून तिजवर थाप मारली. याचा अर्थ उघडच होता. अगदीं याच क्षणीं आंतल्या बाजूला अग्निकुंडाजवळ येऊन एक कोल्हें ओरडलें. अमंगळ पक्षी ओरडूं लागले. तें ऐकून कौरव स्त्रिया घाबरून गेल्या. गांधारीनें ती गोष्ट धृतराष्ट्राला कळविली. तेव्हां त्याच्या मनाला या अशुभ शकुनाचा धक्का बसला आणि मनाचा निश्चय करून तो द्रौपदीजवळ जाऊन म्हणाला "द्रौपदी, होऊं नये तें झालें. पण तूं मला स्वतःच्या सख्या सुनांपेक्षां अधिक प्रिय आहेस. तूं खरी महान पतिव्रता आहेस. तर आतां तूं काय हवा तो वर माग. मी तुला तो देतों." धृतराष्ट्राला या प्रसंगीं तरी सुबुद्धी सुचली खरी. तें ऐकून द्रौपदी

म्हणाली " मामंजी वर देणार तर हा द्या कीं धर्मादि माझे पांचहि पति दासपणांतून मुक्त व्हावे." धृतराष्ट्र म्हणाला 'ठीक. हा वर दिला. पांडव

## शाबास द्रौपदी

दास्यांतून मुक्त झाले. तरी आतां आणखीहि कांहीं मागून घे." पण द्रौपदी म्हणाली " एवढा एकच वर मला पुरे झाला. जो दास्यांतून मुक्त झाला. तो मग आपल्या प्रयत्नानें आपलें कल्याण साधतो. दास्य हेंच काय तें कोणालाहि नडतें." केवढी द्रौपदीची धर्मनिष्ठा! आणखी वर देण्याला धृतराष्ट्र तयार झाला असतां तिनें दासमुक्तता येवढीच मागून घेतली! हें पाहून कर्णाच्या मनावर फार परिणाम झाला. तो म्हणाला "शाबास! पत्नी असावी तर अशी असावी. पांच वीरपती. पण त्यांचे जेथें कांहीं चाललें नाहीं, तेथें या द्रौपदीनें एकटीनें आपल्या पातिव्रत्यानें, धर्मनिष्ठेनें, शहाणपणानें, धैर्यानें सर्व संकट टाळून सर्व वादळ शांत केलें कीं!" पण हें बोलणें भीमाला रुचलें नाहीं. तो म्हणाला " आहे ठाऊक तुझा मानभावीपणा. एकूण पांडव वीरांना तारणारी स्त्री काय? ठीक आहे. पाहूं पुढें."

मग धर्मराजानें आतां आम्ही पुढें काय करावें असें विचारल्यावरून धृतराष्ट्र म्हणाला " बाळांनो, जा आतां आपल्या घरीं. धर्मा तूं धर्मनिष्ठ व वीरसत्व आहेस म्हणूनच तुझी अशी शांति राहते अशाहि प्रसंगीं. तर आतां झालें तें विसरून जा. तूं साधूच आहेस. मीच चुकलों 'करमणूक करोत' म्हणून मी द्यूताला परवानगी दिली हेंच मुळांत चुकलें खरें. पण त्याचें पर्यवसान असें होईल अशी कल्पनाहि आली नाहीं."

त्याप्रमाणें द्रौपदीला घेऊन पांडव इंद्रप्रस्थाला निघाले.

पांडवांनीं द्यूतांत हरविलेली सर्व संपत्ति घेऊन परत इंद्रप्रस्थाला जाण्याला धृतराष्ट्रानें अनुज्ञा दिली हें कळतांच दुर्योधनादि कौरव फार रागावले. चवताळले. ते म्हणाले 'आम्ही एवढा घाट परिश्रमानें जुळवून आणला होता तो पहा कसा या थेरड्यानें ढासळून टाकला.' त्यांनीं धृतराष्ट्राला शंभर शिव्या मोजल्या.' आम्ही सापाच्या शेपटीवर पाय देऊन त्याला मोकळा सोडला असेंच झालें कीं नाहीं?' आतां पांडव सैन्यें जुळवितील, मित्र मिळवितील, सामर्थ्य वाढवितील. त्यांना संपत्तीला कांहीं तोटा नाहीं, बस

तें कांहीं नाहीं. 'शक्य तर फिरून धर्माला द्यूताचें आमंत्रण देऊन गोत्यांत घातला पाहिजे' हीच कल्पना सर्वांना पटून आतां अशी नवी कल्पना निघाली की, पांडव द्यूतांत हरले तर त्यांना पुष्कळ काळपर्यंत असहाय्य असें वनवासांत घालवून दिले पाहिजेत. आणि याकरितां त्यांना प्रतिज्ञेंत गुंतवून घेतले पाहिजे. पण धृतराष्ट्राची कबुली हवी ती कशी मिळणार? दैवयोग असा कीं, त्यानें तावडतोब अनुज्ञा दिली. द्रोण, सोमदत्त, वाल्हीक. कृप, विदुर, अश्वत्थामा, युयुत्सु, भूरिश्रवा, भीष्म आणि विकर्ण या सर्वांनीं मध्यें पडून 'फिरून तरी ही गोष्ट न व्हावी' असें धृतराष्ट्राला सांगून पहाण्याचा प्रयत्न केला. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं गांधारीनें स्वतः प्रयत्न करून पाहिला. आणि तोहि इतक्या निखालसपणें कीं, अगदीं मन मोकळें करून तिनें आपल्या पतीपुढें दुर्योधनाचें अवगुण यथार्थ वर्णन केलें. 'तो मूर्ख आहे. अभिमानाला पेटतो. नीचांची संगत धरतो, तो शेवटीं कुलाचा घात करील. एकदां बिघडलें होतें तें सावरलें. पण फिरून द्यूत आरंभिणें म्हणजे चांगला बंदिस्त झालेला बाण फोडणें किंवा विजत आलेली आग फिरून वारा घालून पेटविणें यासारखें होईल. वास्तविक मुलांनीं बापाचें ऐकलें पाहिजे. बापानें मुलांचें ऐकूं नये. कारण तरुण मुलें अविचारी असतात. तुम्ही दुर्योधनाचें ऐकूं नका.'

## फिरून दुर्दैवाचा फेरा

पण धृतराष्ट्रानें तिचा उपदेश मनावर घेतला नाहीं. पांडव हस्तिनापुराहून बऱ्याच लांबीच्या पल्ल्यावर गेले असतां कौरवांनीं पाठविलेल्या दूतांनीं मध्येंच त्यांना गांठलें आणि द्यूताचें आव्हान कळविलें! आणि धर्मराज तर काय बोलून चालून मूर्ख! फिरून द्यूताचें निमंत्रण आलें याचा अर्थ उमगून त्यानें नाकारावला हवें होतें. पण फिरून ती मूर्खपणाची प्रतिज्ञा आणि ती पाळण्याची मानीव अब्रू आड आली! तोंडानें तो म्हणाला 'दैवानें मला घेरलें आहे खरें, आणि मी मूर्ख कुलक्षयाला कारण होणार' पण इतकें बोलूनहि कोणी बलात्कारानें हाताला धरून ओढून न्यावें त्याप्रमाणें धर्मराजानें इंद्रप्रस्थाकडचें तोंड व पाऊल हस्तिनापुराकडे वळविलें. परत जाऊन पोंचल्यावर कपटी शकुनी म्हणाला "तुम्हांला धृतराष्ट्रानें जे धनादि सर्व परत

दिलें तें तुमचें तुम्हांला राहो. मी आतां एका वेगळ्या महाधनाचा पण लावणार आहे. तो असा कीं, जो द्यूतांत हरेल त्यानें फक्त मृगचर्म अंगावर ठेवून बारा वर्षें दूर वनवासांत घालवावीं. आणि मग एक वर्षभर कोणी न ओळखील अशा कोणत्याहि वेषांत गुप्त राहावें. पण या अज्ञातवासांत चुकून कोणी ओळखलें तर फिरून बारा वर्षें वनवासाला जावें!'' काय ही अट! तिनें वनवास व अज्ञातवास या चक्रांतून बाहेर पडणें कोणाला शक्य होईल काय? पण धर्म पडला सत्याग्रही, सत्यप्रतिज्ञ. आणि हसूं येण्यासारखी गोष्ट ही कीं, तो असेंहि म्हणाला, ' बरें आहे, नशिबी वनवास असेल तर त्यांत तीर्थाटन घडेल, सत्समागम साधेल. हा तरी लाभच कीं नाहीं?' झालें, मंडळी द्यूताला पुन्हां बसली. आणि पांडव पुन्हां हरले. मग बोलायचें कांहींच उरलें नाहीं. पूर्वीच्या खेपेला द्रौपदीचा छळ निघाला म्हणून कांहीं नवा मुद्दा उपस्थित होऊन गाडें चांगल्या दिशेला कलाटलें. पण आतां वादाला कांहींच विषय राहिला नाहीं. पांडवांनीं निमूटपणें बाजूला होऊन आपलीं वस्त्रें उतरून हरिणाजिनें घेतलीं आणि तोंड फिरविलें. दुःशासन म्हणाला, ''वास्तविक हें योग्यच झालें. कारण वयानें आम्ही कौरवच ज्येष्ट वडील आहों. तसेंच गुणांनींहि वरिष्ट आहों. एरवीं का देव व दैव आम्हांला असें गुप्तपणें सहाय्य करितात? म्हणे पांडव गरीब सालस. पण मयसभेंत आमची फजिती झालेली पाहून आम्हांला कोण हंसले? पांडवच ना! घ्या त्यांची हत्यारेंहि काढून. वनवासांत हत्यारें कशाला? कंदमुळें खाऊन जगतां येतें कीं. ही द्रौपदी मात्र दुर्दैवी खरी. कारण पांच पती असून तिला नसल्यासारखेंच आहेत. तिनें त्यांना टाकून देऊन कौरवांतलाच एखादा पसंत करून त्याच्याशीं लग्न कां करूं नये.'' हें ऐकून भीमानें दुःशासन वधाची उघड प्रतिज्ञा केली. कौरव त्याची थट्टा करूं लागले. वेडावूं लागले. कारण वनवासाचें प्रस्थान ठेविल्यावर आपणाला आतां पांडवांची भीति उरली नाहीं असें त्यांना वाटूं लागलें. अर्जुन, नकुल, सहदेव या सर्वांनींहि आपापल्यापरीनें प्रतिज्ञा केल्या. नंतर ते धृतराष्ट्राला भेटावयाला गेले व त्यांनीं त्याचा निरोप घेतला भीष्मांचाहि निरोप घेतला. पण त्यानें मौन स्वीकारिलें होतें व तो वर मान करण्यालाहि धजत नव्हता. आतां घरांतून बाहेर पडण्याची वेळ आली तेव्हां विदुर म्हणाला, “ कुंती ही [illegible]

तें कांहीं नाहीं. 'शक्य तर फिरून धर्माला द्यूताचें आमंत्रण देऊन गोत्यांत घातला पाहिजे ' हीच कल्पना सर्वांना पटून आतां अशी नवी कल्पना निघाली की, पांडव द्यूतांत हरले तर त्यांना पुष्कळ काळपर्यंत असहाय्य असें वनवासांत घालवून दिले पाहिजेत. आणि याकरितां त्यांना प्रतिज्ञेत गुंतवून घेतले पाहिजे. पण धृतराष्ट्राची कबुली हवी ती कशी मिळणार ? दैवयोग असा कीं, त्यानें तावडतोब अनुज्ञा दिली. द्रोण, सोमदत्त, बाल्हीक कृप, विदुर, अश्वत्थामा, युयुत्सु, भूरिश्रवा, भीष्म आणि विकर्ण या सर्वांनीं मध्यें पडून ' फिरून तरी ही गोष्ट न व्हावी ' असें धृतराष्ट्राला सांगून पहाण्याचा प्रयत्न केला. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं गांधारीनें स्वतः प्रयत्न करून पाहिला. आणि तोहि इतक्या निखालसपणें कीं, अगदीं मन मोकळें करून तिनें आपल्या पतीपुढें दुर्योधनाचें अवगुण यथार्थ वर्णन केलें. ' तो मूर्ख आहे. अभिमानाला पेटतो. नीचांची संगत धरतो, तो शेवटीं कुलाचा घात करील. एकदां बिघडलें होतें तें सावरलें. पण फिरून द्यूत आरंभिणें म्हणजे चांगला बंदिस्त झालेला बाण फोडणें किंवा विजत आलेली आग फिरून वारा घालून पेटविणें यासारखें होईल. वास्तविक मुलांनीं बापाचें ऐकलें पाहिजे. बापानें मुलांचें ऐकूं नये. कारण तरुण मुलें अविचारी असतात. तुम्ही दुर्योधनाचें ऐकूं नका.'

## फिरून दुर्दैवाचा फेरा

पण धृतराष्ट्रानें तिचा उपदेश मनावर घेतला नाहीं. पांडव हस्तिनापुराहून बऱ्याच लांबीच्या पल्ल्यावर गेले असतां कौरवांनीं पाठविलेल्या दूतांनीं मध्येंच त्यांना गांठलें आणि द्यूताचें आव्हान कळविलें ! आणि धर्मराज तर काय बोलून चालून मूर्ख ! फिरून द्यूताचें निमंत्रण आलें याचा अर्थ उमगून त्यानें नाकारावला हवें होतें. पण फिरून ती मूर्खपणाची प्रतिज्ञा आणि ती पाळण्याची मानीव अब्रू आड आली ! तोंडानें तो म्हणाला ' दैवानें मला घेरलें आहे खरे, आणि मी मूर्ख कुलक्षयाला कारण होणार ' पण इतकें बोलूनहि कोणी बलात्कारानें हाताला धरून ओढून न्यावें त्याप्रमाणें धर्मराजानें इंद्रप्रस्थाकडचें तोंड व पाऊल हस्तिनापुराकडे वळविलें. परत जाऊन पोंचल्यावर कपटी शकुनी म्हणाला " तुम्हांला धृतराष्ट्रानें जे धनादि सर्व परत

दिलें तें तुमचें तुम्हांला राहो. मी आतां एका वेगळ्या महाधनाचा, पण लाव-गार आहे. तो असा कीं, जो द्यूतांत हरेल त्यानें फक्त मृगचर्म अंगावर घेऊन बारा वर्षे दूर वनवासांत घालवावीं. आणि मग एक वर्षभर कोणी न ओळखील अशा कोणत्याहि वेषांत गुप्त राहावें. पण या अज्ञातवासांत चुकून कोणी ओळखलें तर फिरून बारा वर्षे वनवासाला जावें!'' काय ही अट! तिनें वनवास व अज्ञातवास या चक्रांतून बाहेर पडणें कोणाला शक्य होईल काय? पण धर्म पडला सत्याग्रही, सत्यप्रतिज्ञ. आणि हसूं येण्यासारखी गोष्ट ही कीं, तो असेंहि म्हणाला, 'बरं आहे, नशिबी वनवास असेल तर त्यांत तीर्थाटन घडेल, सत्समागम साधेल. हा तरी लाभच कीं नाहीं?' झालें, मंडळी द्यूताला पुन्हां बसली. आणि पांडव पुन्हां हरले. मग बोलायचें कांहींच उरलें नाहीं. पूर्वीच्या खेपेला द्रौपदीचा छळ निघाला म्हणून कांहीं नवा मुद्दा उपस्थित होऊन गाडें चांगल्या दिशेला कलाटलें. पण आतां वादाला कांहींच विषय राहिला नाहीं. पांडवांनीं निमूटपणें बाजूला होऊन आपलीं वस्त्रें उतरून हरिणाजिनें घेतलीं आणि तोंड फिरविलें. दुःशासन म्हणाला, "वास्तविक हें योग्यच झालें. कारण वयानें आम्ही कौरवच ज्येष्ठ वडील आहों. तसेंच गुणांनींहि वरिष्ठ आहों. एरवीं का देव व देव आम्हांला असें गुप्तपणें सहाय्य करितात? म्हणे पांडव गरीब सालस. पण मयसभेंत आमची फजिती झालेली पाहून आम्हांला कोण हंसले? पांडवच ना? घ्या त्यांची हत्यारेंहि काढून. वनवासांत हत्यारें कशाला? कंदमुळें खाऊन जगतां येतें कीं. ही द्रौपदी मात्र दुर्दैवी खरी. कारण पांच पती असून तिला नसल्यासारखेच आहेत. तिनें त्यांना टाकून देऊन कौरवांतलाच एखादा पसंत करून त्याच्याशीं लग्न कां करूं नये.'' हें ऐकून भीमानें दुःशासन वधाची उघड प्रतिज्ञा केली. कौरव त्याची थट्टा करूं लागले, वेडावूं लागले. कारण वनवासाचें प्रस्थान ठेविल्यावर आपणाला आतां पांडवांची भीति उरली नाहीं असें त्यांना वाटूं लागलें. अर्जुन, नकुल, सहदेव या सर्वांनींहि आपापल्यापरीनें प्रतिज्ञा केल्या. नंतर ते धृतराष्ट्राला भेटावयाला गेले व त्यांनीं त्याचा निरोप घेतला. भीष्मांचाहि निरोप घेतला. पण त्यानें मौन स्वीकारिलें होतें व तो वर मान करण्यालाहि धजत नव्हता. आतां घरांतून बाहेर पडण्याची वेळ आली तेव्हां विदुर म्हणाला "कुंती ही [illegible]

होणार नाहीं." शिवाय पण तुमच्या पांचापुरतांच आहे. त्यांत कुंतीचें नांव निघालेलें नाहीं. पांडवांनीं तें मान्य केलें आणि तिनें यापुढें विदुराच्या घरीं राहावें, असें ठरलें. पण द्रौपदी पांडवांबरोबर वनवासाला जाण्याला मनानें सिद्ध होती ती निघाली. तिनें कुंतीकडे जाऊन तिचा आशीर्वाद घेतला. तेव्हां अंत:पुरांत मोठीच रडारड झाली. शेवटीं कुंतीनें कापऱ्या स्वरानें कांहीं उपदेश करून, कांहीं एरव्हीचें प्रेमाचें बोलून तिला निरोप दिला. पांडवांचे पुत्रहि मागेंच राहावयाचे होते. अखेरचा निरोप देतांना कुंतीनें आपल्या देवाला बोल लावला. ती म्हणाली "माद्री ही धन्य म्हणावी. कारण सहगमनाचा आनंद तरी तिला लाभला. मी मात्र हें दुःख पाहाण्याला जगलें आणि संसाराच्या या घोटाळ्यांत पडलें. ब्रह्मदेवानें माझा जन्म माझ्या कपाळीं लिहिला पण त्याची मर्यादा लिहिण्याला कदाचित तो विसरला असावा म्हणूनच मला अजून मरण आलें नाहीं." पांडवांनीं परोपरीनें तिचें सांत्वन केलें आणि कुंती व विदुर तोंड फिरवून निघाल्यावर पांडवहि दुसऱ्या दिशेला निघाले. पांडव गेले असें कळल्यावर मग मात्र धृतराष्ट्राला थोडा पश्चात्ताप होऊं लागला. पण मग तो काय उपयोग! नगरामध्यें प्रजेलाहि अतिशय दुःख झालें. त्यांनीं कौरवांचा धिक्कार केला. पण राजघराण्यांतला हा कलह त्यांत लक्ष घालण्याचा त्यांना काय अधिकार? थोड्याच वेळांत हस्तिनापुरांत सर्व प्रकारचीं अशुभ लक्षणें व उत्पात होऊं लागले. कौरवांनीं द्रोणाला श्रेष्ठ मानून त्याला राज्याचा मुख्य अधिकारी केलें. यामुळें त्याला कौरवांचा पक्षपात यापुढेंहि करावा असें वाटूं लागलें. पण आपला शत्रु धृष्टद्युम्न हा पांडवांकडे आहे या गोष्टीची त्याला भीति वाटूं लागली. मग लौकिकाचार म्हणून पहिल्या मुक्कामाला उपयोगी पडण्याकरितां पांडवांकडे धृतराष्ट्र व द्रोण यांनीं अनेक वस्तू व माणसें पाठविलीं. त्यांनीं कांहीं शस्त्रेंहि पाठविलीं. पांडवांनीं उत्तरेची वाट धरली. तेव्हां इंद्रसेन व आणखी चौदा लोक आपल्या स्त्रिया बरोबर घेऊन त्यांच्या मागून गेले. व त्यांनीं पांडवांबरोबरच रहावें असें ठरविलें. त्यांना उद्देशून युधिष्ठिर म्हणाला, "तुम्ही आमच्या बरोबर कशाला येता? परत जाऊन धृतराष्ट्र, भीष्म, विदुर, कुंती यांचें रक्षण करा व त्यांना सहाय्य करा. आमची ती ठेवच तुमच्याजवळ आहे असें [illegible]" [illegible] परत फिरले कांहीं वैदिक व शास्त्री

पांडवांबरोबर आणखी कांहीं पुढें गेले. तेव्हां धर्मराजानें त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण ब्राह्मण कांहीं केल्या ऐकेनात. ते म्हणाले "आम्ही तुमच्याबरोबर येतो याचा अर्थ तुम्ही आमच्या पोटाला घालावें असा नाहीं. आमचें आम्ही मिळवूं आणि ईश्वराधना, जप इत्यादि करीत राहूं." त्यांतील एक शौनक नांवाचा ब्राह्मण होता. तो म्हणाला, "धर्मा तूं दुःख करूं नको आणि आम्हाकडे पाहून आपण निर्धन आहों, याची खंती करूं नको." मग धर्मराज आपल्या पुरोहिताकडे गेला आणि म्हणाला, "या ब्राह्मणांचें मी पोषण करूं शकत नाहीं आणि जा म्हटलें तरी ते जात नाहींत." पुरोहित

## सूर्याची थाळी

म्हणाला "तूं त्याची कांहीं काळजी करूं नको. तूं तपश्चर्या करीत जा, ब्राह्मणांचें पोषण व्हायचें तसें होईल." मग धर्मानें सूर्योपासना आरंभिली. तेव्हां सूर्य प्रकट होऊन म्हणाला, "तुला ही तांब्याची तपेली मी देतों. ती द्रौपदीच्या हातीं असेल तोंवर कोणत्याहि प्रकारच्या अन्नाची वाण पडणार नाहीं. फळें मुळें पक्वानें सुद्धां पाहिजे असेल तें मिळेल." त्यामुळें मग ब्राह्मणादिकांचें पोषण करणें ही गोष्ट धर्माला आपल्या मनाप्रमाणें करतां येऊं लागली. ती तपेली किंवा थाळी धर्मानें द्रौपदीला नेऊन दिली तेव्हां त्यांत केलेला स्वयंपाक वाटेल तितका वाढतो असें दिसून येऊं लागलें आणि सर्वांना हवें तितकें देऊन वाढून खाऊन झालें म्हणजे बाकीचें अन्न अदृश्य होई. तात्पर्य अशा रीतीनें ब्राह्मणांनीं पांडवांबरोबर राहण्याचा आपला हट्ट पुरविला. पण मग त्यांना आपणांबरोबर येऊं न देण्याचें संकट धर्माला वाटनासें झालें. मागें धृतराष्ट्र व विदुर यांचें [illegible]क्याचें भांडण झालें. विदुर म्हणे, 'तूं दुर्योधनाचा त्याग कर.' धृतराष्ट्र म्हणे, 'तो माझा प्रत्यक्ष मुलगा मी त्याचा त्याग कसा करूं?' पांडव भागीरथीच्या कांठीं काम्यक वनांत शिरले. त्या सुमारास विदुर येऊन त्यांना भेटला. पांडवांना वाटलें, हा काय आम्हांला दिलेलें किरकोळ सामान शस्त्रें इत्यादि मागून घेऊन परत न्यायला आला कीं काय! पण ती दूषित कल्पना खोटी ठरली. विदुरानें धृतराष्ट्राशीं झालेलें भांडण त्यांना सांगितलें. पुढें कांहीं दिवस विदुर पांडवांबरोबरच राहिला. विदुर रागावून गेला असें पाहून धृतराष्ट्रानें संजयाला त्याच्या शोधाकरितां धाडलें. त्याच्याबरोबर

विदुर हस्तिनापुराला परत गेला. धृतराष्ट्रानें त्याची क्षमा मागितली. विदुर म्हणाला, "मला कौरव पांडव दोघे सारखेच. पण पांडव आज दीन आहेत म्हणून माझें मन त्यांच्याकडे धांवतें." मग कौरव कर्ण इत्यादिकांमध्यें चर्चा झाली कीं, धृतराष्ट्राला पश्चाताप होऊन कदाचित् तो पांडवांना परत बोलावील कीं काय? व ते येतील कीं काय? कोणी म्हणे, ते आपल्या प्रतिज्ञेला जागणारे आहेत ते परत येणार नाहींत, पण आले तर शकुनीनें धर्माला पुन्हां द्यूताला बोलवावें म्हणजे झालें. दुसरा कोणी म्हणाला, "ते कांहीं नाहीं. विषाची परीक्षा पहा कशाला? पांडव वनांत आहेत, निःशस्त्र आहेत, त्यांना कोणी सहाय्य नाहीं अशा वेळींच आपण जाऊं, त्यांच्यावर हल्ला करूं. त्यांना ठार मारूं म्हणजे कायमची कटकट मिटली." व्यासांना ही गोष्ट कळली तेव्हां त्यांनीं धृतराष्ट्राकडे जाऊन पुष्कळ कान उघाडणी केली. पण फिरून पुत्रप्रेमामुळें माझा नाइलाज होतो असेंच उत्तर आलें. मैत्रेय यांनीं प्रत्यक्ष दुर्योधनालाच उपदेश करून पाहिला. त्याचाहि उपयोग झाला नाहीं. उलट मैत्रेय बोलत असतां त्याची टवाळी करण्याकरितां दुर्योधन खालीं मान घालून जमिनीवर रेघा काढीत होता व आपल्या मांडीवर थाप देऊन वीरभाव प्रकट करीत होता. हें पाहून मैत्रेय रागाऊन त्याला शाप देऊन निघून गेले.

## द्रौपदीचें सांत्वन

पांडवांनीं वनवासाला प्रारंभ केल्यावर तिसरे दिवशीं रात्रीं किरमिर नामक राक्षस आले, त्यांच्यावर हल्ला केला. त्याला खरोखर नरमांस भक्षण करावयाचें होतें, परंतु नसत्या कुरापती काढून, खोटी कारणें सांगून, आपल्या मित्राचा सूड उगविण्याचें सोंग त्यानें वरकरणी केलें. पण भीमापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. भीमानें प्रथम एक मोठा वृक्ष त्याच्या डोक्यांत घालून जमिनीवर पाडून त्याचा प्राण घेतला. कांहीं दिवसांनीं श्रीकृष्ण पांडवांच्या भेटीला गेला. तेव्हां त्याचें व अर्जुनाचें संभाषण मोठ्या प्रेमानें झालें. कृष्ण आलेला पाहून द्रौपदी त्याला भेटली, पण आपल्या मनांतील दुःखाहून ती त्याला कांहीं बोलूं शकली नाहीं. ती म्हणाली, "मला आपलीशी करतांना पांडवांनीं शत्रूशीं मोठें युद्ध केलें. पण त्यानंतर त्यांनीं माझें संरक्षण करावें

तसें केलें नाहीं." हें बोलतांना तिच्या डोळ्यांतून दुःखाश्रू एकसारखे गळत होते. ती म्हणाली, "हे माझे पती नव्हेत, ते माझे पुत्र नव्हेत, मला भाऊ बाप आज कोणी नाहीं, आणि कृष्णा तूंहि पण माझा नव्हेस. रक्षण होईना तर भावाबहिणींचें प्रेम घेऊन काय करावयाचें ?" श्रीकृष्णाला वाईट वाटलें पण करणार काय ? तो म्हणाला "या द्यूत प्रसंगाच्या वेळीं मी द्वारकेला असतो तर मी धाऊन आलों असतो, आणि तो सर्व प्रकार थांबविला असता. पण मी त्याचवेळीं लांब आनर्त देशांत होतो. कारण शाल्व राजाचे पारिपत्य करणें मला प्राप्त झालें होतें. तो शिशुपालाचा स्नेही ना ! म्हणून शिशुपाल-वधाचा सूड त्याला घ्यावयाचा होता. तेव्हां मी शाल्वाचाहि वध केला. माझ्याबरोबर माझा मुलगा प्रद्युम्न हाहि आला होता व त्यानें तेथें मोठा पराक्रम केला. शाल्वाची उपेक्षा मी किती करावी. कारण त्यानें द्वारकेलाहि वेढा देऊन लोकांचा पुष्कळ छळ केला होता. एक वेळीं शाल्वानें मोठी माया निर्माण करून मला असें भासविलें कीं, 'माझा पिता वसुदेव हा मृत झाला आहे.' पण मायाच ती ! तशीच माया निर्माण करून त्यानें मी मेल्याचेंहि माझ्या सैन्याला एकवेळ भासविलें होतें. असो. शत्रू सर्वांनाच असतात तेव्हां हे द्रौपदी तूं दुःख करूं नको, भिऊं नको. मी सर्व कांहीं ठीक करून देईन." श्रीकृष्ण परत जातांना सुभद्रा व अभिमन्यु यांना आपल्या बरोबर घेऊन गेला. तसेच इतर आप्तमित्रांनीं पांडवांच्या इतर मुलांना आपल्या रक्षणाला नेलें. श्रीकृष्ण गेल्यावर पांडवांनीं काम्यकवन सोडलें व ते द्वैतवनाकडे निघाले. पुष्कळ वर्षे सुखानें राहाण्यासारखें तें वन त्यांना वाटलें. या सूच-नेला सर्व पांडवांची संमति पडली. द्वैतवनांत शिरतांच तेथील धर्मनिष्ठ तपस्वीच काय पण चारण व सिध्द येऊन त्यांनींहि पांडवांचा सत्कार केला. सरस्वती तीरावरील शालवनाची जागा त्यांनीं त्यांतल्या त्यांत पसंत केली. तेथें प्रथम मार्कंडेय मुनी येऊन त्यांना भेटले. ते धर्माला म्हणाले, "तुम्हां बंधूंमध्यें बाहुबल कांहीं कमी होतें असें नाहीं. परंतु तुम्ही प्रतिज्ञेप्रमाणें वागलां, अध-र्माचरण केलें नाहीं हें चांगले झालें आणि याचें चांगलें फळ तुम्हांला मिळणार आहे." पांडवांच्या परिवारांत या वेळीं ब्राह्मण व क्षत्रिय दोन्हीहि वर्णांचे मित्र होते.

## अर्जुनाला शंकराकडून अस्त्रप्राप्ति

एक दिवस द्रौपदीसह पांडव बसून सुखदुःखाच्या गोष्टी बोलत होते. तेव्हां द्रौपदी म्हणाली. "मला स्वतःच्या दुःखापेक्षांहि भीम, अर्जुन, यांच्या दुःस्थितीकडे पाहून वाईट वाटतें. तुम्हांला (धर्मराजाला) राग कसा येत नाहीं?" तेव्हां धर्मराजानें एकाद्या पुराणिकाप्रमाणें क्रोधाचा निषेध व निंदा याचें पुराण सुरू केलें आणि जितेंद्रिय पुरुषानें क्षमाशीलच असावे, अशा तत्त्वज्ञानानें आत्मसमर्थन केलें. पण द्रौपदीहि कांहीं कमी तेजस्वी नव्हती. मात्र तिचें तेज क्षमेचें नसून न्यायबुध्दीचें होतें. म्हणून धर्मराजाला उत्तर देतांना 'तुम्ही दुबळे आहां.' असें म्हणण्यापर्यंत तिची मजल गेली. नंतर तिनेंहि आपल्या बुध्दीप्रमाणें उलट धर्माला खरी नीति व खरा धर्म म्हणजे काय याविषयीं मोठें व्याख्यान झोडलें. ती म्हणाली, "मनुष्यानें तेजस्वी राहून उद्योग केला पाहिजे. आपला शत्रु समुद्र किंवा पर्वत यांसारखा मोठा व अजरामर असला तरी त्यालाहि देशांतून हांकून देण्याची व पराभूत करण्याची आकांक्षा धरली पाहिजे." ते सर्व बंधू बरोबरीच्या नात्यानें वागत म्हणून भीमाला सुचलेल्या शहाणपणाचा उपदेश त्यानें धर्मराजाला केला. मात्र त्यानें प्रस्तुतच्या दुःस्थितीवर भर न देतां ज्या प्रजेचे तुजवर प्रेम आहे, तिला कौरवांच्या हातीं देण्याचें पाप तुला घडत आहे, म्हणजे स्वार्थाकरितां नसले तरी परार्थाकरितां तरी तुला लौकरच युध्दाला उभें राहावे लागेल. हस्तिनापुरावर स्वारी करावी लागेल असें बजाविलें. पण धर्माचा स्वभावच असा होता कीं त्याच्या चित्ताला कोणीहि चेतविलें तरी तें चेतणें शक्य नव्हतें. तात्पर्य अशा रीतीनें रिकाम्या वेळीं रोज त्यांचे वाद चालत. पुढें एकदां व्यास तेथें गेले. ते म्हणाले, "तुम्ही माझी आठवण केली हें जाणून मी आलों, वाटलें तुमचा समाचार घेऊन जावें." नंतर व्यासांनीं धर्मराजाला 'प्रतिस्मृति' नामक विद्या दिली व असें सांगितलें कीं तुम्ही या द्वैतवनांत आलां हें बरोबर नाहीं. कारण या ठिकाणीं तापसी लोकांची मोठी वस्ती आहे यामुळें तुम्हांला व त्यांना त्रास होईल. तेव्हां पांडव पुन्हां काम्यक वनाला गेले. एक दिवस धर्मराजाच्या मनांत कांहीं कल्पना येऊन तो अर्जुनाला म्हणाला "तूं कांहीं काळ उत्तर दिशेला जा. इंद्राला प्रसन्न करून घे.

त्याचें तुझ्यावर प्रेम आहे तेव्हां आम्हांला उपयोगीं पडतील अशीं कांहीं शस्त्रास्त्रें तो तुला देईल.'' तें मान्य होऊन अर्जुनानें आपल्या बंधूंचा व द्रौपदीचा निरोप घेतला. मग अर्जुन धर्माच्या उपदेशाप्रमाणें हिमालय पर्वतावर गेला. व गंधमादन पर्वतहि त्यानें ओलांडला. इंद्रकील पर्वताशीं गेल्यावर 'तूं आतां येथेंच रहा,' असा त्याला आकाशवाणीनें उपदेश झाला. त्याला ब्राह्मणाच्या रूपानें इंद्रानें भेट दिली. आणि हवीं होतीं तीं अस्त्रेंहि दिलीं. आणि सांगितलें कीं 'हें तर झालेंच पण येथें तूं शंकराचीहि आराधना कर, म्हणजे तुला आणखी कांहीं वेगळे लाभ होतील.' अर्जुनानें त्याप्रमाणें केलें. एका निवान्त स्थळीं जाऊन त्यानें तपश्चर्या आरंभिली व केवळ झाडपाला खाऊन राहूं लागला. तेव्हां आसपासचे ऋषी ही उग्र तपश्चर्या पाहून शंकराकडे गेले व म्हणाले, "हा कोण अद्भुत तेजाचा तपस्वी येथें आला आहे पहा. त्याच्या तेजामुळें आमच्या अंगाचा प्रत्यक्ष दाह होऊं लागला आहे.'' हें ऐकून श्रीशंकर हंसला. कारण त्याला सर्व प्रकार अंतरदृष्टीनें दिसला होता आणि अर्जुनावर कृपा-प्रसाद करण्याच्या हेतूनें त्यांनी भिल्लाचा वेष घेऊन, बरोबर अनेक स्त्रीपुरुष भिल्लहि घेऊन, अर्जुन होता त्या ठिकाणीं आगमन केलें. तेथें त्यांना असें दिसलें कीं, मूकनावांचा एक दैत्य अर्जुनाचा वध करण्याच्या इच्छेनें पण वराहाचें रूप घेऊन आला आहे. अर्जुनालाहि हा प्रचंड वराह आपल्या अंगावर धांवून येत आहे असें दिसलें म्हणून त्यानें सहजच धनुष्यबाण हातीं घेतला. तेव्हां कांहीं विनोदी कलागत करण्याला हा प्रसंग ठीक आहे असें वाटून भिल्लरूपधारी शंकर पुढें आले व भांडणाचा आव आणून म्हणाले, "हां खबरदार! हें सावज, हा मृगयापशु प्रथम माझ्याच दृष्टीला पडला, मीच त्याच्यावर पहिला नेम धरला, तेव्हां ती माझीच शिकार आहे. म्हणून तूं आपला हात आवर.'' पण अर्जुनासारखा क्षत्रिय वीर त्या रानटी भिल्लाला थोडाच जुमानणार! म्हणून त्यानें हात तर मागें घेतलाच नाहीं पण धनुष्याला बाण लावून सोडला. उलट भिल्लानेंहि तेंच केलें. यामुळें त्या दोघांचे मिळून अनेक बाण त्या वराहरूपी दैत्याच्या अंगांत शिरून तो मरून पडला. तरीपण त्यामुळें दोन शिकाऱ्यांतील भांडण न मिटतां उलट बळावलें. अर्जुन म्हणे 'ती माझी शिकार.' 'शंकर म्हणे ती माझी शिकार.' शंकर म्हणाला, "हें आम्हां भिल्लांचें रान आहे.'' अर्जुन म्हणाला "आम्हीहि तूर्त वनवासीच आहोंत.

आम्हांला वाटेल त्या वनांत शिरण्याचा तूर्त अधिकार आहे.'' पुढें बरीच तोंडा-तोंडी झाली. एकमेकांना धाक दाखवून भीति घालण्यांत आली. शेवटीं अर्जुनानें रागावून त्या भिल्लावर बाण सोडले. पण मौज अशी झाली कीं, भिल्लाचे बाण अर्जुनाला लागावे पण अर्जुनाच्या बाणांनीं भिल्लाला कांहीं इजा होऊं नये. आणि चमत्कार हा कीं तो भिल्ल ते बाण अंगावरून चुकवून तोंडांत घेऊन गिळूं लागला. अर्जुनाचे बाण संपले तेव्हां त्या भिल्लाला ओढून पाडण्याकरितां अर्जुनानें त्याच्या गळ्यांत आपलें धनुष्य अडकविलें. तेंही त्या भिल्लानें खाऊन टाकलें. अर्जुनानें, भिल्लाच्या डोक्यावर तरवार मारली पण तीच मोडून गेली. शेवटीं निराशेनें हातीं लागेल तें म्हणजे वृक्ष, दगड, धोंडे, हेहि अर्जुनानें भिल्लाला मारण्याला आरंभ केला. नंतर मुष्टियुद्ध सुरू झालें. त्यांत अर्जुनानें भिल्लाला बरेच तडाखे दिले. तरी शेवटीं भिल्लानेंच अर्जुनाला आपल्या वेंगेंत घेऊन इतकें दाबलें कीं, अर्जुनाचा श्वासोच्छ्वास होईना. तेव्हां कुस्ती सोडून देऊन अर्जुनानें जमिनीवर बसून शंकराची आराधनाच सुरू केली. तेव्हां चमत्कार असा झाला कीं, अर्जुनानें जीं फुलें किंवा माळा शिवाच्या मूर्तीवर म्हणजे मातीनें बनविलेल्या शिवमूर्तीवर घालाव्या त्या भिल्लाच्या अंगावर जाऊन पडाव्या. हें पाहिल्यावर मात्र अर्जुन उमजला. आणि हा भिल्ल नसून प्रत्यक्ष शंकर आहे असें ओळखून त्यानें त्याचे पाय धरले. मग शंकरहि प्रसन्न होऊन त्यांनीं आपल्या खऱ्या रूपानें अर्जुनाला दर्शन दिलें. आणि कृपाळू होऊन अर्जुनाची इच्छा जाणून आपलें प्रिय असें 'पाशुपत' अस्त्र त्याला दिलें. आणि त्याच्या उपयोगाचा मंत्र शिकविला. शंकराच्या स्पर्शानें अर्जुनाचा देह पवित्र झाला. आणि शंकर पार्वतीसह स्वस्थानीं निघून गेले. त्यानंतर अनेक लोकपाल येऊन अर्जुनाला अस्त्रें व आशीर्वाद देऊन गेले. त्यांत वरुण, कुबेर, यम हे होते. शेवटीं इंद्र इंद्राणीसह आला. त्याच्यासमक्ष यम अर्जुनाला म्हणाला, "अर्जुना तूं पूर्वजन्मीं महाबलाढ्य असा नर नांवाचा ऋषी होतास. ब्रह्मदेवाच्या आज्ञेमुळें मनुष्य जन्माला आलास. कारण तुझ्या हातून भीष्म द्रोणादिकांचा वध होऊन पृथ्वी-चा भार हलका व्हावयाचा आहे.'' लोकपाल निघून गेल्यावर इंद्र अर्जुनाला म्हणाला "तूं देवस्वरूपींच आहेस म्हणून तुला एक वेळ स्वर्गाला भेट दिली पाहिजे. मी आतां जातो परंतु माझा सारथी जो मातली तो माझा रथ घेऊन

येईल, त्यांत बसून तूं स्वर्गांत ये. आम्ही सर्व तुझी वाट पहात बसूं.'' त्याप्रमाणें पुढें मातली इंद्राचा दिव्य रथ घेऊन आला, खालीं उतरला व अर्जुन रथांत बसल्यावर व त्यानें हिमालय पर्वताला नमस्कार करून त्याचा निरोप घेतल्यावर रथ चालू लागला. लवकरच त्याला अमरावती नगरी व नंदनवन हीं दिसलीं. गंधर्व, अप्सरा, देव इत्यादि मंडळी त्यांचें स्वागत करण्याला उभी होतीं. त्यांनीं शंख, दुंदुभी वगैरे वाजवीत नक्षत्र मार्गावरून अर्जुनाची मिरवणूक काढली. इंद्राचें दर्शन होतांच त्यानें अर्जुनाला आपल्या सिंहासनावर अगदीं जवळ बसवून घेतलें व स्वतःच्या मुलासारखा त्याच्या अंगावरून हात फिरवून आपलें प्रेम प्रकट केलें. हें करतांना इंद्राचें डोळे आनंदानें विकसित होऊन गेले होते. नंतर इंद्रापुढें नेहमींप्रमाणें अप्सरांचें नृत्यगायन झाल्यावर इंद्रानें अर्जुनाला चित्रसेन गंधर्वाच्या स्वाधीन केलें व इंद्रलोकांतील अनेक ललितकला व विद्या या अर्जुनाला शिकविण्याची आज्ञा केली. स्वर्गलोकांत गेलेल्या पाहुण्यांच्या स्वागत प्रकारामध्यें अप्सरांची भेट हीहि एक गोष्ट ठरीव असे. त्याप्रमाणें चित्रसेनाच्या आज्ञेवरून ऊर्वशी अर्जुनाकडे गेली व लाघवीपणाचीं भाषणें करूं लागली. परंतु अर्जुनानें आदरबुद्धीनें तिला नमस्कार केला आणि अत्यंत लज्जायुक्त अशा वाणीनें तो तिला म्हणाला, "हे अप्सरे, तूं आमच्या पौरव वंशांची जननी आहेस म्हणून काल तुला पाहतांच तुजकडे मी त्या वंशांतील जन्मलेला एक म्हणून आदरबुद्धीनें टक लाऊन पहात होतों. त्यामुळें माझ्या खऱ्या भावनेविषयीं तुझा कांहीं गैरसमज झालेला असेल तर तो कृपा करून दूर कर. तूं आमच्या वंशाची आदिमाता म्हणून मला पूज्य आहेस.'' उर्वशीनें अशा उत्तराची अपेक्षा अर्जुनाकडून केली नव्हती. म्हणून रागावून तिनें त्याला असा शाप दिला कीं एक वर्षपर्यंत केव्हांतरी तूं पुरुष नसून स्त्री आहेस अशी लोकांची समजूत होण्यासारखा वेष तुला घ्यावा लागेल. हाच तुला शिक्षा.'' मग अर्जुन चित्रसेनाकडे गेला व म्हणाला, "अरे हें काय भलतेंच झालें. इंद्राचा खरा हेतु तरी काय होता.'' गंधर्व म्हणाला "इंद्रानें तुझी परीक्षा पाहिली आणि ऋषीपेक्षांहि तूं अधिक निग्रही आहेस हें पाहून इंद्राला संतोष झाला आहे.'' आतां उर्वशीनें तुला जो चमत्कारिक शाप दिला, त्याचें वृत्त मी इंद्राला सांगितलें तेव्हां तो मला म्हणाला, "हा शाप अर्जुनाला पुढें एका विशेष प्रसंगीं फार उपयोगी पडणार आहे, पण तें काय

हें आज मी सांगत नाहीं. त्या शापांतच तुझें कल्याण आहे.'' मग चिंतामुक्त होऊन अर्जुनानें मोठ्या आनंदानें स्वर्गलोकींचीं सर्व सुखें भोगीत वरेच दिवस घालविले. या अवधींत लोमश नांवाचा ऋषी इंद्रलोकाला गेला. तेथें अर्जुनाला पाहून त्याला मोठें आश्चर्य व कौतुक वाटलें. आणि खालीं परत आल्यावर त्या ऋषीनें काम्यकवनांत जाऊन स्वतः तेथें पाहिलेली सर्व हकीकत धर्मराजाला सांगितली. तेव्हां त्यालाहि फार आनंद झाला. अर्जुनाच्या वियोगानें सर्वांनाच वाईट वाटत होतें. तथापि तो एका मोठ्या कार्याकरितां दूर गेला आहे या विचारानें पांडव जप, हवन इत्यादि पवित्र कर्में करीत व त्या वनांत मिळेल तें फलमूल, मांस खाऊन कालक्रमणा करीत राहिले. दुसरी करमणूक म्हणजे आल्यागेल्या अतिथि, ऋषी, मुनींशीं अनेक प्रकारची चर्चा व संभाषणें करणें, याचा लाभ होत असे. बृहदश्व वगैरे अनेक ऋषी पांडवांकडे येऊन समाधानाच्या गोष्टी बोलत. आणि गोष्टींवरून निघालेल्या गोष्टी सांगत. त्यांत कांहीं पूर्वींच्या राजांच्या असून त्यांच्यावर सकटें कशीं आलीं पण शेवटीं त्यांचा परिहार कसा झाला इत्यादि इतिहासहि पांडवांना ऐकावयाला मिळत. अशा इतिहासांत बृहदश्वानें, पांडवांना नलराजाची कथा सांगितली ती त्यांना मनोरंजक पण बोधप्रदहि वाटली. कारण धर्मराजाप्रमाणेंच द्यूतक्रीडेमुळें नलराजावर मोठें कठीण प्रसंग आले. पण ते शेवटीं कसे निरास पावले हें साम्य पाहून सहजच धीर वाटण्यासारखा होता. दुसरी एक गोष्ट ही कीं, या बृहदश्वाला अक्षविद्येचे म्हणजे फांसे टांकून खेळण्याच्या विद्येंतलें रहस्य चांगलें माहीत होतें तेंहि बृहदश्वानें धर्मराजाला शिकविलें. मग द्यूताचा पुन्हा प्रसंग येणार अशी भीति वाटल्यावरून धर्मराजानें हा सावधगिरीचा उपाय आगाऊच केला कीं काय न कळे.

## तीर्थयात्रा

कांहीं काळानें काम्यकवन सोडून जावें असें धर्माला व इतर पांडवांनाहि वाटूं लागलें. एकदां नारदमुनि पांडवांकडे आल्यावर त्याजकडून पांडवांना अनेक तीर्थांचीं वर्णनें व तीर्थयात्रांची फलश्रुती सविस्तर ऐकावयाला मिळाली. धौम्य पुरोहित पांडवांची उदासीनता पाहून त्यांना धीर देण्याचीं भाषणें मधून मधून करीतच होते. त्यानेंहि पांडवांच्या मनाला करमणूक होऊन

तीर्थादिकांची वर्णनें ऐकून मन पवित्र व्हावें या हेतूनें चारी दिशांच्या तीर्थांचें वर्णन आपल्या माहितीप्रमाणें केलें. तथापि काम्यकवन सोडून जाण्याची धर्माची उत्कंठा कमी होईना. तेव्हां असे ठरलें कीं, पांडवांनीं कांहीं दिवस स्थलांतर करावें. पण बरोबर परिवार अगदीं थोडका घ्यावा. अर्थात उरल्या परिवाराला हस्तीनापुराकडे परत पाठविणें प्राप्त झालें. तेव्हां त्या परिवारांतील ब्राह्मण, नागरिक, यति इत्यादि लोक मोठ्या कष्टानें धर्माचा निरोप घेऊन गेले. मग धर्मानें पुण्याहवाचन केलें आणि मार्गशीर्ष पौर्णिमेचा मुहूर्त ठरवून पुष्य नक्षत्रावर तेथून निघाले. क्रमानें ते प्रथम नैमिषारण्यांत गेले. मग प्रयाग क्षेत्रीं जाऊन त्यांनीं गंगा यमुना संगमांत स्नान केलें. गयेलाहि गेले. व अक्षयवटाखालीं किंचित काळ राहिले. तेथें गय व गयपर्वत यांचा वृतांत धर्मराजाला विदित झाला. तेथून पांडव अगस्त्य मुनींच्या आश्रमाला गेले. तेथें त्यांना लोपामुद्रेची पुण्यकथा ऐकावयास मिळाली.

नारद, धौम्य, लोमश, इत्यादिकांच्या संगतींत पांडवांनीं किती तीर्थयात्रा केल्या याचें वर्णन करणेंच कठिण आहे. या सर्व यात्रा करितांना त्यांना कंटाळा येऊं नये म्हणून हे मुनि व पुरोहित पांडवांना अनेक राजांच्या कथा, जुने इतिहास सांगत असत. त्यांत वातापि, इल्वल, अगस्ति, लोपामुद्रा, दधीच, वृत्रासुर, कालेय दैत्य, सगर, कपिल, असमंजा, अंशुमान् ऋष्यशृंग, लोमपाद, विभांडक, वैतरणी, परशुराम, ऋचीक, जमदग्नी, रेणुका, कार्तवीर्य, च्यवन, शर्याती, अश्विनीकुमार, मांधाता, सोमक, शिबी, नरकासुर, वराह अवतार, अष्टावक्र, यवक्रीत, रैभ्य, भारद्वाज, परावसु, इत्यादी स्त्री पुरुषांची चरित्रें कमी अधिक विस्तारानें सांगितलीं. या यात्रा प्रवासांत कृष्ण व बलराम हे प्रभास तीर्थाच्या ठिकाणीं पांडवांची भेट घेण्यास गेले. तेथें सुखदुःखाच्या बऱ्याच गोष्टी झाल्या. बळराम म्हणाला, "धर्माचरण करणाऱ्या पांडवांना जर अशी दुःस्थिती येते, संकटें प्राप्त होतात, तर मनुष्यानें धर्माचरण करावेंच कशाला? अधर्माचरण करून सुख तरी भोगावें तेंच अधिक श्रेयस्कर असा न्याय ठरूं पहात आहे, त्याला काय करावें? पांडवांना झालेला हा अन्याय पाहून पृथ्वी अद्यापि दुभगून कशी गेली नाहीं. व पर्वत पृथ्वीच्या उदरांत कसे लोपून गेले नाहींत; कारण त्या उत्पातासारखाच धर्माचरण करणाऱ्या पांडवांना वनवास भोगावा लागावा हाहि उत्पातच नव्हे काय?"

सात्यकीचेंहि म्हणणें तसेंच पडलें. मात्र तो अधिक उत्साही म्हणून केवळ दुःख न करितां कौरवांचा प्रतिकार करावा, करूं, त्यांना शासन घडवूं अशा गोष्टी बोलूं लागला. तो म्हणाला, "ही काय आमच्यासारख्या यादवांनीं स्तब्ध राहाण्याची वेळ आहे? आम्ही इतके यादव त्यांपैकीं कोणीहि कौरवांना पराभूत करील. मग श्रीकृष्णाची तर गोष्ट बोलायलाच नको." तेव्हां श्रीकृष्ण म्हणाला, "अरे तें सर्व खरें. आम्ही यादव मनांत आणूं तर कौरवांचा नाश करून पांडवांना आजच राज्यावर बसवूं पण धर्मराज असा पडला ना! प्रतिज्ञापालन करणारा, बोलल्याप्रमाणें करणारा, स्वधर्माचा त्याग न करणारा. शिवाय दुसऱ्यांनीं राज्य जिंकून द्यावें अशी का पांडवांची योग्यता आहे? त्यांना आपल्या बाहुबलानें जिंकून घेतल्याशिवाय राज्य भोगण्याची इच्छा होणार नाहीं." तेव्हां धर्म म्हणाला, "कृष्णाचें म्हणणेंच बरोबर आहे. बरें, वेळ येईल तेव्हां तुम्ही यादव आम्हाला साहाय्य करालच कीं. मला त्याविषयीं विश्वास आहे." श्रीकृष्ण, बळराम परत गेल्यावर पांडव पयोष्णी नदीकडे गेले. आणि तेथून पुढें मैनाक, श्वेतगिरी, कालशैल इत्यादी स्थानें त्यांनीं पाहिलीं. त्यांत सर्व प्रकारचे चमत्कार त्यांना दिसले. कोठें अग्नि अखंड प्रदीप्त राहात असे, आणि तोहि इंधनाशिवाय, तर कोठें उपवनांत देवादिकांचीं पावलें स्पष्ट उमटलेलीं दिसत. पुढें यक्षगंधर्वांची नगरेंहि लागलीं. मग कैलासपर्वत आला. तें कुबेराचें स्थान पण तेथें यक्ष, राक्षस, किन्नर, नाग, सुपर्ण, गंधर्व, इत्यादी अनेकांची वस्ती होती. पण तें ठिकाण इतर दृष्टींनीं भयप्रद वाटल्यामुळें पांडव द्रौपदीला मध्यें ठेवून तिचें संरक्षण करीत सावधगिरीनें चालत असत. आणि चालण्याच्या श्रमानेंहि द्रौपदी मधूनमधून व्याकुळ होई. प्रदेश डोंगराळ यामुळें वाहनांचा उपयोग करणें शक्यच नव्हते मात्र द्रौपदी फार थकली असें पाहिलें म्हणजे भीम म्हणे, "संकोच धरूं नको, माझ्या खांद्यावर बैस" पण द्रौपदी म्हणे, 'तुम्हीं माझी काळजी करूं नका मी आपली चालेन.' नंतर सुबाहु राजाचा देश लागला. त्यांचा विचार पुढें अर्जुनाची भेट घेण्याकरितां गंधमादन पर्वतावर जाण्याचा होता. तो मार्ग प्रथम मंदरपर्वतावरून जात होता. खालीं अलकनंदा महानदी वहात होती. तिच्या तीरावर ऋषी सामगायन करीत होते. गंधमादन पर्वतावर पोंचण्याच्या सुमारास मोठें वादळ झालें. इतकें कीं, पांडवांचें बोलणें एकमेकांना ऐकूं

येईना व डोळे मिटल्यानें एकमेकांस पाहतां येईना. वारा इतका सोसाटयाचा सुटला कीं, वृक्ष, वारुळ, खांचखळगा, सांपडेल त्याला धरून त्याना चिकटून राहावें लागे. नाहीं तर वाऱ्यानें उडून जाण्याची भीति. एक कोस गेल्यावर द्रौपदी बसली व थरथरां कापूं लागली. तिला नकुलानें सांवरून धरलें. तें पाहून हें सर्व आपल्या मूर्खपणाचें फळ असें धर्मराज म्हणूं लागला. नकुळ सहदेवांनीं तिचे पाय चेपण्यास सुरवात केली. मग भीमाला कांहीं आठवण होऊन त्यानें घटोत्कचाचें स्मरण केलें, अशा करितां कीं आपल्या पतींच्या खांद्यावर बसण्याची द्रौपदीला लाज वाटते, तेव्हां घटोत्कच हा तिला मुलासारखा असल्यामुळें त्याच्या खांद्यावर बसण्याला तिला संकोच वाटणार नाहीं. त्याच्या बरोबर आलेले कांहीं राक्षस अशक्त झालेल्या ब्राह्मणांनाहि खांद्यावर घेऊन चालूं लागले. पुढें चालतांना नरनारायणाश्रमाचें दर्शन झालें. मग अर्जुनाची गांठ पडेल, अशा अपेक्षेनें एका ठिकाणीं पांडव पांचसहा दिवस राहिले असतां, एक दिवस वाऱ्यानें एक हजार पत्रांचें कमळ द्रौपदीच्या पायाशीं येऊन पडलें. तेव्हां सहजच तिनें इच्छा प्रदर्शित केली कीं अशीं आणखी कमळें मिळतील तर मला बरें वाटेल. तेव्हां 'ठीक आहे' असें म्हणून भीम ज्या दिशेनें तें कमळ वाऱ्यानें उडून येऊन पडलें त्या दिशेला त्या कमळाचें मूळस्थान शोधण्याला निघाला. त्याची चालण्याची ऐट पाहून आकाशांत यक्ष गंधर्वादि कौतुक करीत होते. पण कमळाच्या ठिकाणाचा शोध लवकर लागेना. त्याच्या चालण्यानें वेली या पायाला गुंडाळून तुटूं लागल्या. पावलाच्या आवाजानें वाघ गुहांतून जागे झाले. कांहीं हिंस्र पशु बेभान होऊन भीमाच्या अंगावर धावले. तेव्हां भीमाला आपला पराक्रम त्यांना दाखवावा लागला.

## भीमाचा गर्वपरिहार

शेवटीं भीमाला एक मोठें सरोवर दिसलें. त्यांत स्नान करून व विश्रांति घेऊन तो पुढें निघाला. वाटेंत मारुती बसला होता. मारुती म्हणजे वायुपुत्र. तेव्हां तो भीमाचा बंधूच. तेथें तो अशाकरितां बसला होता कीं येथून जो पुढें जातो त्याला संकट प्राप्त होतें. तसें भीमाला न व्हावें म्हणून त्याची वाट अडवून तो बसला होता. पण हें भीमाला काय माहीत. मारुतीनेंहि थोडी कुचेष्टा करावी म्हणून भीमाला म्हटलें, "तूं कोण आहेस? माझी झोंप कां मोडलीस?

तें असो, पण तुला यापलीकडे जातां येणार नाहीं. हें मी तुला तुझ्यावरील ममतेमुळेंच सांगत आहे.'' भीम म्हणाला, "मी भीम म्हणतात तो पांडव आहे. वानररूपी तूं तरी कोण आहेस ?'' तेव्हां मारुती म्हणाला, "मी कांहीं व्यथेनें अशक्त झालों आहे; माझ्यानें येथून उठवत नाहीं तेव्हां तुला पुढें जावयाचें तर मला ओलांडून गेलें पाहिजे किंवा मला उचलून ठेवून गेलें पाहिजे.'' भीम म्हणाला, "असें का, तर ठीक आहे. तुला उचलूनच ठेवितो. आणि त्यांत मला प्रतिबंध केलास तर तुझा प्राणहि घेईन.'' मग मारुती हंसून म्हणाला "बरे बुवा ! तूं पराक्रमीच आहेस तसा ! काय करशील तें खरें पण प्रथम माझी एवढी शेपटी उचलून बाजूला ठेव मग मला उचलण्याची गोष्ट.'' पण भीमाला तें किंचितहि उचलेना, हलेना, तेव्हां त्याचा गर्व परिहार झाला व शरण जाऊन म्हणाला, "हे वानर राजा तूं कोण आहेस तें खरें सांग. तेव्हां मारुतीनेंहि आपला खरा वृत्तांत त्याला सांगितला.'' आणि म्हणाला "तुझी कुरापत काढण्याकरितां कांहीं मी मार्ग अडविला नाहीं तर पुढें गेल्यानें तुझ्यावर संकट येईल तें येऊं नये म्हणून.'' इतकें बोलून मारुतीनें त्याला आपलें पूर्वयुगांतलें खरें रूप दाखविलें आणि एक गमतीची गोष्ट सांगितली कीं, 'शत्रूशीं गांठ पडली म्हणजे माझें बळ व शरीर दोनहि वाढावी असा मला वरच आहे.' असो. 'तूं कमळें तोडण्याच्या इच्छेनें यापुढें आणखी जाऊं नको. या पलीकडच्या मार्गानें गेलास तर कमळें दिसतील पण तोडूं नको–' भीमानें त्याचे आभार मानले. तेव्हां मारुती म्हणाला "बंधुप्रेमाखातर मी तुम्हां पांडवांचें कांहीं कार्य करीन. तें असें कीं, अर्जुनाच्या रथध्वजावर मी नेहमीं बसत जाईन आणि रणांगणांत तूं ओरडलास म्हणजे मीहि ओरडून तुझा सिंहनाद प्रतिध्वनीनें अधिक घुमवीन.'' मारुती अदृश्य झाल्यावर भीम पुढें वाट चालूं लागला. कैलास शिखराच्या जवळ गेल्यावर त्याला कुबेर सरोवर दिसलें. त्यांत दिव्य सुगंधी कमळें पुष्कळ उगवलीं होतीं. तेव्हां तीं काढण्याकरितां भीम सरोवरांत उतरूं लागला. त्याला सरोवराचें रक्षण करण्याकरितां ठेविलेल्या राक्षसांनीं प्रतिबंध केला. तेव्हां त्यांच्यांत युद्ध झालें, भीमानें पुष्कळ राक्षस मारले. कांहीं राक्षस म्हणाले 'आमची हरकत इतकीच कीं कुबेराला विचारून त्याच्या परवानगीनें तूं कमळें न्यावीं. बलात्कारानें नेऊं नये.'' पण त्यांना भीम कसचा ऐकतो ? तो म्हणाला, "याचना करणें, भिक्षा मागणें हा क्षत्रियाचा धर्म

नाहीं. आणि पर्वतावरून वाहत आलेल्या नद्यांनीं बनलेलें हें सरोवर! यावर कुबेराचा तरी हक्क काय?" मग हें सर्व वर्तमान घेऊन कांहीं राक्षस कुबेराकडे गेले तेव्हां कुबेर हंसून म्हणाला "तुम्हांला माहीत नाहीं म्हणून हें असें झालें. द्रौपदीला कमळें हवीं तीं नको कोण म्हणणार? भीमाला वाटतील तितकीं घेऊन जाऊं दे!" तेव्हां राक्षस परत येऊन त्यांनीं भीमाची क्षमा मागितली. इकडे धर्मादि पांडवांना कांहीं दुश्चिन्हें भासूं लागलीं. भीम कोठें दिसेना, अशी चिंता धर्माला वाटूं लागली. तेव्हां द्रौपदीनें त्याला सांगितलें कीं, "सुगंधी सुवर्णकमळें आणण्याकरितां भीम गेला आहे." तेव्हां धर्म म्हणाला, "तर मग आपणहि तिकडेच जाऊं. कारण भीम एकटा म्हणून त्याच्यावर एखादें संकट यावयाचें." मग बरोबरच्या ब्राह्मणांना राक्षसांच्या खांद्यावर बसवून सौगंधिक सरोवराकडे सर्व पांडव गेले. आणि भीमाची व त्यांची गांठ पडली. नंतर कुबेर नगरीचे व कुबेराचें दर्शन घडावें अशी इच्छा धर्माला झाली, म्हणून लोमश मुनीच्या सांगण्याप्रमाणें ते मार्ग चालूं लागले. प्रथम त्यांना नर-नारायणाश्रमाकडे जावें लागलें व तेथें ते सर्व अर्जुनाची वाट पहात बसले. त्या ठिकाणीं जटासुर नांवाचा राक्षस ब्राह्मणाचा कपटी वेष घेऊन पांडवांच्या परिवारांत शिरला आणि घरांत वावरतांना त्यानें बारिक दृष्टीनें हत्यारांच्या जागा पाहून हत्यारें पळविलीं. आणि द्रौपदी, धर्म, नकुळ, सहदेव यांना उचलून घेऊन तो पळून जाऊं लागला. तोंच भीमसेन बाहेरून परत आला व त्यानें राक्षसाशीं युद्ध करून त्याचा वध केला. मग अर्जुनाची वाट पाहून थकल्यावर पांडव तसेच पुढें निघाले. वाटेंत त्याना कैलास, मैनाकश्वेत इत्यादी पर्वत भेटले. आणि सतरा दिवसांचा प्रवास करून ते हिमालय पर्वतावर चढले. तेथें वृषपर्वा या मुनीच्या आश्रमांत त्यांनीं मुक्काम केला. अजून कैलास पर्वत दूरच होता. पण चार दिवस वाट चालल्यावर ते त्या पर्वतावर पोंचले. त्यांचा पुढील मुक्काम आर्ष्टिषेण या मुनीच्या आश्रमांत झाला. तेथें पर्वसंधीच्या वेळीं अनेक मुनी, यक्ष, गंधर्व, सुपर्ण, नाग यांचे मेळ येत. तो देवांचा क्रीडाप्रदेश ठरलेला असे. तेथें सुखानें कांहीं काळ काढल्यावर द्रौपदीच्या इच्छेवरून भीमानें तिला गंधमादन पर्वताचें सुंदर शिखर दाखविलें. तेथें भीमाचें व कांहीं राक्षसांचें युद्ध झालें. त्यांत मणिमान राक्षस मृत्यु पावला. कुबेराकडे ही बातमी गेली. तेव्हां तो [illegible]

या सगळ्या कलहाचें कारण लक्षांत घेतां भलतेंच कांहीं झालें असें कुबेराला वाटलें. आणि पांडवांना कुबेर सदनांतच येऊन राहण्याची विनंती केली. तेथें कुबेरानें त्यांना सांगितलें कीं, " अर्जुनाची व माझी स्वर्गात गांठ पडली आणि तो तेथें खुशाल आहे." यामुळें त्यांची काळजी कमी झाली. नंतर पांडवांनीं मेरुपर्वताचें दर्शन घेतल्यावर फिरून गंधमादन पर्वतावर वस्ती केली. शेवटीं एक दिवस इंद्राच्या दिव्य रथांत बसून अर्जुन खालीं आला व पांडवांना भेटला तेव्हां सर्वांनाच अतिशय आनंद झाला. त्याच्या पाठीमागून इंद्रहि स्वत: पांडवांच्या भेटीला आला. त्यानें अर्जुनाला आपण इंद्रलोकीं काय काय साहाय्य केलें हें सांगितलें व पांडवांना शुभाशीर्वाद देऊन तो परत गेला. नंतर स्वस्थपणा मिळाल्यावर अर्जुनानें तीनचार वर्षांत स्वर्गलोकीं आपण काय केलें, काय शिकलों, काय मिळविलें, संकटें कोणतीं आलीं, परिहार कसा झाला या सर्वांची मनोरंजक व रोमांचकारी कथा आपले इतर बंधू व द्रौपदी यांना सांगितली. बरोबर कांहीं आणलेलीं अस्त्रेंहि बंधूंना दाखविलीं. पण आतां पुढें निश्चित असें कार्य कांहीं नसल्यानें ते कुबेरवनामध्यें कांहीं दिवस राहिले व नंतर ते द्वैतवनाकडे परतले. येतांना एका अजगरानें भीमाला धरल्यामुळें भीति उत्पन्न झाली. त्याचा शोध काढण्याकरितां धर्मराज गेला तेव्हां अजगराच्या विळख्यांत सांपडून निश्चेष्ट झालेला भीम त्याला दिसला. तेव्हां धर्मराजाला उद्देशून अजगरानें कांहीं प्रश्न विचारले व धर्मराजानें त्याचीं सविस्तर उत्तरें दिलीं; तेव्हां संतुष्ट होऊन अजगरानें भीमाला सोडून दिलें आणि धर्मराजाच्या दर्शनानें आपल्या शापाची निवृत्ती होणार होती ती झाली यामुळें आनंदित होऊन अजगर स्वर्गाला गेला.

## पांडव–श्रीकृष्ण भेट

पुढील शरदऋतूंत एक दिवस श्रीकृष्ण पांडवांच्या भेटीला आला. बरोबर सत्यभामा होती. अशी जिव्हाळ्याचा माणसें भेटल्यामुळें सर्वांना आनंद झाला. इकडच्या तिकडच्या लोकांविषयीं कुशल प्रश्न झाले. अर्जुन स्वर्गलोकाहून अस्त्रें मिळवून आला याविषयीं कृष्णानें पांडवांचें अभिनंदन केलें. इतक्यांत मार्कंडेय मुनि तेथें आले व तेथें कांहीं दिवस मुक्काम करून त्यांनीं आपल्या ज्ञानभांडारांतून अनेक कथा पांडवांना सांगून त्यांचें मनोरंजन केलें.

तसेंच अनेक धर्मविषयक व नीतिविषयक प्रश्नांची चर्चा होऊन मार्केंडयांनीं धर्मराजाचें अनेक प्रकारें समाधान केलें व नवी महिती दिली. मार्केंडयांना अनेक युगांतील माहिती होती. कारण ते अमर असल्यामुळें आपल्या डोळयांनीं त्यांनीं अनेक युगांतील महत्प्रसंग पाहिले होते. अनेक देव, मुनि, राजे यांचीं चरित्रें त्यांना माहीत झालीं होतीं. आणि त्यांची स्मरणशक्तीहि अद्‌भुत होती. बाहेर पुरुषमंडळी संभाषण करीत बसली असतां आंत द्रौपदी व सत्यभामा यांचीं संभाषणें सुरू होतीं. त्यांत पतिव्रतेचा अचार कसा असावा इत्यादी गोष्टी निघाल्या होत्या. त्यांतल्यात्यांत द्रौपदी ही अधिक अनुभवी व ज्ञानी. तिनें केलेला उपदेश सत्यभामेला फारच पटला. कारण सत्यभामेचा स्वभाव रागीट यामुळें कृष्णाशीं तिचे अनेक वेळां प्रेमाचेच पण कलह होत. कृष्ण व सत्यभामा निघून गेल्यावर पांडवहि सुखानें वनवासाचे दिवस चालवीत वनामध्यें राहिले.

## कौरवांना कैद

अशा रीतीनें पांडव वनवासांतहि सुखानें काळ कंठीत होते. एकदां एक ब्राह्मण पांडवांच्या भेटीला आला. तो त्यांजपाशीं कांहीं दिवस राहिला. त्यांच्याशीं त्यानें अनेक प्रकारचीं संभाषणें व सुखदुःखाच्या गोष्टी केल्या. तेव्हां अशा सज्जनांना वनवासदुःख भोगावें लागत आहे तें दूर व्हावें अशा चांगल्या हेतूनें तो परत गेल्यावर धृतराष्ट्राला भेटला व म्हणाल, “ राजा पांडव, द्रौपदी हीं माणसें वनवासामुळें कष्टी झाली आहेत, रोडावलीं आहेत. त्यांच्यावर अनेक संकटें येतात. म्हणून, त्यांचा हा वनवास तूं मध्यें पडून संपवावा हें बरें नव्हे काय ? ” हें ऐकून धृतराष्ट्राला वाईट वाटलें. त्याच्या तोंडून पश्चातापाचीं भाषणें बाहेर पडूं लागली. तीं ऐकून शकुनीनें दुर्योधनाला त्यानें सावध केलें. तो म्हणाला “ धृतराष्ट्र जर पांडवांचा वनवास संपीव असें म्हणूं लागला तर त्यांचें ऐकूं नको. त्यांच्याविषयीं दया वाटून त्यांची कड घेऊन त्यांच्यावर कृपा करण्याचें मनांत आणील तर तें मोडून काढ. फार काय आपले शत्रु संकटांत असले तर त्याच वेळीं त्यांच्या भेटीला जाऊन त्यांचें दुःख मुद्दाम आपल्या डोळयांनीं पाहावें हा एक पुरुषार्थच होय. शत्रूचें दुःख आपल्या डोळयांनीं पाहिल्यानें जो आनंद होतो तो पुत्र, द्रव्य, राज्य हीं मिळाल्यानेंहि

होत नाहीं. तुम्हीं कौरवांनीं मुद्दाम जाऊन त्या स्थितींत पांडवांना दर्शन दिलें म्हणजे त्यांचें दुःख अधिक वाटेल. ते स्वतःला अधिक निंद्य समजूं लागतील. तुमच्या स्त्रिया अंगावर दागिने घालून गेलेल्या द्रौपदीनें पाहिल्या म्हणजे तिला दुःख वाटेलच कीं नाहीं ! तसें दुःख त्यांना सभेंतहि वाटलें नव्हतें." दुर्योधन म्हणाला, " शकुनिमामा तुमचें हें बोलणें मला पटतें. पण आमचे बाबा या गोष्टीला कबूल होणार नाहींत याला काय करावें ? " तेव्हां त्यांना फसवून कांहीं-तरी भलतें सांगून त्यांची अनुज्ञा मिळवितां येईल असा कांहीं उपाय तुम्हीच विचार करून काढा. दुसरे दिवशीं शकुनि दुर्योधनाकडे जाऊन म्हणाला, "तूं बाबांना असें सांग कीं द्वैतवनामध्यें आपल्या स्वामित्वाचे अनेक गौळवाडे आहेत, खिलारे आहेत. त्यांच्या दूधदुभत्यापासून मिळणाऱ्या पैशांतील कांहीं अंश आपणांला मिळावयाचा असतो. म्हणून त्याची तपासणी करणें, हिशेब पहाणें हें निमित्त करून आपण जाऊं. पण धृतराष्ट्राची परवानगी हवी." ती मिळविण्याकरितां संगम नांवाचा एक गवळी आधींच त्यांनीं मथवून ठेविला होता. त्यानेंच धृतराष्ट्राकडे परत जाऊन हें बोलणें काढलें. त्यामुळें धृतराष्ट्राला तो विचार ठीक वाटला. तथापि आसपास कोठें पांडव असले तर विनाकारण त्यांच्याशीं कलागत व्हावयाची तेव्हां तिकडे मात्र जाऊं नका' एवढी सूचना देऊन धृतराष्ट्रानें रुकार दिला. तेव्हां दुर्योधन, इतर कौरव, शकुनी, कौरवस्त्रिया व कांहीं सैन्य घेऊन अर्धे काम व अर्धी शिकार अशा मिषानें द्वैतवनाकडे गेला. प्रथम गौळवाडे तपासण्याचें थोडें काम झालें. पुढें द्वैतवनाच्या तोंडाशीं चित्रसेन गंधर्वाच्या सेवकांनीं दुर्योधनाला प्रतिबंध केला. कारण चित्रसेन या ठिकाणीं याच वेळीं क्रीडा करण्याकरितां आला होता. दुर्योधनानें गंधर्वांना हांकून लावण्याची आज्ञा आपल्या सैनिकांना केली. तेव्हां युद्ध जुंपलें. त्यांत प्रथम कौरवांनी गंधर्वांचा मोड केला व वनांत शिरले. चित्रसेनाला हा वृतांत कळला तेव्हां तो स्वतः आणखी सैनिक घेऊन आला त्यामुळें फिरून युद्ध जुंपलें. अनेक दिव्य शस्त्रें व माया इत्यादिकांच्या योगानें कौरवांचा पराभव झाला. तरी महारथी कर्णानें बराच टिकाव धरला. शेवटीं त्याचाहि मोड झाल्यावर गंधर्वांनीं पळपुट्या कौरवांचा पाठलाग करून त्यांना व त्यांच्या स्त्रियांना बंदिवान केलें. इतक्यांत पांडव जवळपास आहेत अशी बातमी लागल्यामुळें कांहीं कौरव धर्मराजाकडे जाऊन " आमचे

संरक्षण करा दुर्योधनाला सोडवा अशी त्यांनीं विनवणी केली.'' तेव्हां धर्म भीमाला म्हणाला, "अरे हें वाईट झालें, तुम्ही जाऊन त्यांना सोडवा पाहूं.'' भीम म्हणाला, "आयतें बरें झालें कीं. सोडवा कशाला? आमचा छळ करून वरतीं आमचे दुःख पहाण्याकरितां येणाऱ्या त्या चांडाळांना परस्पर शिक्षा झाली. आपण त्यांत कशाला पडा?'' तेव्हां धर्म म्हणाला, "हा विचार नीट नाहीं. कांहीं केलें तरी कौरव हें आपले बंधूच आहेत. त्यांचा पराभव व मानहानी ही आपलीच होय. एक तर शरण आले- त्यांचें रक्षण करणें हा क्षत्रियाचा धर्म आहे. शिवाय आमच्या आमच्यांत कौरव शंभर आणि पांडव पांच असे वेगळे असले तरी शत्रूशीं प्रसंग आला म्हणजे आम्ही एकशें पांच होऊन प्रतिकार केला पाहिजे. मी स्वतः यज्ञाला बसलों आहे म्हणून. नाहींतर मीच त्यांच्या रक्षणाला गेलों असतों.'' तेव्हां अर्जुन म्हणाला, "ठीक आहे. तुमच्या आज्ञेप्रमाणें आम्ही जाऊन दुर्योधनाला सोडवितों. काळजी करूं नका.'' पण अर्जुन व चित्रसेन यांची गांठ पडल्यावर युद्धाचा प्रसंगच टळला. चित्रसेन म्हणाला, "तुम्हांला त्रास देण्याकरतां हे दुष्ट या वनांत आले असें इंद्राला समजलें म्हणून त्यानें दुर्योधनाला पकडण्या- करितां मला इकडे पाठविलें. त्याप्रमाणें मी केलें. मग उगीच कशाला त्याला सोडवितां?'' परंतु धर्मराजापर्यंत हें बोलणें गेलें तेव्हां त्यानें कौरवांना सोड- विण्याविषयीं आग्रहच धरला. म्हणून त्याप्रमाणें करण्यांत आलें. मग पूर्वीच्या युद्धांत पडलेल्या लोकांवर इंद्रानें अमृत शिंपडून त्यांना जिवंत केलें. धर्म- राजानें मोठ्या ममतेनें दुर्योधनाला यापुढें असें न करण्याविषयीं उपदेश केला. तेव्हां सर्व कौरवांसह दुर्योधन खालीं मान घालून हस्तिनापुराकडे परत गेला.

## दुर्योधनाचें उपोषण

या फजितीचें दुर्योधनाला इतकें दुःख झालें कीं, त्यानें मृत्यु येईपर्यंत उपोषण करण्याचा निश्चय केला. तेव्हां कर्ण, दुःशासन इत्यादि अनेकांनीं त्याला परोपरीनें विनविलें. उपोषणाची प्रतिज्ञा करूं नको असें सांगितलें. पण दुर्योधन कांहीं केल्या ऐकेना आणि दर्भासन आंथरून स्नान करून उपोषणाला मांडी घालून बसला. इकडे दुर्योधन मृत्यु पावला तर आपली हानि होईल अशी पाताळांतील दानवांना भीति पडली, कारण ते दानवहि

पांडवांचे वैरीच होते म्हणून दानवांनीं कृत्या निर्माण करून तिच्या हातीं दुर्योधनाला उचलून पाताळांत नेलें व त्याला म्हणाले, "तूं हें उपोषण सोडून दे. तुझ्या बाजूचे कर्ण, संशप्तक वगैरे वीर पांडवांचा नाश खचित करतील तूं खिन्न होऊं नको. व्यर्थ उपोषण करून तूं मेलास तर आमच्या पक्षाचीच हानि होईल." मग दुर्योधनाला परत त्याच्या जागीं आणून सोडल्यावर तो दानवांच्या बोलण्याचा विचार करूं लागला आणि त्यानें उपोषणाचा व्रत रहित केला. हस्तिनापुराला गेल्यावर भीष्मांनीं दुर्योधनाला सदुपदेश केला. ते म्हणाले "तूं द्वैतवनाकडे निघालास तेव्हांच मला संशय आला. त्यांची कुचाळकी करून शेवटीं पराभवच पदरांत घेतलास कीं नाहीं ? ज्या पांडवांचा तूं मत्सर करतोस त्यांनींच तुला शेवटीं सोडविलें कीं नाहीं ? तेव्हां तूं द्वेषबुद्धी टाकून पांडवांशीं जुळतें घेण्याचा विचार कर."

## वैष्णवयज्ञ

ही पूर्वीची योजना फसली, तेव्हां आतां नवें काय करावें असा विचार सुरू झाला. तेव्हां कर्ण म्हणाला, "पूर्वी पांडवांनीं राजसूय यज्ञ करण्याचे ठरवून दिग्विजय केला तसा तूं वैष्णवयज्ञ कर. आणि त्या निमित्तानें मी तुझ्या नांवानें दिग्विजय करून येतो." त्या प्रमाणें तो सैन्य घेऊन निघाला आणि मोठा वीर असल्यामुळें त्यानें चारहि दिशांना जाऊन दिग्विजय केला, आणि पुष्कळसें द्रव्य बरोबर आणलें. नंतर यज्ञाला सुरुवात झाली. प्रत्यक्ष राजसूय यज्ञाऐवजीं वैष्णवयज्ञ करण्याचें कारण असें कीं, राजा या नात्यानें धृतराष्ट्र जिवंत असतां दुर्योधनाला राजसूय यज्ञ करतां येणार नाहीं, युधिष्ठिराचा बाप मृत असल्यामुळें तो करण्याचा अधिकार त्याला होता असें शास्त्र पुरोहितानें सांगितलें. आणि म्हणाला, "वैष्णवयज्ञ हा मात्र असा आहे कीं, कोणाहि सज्जनानें तो करावा." यज्ञाचें आमंत्रण द्वैतवनांत पांडवांकडे गेलें. पण धर्मराजानें उलट निरोप पाठविला कीं, "आम्ही यज्ञाकरितां नगराला परत येऊं तर वनवासाच्या प्रतिज्ञेचा भंग होईल, म्हणून आम्ही येत नाहीं." पण भीमानें निरोप पाठविला तो असा "होय, आम्ही येऊं कीं नगराला परत. पण आधीं रणयज्ञ उभा करूं, त्यांत दुर्योधनाची आहुति देऊं, आणि मग येऊं." केव्हांहि

स्पष्ट व अप्रिय बोलण्याचें काम भीमाकडे सोंपविल्या सारखेंच असे. धर्म तर निष्ठुर भाषा बोलणाराच नव्हे. अर्जुनहि एकादे वेळीं कठोर शब्द आवरते घेई. पण भीम कधींहि उपेक्षा करीत नसे. कौरवांची गोष्ट निघाली कीं तो क्रोधानें बोलायचाच. या यज्ञासंबंधानें प्रजाजनांतहि दुमत होतें. कोणी दुर्योधनाला धन्यवाद देत तर कोणी म्हणत, "धर्मानें केलेला राजसूय यज्ञ कोणीकडे, आणि हा वैष्णवयज्ञ कोणीकडे ?" पांडव मात्र आपल्या ठिकाणीं विचार करूं लागले कीं दुर्योधनानें हीं यज्ञाची टुम कां काढली ? पण त्यांना समाधानकारक उत्तर मिळेना. मात्र पांडववधाच्या प्रतिज्ञा कौरव वीर करीत आहेत अशा वार्ता दूतांकडून पांडवांच्या कानांवर अधिकाअधिक जाऊं लागल्या.

## हरिणांची धर्मराजास विनंती

पांडवांचा मुक्काम द्वैतवनांत बरेच दिवस झाल्यामुळें एक वाईट गोष्ट झाली. ती अशी कीं, शिकार करून हरणांचे मांस पांडव खात. यामुळें या अनेक वर्षांच्या अवधींत हरिणांची संख्या घटूं लागली. तेव्हां हरिणांच्या कळपाचे पुढारी धर्मराजाकडे गेले व हळूंच म्हणाले, "आम्ही म्हणूं नये पण आतां म्हणावें लागत आहे; आजवर आम्ही तुम्हांकरितां मृत्यु पत्करला व तुमचें पोषण केलें. परंतु असाच क्रम चालला तर या वनांत जागेवर हरिण उरणार नाहीं. तरी आतां आपण येथील मुक्काम हालवून दुसऱ्या वनांत गेला तर आमच्यावर उपकार होतील." हें ऐकून धर्मराजाला त्या हरिणांविषयीं दया उत्पन्न झाली आणि आपल्या भावांसह तो द्वैतवन सोडून काम्यकवनाकडे पुन्हां गेले. तिकडे गेल्यावर एक दिवस व्यसमुनींची स्वारी पांडवांना भेटण्यासाठीं आली. व नेहमींप्रमाणें त्यांनीं लौकिक आचार, नीति, धर्मशास्त्र तत्त्वज्ञान, इतिहास, कथा सांगून पांडवांचें समाधान केलें. आणि जातांना असा आश्वासनपर वर देऊन म्हणाले, "प्रतिज्ञेप्रमाणें वनवास व अज्ञातवास पुरा करावा लागलेच तो तुम्ही शांतमनानें व सुखसमाधानानें करीत आहां. तेव्हां तेराव्या वर्षाच्या शेवटीं तुम्हांला यश व राज्य यांची प्राप्ति खचित होईल."

## दुर्वासांकडून पांडवांचा छळ

पांडवांचा छळ करण्याची आणखी एक युक्ति निघाली. तिला कारण दुर्वास ऋषी हे झाले. हा ऋषी मोठा तपस्वी खरा पण अत्यंत लहरी होता. दुसऱ्याची सत्वपरीक्षा करावयाची त्याला फार खोड असे. तसें करून त्याला काय लाभ होई तें देव जाणे! पण तसें केल्यानें त्याला बरे वाटे एवढे खरें. त्याला एक संवय अशी होती कीं एकाद्या गृहस्थाश्रमीं कुटुंबाकडे अशा वेळीं जावयाचें की जेवणखाण होऊन भांडी घासूनहि झालेली असावयाची. अशा वेळीं अवचित येऊन तो म्हणावयाचा "मला भूक लागली आहे; आतांच्या आतां जेवावयास वाढा." बरें, तो एकटाहि असावयाचा नाहीं. बरोबर अनेक शिष्यमंडळी घेऊन येई; आतां आयत्या वेळीं इतक्या लोकांचा स्वयंपाक कसा होणार? तथापि तुम्ही स्नान करून या तोंपर्यंत स्वयंपाक होईल असें घरांतील मुख्य स्त्रीनें म्हटलें म्हणजे ऋषी स्नानाला जाई आणि परत आल्यावर पानें वाढलेलीं दिसलीं कीं म्हणे 'मला आतां भूक नाहीं.' जेवावयाला वाढलें नाहीं म्हणजे रागानें शाप देई व वाढलें म्हणजे म्हणे मला भूक नाहीं. तात्पर्य कोणीकडून तरी सज्जनांचा छळ करावा हेंच जसें कांहीं त्यानें व्रत घेतलें होतें. हे ऋषीमहाराज एकदां दुर्योधनाकडे आले आणि त्यांनीं त्याला आपल्या लहरीपणाचा प्रभाव पुरा दाखविला. परंतु योग असा कीं दुर्योधन त्याच्या सत्वपरीक्षेला उतरला. तेव्हां दुर्वास म्हणाला "कांहींतरी वर माग मी संतुष्ट झालों आहे." पण दुर्योधनाची बुद्धीच इतकी दुष्ट कीं त्यानें स्वतःच्या कल्याणाचा कांहीं वर मागितला नाहीं. आणि कर्ण दुःशासन यांचा विचार घेऊन वर मागितला कीं, "तुम्ही काम्यकवनांत जाऊन द्रौपदीची व पांडवांची सत्वपरीक्षा करा आणि ते परीक्षेला उतरले नाहींत तर शाप द्या." दुर्वासानें ही गोष्ट कबूल केली. आणि बरोबर शिष्यांचा एक मेळा घेऊन तो पांडवांच्या आश्रमांत अवचित येऊन उभा राहिला व म्हणाला, "आम्ही फार भुकेलों आहों तरी आम्हांला मुग्राम अन्न तयार करून जेवावयाला वाढा. या वेळीं सर्वांचीं जेवणें होऊन द्रौपदी विश्रांति घेत होती. ती खडबडून उठली; तिला चिंता पडली कीं, दुर्वास ऋषी स्नान करून परत येईपर्यंत सर्व स्वयंपाक तयार कसा व्हावा? उर्शार

झाला तर तो शाप देणार व सत्वहरण करून जणार. तेव्हां तिनें कृष्णाचा धांवा केला. त्याप्रमाणें कृष्ण आला. त्याला द्रौपदीचें संकट काय हें कळलें होतें. पण तिची थट्टा करावी म्हणून दुर्वासाचें कांहीं न बोलतां तो म्हणाला "मला फार भूक लागली आहे, खायला दे." पण ती कोठून देणार! तेव्हां कृष्ण म्हणाला, "सूर्यानें तुला दिलेली ती स्थाली आहेना, ती आण" ती आणून पाहातां तिच्या कांठाला एक शिजल्या भाजीचें पान चिकटून राहिलें होतें. तें खाऊन कृष्ण द्रौपदीला म्हणाला, "बहिणीचा हात, मग एवढयाशा पानानेंहि भावाचें पोट भरलें तर काय नवल!" असो, मीहि दुर्वासाला चमत्कारच दाखवितो. त्याला बोलाविणें पाठीव. त्याप्रमाणें बोलावण्याकरितां दूत नदीवर गेले आणि पहातात तों स्नानाकरितां नदींत उतरलेले शिष्य पोट भरल्याप्रमाणें मोठमोठ्या ढेंकरा देत आहेत. मग ते सर्व बाहेर येऊन आश्चर्यानें एकमेकांकडे पाहून दुर्वासाला म्हणाले, "आम्हांला तर आतां भूक नाहीं. उगीच श्रम पडले. सर्व अन्न फुकट जाणार. आणि तिनें रागानें शाप दिला तर काय करा. असें म्हणून भीतीनें ते दाही दिशांना पळून गेले." अशा रीतीनें त्या वेळचें संकट टळलें. पण पांडवांना चिंता वाटू लागली कीं, झाल्या फजितीचा वचपा काढण्याकरितां दुर्वास ऋषी मध्यरात्रींच पुन्हां आला तर काय करा? तेव्हां कृष्णानें त्यांना आश्वासन देऊन सांगितलें कीं, आतां मी आलों आहे. तुम्हांला दुर्वासाची भीति नको. तात्पर्य अशा एका चमत्कारिक रीतीनें पांडवांचा छळ करण्याचा विचार कौरवांनीं केला पण तोहि फुकट गेला.

## जयद्रथाची फजिती

पण याहून खरोखरीचें एक संकट येणार होतें तें असें. एक दिवस द्रौपदीला आश्रमांत ठेवून पांडव शिकारीकरितां निरनिराळया दिशांना गेले. इतक्यांत त्या वाटेनें जयद्रथ राजा आपल्या लग्नवधूच्या गृहाकडे म्हणजे शाल्व देशाकडे निघाला होता. द्रौपदी त्याला आश्रमांत उभी असलेली दिसली. तेव्हां तो मूर्ख मनांत म्हणाला "ही स्त्रीच जर मला बायको करण्याला मिळाली तर शाल्व देशाकडे जाच कशाला!" या विचारानें तो रथांतून उतरून द्रौपदीकडे गेला व तिच्याशीं लाडीगोडी करून बोलूं लागला. तेव्हां तिनें त्याचा सडकून निषेध केला. ती म्हणाली, "मी तुला ओळखलें, पण तुझी

इच्छा असेल तर धर्मराज परत आल्यावर त्यांच्याकडून तुझा अतिथिसत्कार हवा असेल तो करून घेऊन मुकाट्यानें जा " असें बोलून ती पर्णशालेकडे निघाली. तेव्हां जयद्रथ कांहीं सेवक बरोबर घेऊन तिकडे गेला व म्हणाला "द्रौपदी ये व माझ्या रथावर बैस. या तुझ्या पांडवांचें वैभव नष्ट झालें आहे. अशांची सेवा तुझ्यासारख्या सुंदर स्त्रीनें कशाला करावी ? मी तुला आपल्या नगरीला नेऊन सुखी करीन." द्रौपदीला भीति वाटली आणि एकदम अधिक तोडून बोललें तर तो एकदम आपणाला उचलून रथावर बसवील म्हणून ती त्याच्याशीं इकडून तिकडून बोलून वेळ काढूं लागली. शेवटीं जयद्रथानें तिच्या अंगावरील वस्त्राला धरलेंच तेव्हां तिनेंहि अशा जोरानें तें हिसकावून घेतलें कीं जयद्रथ कोलमडून जमिनीवर पडला. पण ती एकटी करणार काय! जयद्रथ व त्याचे सेवक यांनीं तिला धरली व ते तिला घेऊन चालले. इतक्यांत पांडवहि शिकार पुरी करून परत आले. त्यांना पर्णशालेंतील एका दासीकडून ती बातमी कळली. तें ऐकतांच पांडव जयद्रथावर चालून गेले. त्यांनीं त्याची वाट अडविली व रणसंग्राम करून आतां त्याला पकडणार इतक्यांत तो त्यांचा डोळा चुकवून पळून गेला. पांडवांनीं द्रौपदीला स्वाधीन करून घेऊन आपणावरोबर चालविली. भीमसेन व अर्जुन जयद्रथाचा शोध व पाठलाग करण्याला निघाले. तेव्हां धर्मराज त्यांना म्हणाला, "अरे जयद्रथाला पकडा पण त्याला मारूं नका. तो धृतराष्ट्राचा जांवई व आपला मेहुणा आहे." तें ऐकून द्रौपदी फार रागावली व म्हणाली, "यांचे हें नेहमीं असेंच चालावयाचें. त्यांचें काय ऐकतां ? जयद्रथाला ठार मारूनच माझ्या अपराधाची भरपाई करा!" शेवटीं भीम व अर्जुन यांनीं जयद्रथाला पकडलें व त्याचे केंस धरून त्याच्या पाठींत लाथा घातल्या. आणि भीम त्याला धरून आतां ठार करणार इतक्यांत अर्जुनानें निवारण केलें. तेव्हां भीमानें अर्धाकृति बाणानें जयद्रथाच्या डोक्याचे पांच पाट काढले व म्हणाला "तुला जीवदान हवें असेल तर सर्वांसमक्ष जमिनीला डोकें लावून मी तुमचा दास आहे असें म्हण." मग त्यानें तसें केल्यावर अर्जुनानें त्याला रथावर बांधून घातला आणि धर्मासमोर नेऊन उभा केला. तेव्हां धर्म म्हणाला, "जयद्रथानें मी पांडवांचा दास आहे असें तोंडानें म्हटल्याचें द्रौपदीला कळवा आणि त्याला सोडून द्या." तेव्हां जयद्रथ मेल्यासारखा होऊन निघून गेला व या

अपमानाचा सूड घेण्याकरितां शंकराची आराधना करण्याचें त्यानें ठरविलें. ती आराधना केल्यावर शंकरानें त्याला असा वर दिला कीं, "स्वतः अर्जुनापुढें तुझें कांहीं चालणार नाहीं तरी त्याखेरीज इतर सर्व पांडवांचा तूं एक दिवस तरी पराभव करशील."

## मार्कंडेयांचा उपदेश

द्रौपदीवर हीं अशीं संकटें येऊं लागलीं. आम्ही पांडवही धर्मानें वागत असतां अधर्मानें वागणाऱ्या कौरवांकडून आमचा छळ होत आहे तेव्हां यांत देवाघरीं अन्याय होतो कीं नाहीं अशी शंका धर्मराजाला वरचेवर येई आणि तो दुःखी होई. पण एक दिवस मार्कंडेय मुनी भेटीला आले. तेव्हां त्यांनीं धर्मराजाला श्रीरामचरित्र–विशेषतः सीतेवर आलेलीं संकटें या विषयीं सविस्तर वृत्तांत सांगितला. आणि म्हणाले "जगांत ज्यावर अन्याय होतो असा तूंच एकटा नाहींस. अनेकांवर तसा पूर्वी झालेला आहे पण तें ईश्वरी तंत्र असें मानावें लागतें." तसेंच सती सावित्रीचें चरित्र सांगून मार्कंडेय म्हणाले, "सावित्रीला जे क्लेश झाले ते तिला कां व्हावे? पण जसा श्रीराम तसा धर्मराजा तूं! आणि जशी सीता किंवा सावित्री तशीच ही द्रौपदी असें समज. आज तुम्हांला क्लेश होत असले तरी शेवटीं तुमचा विजय होणार आहे." तसेंच मार्कंडेयांनीं द्रौपदीचा जन्मवृत्तांत धर्मराजाला सविस्तर सांगितला.

## कर्णाचें दातृत्व

इकडे हें होत असतां, पांडवांचा वनवास संपण्याच्या सुमारास इंद्रानें असा विचार केला कीं पुढें केव्हां तरी युद्ध होणार आणि त्यांत पांडवांना खरी भीति कर्णापासून. तेव्हां तो ज्याच्या योगानें अजिंक्य ठरणार तीं त्याचीं कवचकुंडलें कपटानें काढून घ्यावीं. कर्ण पडला सूर्याचा पुत्र. त्याला ही गुप्त गोष्ट कळतांच त्यानें कर्णाला याविषयीं सावधगिरीची सूचना दिली. परंतु कर्ण हा देखील प्रतिज्ञेचें पालन करणारा निश्चयी पुरुष. म्हणून इंद्र जेव्हां ब्राह्मणाचें रूपानें कर्णाकडे आला व त्यानें कवच कुंडलांचेंच दान नक्की मागितलें. तेव्हां प्रथम कर्णानें त्याचें इतर रीतीनें समाधान करण्याचा प्रयत्न केला. कवच-

कुंडलें न देण्याचें खरें कारण सांगितलें. 'तूं इंद्र असून कपटवेषानें, वाईट हेतूनें मजकडे आला आहेस' असेंहि सांगितलें. शेवटीं ब्राह्मण माघार घेत नाहीं असें पाहून कर्णानें कवच-कुंडलें काढून इंद्राला दिलीं, पण त्यामुळें उलट कांहीं मागून घेण्याचा अधिकार कर्णाला प्राप्त झाला. म्हणून कर्ण म्हणाला "इंद्रा, मला हें दे कीं, कवच-कुंडलें कापून दिल्यामुळें मी विद्रूप दिसेन तसा दिसूं नये. त्यानें दुसरी एक गोष्ट मागितली. ती अमोघ वासवी शक्ति." इंद्रानें या दोन्ही गोष्टी मान्य केल्या. परंतु शक्तीविषयीं इतकें सांगून ठेविलें कीं, "ती तुला एकदांच उपयोगी पडेल. तुझ्या प्राणावरच जेव्हां प्रसंग येईल तेव्हांच निर्वाणीचा उपाय म्हणून ही शक्ति तूं शत्रूवर सोडावी. एरव्हीं तिचा उपयोग तूं केल्यास तुझ्यावर उलटेल." तात्पर्य पांडव तेरा वर्षांनीं परत आले म्हणजे युद्धप्रसंग ठेविलेला आहे हें समजून त्यांचे शत्रु व मित्र आपापल्यापरीनें उद्योगाला लागले होते.

## यक्षप्रश्न

नंतर पांडव फिरुन द्वैतवनांत आले व आतां त्यांनीं निश्चय केला कीं हरिणांची शिकार करून त्यांचे मांस खावयाचें नाहीं तर वनांतील फल-मूलावरच उपजीविका करावयाची. एक दिवस एक तपस्वी ब्राह्मण त्यांच्याकडे रडत येऊन म्हणाला, "एक हरीण आश्रमांत येऊन त्यानें आपले शिंग अरणी आणि मंथा यावर घासून तीं शिंगांत अडकवून घेऊन पळून गेला. यामुळें माझ्या अग्निहोत्राचा लोप होणार आहे तरी हरिणाचा पाठलाग करून त्या वस्तू मला परत आणून देण्याची कृपा करावी." तें एकून पांडव त्या हरिणाला पकडण्याकरीतां निघाले. परंतु थोडया वेळांत तो हरीण दिसतां दिसतां नाहींसा झाला. ब्राह्मणाची अरणी मिळत नाहीं यामुळें पांडवांना वाईट वाटलें. नंतर ते थकून तहान लागल्यामुळें एका जागीं बसले. धर्म म्हणाला "त्या झाडावर चढ आणि पाणी कोठें दिसतें का पहा." नकुलानें वर चढून पाहिलें तों त्याला वृक्षांच्या झाडींत पाणी दिसलें. धर्म म्हणाला "तर मग जा आणि या बाणांच्या भात्यांत पाणी घेऊन ये." नकुल तेथें गेला पण त्या पाणवटयावर एक यक्ष बसला होता. तो म्हणाला "थांब, हा पाण्याचा झरा माझा आहे आणि माझा असा नियम आहे कीं जो मी विचारल्या

प्रश्नांचीं, उत्तरें देईल त्यालाच हें पाणी पितां किंवा नेतां येईल." पण तें न जुमानतां नकुल तें पाणी प्याला. पण यक्षाच्या प्रभावानें जागच्या जागीं मरून पडला. नकुल जाऊन फार वेळ झाला असें पाहून धर्मानें सहदेवाला पाठविलें. त्याचा प्रकार तोच झाला. नतर अर्जुन गेला व त्यानें बाणांचा वर्षाव केला. पण त्या अदृश्य यक्षानें अर्जुनालाहि बेशुद्ध करून पाडलें. मग त्या मागून भीम गेला त्याचाहि तोच प्रकार. शेवटीं स्वतः धर्मराज गेला. त्यानें चारहि बंधु जमिनीवर निचेष्ट होऊन पडलेले पाहून त्याला फार दुःख झालें. तो मनांत म्हणाला, "खच्चित दुर्योधनानें या पाण्यांत विष कालवून ठेवलें असलें पाहिजे." तथापि स्वतः पाण्याजवळ जाऊन पाहावें असा विचार करून तो खालीं पाण्यांत उतरणार तोंच अदृश्य असा तो यक्ष म्हणाला "हां खबरदार! या झऱ्याचा मालक मी एक बगळा आहे. मी शेवळें आणि मासे खाऊन राहतों. आणि माझ्या प्रश्नांचीं उत्तरें जो बरोबर देईल त्यालाच मी हें पाणी पिऊं देतों." हें ऐकून धर्मानें ताडलें कीं "हा स्वतःला पक्षी म्हणवितो, पण तो खरोखर कोणी देव असला पाहिजे." अशा विचारानें धर्मानें त्या देवाला नमन करून स्तुती केली व म्हणाला "हे देवते. तूं खरोखर कोण आहेस तें सांग!" तेव्हां यक्ष प्रचंड रूप धरून प्रगट झाला व म्हणाला, "मीच हे तुझे भाऊ मारले. तेव्हां तुझी इच्छा असेल तर माझ्या प्रश्नांचे उत्तर दे! या तुझ्या भावांनीं प्रश्नांची उत्तरें न देतां दांडगाई केली म्हणून ते मेले." धर्म म्हणाला "ठीक आहे मी यथामति उत्तरें देईन." तेव्हां यक्षानें त्याला धर्मनीति, तत्वज्ञान या विषयावर अनेक प्रश्न विचारले. ते अवघड होते तरी धर्मानें त्यांचीं उत्तरें बरोबर दिलीं. तीं उत्तरें ऐकून यक्ष संतुष्ट झाला व म्हणाला, "तुला यांतला कोणता भाऊ पाहिजे तो सांग? मी त्याला जिवंत करतों." धर्म म्हणाला, "एकच तर, नकुल जिवंत होऊं दे!" यक्ष म्हणाला, "असें कां?" आणि धर्म म्हणाला, "माझ्या आईचा एक मुलगा मी जिवंत आहे, आणि एकच जिवंत व्हावयाचा तर माझी दुसरी आई माद्री तिचा एक जिवंत व्हावा म्हणजे तें न्यायाचें होईल." हें उत्तर ऐकून यक्षाला फार समाधान वाटलें आणि त्यानें त्या चौघांहि भावांना जिवंत केलें. पण ते खरोखर मृत नसून मूर्च्छित होते म्हणून ते झोपेंतून जागे झाल्याप्रमाणें सतेज उठून उभे राहिले. शेवटीं यक्ष म्हणाला, "मी पक्षी नाहीं तर खरोखर तुझा पिता यमधर्मच

आहे. मी संतुष्ट झालों. तूं वाटेल तो वर मागून घे." धर्म म्हणाला, "तर मग हें द्या कीं, ब्राह्मणाच्या अरणी नाहींशा झाल्या त्या त्याला परत मिळाव्या." यमधर्म हंसून म्हणाला, "ठीक आहे. मीच त्या हरिणाच्या रूपानें नेल्या होत्या." मग आणखी 'दुसरा वर माग' असें यमधर्म म्हणाला, "तेव्हां धर्मानें मागितला तो असा. आमचा आतां वनवास संपला आहे. आणि अज्ञातवास सुरू होणार आहे तर या कठीण प्रसंगांत आम्हाला कोणी ओळखूं नये हा वर द्यावा." यमधर्मानें तोहि दिला. आणि वरतीं सांगितलें कीं, "तुम्ही पांडव कोठेंहि असला तरी एक वर्षभर तुम्हांला कोणीहि ओळखणार नाहीं."

## पांडवांचा अज्ञातवास

नंतर वनवासाची बारा वर्षें उद्यां संपणार तेव्हां आपण अज्ञातवासाचा काळ घालविण्याकरितां कोठें रहावें याचा विचार पांडव बंधु करूं लागले. पण आधीं आपल्या परिवारांतील ब्राह्मणांना त्यांनीं निरोप दिला. तेव्हां ब्राह्मणांनींहि त्याला आशीर्वाद दिला. आणि ते आपापल्या ठिकाणीं निघून गेले. अर्जुन म्हणाला, "मी तुम्हांला अनेक देशांचीं नांवें सांगतों. त्यांतील कोणता तुम्हांला पसंत पडतो हें सांगा." तेव्हां धर्मराजानें मत्स्य देश पसंत केला. कारण त्याचा राजा विराट हा धर्मशील असून पांडवांवर त्यांचें प्रेम होतें. अशा रीतीनें देश निश्चित झाल्यावर तेथें जाऊन कोणत्या वेशानें रहावें याची चर्चा झाली. धर्म म्हणाला "मी, कंक नांवाचा ब्राह्मण होऊन जाईन राजाकडे, कारण मला फांशांचा डाव खेळतां येतो. फार तर सांगेन कीं मी धर्मराज युधिष्ठिराचा मित्र होतों." भीम म्हणाला, "मला स्वयंपाक चांगला करितां येतो म्हणून मी आचाऱ्याच्या वेषानें जाईन स्वयंपाकाला लागणारे जळणाचे भारे उचलणें, वेळीं माजलेले हत्ती व बैल आवरणें, कुस्ती खेळणें, इत्यादी गोष्टीहि मी करीन. कारण देवानें मला तितकें शरीरबळ दिलें आहे." अर्जुन म्हणाला, "मी स्त्रीचा वेश घेईन आणि माझ्या अंगावर पुरुषपणाच्या ज्या ठळक खुणा असतील त्या झांकून टाकीन. हातांत शंखांच्या बांगड्या घालीन. केसांची वेणी घालीन आणि बृहन्नला हें नांव घेऊन अंतःपुरांत राहून गाणें, वाजविणें, गोष्टी सांगणें, नाचणें इत्यादि नाजूक कामें मी करीन. सांगेन कीं मी एक वेळ द्रौपदीची दासी होत्यें." नकुल म्हणाला,

" मी मोतद्दार चाबुकस्वार होईन कारण घोडयांविषयींच्या सर्व विद्या मला येतात." सहदेव म्हणाला, " मला गवळयाचें सर्व काम येतें. मी तंतिपाल या नांवानें गौळवाडयाचें काम घेईन. त्यांत राजाला संतुष्ट करीन." आतां प्रश्न निघाला द्रौपदीचा ! तेव्हां ती म्हणाली, " तुम्ही माझी काळजी करूं नका. मी सैरंध्री नांवाची दासी होऊन विराट राजाच्या राणीची सेवा पत्करीन. राजस्त्रियांची सेवा करून त्यांना आनंदित कसें करावें हें मला चांगलें समजतें." हें सर्व ठरल्यावर पांडवांचा पुरोहित, दासदासी, आचारी, सारथी द्रुपद राजाच्या नगराला गेले. आणि सेवक इंद्रसेन हा मोकळ रथ घेऊन द्वारकेला निघून गेला. या सर्वांनीं असें सांगावयाचें ठरविलें कीं " पांडव द्वैतवनांत कोठें गुप्त झालें हें कळेना. फार वाट पाहिली. शेवटीं निराश होऊन आम्ही निघून आलों." सर्वांत शेवटीं पांडवांनीं धौम्य ऋषींचा निरोप घेतला. तेव्हां त्यानें राजदरबारीं मनुष्यानें कसें वागावें याविषयीं फार शहाणपणाचा उपदेश केला आणि पांडवांचा गृह्याग्नि घेऊन तो पांचाल देशाला गेला. मग प्रश्न निघाला कीं बरोबरच्या शस्त्रांचें, धनुष्यबाणांचे काय करावें ? तेव्हां दुरून विराट नगरी दिसूं लागतांच जवळच एक मोटा शमी वृक्ष दिसत होता तिकडे ते गेले. आणि अतिशय विस्तृत फांद्यांचा, अतिशय विशाल, भय वाटण्यासारखा आणि फांद्यांची अतीशय गुतागुंत झालेला वृक्ष पाहून त्यांनीं धनुष्यांच्या दोऱ्या सोडल्या आणि धनुष्यें, तलवारी, भाते, बाण, सर्व सामुग्री त्या वृक्षाच्या ढोलींतून, फटींतून, चिरांतून नीट राहतील अशी ठेवून दिली. हा वृक्ष स्मशानाजवळ होता, म्हणून तेथें मनुष्य सहसा फिरकणारे नव्हते. तथापि त्यांनीं जवळचें एक प्रेत घेतलें आणि तें झाडावर बांधून ठेविलें. हेतु हा कीं ते पाहूनच लोकांनीं भिऊन दूर जावें. नगराच्या तोंडीं एक दुर्गादेवीचें देऊळ होतें त्यांत जाऊन त्यांनीं देवीची परोपरीनें प्रार्थना केली व अज्ञातवासांत तू आमचें रक्षण कर असें वरदान मागितलें. तेव्हां देवी संतुष्ट होऊन तिनें तो वर त्यांना दिला. मग निरनिराळया वेळीं पांडव बंधू नवीन वेष घेऊन विराट राजाच्या पदरीं राहिले. द्रौपदी ही केंसाची गांठ मारून एखाद्या वेड्या स्त्रीप्रमाणें भटकूं लागली. हेतु हा कीं, राजवाडयांतील सुदेष्णा राणीची दृष्टि आपणाकडे जावी आणि तसेंच झालें. कारण, इतकी सुंदर स्त्री गरीब वेषांत आणि वेडसर पाहून राणीला तिची दया आली. आणि

तिनें तिला आपल्या पदरीं ठेवून घेतलें. पण तिला मनांतून एक भीति वाटली कीं, अशी सुंदर स्त्री राजवाड्यांत वावरूं लागली म्हणजे तिच्या रूपामुळेंच अनेक संकटें उत्पन्न व्हावयाचीं. परंतु द्रौपदी म्हणाली, "तुम्ही त्या विषयीं चिंता करूं नका. मी विवाहित स्त्री आहे व माझे पति गंधर्वपुत्र आहेत. माझ्या-वर दृष्टि ठेवून अपमान करण्याची कोणाचीहि छाती होणार नाहीं. मात्र माझी एक अट आहे ती ही कीं, मी सेविका झालें तरी मला पाय चेप-ण्याचें काम सांगूं नये, आणि उष्टा पदार्थ खावयाला देऊं नये तें मला खपावयाचें नाहीं." अर्जुनाला आपल्या कपटवेषाची बतावणी करणें थोडें अवघड गेलें पण अर्जुनानें मोठ्या चातुर्यानें आपल्या सोंगाची संपादणी केली, तेव्हां अंतःपुरांतील स्त्रियांना देखील ही स्त्रीच आहे असा मोह पडून तिला ठेवून घेण्याविषयीं त्यांनीं राणीला विनंती केली. अशा रीतीनें त्या सर्वांची व्यवस्था विराट राजाच्या पदरीं लागली. मग प्रत्येकानें आपल्या वेषाप्रमाणें आपले गुणहि प्रकट करण्याला प्रारंभ केला. धर्मानें फांशाच्या खेळांत विराटावर डाव लाऊन द्रव्य मिळवलें व तें हळूंच आपल्या भावांकडे दिलें. भीम स्वयं-पाकघरांतील पक्वान्नें हळूंच आपल्या भावांना गुप्तपणें खायला देई. असे चार महिने गेल्यावर विराट नगरांत ब्रह्मोत्सवाकरितां चहूंकडून मंडळी जमली. त्यांत कांहीं तमासगीर, कांही पहिलवान असेहि लोक आले. उत्सवाचा एक भाग म्हणून कुस्त्यांचा आखाडा पडला. त्यांत जीमूत नांवाचा पहिलवान पुढें येऊन त्यानें दंड थोपटून माझ्या बरोबर कोणाला लढावयाचें असेल त्यानें यावें अशी घोषणा केली. तेव्हां आपल्या पदरचा पहिलवान म्हणून राजानें भीमाला कुस्तीला उठविलें, त्या दोघांची कुस्ती फारच भयंकर पण प्रेक्षणीय झाली. शेवटीं भीमानें जीमूताला वर उचलून गर गर फिरवून जमिनीवर आपटलें तेव्हां तो पहिलवान मरण पावला. सर्वांनीं बल्लवाचा जयजयकार केला. मग राजानें सिंह, वाघ, हत्ती यांच्याशींहि भीमाला लढविलें पण त्यांतहि तो विजयी झाला.

## कीचकवध

सहा महिने सुखरूपपणें गेले. नंतर एकदां विराटाचा सेनापति व राणी सुद्रेष्णेचा भाऊ कीचक याच्या दृष्टीला सैरंध्री पडली व त्याच्या

मनांत तिच्याविषयीं अभिलाष उत्पन्न झाला. तो सुदेष्णेला म्हणाला “ ताई ही देवतेसारखी सुंदर स्त्री ती तुला दासी म्हणून कशाला हवी ? दे ती मला. मी तिला आपली राणी करीन ! ” स्वतः द्रौपदीकडेहि तो गेला व म्हणाला “ तूं इतकी मळकट वस्त्रें नेसून दासीपणांत कां दिवस घालवितेस ? ” द्रौपदी म्हणाली, “ मी हलक्या जातीची आहे. मला दासीपणाच योग्य. शिवाय मी विवाहित आहे. तूं माझ्या वाटेला जाऊं नको. तसें केलेंस तर तुझ्या प्राणावर बेतेल.” मग कीचकानें आपल्या बहिणीला फारच गळ घातली व म्हणाला “ ताई कसेंहि करून सैरंध्री माझ्या स्वाधीन कर ! ” सुदेष्णा म्हणाली “ एका पर्वणीला तूं मद्य आणि लाडू तयार कर म्हणजे ते आणण्याच्या निमित्तानें मी सैरंध्रीला तुझ्याकडे पाठवीन आणि तुला तिला वश करतां आलें तर पहा. माझी हरकत नाहीं.” असें ठरून मग कीचकाकडून निरोप आल्यावर सुदेष्णेनें द्रौपदीला कीचकाकडे जाऊन ते पदार्थ आण म्हणून आज्ञा केली. द्रौपदीनें जाण्याला फार हरकती घेतल्या. पण ती पडली दासी. तिचे काय चालणार ? म्हणून ती गेली. अर्थात ती येतांच कीचकानें लगट करून तिचा हात धरला. परंतु द्रौपदीनें इतक्या जोरानें तो ओढून घेतला कीं त्यामुळें कीचक जमिनीवर कोसळला. द्रौपदी राजसभेकडे धांवत निघाली. फिरून कीचक तिची वेणी धरून ओढूं लागला व त्यानें तिला लाथहि मारली. राजसभेंत त्यावेळीं धर्म, भीम इत्यादि बसले होते. त्यांच्या दृष्टीला हा प्रकार पडला. पण करतात काय ! द्रौपदी राजा विराटाला म्हणाली, “ राजा या कीचकाचा मी कांहीं अपराध केला नसतां तो माझ्या पाठीस लागला आहे. माझें रक्षण करणें हें तुझें काम आहे.” पण राजसभेंतील लोक म्हणाले “ हें बायकांचें प्रकरण आहे. तूं आपल्या मालकिणीकडे जा. इकडे राजसभेंत कशाला ? ” द्रौपदीनें सुदेष्णेकडे जाऊन सर्व वृत्तांत सांगितला. राणी म्हणाली “ घाबरूं नको, याला आपण कांहीं तोड काढूं.” पण द्रौपदीचें समाधान या आश्वासनानें होईना. मग त्या रात्रीं ती भीम निजला होता तेथें गेली व म्हणाली “ माझा असा अपमान, छळ चालला असतां तुम्हांला झोंप कशी येते ! ” ती रडूं लागली असें पाहून भीम म्हणाला “ काय करूं ? कीचकाला मारायला काय उशीर, पण धर्मराजाचें प्रतिज्ञाव्रत जेथें तेथें आड येतें, पण आतां आपला अज्ञातवास संपायला पंधरा दिवसच राहिले आहेत तेव्हां धीर धर. पण असेंहि करून पहा. उद्यां सकाळीं तूं

कीचकाकडे त्याला गोड बोलून म्हण मी चुकलें. तुम्हीं आज रात्रीं अंत:पुरांतल्या नृत्यशाळेंत या म्हणजे आपणाला हवा तो एकांत मिळेल आणि तो तेथें आला म्हणजे मी काय करायचें तें करीन. अगदी निश्चिंत रहा.'' द्रौपदीनें त्याप्रमाणें केलें. कीचकाला आनंदी आनंद झाला आणि तो आपल्या अंगावर उंची वस्त्रें व दागिने घालून रात्र होण्याची वाट पहात बसला. रात्र झाल्यावर भीम हळूंच आधींच जाऊन नृत्यशाळेंत बसला. मध्यरात्रीं कीचक नृत्यशाळेंत जाऊन सैरंध्रीला शोधूं लागला. तेव्हां अंधारांत त्याचा हात भीमाच्या अंगाला लागला. मग काय उशीर? भीमानें पलंगावरून उतरून कीचकाचे केस धरून त्याला ओढून जमिनीवर पाडलें आणि त्याची मान मुरगाळून बुकलून बोकड मारावा त्याप्रमाणें भीमानें कीचकाला ठार मारलें. नंतर त्याचें शरीर घुसळून त्याच्या मांसाचा एक गोळाच केला व तो द्रौपदीला दाखवून भीम म्हणाला "आतां तरी तुझें संकट दूर झालें ना?'' भीम निघून गेल्यावर द्रौपदीनें नृत्यशाळेच्या रखवालदारांना हाक मारून तो गोळा दाखविला व म्हणाली "पहा, माझा अभिलाष धरून यानें माझा छळ केला म्हणून माझ्या गंधर्वपतींनीं याला गुप्तपणानें येऊन मारलें.'' ही बातमी कीचकाच्या भावांना कळली. ते येऊन पहातात तों हा प्रकार. तेव्हां जवळ द्रौपदी उभी असलेली पाहून ते म्हणाले "हीच चांडाळीण या अत्याचाराला कारण. तेव्हां तिला या प्रेताबरोबर नेऊन स्मशानांत जाळूं या!'' असें म्हणून त्यांनीं तिला त्या प्रेताच्या तिरडीवर बांधून स्मशानाकडे चालविली. तेव्हां ती मोठमोठयानें रडून ओरडून आक्रोश करूं लागली. तो ऐकून भीम पाठोपाठ गेला आणि स्मशानांतला एक वृक्ष उपटून घेऊन त्यानें त्या सर्वांचा वध केला. हा सर्व अद्भुत प्रकार पाहून नगरचे लोक भ्याले व सैरंध्री सुटून परत आल्यावर ते विराट राजाला म्हणाले "ही स्त्री नसून कृत्या आहे. इचे गंधर्व पति महा क्रूर व प्रबळ आहेत. ते या नगराला उपद्रव केल्यावांचून राहणार नाहींत म्हणून या स्त्रीला हद्दपार करा.'' राजानें ती गोष्ट मान्य करून राणीकडून द्रौपदीला निघून जाण्याची आज्ञा केली. पण द्रौपदी म्हणाली "मला इतके दिवस थारा–आश्रय दिलात तसाच आणखी तेरा दिवस द्या. त्या नंतर मी जाईन.'' राणीनें ती गोष्ट कृपाळूपणानें मान्य केली. मात्र या अद्भुत प्रकाराची बातमी देशोदेशीं पसरली व लोक आश्चर्यचकित झाले.

## पांडवांचा शोध

इकडे पांडवांच्या अज्ञातवासाची अवधी संपत आली असून ती पुरी होतांच पांडव प्रकट होऊन राज्य मागतील तेव्हां आधींच त्यांचा शोध काढावा आणि तो शोध लागला म्हणजे द्यूतांतील अटींप्रमाणें त्यांना फिरून वनवासाला पाठवितां येईल. या हेतूनें दुर्योधनानें चारही दिशांना मोठे चवकस व चतुर असे दूत पाठविले. आश्चर्य हें कीं, कर्ण दुःशासनाप्रमाणें द्रोण व भीष्म यांनींहि या योजनेला संमति दिली. त्याप्रमाणें दूत जाऊन त्यांनीं परोपरीनें पांडवांच्या शोधाची पराकाष्ठा केली पण व्यर्थ. तेव्हां सर्वांनीं तर्क केला कीं पांडवांचा नाश झाला असला पाहिजे म्हणूनच ते सांपडत नाहींत. आणि या तर्कानें कौरवांना आनंद झाला.

पण कीचकाचा वध झाला यांतूनच पांडवांना अपाय होण्याचा एक संभव उत्पन्न झाला. तो असा. त्रिगर्त देशाचा राजा सुशर्मा याचें व विराट राजाचें हाडवैर होतें, त्यांच्या मध्यें नेहमीं युध्दें होत. पण विराट राजाचा सेनापति कीचक हा महान योद्धा असल्यामुळें सुशर्मा याचा नेहमीं पराभव होई. सुशर्म्यानें कीचकवधाची बातमी ऐकली. तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं आतां मात्र विराटावर स्वारी केला असतां आपल्याला त्याचा पराभव करतां येईल. सुशर्मा व दुर्योधन यांची मोठी मैत्री होती म्हणून कौरवांनींहि या स्वारींत सुशर्म्याला तो मागेल तेव्हां सहाय्य करण्याचें ठरविलें. सुशर्म्यानें प्रथम विराट नगरी जवळच्या एका मोठ्या गौळवाड्यावर एकट्यानेंच अचानक हल्ला करून शेंकडों हजारों गाई पळविल्या व त्या भागांतील सर्व द्रव्याची लूट केली. गौळवाड्याच्या अधिकाऱ्यांनीं हा वृत्तांत विराटाकडे जाऊन सांगितला. तेव्हां विराटानें युद्धासाठीं आपलें सैन्य सज्ज केलें. त्यांत आश्रयार्थ राहिलेल्या पांडवांनाहि घेतलें. पहिल्या युद्धांत प्रथम विराटाचा पराभव होऊन तो बंदिवान झाला. तेव्हां पांडवांनीं त्याला सोडवून उलट केलेल्या हल्ल्यांत सुशर्म्यालाच पकडून धर्मराजाजवळ आणलें. पण धर्मानें त्याला जीवदान दिलें, व तो फजीत होऊन आपल्या राजधानीला परत गेला. ही झाली दक्षिणेकडच्या गौळवाड्यावरील स्वारीची हकीकत. पण उत्तरेच्या गौळवाड्यावर

कौरवांनीं जाऊन हल्ला करण्याचें ठरलें होतें, त्याप्रमाणें त्यांनीं दक्षिणेकडील युद्ध चालू असतांच स्वारी केली. तिकडचेहि गौळवाड्याचे अधिकारीही वार्ता घेऊन रडत विराटनगराकडे गेले. पण स्वतः विराट दुसरीकडे गुंतला होता. यामुळें त्यांनीं विराटराजाचा मुलगा उत्तर याची गांठ घेतली.

या वेळीं उत्तर हा संगीत शाळेंत स्त्रियांमध्यें बसून बृहन्नडारूपी अर्जुनाकडून नृत्य गायनाचे धडे घेत होता. उत्तर हा क्षत्रियाचा मुलगा. पण त्याचा सर्व काळ ख्याली खुशालींत गेल्यामुळें तो केवळ स्त्रैण–बायकी बनला होता. गौळवाड्याच्या अधिकाऱ्यांनीं कौरवांच्या स्वारीची वार्ता सांगितली ती सर्वांसमक्ष ऐकल्यामुळें उत्तराला मोठी अडचण उत्पन्न झाली. त्याच्या मनांतून संगीताची तालीम सोडून युद्धावर जावयाचें नव्हतें. पण तसें उघड कसें म्हणावें ? तेव्हां न जाण्याला कांहीं निमित्त पाहिजे म्हणून तो बढाईखोरपणा करून म्हणाला 'कौरव म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ? मीं रणांगणावर जाण्याचा अवकाश कीं सर्व कौरव पळून जातील. पण काय करावें. सगळे सारथी बाबांच्या ( विराटराजाच्या ) सैन्याबरोबर गेले म्हणून मला सारथी कसा मिळणार ? ''

## बृहन्नडेचा पराक्रम

अर्जुन हीं सर्व मौज पहात होता, त्याच्या लक्षांत आलें कीं गौळवाड्यावरील या दुहेरी हल्ल्यांत कौरवांचा कांहीं अंतस्थ हेतु असावा. पण तसा असला तरी काय हरकत ? आपण आतां प्रकट झालों तरी अज्ञातवासाची अवधि संपल्यासारखीच आहे. म्हणून या युद्धांत आपण भाग घ्यावा हें बरें. म्हणजे विराटराजावरील संकटहि निवारलें जाईल. असा विचार करून अर्जुनानें द्रौपदीला एका बाजूला बोलावून घेतलें व म्हणाला " बृहन्नडेला सारथ्याचे कामहि चांगलें येतें असें तूं उत्तराच्या बहिणीला उत्तरेला सांग आणि तिच्याकडून मला विनंति करायला लाव म्हणजे मी सारथी होऊन उत्तराबरोबर युद्धावर जायला कबूल होईन आणि यामुळें आपला कार्यभाग होईल '' त्याप्रमाणें द्रौपदीनें उत्तरेशीं कानगोष्ट केली. तिला प्रथम आश्चर्य वाटलें कीं बृहन्नडेला सारथ्याचें काम येण्याचा काय संबंध ? पण द्रौपदीनें तिला इकडच्या तिकडच्या साऱ्या खोट्या गोष्टी अनुभवाच्या म्हणून सांगितल्यावर

तिची खात्री पटली आणि तिनें मोठ्या आनंदानें बृहन्नडकडे जाऊन राजकुमार उत्तर याचा सारथी होण्याचें त्याच्याकडून वचन घेतलें. अशा रीतीनें सारथी मिळाल्यामुळें उत्तराला कांहीं सबब राहिली नाहीं व त्याला युद्धाला जावें लागलें. पण कौरव सैन्याचें नुसतें दर्शन होतांच तो अगदीं भिऊन गेला. त्याची बोबडी वळली. अंग थरथरूं लागलें. तो बृहन्नडेला रथ मागें घेऊन नगराकडे परत जाण्यासाठीं विनवणी करूं लागला. तेव्हां अर्जुनानें त्याची अतिशय निंदा केली आणि म्हणाला "तुला होत नसेल तर उगीच बसून रहा. मी युद्ध करीन. पळून जाणें हें क्षत्रियाला शोभत नाहीं. तरी उत्तर ऐकेना. त्यानें रथावरून उडी टाकली व तोंड फिरवून तो पळूं लागला. तेव्हां अर्जुनानेंहि रथावरून उडी घेतली व तो उत्तराला पकडण्यासाठीं त्याच्या मागून धावूं लागला. पण अर्जुनाच्या अंगावर अजून तो बृहन्नडेचा स्त्रीवेषच होता. म्हणून वेणी पाठीवर लोंबणारी स्त्री एका तरुण पुरुषाच्यामागें धावत जाऊन त्याला पकडून मागें खेचीत आहे. हा अद्भुत देखावा पाहून कौरवसैन्यांतील लोक अनेक तर्क करूं लागले. आणि मग ती स्त्री त्या पुरुषाला सारथी बनवून एका शमीवृक्षाकडे गेली व त्या वृक्षावर चढून त्यांतून ती भराभर धनुष्यें, भाते, बाण, तलवारी इत्यादि शस्त्रें उपसून टाकीत आहे हें पाहून कांहींना तर अशी शंका आली कीं "हा अर्जुन तर नसेल? पण अर्जुन आणि तो स्त्री वेषांत कसा? हें कोडें उलगडेना." कोणी म्हणाले. "तो अर्जुन ठरला तर अज्ञातवास फुकट जाईल तें आयतें बरें." कोणी म्हणाले "पण तो अर्जुन ठरला तर प्राण घेतल्याशिवाय सोडणार नाहीं त्याची काय वाट?" शस्त्रें काढून झाल्यावर अर्जुनानें आपण कोण हें उत्तराला सांगितलें. तसेंच गुप्तवेषानें राहिलेले आपले इतर भाऊ व द्रौपदी ही कोण हें सांगितलें. तेव्हां मात्र उत्तराला आनंद होऊन धीरहि आला. अर्जुनानें आपला शंख फुंकला त्यावरून कौरवांनीं त्याला पुरें ओळखलें. मग कौरवांनीं आपल्या सैन्याची व्यूहरचना केली. भीष्मांनीं असें सुचविलें कीं "दुर्योधनानें गाई घेऊन निघून जावें व इतरांनीं जाग्यावर आवळून उभे राहून लढावें." पण अर्जुनानेंहि बाकीच्यांना सोडून देऊन धावत जाऊन दुर्योधनाशींच गांठ घातली. अर्जुनानें अश्वत्थामा, कृपाचार्य, कर्ण, भीष्म या सर्वांचा पराभव करून शेवटीं दुर्योधनाचा मोड केला. गाई परतविल्या. मोहनास्त्र सोडून शत्रुसैन्य

मूर्च्छित केलें. त्यांचीं वस्त्रें ओढून काढून घेतलीं आणि असा मोठा विजय मिळवून रथाचें तोंड फिरवून विराटनगराकडे परतला.

तथापि अर्जुन उत्तराला म्हणाला “ आम्हीं सर्व कोण हें तुला कळलें आहे. तरी पण आमची ओळख तूंच विराटराजाला किंवा इतरांना देऊं नको आणि असा खोटा बहाणाहि कर कीं मी उत्तरानेंच सर्व पराक्रम करून गाई सोडवून आणल्या त्याचें कारण पुढें सांगेन.” आणि फिरून स्त्रीवेष घेऊन रथावर सारथ्याच्या म्हणजे पुढच्या जागेवर बसून हातांत घोड्यांचे दोर घेतले.

हें विजयाचें वर्तमान घेऊन दूत पुढें गेले त्यापूर्वीं विराट दक्षिणेकडील विजय मिळवून नगरांत परत आला होता. त्याला मागें घडलेला प्रकार आणि उत्तराचे युद्धाला जाणें याची माहिती मिळते न मिळते इतक्यांत उत्तरेकडील उत्तराच्या विजयाचीहि माहिती दूतांच्या तोंडून कळली. मग काय विचारतां ? सर्व नगर शृंगारलें. विराटासह सर्व स्त्री पुरुष नागरिक उत्तराला सामोरे गेलें. मग विराटानें उत्तराच्या पराक्रमाबद्दल त्याच्या स्तुतीला प्रारंभ करितांच लज्जा वाटून उत्तर म्हणाला “ बाबा मी युद्धाला गेलों खरा ! पराक्रम मी केला नसून एका दिव्य पुरुषानें आयत्या वेळीं प्रकट होऊन केला.” विराट म्हणाला “ तो दिव्य पुरुष कोठें आहे ? ” उत्तर म्हणाला “ तो रणांगणावरच अदृश्य झाला, पण माझ्या विनंतीवरून तो एकदोन दिवसांत तुम्हांला दर्शन देईल.” मग उत्तर व अर्जुन यांनीं मिळून पांडवांनीं प्रकट कसें व्हावें याचा बेत ठरविला.

## अज्ञातवासाची समाप्ति

तिसरे दिवशीं पांडवांनीं स्नानें करून शुभ्रवस्त्रें अंगावर घातलीं, अलंकार घातले, आणि अज्ञातवासाचें व्रत समाप्त करून ते विराट सभेंत येऊन उभे राहिले आणि राजेलोकांकरितां मांडून ठेविलेल्या आसनावरच बसले. हें पाहून विराट राजाला राग आला. तो म्हणाला “ द्यूत खेळणारा म्हणून खेळाच्या वेळीं मी या कंकभटाला राजसभेंत येऊं देतों आणि हा तर आज राजाच झाला ! ” तेव्हां अर्जुन म्हणाला

असतो तेव्हां त्याच्यामागून दहा हजार हत्ती चालतात आणि तो आपल्या प्रजेकडून कर घेतो. हा युधिष्ठर धर्मराज आहे. आणि आम्ही हे इतर भाऊ पांडव आहोत." मग अर्जुनानें सर्वांची ओळख करून दिली आणि उत्तरहि पुढें झाला. आणि त्यानें युद्धामध्यें खरा पराक्रम कुणी केला आणि कौरवांना पिटाळून लाऊन गाई सोडवून कुणीं आणल्या हें आपल्या बापाला सर्व समजावून सांगितलें. मग सैरंध्रीहि दुसरी तिसरी कुणी नसून स्वतः द्रौपदीच होय ही खात्री करण्याला उशीर लागला नाहीं. तेव्हां विराट राजाला फार वाईट वाटलें. तो म्हणाला "खरोखर माझ्या हातून न कळत पण फार मोठा अपराध झाला. या पांडवांची कृपा संपादण्याला आणि माझ्या अपराधाचें प्रायश्चित्त घेण्याला मला एकच मार्ग दिसतो तो हा कीं, माझी मुलगी उत्तरा ही अर्जुनाला अर्पण करावी." तेव्हां अर्जुन म्हणाला, "माझा मुलगा अभिमन्यू हाच आतां लग्न करण्याएवढा मोठा झाला आहे तेव्हां मी उत्तरेचा स्वीकार माझ्या पुत्राकरितां करितों. शिवाय मी या अंतःपुरांत राहात असल्यामुळें उत्तरा ही विश्वासानें मजकडे येई व मी तिला नृत्यगायन माझ्या पोटच्या मुलीप्रमाणें आस्थेनें शिकविलें आहे. तेव्हां मी उत्तरेशीं विवाह केला तर गुरूनें शिष्येशीं विवाह केल्यासारखें अनुचित होईल. उत्तरेवर माझें फार प्रेम आहे. पण तें माझी सून म्हणून!" अर्थात हें बोलणें मान्य होण्यासारखेंच होतें, म्हणून मग विराट व धर्मराज यांनीं आपापल्या आप्तांकडे, मित्रांकडे निमंत्रणें पाठविलीं. अभिमन्यू आला, सुभद्रा आली, यादवांसह कृष्ण आला, द्रौपदीचे पुत्र आले, इतर राजेरजवाडे आले. मग मोठमोठे मंडप शृंगारून अनेक मंगल कृत्यें करून उत्तरा व अभिमन्यू यांचा विवाह झाला. जो कंकभट तो आतां वराकडील मुख्य व्याही आणि जी दासी सैरंध्री ती मुख्य विहीण, असें झालें. तेव्हां हें स्थित्यंतर पाहून सर्वांनीं दैवाला धन्यवाद दिला आणि विराट राजाचा आनंद तर गगनांत मावेना.

दुसरे दिवशीं निवडक मंडळींची बैठक एका दिवाणखान्यांत भरली. तेव्हां राहिलेले सर्व खुलासे परस्पर झाले. कृष्ण म्हणाला, "धर्म हा न्यायानेंच मिळेल तें घेईल त्याला राज्य परत हवें तें न्यायानेंच परत मिळणें योग्य आहे.

कारण आधीं. द्यूतांतील पैजेवर कोणाचें राज्य कोणी घ्यावें हें अयोग्य आणि त्यांतूनहि ज्या द्यूतांत धर्मराज हरला तें कपटाचेंच द्यूत होतें. शिवाय तें कसेंहि असलें तरी पांडवांनीं आतां वनवास व अज्ञातवास यांची अट पुरी केली आहे; तेव्हां आतां अर्धें राज्य देत नाहीं म्हणायला कौरवांना जागाच नाहीं. बळराम म्हणाला, "कृष्णाचें म्हणणें बरोबर आहे." मग असें ठरलें कीं, कोणीतरी एखादा सुजाण कुशल असा मध्यस्थ कौरवांकडे पाठवावा. मात्र बळराम पुढें म्हणाला कीं, "जो जाईल त्यानें कौरवांना अपमानकारक कांहीं बोलूं नये. कारण द्यूत खेळण्यांत व अटी मान्य करण्यांत धर्मराजाचीच फार चूक झाली." सात्यकीला हें बोलणें आवडलें नाहीं. तो रागावून म्हणाला, "पांडवांकडे कांहींच कमीपणा नाहीं. ते सर्व राज्य मागतील तरी न्यायाचें ठरेल. कारण धृतराष्ट्र हा अंध यामुळें त्याला किंवा त्याच्या मुलांना राज्यावर कांहींच अधिकार पोंचत नाहीं. कौरवांकडे जो जाईल त्यानें नमूद बोलण्याचें कांहीं कारण नाहीं. वेळ आली तर आम्ही कौरवांना जिंकून सगळें राज्य पांडवांना देऊं." द्रुपदहि म्हणाला, "दुर्योधनाशीं गोडीनें बोलणें म्हणजे गाढवाला गोंजारण्यासारखें आहे. तें लाथ उगारणारच आणि त्याच्या नाकावर तडाखा देणें हें क्रमप्राप्तच असतें. तात्पर्य. शिष्टाईला यश येण्याचा संभव कमी म्हणून आपण आतां युद्धाकरितां सैन्याचीच तयारी करूं या." श्रीकृष्ण म्हणाला "सैन्याची तयारी करा पण प्रारंभ शिष्टाई करण्यापासून झाला पाहिजे." मग कृष्ण बळराम द्वारकेला परत गेले. आणि पांडवहि आपल्या ठिकाणीं गेले. विराट व द्रुपद यांनीं पांडवांना साहाय्य करण्याविषयीं अनेक राजे लोकांना निमंत्रणें पाठविलीं. पांचालराजानें आपला वृद्ध पुरोहित कौरवांकडे पाठविला. कृष्ण द्वारकेला गेल्यावर एक मौज अशी झाली, दुर्योधनानें विचार केला कीं, "आपण कृष्णाला आधीं भेटून त्याच्याकडून साहाय्य मिळण्याचें वचन घ्यावें." उलट अर्जुनालाहि तोच विचार सुचला. दोघेहि द्वारकेला एकाच दिवशीं पोंचले. दुर्योधन भेटीला गेला तेव्हां कृष्ण पलंगावर आडवा झाला होता. त्यानें झोंप लागल्याप्रमाणें डोळे मिटून घेतले होते. दुर्योधन गेला तो त्याच्या उशाशीं जाऊन मागें सरून बसला. कारण मनुष्याच्या डोक्याकडची जागा ही बहुमानाची आणि अर्जुन गेला तो कृष्णाच्या पायथ्याशीं हात जोडून उभा राहिला. कृष्णानें डोळे उघडले तों

त्याला अर्जुन प्रथम दिसला आणि मागाहून दुर्योधन. कृष्ण मनांत हंसला व म्हणाला, "कां आला?" दुर्योधन म्हणाला, "मी युद्धामध्यें तुमचें साहाय्य मागण्याला आलों आहे. मी व अर्जुन तुम्हांला दोघे सारखेच. तरीपण मी प्रथम येऊन पोंचलों म्हणून माझा हक्क अधिक आणि पहिला." तेव्हां कृष्ण हंसून म्हणाला, "तू पहिल्यानें आलास खरा पण मला प्रथम दिसला अर्जुन. त्याला काय करावें? झोपेंतून जागा झालेल्याला पायाकडचा प्रथम भाग दिसतो उशाशीं बसलेला मागाहून दिसतो. शिवाय अर्जुन लहान, तूं मोठा. म्हणून मला लहानाची समजूत आधीं काढणें प्राप्त! मजजवळ दोन साधनें आहेत. एक स्वतः मी व दुसरें साधन मजजवळचें यादव सैन्य. तेव्हां अर्जुनानें यापैकीं प्रथम हवें तें घ्यावें उरलें तूं घे." अर्जुन म्हणाला, "कृष्ण मला पाहिजे. तुझें सैन्य. दुर्योधनाला दे." मग दुर्योधन बलरामाकडे गेला. त्याला संकट पडलें. कारण दोघे सारखे. शिवाय कृष्णासारखी युक्तीहि नाहीं म्हणून तो म्हणाला, "मी तुम्हां दोघांपैकीं कुणालाहि कांहीं सहाय्य करणार नाहीं. युद्ध उभें राहिलें तर मी कोठें-तरी निघून जाईन म्हणजे झालें." दुर्योधनाला वाटलें कीं यादव सैन्य आपल्याला मिळालें तर स्वतः कृष्ण मिळाल्यापेक्षां अधिक लाभ झाला म्हणून तो आनं-दानें हस्तिनापुराला गेला. मग कृष्ण अर्जुनाला म्हणाला, "तूं सैन्य टाकून मला एकट्याला मागून घेतलेंस तें कां?" अर्जुन म्हणाला, "कोणत्याही सैन्याला मी भीत नाहीं पण मला तुझ्यासारखा सारथी मिळेल तरच जय मिळेल." श्रीकृष्णानें हंसून ती गोष्ट मान्य केली. पुढें शल्य आपलें कांहीं सैन्य बरोबर घेऊन पांडवांकडे जात आहे. असें पाहून दुर्योधनानें त्याला वाटेंत गांठून त्याचा सत्कार करण्याची आघाडी मारली. शल्य त्या स्वागताला भुलला. तेव्हां पांडव बाजूलाच राहून शल्यानें युद्धांत प्रसंग पडेल तेव्हां सैन्याचें आधिपत्य घेण्याचें कबूल केलें. मग तो पुढें पांडवांकडे गेला व वाटेंत दुर्योधनाची गांठ पडल्याची हकीकत त्यानें धर्मराजाला सांगितली. तेव्हां धर्मराज म्हणाला, "दुर्योधनाला वचन दिलें तर दिलेंस पण मलाहि एक द्या. तें असें कीं कर्णार्जुनाच्या युद्धप्रसंगीं तुम्ही कर्णाचें सारथ्य कराल तेव्हां होईल तेवढा कर्णाचा पाणउतारा करा. म्हणजे तो लढण्यास ढिला पडेल." 'बरें' म्हणून शल्यानें पांडवांनाधीर दिला व त्यांचें समाधान होईल अशा प्रकारच्या अनेक कथा त्यांना सांगितल्या. या नंतर युद्धाचा संभव जाणून

आपआपल्या पक्षपाताप्रमाणें, आवडीप्रमाणें, सोईप्रमाणें अनेक राजे लोक आपापलें सैन्य घेऊन कोणी पांडवांना कोणी कौरवांना येऊन मिळूं लागले. इकडे कौरवांच्या दरबारीं वाटाघाटी सुरूच होत्या. त्यांत हा विषय चाले कीं, कोणाची शक्ति, युद्धकौशल्य किती आहे; त्यांत कोणी आपली अवास्तव स्तुति करीत, कोणी दुसऱ्यांची निंदा करीत. कर्ण भीष्माला वृद्ध म्हणून तुच्छ मानी. भीष्म म्हणे, "तरुणालाच कांहीं सर्व पराक्रम ईश्वरानें दिला नाहीं." त्यांतल्या त्यांत भीष्माची इच्छा अशी कीं, सामोपचार करावा व पांडवांना यथान्याय काय देणें तें द्यावें. ते बुद्धीला थोडेसें पटून धृतराष्ट्रानें संजयाला पांडवांकडे उपप्लव्य नगराला पाठविलें व सांगितलें कीं, "मी धृतराष्ट्र तुमच्याशीं सख्य करूं इच्छितों असें त्यांना कळीव." त्याप्रमाणें संजय गेला. त्याचें व युधिष्ठिराचें पुष्कळ बोलणें झालें. संजयानें धृतराष्ट्राचा निरोप सांगितला. तेव्हां युधिष्ठिरानें आपणाकडे पुष्कळ मोठेपणा घेऊन शेवटीं सांगितलें कीं, "मीं दुसरें कांहीं मागत नाहीं. कौरवांनीं इंद्रप्रस्थाकडचें राज्य आम्हांला द्यावें व हस्तिनापुराकडचें राज्य त्यांनीं करावें. शिवाय श्रीकृष्ण जें मला सांगेल तें मी करीन." श्रीकृष्ण जवळच होता. तो म्हणाला, "युद्ध होऊं नये असेंच मलाहि वाटतें. युधिष्ठिर केव्हांहि अधर्मानें वागणार नाहीं, पण न्यायाचें राज्य गमावून पांडवांनीं भिक्षा कां मागावी हें मला कळत नाहीं. धर्मतत्त्व युद्ध करा असेंहि सांगतें व युद्ध करूं नका असेंहि सांगतें. पांडव वनवासाला गेले तेव्हां त्यांनीं आपलें राज्य कौरवांकडे निव्वळ ठेव म्हणून ठेविलें होतें; पांडवांचें तें वडिलार्जित राज्य आहे. तें कौरवांनीं कां देऊं नये ? कौरवांनीं पांडवांचा व द्रौपदीचा छळ केला त्या विषयीं बोलून फिरून मी ती जखम ताजी करूं इच्छित नाहीं. उलट सामोपचाराचें बोलणें बोलण्याकरितां मीच कौरवांकडे जाण्याचें योजिलें आहे." नंतर संजय युधिष्ठिराचा निरोप घेऊन धृतराष्ट्राकडे परत गेला. व म्हणाला "धर्माचा हा असा निरोप आहे." नंतर धृतराष्ट्रानें विदुराला बोलावून त्याचा सल्ला विचारला. तेव्हां विदुरानें अनेक प्रकारांनीं, दाखल्यांनीं, कथानिरूपणानें, धर्म व नीति यांची तत्त्वें धृतराष्टाला सांगितलीं. तें ऐकून धृतराष्ट म्हणाला "हें सर्व खरें पण मला माझ्या पुत्राला दूर लोटण्याची छाती होत नाहीं. तो म्हणेल तें करावें असा प्रेमामुळें मोह पडतो त्याला काय करावें ?"

विदुर म्हणाला "कळायला पाहिजे तें हेंच कीं, सत्यापुढें पुत्रसुद्धां त्याज्य मानावा. मग कोणत्याहि मोटया गोष्टाकरितां लहान गोष्ट टाकून द्यावी." विदुरानें सर्व रात्रभर धृतराष्टाला उपदेश केला. संजय फिरून राजसभेंत आला व धर्माचा निरोप त्यानें आतां अधिक विस्तारानें धृतराष्ट्राला सांगितला. शेवटीं म्हणाला, "युद्ध उभें राहिलें तर सर्व कौरव मरतील आणि मला अखंड राज्य मिळेल. असें युधिष्ठिर व कृष्णादि निश्चयानें म्हणत आहेत." मग भीष्मानें पांडवांविषयीं कांहीं नवीन माहिती दुर्योधनाला सांगितली. त्यांत कृष्ण हा नारायण व अर्जुन हा नर असे अवतार असल्याचें सांगितलें व सामोपचाराचा उपदेश केला. पण भीष्मादिकांनीं केलेला सामोपचाराचा उपदेश कर्ण व दुःशासनादिकांनीं खोडून काढावा असा क्रम सुरू झाला. पांडवांकडे सैन्य कोणते किती आहे असा प्रश्न धृतराष्ट्रानें विचारिला. तेव्हां पांडवांकडील प्रचंड सैन्याची कल्पना येऊन संजय सभेंत मूर्च्छितच होऊन पडला व कांहीं वेळानें सावध झाला. तें पाहून धृतराष्ट्र कौरवांना म्हणाला, "पहा बुवा! हें असें आहे. तुम्ही युद्धाचा विचार टाकून द्याल तर मी पांडवांशीं सामोपचाराचें बोलेन." पण दुर्योधनादिकांनीं धृतराष्ट्राचें बोलणें खोडून काढलें. तो म्हणाला, "मी आपले प्राण आणि राज्य यांवर पाणी सोडीन पण पांडवांचें म्हणणें कबूल करणार नाहीं. फार काय, तीक्ष्ण सुईच्या टोंकावर जितकी भूमि मावेल तितकीहि पांडवांना देण्याला मी तयार नाहीं." दुर्योधनाला संजयाचें बोलणें, विदुराचा उपदेश कांहींच रुचेना. तें पाहून राजे मंडळी कांहींच निर्णय लागत नाहीं असें पाहून उठून गेली. मग एकांत झाल्यावर विदुर हा व्यास व गांधारी यांना घेऊन आला. धृतराष्ट्र म्हणाला, "दुर्योधना, संजय हा आपणाला सांगतो तें सर्व खरेच आहे, तूं श्रीकृष्णाला शरण जा." दुर्योधनानें तें साफ नाकारिलें. धृतराष्ट म्हणाला, "गांधारी, हा तुझा पुत्र दुष्ट, डौली, हेकेखोर आहे. त्याला कांहीं समजावून सांग." तेव्हां गांधारीनेंहि त्याला पुष्कळ उपदेश केला. पण उपयोग काय? संजय कौरवांकडे परत गेल्यावर युधिष्ठिर कृष्णाला म्हणाला, "आतां तूं काय करणार तें सांग. विचार पुष्कळ करून झाला." कृष्ण म्हणाला "मी काय करावें तें तुम्हींच सांगा. तें करायला मी कंबर

बांधून तयार आहे." युधिष्ठिर म्हणाला "संजयाच्या बोलण्यांत धृतराष्ट्राच्या-मतें आम्ही पांडवांनीं शांती धरावी असें आलें. याचा अर्थ स्वतः धृतराष्ट्राला आमच्या तोंडाला पानें पुसून गप्प बसवावयाचें आहे. दुर्योधन एक मूर्ख ठरला पण धृतराष्ट्रानेंहि तसेंच व्हावें ?" कृष्ण म्हणाला, "मी एकदां स्वतः कौरवांकडे जाऊन पहातो. तुमचा मतलब न फिरवितां सामोपचार सिध्दीला गेला तर बरेंच झालें." युधिष्ठिर म्हणाला, "कृष्णा, तूं कशाला जातोस ? तुझा शब्द खालीं पडणार. तुझा अपमान होणार हें निश्चित आहे. तें मला आवडत नाहीं." कृष्ण म्हणाला "मी गेलों तर सर्व जगाला तरी असें वाटेल कीं पांडवांनीं आपणांकडून सामोपचाराचा कसून प्रयत्न केला. मी एकटा गेलों म्हणून कौरव माझा घात करतील ही भीति व्यर्थ आहे. जगाचा अपवाद टाळण्याला मी शिष्टाईला जाणें हाच उत्तम मार्ग आहे." तेव्हां युधिष्ठिरानें त्या विषयीं संमती दिली.

## कृष्णशिष्टाई

वास्तविक कृष्णाला पुढें काय होणार हें दिसत कां नव्हतें ? पण जगानें वाईट म्हणायचें तर तें कौरवांना म्हणावें, पांडवांना म्हणूं नये, आणि तसें व्हावें तर पांडवाकडून कृष्ण शिष्टाईला गेला व तोहि हात हालवीत परत आला असें जगाला दिसलें पाहिजे. भीम, अर्जुन, नकुल, सहदेव या सर्वांनीं आपाले विचार श्रीकृष्णाला सांगितले. त्या सर्वांना वाटे कीं, "युध्द न होतां आपलें कार्य झालें तर तें कांहीं वाईट नाहीं पण युध्द करावें लागलें तर त्यालाहि आपली तयारी आहे." तात्पर्य शिष्टाईत काय बोलावें, निर्णय काय घ्यावा याचा विचार कृष्णानेंच सुचेल तसा शेवटीं करावा असें त्यांनीं सांगितलें.

द्रौपदीनें मात्र विशेष कळकळीचें भाषण केलें. ती म्हणाली "कृष्णा, तुझ्याशीं गोड बोलून कोरडें सख्य करण्याची तयारी कौरवांनीं दाखविली तर तूं कबूल होऊं नको. पांडव जिंकतील हा माझा आत्मविश्वास आहे. मी भोगिलेलीं सर्व दुःखें लक्षांत आण." नंतर आपली वेणी सुटलेली हातांत घेऊन ती म्हणाली, "अपमान पावलेल्या माझ्या या केसांचे स्मरण ठेव म्हणजे झालें. मीं तेरा वर्षें पोटांत आग सोसली–" हें बोलत असतां द्रौपदीचा कंठ

दाटून आला व तिच्या डोळ्यांतून तिच्या अंगावर अश्रुधारा पडूं लागल्या. तें पाहून कृष्ण म्हणाला, "द्रौपदी तूं चिंता करूं नको. तुझ्यापेक्षांहि कौरवांच्या स्त्रियांची दुरवस्था झालेली तूं पहाशील. तूं दुःख भोगलेस पण सौभाग्यवती राहिलीस. कौरवांच्या स्त्रियांना उद्यां विधवा होऊन रडत बसावें लागेल. कौरवांचा नाश पांडव तर करतीलच परंतु वेळ पडल्यास मीहि कांहीं कमी नाहीं."

याप्रमाणें भाषणें होऊन श्रीकृष्ण शिष्टाईवर निघाला. त्या वेळीं शरद-ऋतू नुकतांच संपला होता. हवेंत थंडी आली होती. कार्तिक महिन्यांतील रेवती नक्षत्रावर मैत्र मुहूर्त पाहून कृष्णानें प्रस्थान ठेविलें. त्यानें आपला रथ शृंगारला त्याला शकुनहि चांगले होऊं लागले. रथ चालू लागला तरी कांहीं दूरपर्यंत पांडव त्याला पोंचविण्याकरितां चालत गेले. वाटेंत दोहों अंगाला ऋषीमंडळी उभी होती. त्यांना पाहून कृष्ण खालीं उतरून वंदन करून पुन्हां रथावर चढला. ऋषींच्या तर्फे जामदग्न्य ऋषीनें कृष्णाला आशीर्वाद व निरोप दिला. पुढें ठिकठिकाणीं कृष्ण ज्या वाटेनें जाणार त्या वाटेवर लोक त्याचा सत्कार करण्याकरितां वाट पहात उभे राहिले होते. कृष्ण शिष्टाईला येणार ही बातमी ऐकून धृतराष्ट्र म्हणाला, "आतां आपणाला त्याच्या सत्काराची उत्तम तयारी केली पाहिजे" व त्याप्रमाणें सुंदर सभागृहें, वसतीगृहें निर्माण करण्यांत आलीं. पण कृष्णानें या अशा सत्कार चिन्हांची उपेक्षा करून तो थेट कौरवांच्या घरीं गेला. विदुर म्हणाला, "तुम्ही कृष्णाचा सत्कार करणार आहां व त्याला अहेरहि अर्पण करणार आहां पण ही निव्वळ कपटबुद्धि आहे. खरा अन्यायी हेतु लपवून ठेवून वरकरणीं असा केलेला सत्कार व्यर्थ जावयाचा. तुम्हां कौरवांना श्रीकृष्णाविषयीं कांहीं प्रेम किंवा आदर असेल तर तो आपल्या शिष्टाईच्या कार्यासंबंधीं जे बोलेल तें नीट ऐका व सांगेल तें करा." तेव्हां दुर्योधनानें उलट खाल्ली. तो म्हणाला, "कृष्णाचा असा थाटाचा सत्कार करण्याचें कारण नाहीं. कारण कृष्ण मनांत म्हणेल माझ्या व पांडवांच्या भीतीमुळें हा सत्कार सुरू आहे. मी तर म्हणतो कीं कृष्ण आमच्या तावडींत सांपडला तर त्याला चतुर्भुज करून बंदिवासांतच ठेवावें. आणि हें सर्व कृष्णाला न कळत व्हावें अशी एखादी युक्ति कोणाला सुचत असेल तर ती त्यानें सांगावी." धृतराष्ट्रालाहि हें बोलणें आवडलें नाहीं. तो संतापून उठून गेला. कृष्ण

हस्तिनापुराला गेल्यावर औपचारिकरीत्या त्यानें सत्कार घेतला व कौरव व राजे लोक यांच्या गांठी भेटी घेतल्या. आणि तो थेट विदुराच्या घराकडे निघाला. ती सर्व रात्र त्यांनीं संभाषणांत घालविली. नंतर तो आपली आत्या कुंती इजकडे गेला. त्याला ती सामोरी गेली ती रडतच गेली. कृष्णानें तिला नमस्कार केल्यावर तिनें त्याला आपल्याजवळ बसवून घेतलें व आपल्या मुलांविषयीं, द्रौपदीविषयीं परोपरीनें माहिती विचारिली. नंतर ती म्हणाली "माझा जन्म एकंदरीनें अभागीच खरा कारण पांडवांच्या घरीं येऊन मला अतिशय दुःखें सोसावी लागलींच पण माझ्या बापानें तरी काय केलें? अल्पवयांत कुंतिभोज राजाला दत्तक देऊन टाकलें. द्रव्यहानी किंवा वैधव्य यांनींहि मला इतकें दुःख झालें नाहीं परंतु आज तेरा वर्षें झालीं, माझीं मुलें माझ्या दृष्टीस पडत नाहींत. आम्ही एकमेकांना मेल्यासारखेच झालों नाहीं काय! तर आतां तूं धर्मराजाला माझा निरोप सांग. म्हणावे तुझा क्षात्र धर्म सुटत चालला. शान्तिधर्माचें खूळ तूं आतां सोडून दे. मी अशी ही दुसऱ्याच्या घरीं तुकडे खात पडलें आहे. कारण माझ्या मुलांना सत्तेचें राज्य नाहीं. ज्या कारणासाठीं व हेतूनें आई मुलांना जन्म देते त्याची सफलता होण्याची वेळ आतां आली आहे. फाजील क्षमाशील धर्मराजाच्या नादीं लागून त्याच्या भावांनीं ती गमाविली तर त्यांना पातक लागेल. अर्जुनाला सांग कीं, "तुझ्या हातून कांहीं होत नसेल तर द्रौपदीसारख्या हातांत बांगड्या भर. मला एकाचा मात्र खरा विश्वास वाटतो तो भीमाचा. कारण त्यानें एकदां कां कोणाच्याबद्दल मनांत राग धरिला म्हणजे त्याचा निःपात केल्याशिवाय तो रहावयाचा नाहीं. येवढे पांच पती असतां द्रौपदीला ते दुःख होऊं देतात हें कसें तें मला कळतच नाहीं!"

यावर कृष्ण म्हणाला, "आत्याबाई, तूं उगाच दुःख करितेस. तुला बापानें दत्तक दिली, तरी काय झालें? पाण्यानें एका सरोवरांतून दुसऱ्या सरोवरांत जावें तशी तूं फारतर एका थोर कुळांतून दुसऱ्या थोर कुळांत गेलीस. तुझा पती तुला किती तरी मान देत होता. तुझ्यापोटीं असे मुलगे आले आहेत कीं त्यांना दुसरी तोड नाहीं. ते तेजस्वी आहेत. ते सार्वभौमत्व मिळविल्याशिवाय राहाणार नाहींत, किंचित धीर धर." कुंती म्हणाली, "आज तेरा वर्षें धीर धरलाच आहे. मनानें तुझ्यावर सर्व भिस्त

ठेविली आहे. आतां तूं शिष्टाईला आलाच आहेस तेव्हां तूं बोलशील तें खरें करशील असा मला विश्वास वाटतो."

कौरव सभेंत जाऊन कृष्णानें औपचारिक रीतीनें त्यांच्या पुन्हां भेटी घेतल्या. दुर्योधन म्हणाला," तुम्ही आज आमच्याकडे जेवणास आलें पाहिजे." तेव्हां कृष्ण म्हणाला, "मी मालकाची कामगिरी घेऊन आलेला, केवळ दूत आहे. आणि दूतानें आपली कामगिरी पुरी केल्याशिवाय पाहुणचार घेऊं नये अशी रीत आहे." दुर्योधन म्हणाला, "आम्हीं तुला दूत म्हणून बोलावीत नाहीं तर आप्त म्हणून बोलावितों." कृष्ण म्हणाला, " दुसऱ्याच्या घरीं माणसानें जेवावयाला केव्हां जावें याचा एक नियम आहे. एक आपणावर कोणी खरें प्रेम करीत असेल तर, किंवा आपण विपत्तींत असून अन्नाला महाग झालों असलों तर. पैकीं तुझी खरी प्रीति माझ्यावर किती आहे हें मी जाणतों व तुलाहि माहीत आहे. तूं पांडवांचा द्वेष करतोस म्हणजे पर्यायानें तो माझाच द्वेष नव्हे का?" मग भीष्म द्रोणादिकांनींहि कांहीं आग्रह करून पाहिला. तेव्हां कृष्ण नमस्कार करून म्हणाला, " मला तुमची सर्व पूजा पोंचली मग आग्रह कां!"

विदुराच्या घरीं कृष्ण परत गेल्यावर पुन्हां गोष्टी सुरू झाल्या. विदुर म्हणाला, " कृष्णा, तूं इकडे व्यर्थ आलास असें मला वाटतें, कारण दुर्योधनाला सामोपचाराची भाषा मुळीं कळतच नाहीं. तो आपल्याच घमेंडींत असतो. आपण मोठे पराक्रमी, आपल्याजवळ सैन्य भरपूर आहे, मला आज कोणाचें भय नाहीं, सर्व पृथ्वी माझ्या मुठींत आहे, अशा त्याच्या वल्गना चालतात." कृष्ण म्हणाला, "तूं बोलतोस हें ठीक आहे पण मी इकडे शिष्टाईला जो आलों तो सर्व कांहीं जाणूनच आलों आहे. दुर्योधनाला बोललें आणि पालथ्या घागरीवर पाणी ओतलें दोन्हीं सारखींच. परंतु सामोपचाराचा प्रयत्न करणें हें कर्तव्य ठरतें म्हणूनच केवळ तें मला करणें आहे. मी कौरवांशीं अगदीं गोड बोलेन. पण त्यांनीं तें ऐकलें नाहीं म्हणजे पुढें काय होईल तेंही त्यांना बजाऊन सांगेन."

ज्या दिवशीं शिष्टाईचें मुख्य बोलणें होण्याचें ठरलें होतें त्या दिवशीं दुर्योधनानें कृष्णाच्या सत्काराचा थाट मुद्दाम केला होता. त्याची मोठी मिरवणूक काढली. हत्ती, घोडे मिरविले. वाद्यांचे ताफे सज्ज ठेविले होते.

दुतर्फा नागरिकांच्या रांगा उभ्या करून त्याच्यावर पुष्पवृष्टी करण्याची व्यवस्था केली होती. ऋषीमुनी मंडळीहि बोलाविली होती. त्यांत नारदांची स्वारीहि होती. उच्चासनावर बसल्यावर कृष्ण म्हणाला, " मी आलों आहे तो सामोपचार यशस्वी व्हावा म्हणून. युद्धामुळें अगणित वीर मारले जातील ती आपत्ती टळावी. आजपर्यंतच्या कुलाच्या कीर्तीला व शीलाला बट्टा न लागावा. तुम्हीं पांडवांशीं सख्य केलें म्हणजे आजवर पेटलेला वैराचा अग्नि विझेल. पांडव व कौरव हें एकजीव झाले तर धर्म आणि अर्थ याला काय उणें पडणार ? व मग त्यांना जगांत कुणाला भिण्याचें कारण उरेल ? अखिल पृथ्वीचा उपभोग घेतील, मग कौरवांनीं वाटेल तर जागेवर बसावें. पांडव दिग्विजयाचे श्रम घेतील. मी सामोपचार इच्छितों. पांडवांनाहि तो मान्य आहे. ते धृतराष्ट्राला पित्यासमान मानतात. मात्र सामोपचाराचें बोलणें संपलें तर काय करावयाचें हें त्यांनीं निश्चित ठरविलें आहे. मी पक्षपातानें आलों नाहीं. न्यायबुद्धीनें आलों आहे." नंतर सर्व सभासदांकडे वळून श्रीकृष्ण म्हणाला, "राजा धृतराष्टाला योग्य असा सल्ला देणें हें तुमचेंहि काम आहे." परंतु कौरवांकडून कोणी उठून बोलेना आणि सभेंतले नागरिक, ऋषी, राजे, यांनीं कृष्णाच्या भाषणाची प्रशंसा मनांत केली तरी पुढें होऊन स्पष्टपणें बोलण्याचें कोणालाहि धैर्य झालें नाहीं. एकट्या नारदानें मात्र थोडेसें भाषण केलें. तो म्हणाला " दुर्योधना, पूर्वीं ययाति, गालव, इत्यादी राजे केवळ आपल्या हेकेखोरपणानें स्वर्गातून भ्रष्ट होऊन खालीं पडले. म्हणून तूं हा हटवादीपणा टाकून दे." धृतराष्ट्र म्हणाला " नारदा, तुमच्यासारखेंच मीहि दुर्योधनाला नेहमीं म्हणत असतो पण त्याच्यावर माझी सत्ता चालत नाहीं, तुमच्या उपदेशानें दुर्योधन वळणावर आला तरी बरें." भीष्म, द्रोण यांनींहि नारदांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. द्रोण तर म्हणाला, " आमची ही सर्व चिंता दुर्योधना तुझ्या वृद्ध आईबापांकरितां आहे."

हें सर्व ऐकून रागानें भिवया चढवून दुर्योधन म्हणाला " बस झाला हा तुम्हा सर्वांचा साळसूदपणाचा उपदेश. पांडवांचें राज्य गेलें, त्यांच्या कपाळीं वनवास आला त्याला मी कारण नसून धर्माची द्यूताची आवड हेंच खरें कारण. शकुनिमामा आणि धर्म परस्पर द्यूत खेळले. त्यांत माझा काय संबंध ? मजकडे कांहीं अन्याय नाहीं. मग याही उपर पांडव जर युध्दाला उभे

राहतील तर मीहि तयार आहे. त्यांत मेलों तरी हरकत नाहीं. खऱ्या पुरुषानें कोणापुढेंहि लवूं नये. वाकूं नये. फार तर कठीण कळकाप्रमाणें कमरेंत मोडून जावें. कृष्णा, तुझी रदबदली कशाला? धृतराष्ट्रबाबा, पांडवांना राज्याचा कांहीं अंश देतो म्हणतात, पण मी सुईच्या टोंकांवर मावेल इतकीहि भूमि द्यावयाला तयार नाहीं." कृष्ण म्हणाला, "होय. तें मला सर्व ठाऊक आहे. पण, ज्या द्यूताचें निमित्त तूं सांगितलेंस तें कपटाचें होतें हेंहि मला माहीत आहे. माझी बहीण द्रौपदी इचा तुम्ही काय छळ केला तें मी विसरलों नाहीं. तात्पर्य इतकें सर्व असूनहि मी सामोपचाराला आलों आहे. या उपर तुला योग्य वाटेल तें तूं कर." नतर विदुराच्या सांगण्यावरूना गांधारीलाहि सभेंत आणविलें. तिनेंहि आपणाकडून करावयाचा तो योग्य उपदेश दुर्योधनाला केला. पण कोणाचेंहि न ऐकतां, दुर्योधन सभेंतून उठूनच गेला. त्यानें शकुनि, कर्ण, दुःशासन यांना विचारांत घेऊन असें ठरविलें कीं, आतां अधिक न बोलतां कृष्णाच्या मुसक्या बांधून त्याला बंदिवानच करूं म्हणजे झालें. सात्यकीला ही गोष्ट समजली. ती त्यानें कृष्णाला सांगितली. तेव्हां फिरून दुर्योधन सभेंत आल्यावर कृष्णानें एकदम विश्वरूप धारण केलें व तो दुर्योधनाकडे रोखून पाहून म्हणाला, "तुझी छाती असेल तर हें माझें रूप पहा." मात्र हें विश्वरूप दुर्योधन व धृतराष्ट्र यांना तेवढें दिसलें. इतर सभासदांना तें दिसलेंच नाहीं कारण जें महातेज प्रकट झालें त्याच्यायोगानें त्यांचे डोळेच मिटले. नंतर कृष्ण तेथून निघाला व आपल्या रथावर चढला. व तेथून त्यानें सर्वांचा निरोप घेतला. मात्र हस्तिनापूर सोडण्यापूर्वीं त्यानें फिरून कुंतीची गांठ घेतली. तेव्हां कुंतीनेंहि फिरून आपल्या मुलांना तेजस्वी असाच निरोप पाठविला व तो मनावर पटावा म्हणून विदुला व तिचा पुत्र यांची मोठी बोधप्रद गोष्ट सांगितली. नंतर हस्तिनापुराहून उपप्लव्य नगराला येऊन कृष्णानें पांडवांना शिष्टाईची सर्व हकीकत सांगितली. व शेवटीं म्हणाला, "आतां सामोपचार संपला तुम्ही युध्दाची तयारी करा. कौरवांना शासन केल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. कौरव सैन्य घेऊन या सुमाराला कुरुक्षेत्राकडे निघालेच असतील! तरी तुम्हीहि आतां वेळ न गमावितां आपल्या सैन्याची योजना व जुळवा जुळव करा." कृष्णाचें कुंतीशीं संभाषण झालें त्याहून अधिक मह-

त्याचें संभाषण कर्णाशीं झालें. कृष्णाची इच्छा अशी कीं शक्य तितकें करून कर्णाला या युध्दांत स्तब्ध बसवावें आणि जमलें तर कौरव पक्षांतून फोडून बाहेरहि काढावें. या आशेला एक आधार होता तो हा कीं, कर्ण हा खरोखर कुंतीच्या पोटींच युधिष्ठिरापूर्वी जन्माला आला होता. म्हणजे कर्णाला पहिला पांडव आणि त्याच्यासह पांडव पांच नसून सहा असेंहि म्हणतां येण्यासारखें होतें. ही गुप्त गोष्ट कृष्णाला माहीत होती. म्हणून कर्णाला एका बाजूला घेऊन कृष्ण म्हणाला "शास्त्र-दृष्टया तूंच वडील पांडव आहेस म्हणून तूं धर्माच्या आधीं राज्याचा अधिकारी होशील. तुझ्यावर आज कोळ्याचा मुलगा असल्याचा (सूत-पुत्र) अपवाद आहे तो खोटा आहे. पहिला पांडव म्हणून तूं माझा आप्तबंधू होतोस, तर तूं हें सर्व ध्यानांत घेऊन पांडवांकडे येत असलास तर मी तुला नेतों व पांडवांची समजूत घालून देतों. आणि धौम्य मुनी-कडून तुला वाटल्यास आजच्या आज राज्याभिषेक करवितो. म्हणजे युधिष्ठिर हा तुझा युवराज होईल. आणि तूं पांडव राजा झालास असें ठरलें म्हणजे मग तुझें वैभव किती मोठें होईल याची कल्पना कर."

## कर्ण व कुंती यांचा संवाद

कर्ण म्हणाला, "मी कुंतीच्या पोटीं आलों, हें मला माहीत आहे. पण मी उपजतांच तिनें माझा त्याग केला. मला नदींत सोडून दिलें, हें फार वाईट केलें नाहीं काय? अधिरथ नांवाच्या सूताच्या दृष्टीला मी पडलों. त्यानें मला बाहेर काढलें आणि मला पाहून त्याची बायको राधा हिला पुत्रप्रेम वाटून पान्हाच फुटला. त्या दोघांनीं मला लहानाचा मोठा केला. माझें नांव वसुषेण हें ठेविलें. त्यांनीं माझें लग्न करून दिलें. अशा त्या प्रेमळ मातापित्यांना मी आज सोडून दिलें तर मी कृतघ्न ठरणार नाहीं काय ? ज्या आईनें जन्मभर पालण पोषण केलें तिचा त्याग करून ज्या आईनें मला नदींत लोटून दिलें तिच्याकडे मी जावें हा कोणता न्याय किंवा धर्म ? तसेंच आज जन्मभर मी दुर्योधनाचा जिवलग मित्र म्हणून राहिलों, वाढलों, खेळलों, सर्व सुखें भोगिलीं, त्याच्या बाजूनें युध्देंहि केलीं, जो मला भावापेक्षांहि अधिक प्रिय मानतो व माझ्यार विश्वास टाकून बसला

आहे. तेव्हां मी त्याचा विश्वासघात करणें हा दुसराहि एक कृतघ्नपणा होणार नाहीं काय? कृष्णा तूं हें सर्व प्रयत्न युध्दांतील प्राणहानी थांबावी म्हणून करतोस हें मी जाणतों. पण आतां तें शक्य नाहीं. तुझ्यांत कांहीं देवत्व असेल तर एवढेंच कर कीं, युध्दांत जे पडतील त्यांना सुलभरीतीनें स्वर्ग मिळवून दे. माझ्याहि मनाच्या एका कोपऱ्यांत माझा व पांडवांचा संबंध लक्षांत येऊन वाईट वाटतें. परंतु मला तें सर्व विसरून गेलें पाहिजे." तेव्हां कृष्णानें तसें आश्वासन दिलें. मग कर्ण व कृष्ण यांनीं परस्परांना आलिंगन दिलें. अशाच प्रकारचा एक प्रयत्न विदुरानेंहि केला. कृष्णांप्रमाणें त्यालाहि वाटे कीं, कुंतीनें कर्णाला त्याचा खरा जन्मवृत्तांत कळविला तर तो पांडवांना येऊन मिळेल. त्याप्रमाणें त्यानें कुंतीपाशीं गोष्ट काढली. तेव्हां कुंतीनें स्वतः कर्णाची भेट घेण्याचें कबूल केलें. कर्ण भागीरथीच्या तीरी स्नान व वेदघोष करीत उन्हांत उभा आहे असें पाहून, त्याच्या छायेंत उभी राहून तिनें कर्णाला हळूच हांक मारली. कर्ण तोंड फिरवून कुंतीला नमस्कार करून म्हणाला, "हे कुंती हा राधापुत्र तुला नमस्कार करतो आहे." कुंतीला हें ऐकून दुःख झालें. ती म्हणाली, "कर्णा तुझी प्रत्यक्ष आई तुझ्यापुढें उभी असतां तूं राधापुत्र म्हणवून कां घेतोस? तर तूं पांडवांकडे ये. असें सांगायलाच मीं आलें आहे." इतक्यांत वरून सूर्यानें कुंतीच्या म्हणण्याला आकाशवाणीनें दुजोरा दिला. तथापि कर्णानें तें जुमानलें नाहीं. तो कुंतीला म्हणाला, "मी तुझ्या पोटीं जन्मलों असेन पण तुझ्याच कृत्यामुळें मी एका यःकश्चित सूताच्या हातीं जाऊन आजपर्यंत क्षत्रियाच्या सर्व संस्काराला मुकलों कीं नाहीं? आणि आतां तुला नसतें पुत्रप्रेम आठवलें तें स्वार्थबुध्दीनें असें मी कां म्हणूं नये. तूं आई होऊन शत्रूपेक्षांहि माझी अधिक हानि केली आहेस. आणि आतां मी पांडवांकडे गेलों म्हणजे कौरव मला हंसतील, भित्रा म्हणतील, आणि म्हणतील हें पहा आतां युध्द उभें राहिलें तेव्हां कर्णाला पांडवांचा भाऊपणा आठवला व मानवला. तुला वाटतें कीं तूं माझ्या कल्याणाची गोष्ट सांगतेस पण ती न ऐकून मी मला योग्य असेंच वर्तन करीन. आतां तुझा आईचा शब्द म्हणून मी एवढें वचन देतों कीं, एका अर्जुनाशिवाय बाकीच्या चौघांवर मी बाण सोडणार नाहीं पण अर्जुनाशीं मी लढेनच. मग त्यांत आम्हांपैकीं कोणीहि मेलें

तरी तुला आज पांच पुत्र आहेत तितकेच उरतील. मी मेलों तर आज पांच आहेतच तेच पांच आणि अर्जुन मेला तर मला मोजून पांच.'' हें बोलणें कांहींसे छद्मी, लाऊन बोलल्यासारखें होतें. हें जाणून कुंतीला फार दुःख झालें व लाजहि वाटली. तात्पर्य सामोपचाराचे हे शेवटचेहि प्रयत्न फुकट गेले.

## युद्धाची तयारी

मग पांडवांनीं सैन्याची जुळवाजुळव व मोजदाद केली. त्यांत त्यांची सेना सात अक्षौहिणी भरली. त्या प्रत्येक अक्षौहिणीचा मुख्य म्हणून द्रुपद, विराट, धृष्टद्युम्न, शिखंडी, सात्यकी, चेकितान व भीमसेन असे नेमिले गेले. नंतर सर्वांचा मिळून सेनापती कोण नेमावा याचा विचार झाला. सहदेवानें मत्स्यदेशाच्या राजाचें नांव सुचविलें, नकुलानें द्रुपद राजाचें, अर्जुनानें धृष्टद्युम्नाचें, भीमानें शिखंडीचें अशीं नांवें सुचविल्यावर युधिष्ठिर म्हणाला, "हीं नांवें ऐकली व ठीक आहेत. परंतु शेवटीं कृष्ण ज्याचें नांव सुचवील त्यालाच मी सेनापति नेमीन.'' तेव्हां कृष्णानें धृष्टद्युम्नाचें नांव सुचवून हा वाद संपविला. मग पांडव द्रौपदीसह एकवार उपप्लव्य नगराला गेले. तेथून कुरूक्षेत्राकडे परतल्यावर युधिष्ठिरानें एक सपाट चांगला प्रदेश पाहून तेथें सैन्याचा तळ दिला. सावधगिरी अशी घेतली कीं त्याच्या जवळ स्मशानें, देवळें, तीर्थें, ऋषींचे आश्रम हीं नसावीं. पांडव येण्याच्या वाटा रोखण्यासाठीं कौरवांनीं निरनिराळ्या चौक्या ठेविल्या होत्या त्या उधळून लावण्याचें काम पांडवांना प्रथम करावें लागलें. छावणी केली ती नदीच्या काठीं केली. कृष्णाच्या सांगण्यावरून तिच्या भोंवतीं खंदक खणविला. सैन्याला लागणारे खाण्यापिण्याचे पदार्थ भरपूर भरून ठेविले. शस्त्रोपचाराकरितां वैद्य आणविले. युद्धोपयोगी सामानाच्या राशी घातल्या. कांटेरी, लोखंडी झुलीनें मढविलेली हत्ती चहूंकडे फिरते ठेविले. दुसऱ्या बाजूला दुर्योधनानेंहि अशीच तयारी केली. तात्पुरती शिबिरें, त्यांजकडे जाण्यायेण्याच्या सपाट वाटा, पाण्याचे पुरवठे इत्यादींची तजवीज केली. दोन्ही छावण्यांतून युद्धाला तयार व्हा अशा दवंड्या पिटविण्यांत आल्या. धर्माचा स्वभाव असा कीं युद्धाकरितां एक पाऊल पुढें टाकावयाचें व पुन्हां खिन्नता वाटून अर्धें पाऊल मागें

उत्तेजन देणें हें एक कामच होऊन बसलें होतें. सेनेच्या सामुग्रींत खालील वस्तू मुख्यतः होत्या. अनेक तऱ्हेचे बाण, बाणांचे भाते, कातड्यांचे टोप, अणकुचीदार खिळे बसविलेल्या काठ्या, लहान मोठे सोटे, लोखंडी पहारी, ध्वज, पताका, धनुष्यें, फांस, लष्करी बिछाने, चिकट डिंक लावलेल्या काठ्या, वाळू, गूळ, तेल, राळीची बुकणी, घुंगुर लावलेल्या ढाली, गुळाचे चिकट पाणी, तोफेचे गोळे, गोफणी, मेण, फाळ, नांगर, विषारी द्रव्यें, सर्पांनी भरलेले घडे, सुपे, पेटारे, कुऱ्हाडी, कवती, गुप्त्या, खिळे, कांटे, शिंगे, भाले, कुदळी, तेलांत भिजविलेलीं वस्त्रें, जुनें तूप, आणि अर्थात रथादी साधनें हत्ती, घोडे इत्यादी, शिवाय गंडे, ताईत मंत्रून बरोबर ठेविले होते. कोठें सैन्यांत खंड, तूट पडली तर रथामागून हत्ती, घोडे, शिपाई अशी राखीव सेना ठेविली होती. निरनिराळ्या ठरीव संख्येप्रमाणें सेना, पृतना, वाहिनी, ध्वजिनी, चमू, अक्षौहिणी, वरूथिनी, पत्ती, सेनामुख, गुल्म, गण, इत्यादी सैनिकांच्या घटना बनविल्या होत्या. कौरवांकडे भीष्म, द्रोण, कृप, शल्य, जयद्रथ, कांबोज, कृतवर्मा, अश्वत्थामा, भूरिश्रवा, शकुनि, बाल्हीक इत्यादी प्रमुख वीर होते, भीष्मानीं आघाडी सजवण्याकरितां पुढें निघण्याचे वेळीं आपल्या स्वभावाप्रमाणें दुर्योधनाशीं मन मोकळें केलें. ते म्हणाले, " वास्तविक कौरव पांडव हे दोघेहि मला सारखेच आहेत. तरी पांडवांविरुद्ध लढण्याला मी कसूर करणार नाहीं. अर्जुन माझ्याशीं लढेल पण माझी अमर्यादा करणार नाहीं. मी तुझें सहाय्य करीन. पण पांडवांचा उच्छेद करणार नाहीं. मात्र त्यांचें सैन्य मी पुष्कळ मारीन. पण पांडवांचा प्रत्यक्ष वध मी करणार नाहीं." भीष्मानें दुसरी एक अट अशी घातली कीं, "मी युद्ध करीत असतां कर्णानें गप्प बसावें. माझ्या कामांत ढवळाढवळ करूं नये." यावर कर्ण म्हणाला, 'ठीक आहे, भीष्म जिवंत असेपर्यंत मी लढाईत भागच घेणार नाही.'

आतां पांडवांच्या सेनेंत द्रुपद, विराट, सात्यकी, धृष्टद्युम्न, धृष्टकेतु, शिखंडी, सहदेव (मगध देशाचा राजा) हे प्रमुख वीर होते. या सातांपैकीं, धृष्टद्युम्नाला प्रमुख सेनानायक केला. त्या आठांवर अर्जुन आणि त्या नवावर स्वतः श्रीकृष्ण अशी अधिकाराची रचना केली. पांडव सेनापती चालून जाणार, इतक्यांत बळराम आला, व फिरून त्यानें आपलें

मनोगत प्रकट केलें. तो म्हणाला, “हें युद्ध होऊं नये असें मला वाटतें; पण कृष्णासकट कोणीहि माझें ऐकत नाहीं म्हणून मी आतां सरस्वतीच्या तीरीं असलेलीं तीर्थें पहाण्याला व यात्रा करण्याला जातों. युद्धांतून जे वांचतील त्यांची माझी फिरून गांठ पडेलच.” असाच दुसरा एक अनपेक्षित प्रकार घडला. भोजकट नगराचा राजा रुक्मि हा एक अक्षौहिणी सैन्य बरोबर घेऊन पांडवांकडे आला आणि म्हणाला, “मी कृष्णाचा पूर्वीचा वैरी खरा परंतु मी तें विसरून आतां तुम्हांकडे साहाय्यार्थ आलों आहे. तुम्ही सांगाल तो पराक्रम करीन.” कदाचित् त्याच्या मनांत आपणाला एकाद्या मोठ्या सैन्य विभागाचा नायक करावा असें असेल, पण रुक्मिणी हरणाच्या वेळीं कृष्णानें त्याची फजिती व पराभव केला होता व त्याचें पाणी जोखलें होतें. म्हणून त्याची बढाई ऐकून कृष्णानें अर्जुनाला डोळा घातला. त्याचा आशय जाणून अर्जुन म्हणाला, “ मला तुझ्या साहाय्याची गरज नाहीं.” त्याला कदाचित् असें वाटले असेल कीं, रुक्मि वैर विसरल्याचें बोलला तरी न जाणों पांडव-सैन्यांत मित्र म्हणून शिरून आयत्या वेळीं कांही दगाफटका, विश्वासघात करण्याचाहि त्याचा हेतु असेल. म्हणून अर्जुनानें त्याला धिःकारून घालवून दिले. आणि मौज ही कीं, तो तें सैन्य घेऊन दुर्योधनाकडे गेला पण दुर्योधनानेंहि त्याला ‘तुझें सहाय्य मला नको,’ असें सांगून घालवून दिला. तेव्हां लुडबुड करणारा हा रुक्मि दोन्हीकडून थपडा खाऊन परत गेला. दुर्योधन मूर्ख असा कीं, अशा वेळीं पांडवांकडे बढाईचा नुसतां तोंडी निरोप पाठवून का युद्ध थांबणार होतें? पण दुर्योधनानें उलूकनामक एका दूताला, बरोबर कांही तरी आचरटपणाचा निरोप देऊन पांडवांकडे पाठविलें. तो निरोप म्हणजे, नुसता उपमर्दकारक असा स्वपराक्रमाचा वाचलेला पाढा होता. पण अशा निरोपानें काय होणार? उलूकाला हात हालवीत परत जावें लागलें. आणि कृष्ण, अर्जुन इत्यादिकांनीं त्याच्याबरोबर जे उलट अपमान-कारक निरोप दुर्योधनाला पाठविले ते त्याला ऐकून घ्यावे लागले. असो, शेवटीं कौरव सेनाहि आपल्या छावणींतून बाहेर पडून रणांगणाकडे निघाली. ही रणभूमि कुरुक्षेत्रावर पडली. व योग असा कीं याच क्षेत्रांत कुरुराजानें पूर्वी तप केलें होतें. त्याच कुरुराजाचे वंशज अशा पवित्र जागीं लढून त्यांनीं एकमेकांचा संहार करावा हा योग मोठा चमत्कारिक नव्हे काय? पण कुरूचे

वंशजच काय, त्यांचे मित्र, मांडलिक, साहाय्यकर्ते, हितचिंतक म्हणून सगळ्या भरतखंडांतून अनेक राजे व वीर आणि युद्धकार्याला उपयोगी पडणारे सेवक किंवा पोटार्थी लोक येऊन ते उभय पक्षांत मिसळले होते. भारतकार म्हणतो "या युद्धाकरितां सर्व देशांतून पुरुष व वाहनें इतकीं जमा झालीं होतीं कीं, आसपासच्या देशांत लहान मुलें, म्हातारे, स्त्रिया, यांशिवाय कोणी उरलें नव्हतें."

## युद्धनियम

असो, पांडवांचा तळ पूर्वेकडे तोंड करून पडला होता. आणि कौरवांचा तळ पश्चिमेकडे तोंड करून पडला होता. पांडवांच्या सेनापतींनीं सर्व सिद्धता व तयारी केल्यावर आपल्या लोकांना खुणेचे शब्द सांगून ठेविले. आपले म्हणून ओळखण्याकरितां ठराविक चिन्हें, बिल्ले, पट्टे वगैरे अंगावर घालण्याकरितां दिले. एक गोष्ट मात्र दोन्ही सेनापतींनीं मिळून केली ती युद्धाचे नियम ठरविण्याची. कारण युद्ध निकराचें, शत्रुत्वाचें असलें तरी तें धर्मयुद्ध व्हावें, त्यांत अधर्म होऊं नये याविषयीं उभय पक्षाचें एकमत होतें. मुख्य नियम असे कीं सायंकाळीं युद्ध संपल्यानंतर आपले-परके, शत्रु-मित्र हा भेद उरूं नये. म्हणजे दिवसाचें युध्द संपल्यावर रात्रीं कौरव पांडवांकडील सैनिकांनीं खुशाल एकमेकांकडे जावें. त्यांना कोणी कसलीहि इजा करूं नये. युध्द व्हावयाचें तें सारख्या शक्तीच्या जोडीदारांत व्हावें. लहान मोठा, प्रबळ दुर्बळ यांत होऊं नये. तसेंच युध्दांत कोणी जखमी झाला किंवा युध्दांतून बाहेर पडला, किंवा शरण आला तर त्यावर हात उचलूं नये. रणवाद्यें वाजविणारावरहि प्रहार करूं नये.

युध्दाच्या आरंभीं व्यास ऋषी हे धृतराष्ट्राकडे आले आणि म्हणाले, "दुर्दैवानें आतां युध्द थांबविणें संपलें. युध्द पहाणें तेवढें उरलें तें पहाण्याची तुझी इच्छा असली तर मी तुला डोळे देतों. तुझें अंधळेपण नाहींसें करितों." तेव्हां धृतराष्ट्र म्हणाला, "हा दुःखकारक प्रसंग डोळ्यांनीं पहाण्यापेक्षां त्याची वार्ता कानांनीं ऐकणें अधिक बरें म्हणून ती कोणी मला घडेल तशी सांगण्याची व्यवस्था करा." तेव्हां व्यासांनीं त्या कामीं गावलगणाचा मुलगा संजय याची योजना केली. आणि त्याला रणां-

गणावर सुरक्षितपणें संचार करितां यावा म्हणून निर्भयतेचें वरदान दिलें व संचाराकरितां शरीरबळहि दिलें.

## युद्धास प्रारंभ * * *

युध्दाच्या तोंडीं न घडणारी अशी एक गोष्ट झाली. ती अशी कीं, समोर शत्रु दिसले ते पाहून आणि त्यांत आपले आप्त, इष्टमित्र आहेत हें पाहून अर्जुनाला कांहीं अकल्पित रीतीनें विषाद उत्पन्न झाला. आणि हें पाप आपल्या हातून घडूं नये. आणि युध्द न केल्यामुळें राज्य गेलें तरी चालेल असें वाटून त्यानें धनुष्यबाण खालीं ठेविलें. परंतु श्रीकृष्णानें त्याला सुप्रसिध्द भगवद्गीतेंत वर्णिलेला उपदेश केला त्यांत प्रथम वेदांत, नंतर कर्मयोग, नंतर ज्ञानयोग नंतर हटयोग, अध्यात्म, भक्तियोग इत्यादि सर्व सांगून, पण शेवटीं मुख्यतः मनुष्याच्या सहज धर्मावर आणि म्हणून अर्जुनाच्या क्षात्र धर्मावर विशेष जोर देऊन आणि आपल्या उपदेशाला दैवी स्वरूप येण्याकरितां प्रत्यक्ष विश्वरूप दाखवून ताळ्यावर आणिलें तेव्हां अर्जुनाला पडलेला मोह, भ्रम, संशय, पापपुण्याची विपरीत कल्पना या सर्व गोष्टी नष्ट होऊन तो पुन्हां युध्दाला तयार झाला. नंतर कृष्णानें अर्जुनाकडून दुर्गा देवीचा स्तव करविला. तेव्हां देवीनें त्याला विजयाचें वरप्रदान दिलें. आणि अशा रीतीनें शेवटीं एका विचित्र ग्रहयोगावर युध्दाला सुरुवात झाली. त्या दिवशीं चंद्र हा पितृलोकीं मघा नक्षत्रांत होता. आणि राहू व केतू सोडून सर्व ग्रह एकत्र युतीमध्यें येऊन एकमेकांवर प्रहार करीत असावेसें दिसलें आणि उदयाच्या वेळीं सूर्य दुभंगलासा दिसला. त्याच्या अंगांतून तेजाऐवजीं अग्नि बाहेर पडत होता. इकडे युध्द सुरू असतां, युधिष्ठिर भीष्माकडे गेला हेतु हा कीं, तुम्ही वडील तरी युध्दाला अनुमति आणि पांडवांना विजयाचा आशीर्वाद मिळावा. भीष्म म्हणाला, “ तुला प्रिय अशी कोणती गोष्ट करूं ? ” युधिष्ठिर म्हणाला, “ आमच्याकडून कोणत्या उपायानें तुमचा वध होईल तें सांगा ? ” भीष्म म्हणाला,“मी कौरवांचा दास होऊन राहिलों आहे म्हणून लढणार त्यांच्याकरितांच. पण तुझा विजय व्हावा अशी मात्र इच्छा. मात्र माझा वध कोण कसा करील या विषयीं मला आतां कांहीं

सांगतां येत नाहीं. कारण माझा मृत्यूकाल अजून आलेला नाहीं.'' नंतर युधिष्ठिर द्रोणाकडे गेला व त्यालाहि त्यानें हाच प्रश्न विचारला. द्रोण म्हणाला ''मीं हातांतलें शस्त्र आपल्या इच्छेनें खालीं ठेवून मरणाकरितां सज्ज होऊन बसल्याशिवाय मला कोणी मारूं शकणार नाहीं. मात्र मी ज्या पुरुषावर विश्वास ठेवितो त्याच्या तोंडून कांहीं अत्यंत अनिष्ट गोष्ट कळल्याशिवाय मी शस्त्र खालीं ठेवणार नाहीं.'' नंतर युधिष्ठिर, कृप व शल्य यांच्याकडे गेला. पैकीं एकानें त्याला नुसता आशीर्वाद दिला. व दुसऱ्यानें इतकेंच कबूल केलें कीं, 'कर्ण युद्धाला पुढें होईल तेव्हां मी त्याचा सारथी होऊन त्याचा तेजोभंग होईल अशीं भाषणें करीन.' तसेंच युधिष्ठिरानें अशी घोषणा केली कीं अजूनहि शत्रूकडील जो कोणी मजकडे येईल त्याला मी आपलासा करीन. तेव्हां कौरवांपैकीं युयुत्सु हा उघडपणें येऊन पांडवांना मिळाला. नंतर युद्ध सुरू झालें, त्यांत भीष्म व अभिमन्यू यांचें युद्ध झालें. विराटपुत्र उत्तर याचा व श्वेताचा वध झाला. भीष्माचें व अर्जुनाचें युद्ध झालें. द्रोण व धृष्टद्युम्न यांचें युद्ध झालें. कलिंग राजाचा वध झाला. भीष्म निकरानें लढत नाहींत अशी तक्रार दुर्योधनानें केली तेव्हां भीष्मानें महाभयंकर युद्ध केलें. यामुळें पांडवसैन्य पळत सुटलें. त्याला अर्जुनानें प्रतिकार केला. पण अर्जुनालाहि हार खावी लागली. तेव्हां अर्जुनाला वांचविण्याकरितां कृष्णानें पूर्वीं आपण केलेली हातीं शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा विसरून हातांत सुदर्शन चक्र घेऊन तो भीष्मावर धावला. तेव्हां भीष्म म्हणाला, "आतां माझें सार्थक झालें. आतां मी मेलों तरी हरकत नाहीं.'' तेव्हां अर्जुनानें कृष्णाला थांबविलें व स्वतः युद्ध सुरू केलें. तरी निकाल लागेना. रोज सैन्याचे नवे व्यूह रचावे, रोज नवा वीर आघाडीला पाठवावा, असें होऊन नवव्या दिवशीं युद्धाचें तोंड फिरलें. कारण आतां भीष्माला शरण गेल्याशिवाय गती नाहीं असें पाहून कृष्णार्जुनासह पांडववीर भीष्माकडे गेले. तेव्हां भीष्म म्हणाला "दुर्योधनाला दिलेलें वचन मी पाळलें तेव्हां आतां तुम्ही माझा वध कसा होईल तो करा. त्या वधाचा एक उपाय मीच सुचवितों तो असा कीं, पांडवांकडील आज पुरुषरूपानें असलेला शिखंडी वीर हा पूर्वीं स्त्री होता. म्हणून तो माझ्या समोर उभा राहिला तर मी त्याच्यावर बाण

टाकणार नाहीं आणि या गोष्टीचा फायदा घेऊन शिखंडीच्या आड उभा राहून अर्जुनानें मजवर बाणांचा वर्षाव करावा." अर्थात ही युक्ती कळल्यावर तिचा उपयोग करण्याला पांडव कां कमी करतील? त्याप्रमाणें शिखंडीला त्यांनीं पुढें केलें. तेव्हां भीष्मानें धनुष्य खालीं ठेविलें. संध्याकाळीं भीष्म जखमी होऊन पडला. त्यानें आपलें अंग भूमीवर टाकलें. अनेक वीर त्याच्या भोंवतीं जमले. कांहीं वेळ सर्व युद्धच थांबलें. भीष्म म्हणाला, "मला डोकें टेकण्याकरितां आतां कांहीं द्या." तेव्हां कौरवांनीं मऊ मऊ उशा आणिल्या पण भीष्मानें त्या नाकारिल्या. तेव्हां अर्जुनानें त्यांचें अंतरंग ओळखून आपल्या तीक्ष्ण बाणांनीं भीष्मांचें शरीर उचलून धरिलें व बाणांनींच त्यांची शय्या रचिली. भीष्म म्हणाला "मी आतां पडलों खरा परंतु उत्तरायण सुरू होईल तेव्हांच मी आपले प्राण सोडीन." नंतर शस्त्र-वैद्य आणून भीष्मांच्या अंगांत रुतलेलें बाण काढावे असा विचार सुरू झाला. तेव्हां भीष्म म्हणाला "बाण काढूं नका. माझे प्राण गेल्यावर या बाणासकट माझें दहन करा." नंतर भीष्माला फार तहान लागली असें पाहून अर्जुनानें एक बाण मंत्रून जमिनींत सोडला त्याबरोबर एक निर्मळ सुगंधी पाण्याची धार वर निघाली तेव्हां तें पाणी पिऊन भीष्म शांत झाला व त्यानें अर्जुनाला शाबासकी दिली. पण मरतांनाहि भीष्मानें पांडवांचें हितच चिंतलें तें पाहून दुर्योधनाला फार विषाद वाटला. पण करणार काय? मग सर्व मंडळी भीष्माला तसेंच शांतमय अवस्थेंत सोडून आपापल्या ठिकाणीं गेली. मग भीष्माच्या जागीं कोण सेनापती नेमावा याची चर्चा कौरवांत सुरू झाली. तेव्हां कर्ण म्हणाला "आपण आतां द्रोणाचार्यांनाच सेनापति करूं या. कारण ते सर्वांत वडील आहेत, त्यांना टाकून मला सेनापति कराल तर समवयस्क वीर व राजे लोक यांच्या मनांत मत्सर येईल." तेव्हां द्रोणांनीं ती गोष्ट मान्य केली व सेनापतीपद घेतलें. मग द्रोणांनीं प्रतिज्ञा केली कीं धर्माला धरून मी जिवंत कौरवांकडे आणीन मात्र त्याचा वध करणार नाहीं. पुढील युद्धांत सुधन्व्याचा वध झाला. अर्जुनाचे संशप्तकाशीं युद्ध झालें. सत्यजिताचा वध झाला. भगदत्तानें मोठा पराक्रम केला. व अर्जुनाला युद्धांत गुंगविलें. परंतु शेवटीं भगदत्ताचा वध झाला. हा वीर इतका वृद्ध होता कीं, त्याच्या पापण्या शिथिल होऊन लोंबूं लागल्या होत्या म्हणून त्यानें रणभूमीवर दिसावें

याकरितां त्या पापण्या वर उचलून फडक्यानें आवळून ठेविल्या होत्या. दुसऱ्या दिवसाच्या युद्धांत नीलाचा वध झाला.तिसरे दिवशीं महत्त्वाची गोष्ट म्हणजे अर्जुनाचा मुलगा अभिमन्यू हा चक्रव्यूहांत एकटा सांपडला गेल्यामुळें मारला गेला, मात्र मरणापूर्वी अभिमन्यूनें अतिशय जोराचें युद्ध केलें. नंतर बृहद्बलाचा वध झाला. अभिमन्यूच्या वधानें अर्जुनाला फार दुःख झालें. तेव्हां कृष्णानें त्याचें सांत्वन केलें. परंतु अर्जुनानें अशी प्रतिज्ञा केली कीं, ज्याअर्थी जयद्रथानें माझ्या मुलाला मारलें, त्याअर्थी मी त्याचा वध केल्याशिवाय राहाणार नाहीं.

## 'हा सूर्य हा जयद्रथ'

पांडवांकडले पुष्कळ वीर पूर्वी युद्धांत पडले. परंतु अभिमन्यूच्या मृत्यूमुळें पांडवांना जितकी हळहळ वाटली, तितकी पूर्वी केव्हांही वाटली नव्हती. याचें कारण अभिमन्यू तसाच गुण वानहोता. तो तरुण, तेजस्वी आणि अर्जुन व सुभद्रा यांचा अतिशय लाडका होता. त्याच्या पराक्रमावर पांडवांची पुष्कळ भिस्त होती. शिवाय उत्तरा ही त्याची बायको पांडवांच्या अज्ञात-वासांत त्यांच्या निकट परिचयाची झाली असून तिचे गुण त्यांना फार आवडल्यामुळें अर्जुनानें तिला आपली सून करून घेतलें होते. तिच्यावर अभिमन्यूच्या वधानें वैधव्याचा दुःखद प्रसंग कोसळला हें पांडवांच्या दुःखाला विशेष कारण झालें. भरीसभर म्हणून पांडवांना आणखी दुःख होण्याचें कारण असें कीं, कौरवांनीं त्याला एकटा गांठून त्याचा अधर्मानें वध केला होता. या सर्व गोष्टींमुळें अर्जुनाला त्वेष येऊन त्यानें जयद्रथवधाची प्रतिज्ञा केली. पण तींत निष्कारण स्वतःला अशी अट घालून घेतली कीं मी उद्यां संध्या-काळच्या आंत जयद्रथाचा वध करीन. नाहींतर अग्निकाष्ठ भक्षण करीन. ही अट कौरवांना कळल्यामुळें मोठा आनंद झाला. त्यांना वाटलें कीं, कोणीकडून तरी जयद्रथाचें रक्षण एक दिवसभर केलें तर तो न मेल्यामुळें अग्निकाष्ठ भक्षण करून अर्जुनाला मेलें पाहिजे. केवढा हा लाभ. एक अर्जुन मेला म्हणजे कायमची हानि झाली व त्यांचा पराभव होणार तेव्हां कौरवांनीं एक विचारानें जयद्रथाला मध्यें घालून त्याच्या भोवतीं सर्व सैन्य एकवटून मोठा व्यूह रचला. इकडे द्रोणाचार्यांनीं मोठी चढाई

करून अर्जुनासह पांडवांना गुंतवून ठेवून तो प्रतिज्ञेचा सर्व दिवस पार पाडण्याचें ठरविलें. यामुळें त्या दिवशीं जितकें निकराचें युद्ध झालें तितकें पूर्वी झालें नाहीं. जयद्रथ दृष्टिआड झाल्यामुळें अर्जुनाचें मन अत्यंत व्यग्र झालें. सूर्यास्त जसजसा जवळ येऊं लागला तसतशी अर्जुनाच्या प्रतिज्ञेची फारच भीति पांडवांना वाटूं लागली. हें ओळखून कृष्णानें नेहमीं प्रमाणें आपलें प्रसंगावधान दाखविलें. त्यानें आपल्या मायेनें सूर्य चांगला हातभर उंच असतांच त्याला ग्रासून बराच अंधार पाडून असें भासविलें कीं, आतां सूर्यास्त झाल्यामुळें अर्जुनाची प्रतिज्ञा खोटी ठरली आणि त्याला अग्निकाष्ट भक्षण करून मरण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून कौरव हर्षभरित होतील आणि निर्भय झालेला जयद्रथ दिमाखानें प्रकट करतील. कृष्णाची ही युक्ति साधली. कारण त्याच्या अपेक्षेप्रमाणें जयद्रथाभोंवतीं जें सैन्य होतें तें पांगून गेलें आणि स्वतः जयद्रथ अर्जुनासंमुख प्रकट झाला. हें पाहातांच कृष्णानें आपली माया काढून घेतली आणि अर्जुनाला म्हणाला "आतां बघतोस काय? सूर्यास्ताला अजून दोन घटिका आहेत. तेव्हां हा सूर्य आणि हा जयद्रथ असें पाहून त्याचा वध कर." असें पाहून अर्जुनानें जयद्रथाचें शिर उडवून भूमीवर पाडलें. यामुळें पारडें फिरलें. पांडव आनंदी झाले. कारण अर्जुनावरील संकट टळलें. कारण अर्जुनाचा जीव बचावून जयद्रथासारखा वीर गमावला. यामुळें कौरवांच्या सैन्यांत धांवपळ सुरू होऊन द्रोणाचार्याला मोठें संकट पडलें. पुन्हा युद्धाला तोंड लागून दोन्ही पक्षांचे वीर मेले. त्यांत अर्जुना-कडचा महावीर भीमाचा मुलगा घटोत्कच मेला हें वाईट झालें. राक्षस केव्हांहि मनुष्यापेक्षां प्रबळ. तो युद्धांत मनुष्यवीरापेक्षां अधिक पराक्रम करणारच. शेवटीं तो फारच अनावर झाला, असें पाहून कौरवाकडील एक राक्षस त्याच्यावर चाल करून निघाला. परंतु त्याचाहि वध झाला. शेवटीं घटोत्कचानें कर्णाशीं गांठ घातली तेव्हां निर्वाणीचा उपाय म्हणून कर्णाला आपल्या जवळची पाशवी शक्ति राक्षसावर सोडावी लागली. तिच्यापुढें मात्र कांहीं न चालून त्या शक्तीनें राक्षसाच्या शरिरांत शिरून त्याचे प्राण घेतले. पण मरतां मरतां त्यानें प्रचंड देह धारण केला आणि त्या देहानें कौरवांच्या सैन्याच्या एका मोठ्या भागावर आदळून वेऊन सैन्याचा चुराडा केला. घटो-त्कच मेल्यामुळें पांडवांना मोठें दुःख झालें. पण कृष्ण मनांतून आनंदित

झाला. त्यानें हें ओळखलें कीं अर्जुनाचा वध करण्याकरितां पाशवी शक्ति राखून ठेविली होती.ती घटोत्कचाच्या वधांत खर्ची पडली. त्यांत घटोत्कच मरून अर्जुन वांचणें हा मोठा लाभ नव्हे का ? हा युक्तिवाद पटण्याला कांहीं वेळ लागला. व तो पटला. मग पांडवाकडील द्रुपद व विराट हे युद्धांत पडले. तेव्हां द्रोणाशीं अखेरचें युद्ध करण्याचें पांडवांनीं ठरविलें. शेवटीं पांचव्या दिवशीं द्रोणाचा वध करण्याचा पांडवांच हेतु सफल झाला. परंतु येथेंहि श्रीकृष्णाची युक्ति उपयोगी पडली. तो म्हणाला "आतां धर्माधर्म पाहाण्याची वेळ नाहीं. आपण कशानें मरूं हें द्रोणांनीं सांगितलें आहे म्हणून त्या उपायाचा अवलंब केला पाहिजे. तो असा कीं, अश्वत्थामा मेला अशी वार्ता खोटीच पसरविली पाहिजे आणि शिवाय द्रोणाचार्य ज्याच्यावर विश्वास ठेवील अशा माणसानें ती त्याला सांगितली पाहिजे. तेव्हां भीमानें एक मोठा हत्ती हुडकून काढला. त्याचें नांव अश्वत्थामा होतें. त्याला मारून भीमानें 'अश्वत्थामा मेला ! अश्वत्थामा मेला !' अशी दोनदां घोषणा केली. द्रोणाचार्यांची कल्पना होती कीं अश्वत्थाम्याचा पराभव होणार नाहीं. परंतु त्याच्या नांवानें मृत्यूची बातमी तर उठली. तेव्हां ती खरी कीं खोटी हे विश्वासू माणसाकडून कळावयाचें तर धर्मालाच विचारावें. असें द्रोणाला सहजच वाटलें. परंतु येथें मात्र थोडी चिंता उत्पन्न झाली. कारण धर्म पडला खरे बोलण्याचा अभिमानी. कृष्णानें त्याची अशी समजूत केली–ज्या धर्माला दोन अर्थ असतील त्याचा उपयोग करून खऱ्याचें खोटें किंवा खोट्याचें खरें सांगण्यांत अधर्म नाहीं. ती गोष्ट स्वार्थामुळें किंवा बुद्धिहीनतेमुळें धर्माला पटली. जेव्हां द्रोणानें प्रत्यक्ष प्रश्न केला तेव्हां धर्मानें 'अश्वत्थामा मारला गेला, मनुष्य कीं हत्ती देव जाणें' असें मोघम सांगितलें. इतक्यात ऋषी व मुनी पांडवांचें नेहमीं हित चिंतणारे त्यांनींहि येऊन द्रोणाला शस्त्र खालीं ठेवण्याचा उपदेश केला. त्यांच्या मनांतील हेतु हा कीं द्रोण हा अन्यायानें कौरवांचा पक्ष घेऊन पांडवाशीं युद्ध करीत आहे आतां तो मेला तर बरा. असो. धर्म दुटप्पी बोलून आपल्या सत्यप्रतिज्ञेपासून च्युत झाला त्या बरोबर त्याला अधःपाताची शिक्षाहि झाली. कारण धर्माचा रथ नेहमीं जमिनीपासून चार बोटें वर अंतराळी चालावयाचा ही त्याच्या महात्मेपणाची खूण होती. पण हें असत्य भाषण तोंडांतून निघतांच त्याचा रथ जमिनीला टेकला. पण कांहीं झालें तरी खोटें बोलण्याचा लाभ

पांडवांच्या पदरांत पडला. कारण त्यामुळें द्रोणांनीं शस्त्र खालीं ठेविलें, असें पाहतांच त्याचा वध करण्याकरितां त्याचा हाडवैरी धृष्टद्युम्न रथांतून खालीं उतरला. त्यानें हातांत तलवार घेतली आणि द्रोणाचार्यांचें डोकें रथांतले रथांत कापून उडविलें. ही गोष्ट अर्जुनाला आवडली नाहीं. त्याची इच्छा द्रोणाला पकडून आपणाकडे आणून बंदींत ठेवावें अशी होती. या प्रश्नावर भीम व अर्जुन यांची चांगलीच खडाजंगी झाली. भीमाचा स्वभाव सर्व पांडवांत सडेतोड, प्रांजल, व प्रामाणिक. तो वेळ पडल्यास अर्जुनाप्रमाणें वडील भावाचा निषेध करीत असे. आपल्या बापाचा वध झालेला ऐकून अश्वत्थामा खवळला. धृष्टद्युम्नानें भीमाच्या म्हणण्याला दुजोरा दिला. तो म्हणाला " द्रोण ब्राह्मण खरा त्यानें वर्णधर्म टाकून क्षात्रधर्म स्वीकारून कपट प्रयोगानें दिव्य ब्रह्मास्त्रांचाहि उपयोग करून युद्ध चालविलें होतें. व कौरवांचा पक्षपात केला होता, त्या अर्थी तो मेला तर काय वाईट झालें ? " इकडे अश्वत्थाम्यानें अतिशय रागानें युद्ध सुरू करून आपल्या जवळचें नारायणास्त्र काढलें. त्या अस्त्रानें भीमसेनाला तेजानें वेढून टाकिलें. तेव्हां अर्जुनानें वरुण अस्त्र सोडलें आणि अश्वत्थाम्याला युद्धाचें आवाहन दिलें. अश्वत्थाम्यानें अग्नीच्या अस्त्राचा मंत्र उच्चारून सर्वत्र धूर व अंधार उत्पन्न केला तेव्हां अर्जुनानेंहि ब्रह्मास्त्र सोडून तो अंधार नाहींसा केला. अशा रीतीनें पांच दिवसांच्या युद्धानंतर द्रोणाचार्यांचा वध झाला.

## कर्णाला सेनापतीपद मिळालें

नंतर सेनापतीपदाचा अभिषेक करण्याची पाळी कर्णाचीच आली. त्याप्रमाणें दुर्योधनानें तो केला. तेव्हां कर्णानें आपल्या कल्पनेप्रमाणें नवीन व्यूहरचना केली. पुढील युद्धांत प्रथम अर्जुनाचें अश्वत्थाम्याशीं, संशप्तक वीरांशीं युद्ध झालें. अश्वत्थाम्याचा पराजय झाला. सहदेव व दुःशासन यांचें युद्ध झालें. दंडधर व पांड्य यांचा वध झाला. सुतसोम व सौबल यांचें युद्ध झालें. धर्म व दुर्योधन यांचें युद्ध झालें. शिखंडी, धृष्टद्युम्न यांना पराभव पावून मागें हटावें लागलें. कर्णानें नकुलाचा पराभव करून मोठी चढाई केली. परंतु त्याला मनाजोगा सारथी मिळेना. तेव्हां दुर्योधनाच्या विनंतीवरून शल्यानें कर्णाचें सारथीपण पत्करलें. पण अट अशी घातली

कीं, मी मनाला येईल तें तुला बोलत जाईन. मग तुझा तेजोभंग झाला तर त्याचें वाईट वाटून घेऊं नकोस. शल्य कर्णाच्या रथावर बसल्यानंतर कर्णानें स्वतःच्या पराक्रमाची मोठी बढाई चालविली. ती शल्याला आवडली नाहीं. शिवाय शल्यानें पूर्वी पांडवांना वचन दिलें होतें कीं, "मी तुमच्या बाजूनें न लढलों तरी कर्णाचा पाणउतारा करून त्याचा पराक्रम ढिला करीन." तें वचन आठवून शल्यानें कर्णाची निंदा चालविली. 'तूं पांडवरूपी हंसापुढें कावळ्यासारखा तुच्छ आहेस' असेंहि म्हटलें. शेवटीं दुर्योधन मध्यें पडून त्यानें त्यांचा तंटा मिटविला. तेव्हां कर्णानें पुन्हां युद्ध सुरू केलें. भीमसेनानेंहि सहा कौरवांना मारून कर्णाशीं गांठ घातली. कर्ण अद्यापि मरत नाहीं असें पाहून धर्मराजानें रागावून अविचारानें अर्जुनाच्या गांडीव धनुष्याची निंदा केला. यामुळें अर्जुन रागावला. त्याची प्रतिज्ञा अशी होती कीं, जो कोणी गांडीव धनुष्याची निंदा करील त्याचा मी शिरच्छेद करीन म्हणून त्यानें धर्मराजांवर तलवार उगारली. जवळच कृष्ण होता, त्यानें समाधान करून कठिण प्रसंग टाळला. यांत धर्मराजाचीच खरोखर चूक होती. असो. नंतर कर्णानें पांडवांकडील सोमक वीरांना ठार मारिलें. पुन्हां संकुल युद्ध झालें. म्हणजे अमक्याशींच युद्ध करावें अशा हेतूनें युद्ध न करितां जो कोणी समोर दिसेल त्याच्याशीं वीर लढूं लागले. त्यांत भीम, व दुःशासन यांची गांठ पडली. तेव्हां त्याचीं दुष्ट कृत्यें आठवून भीमानें दुःशासनाचा गळा तलवारीनें चिरला. आणि त्याचें रक्त आपल्या तोंडाला लावून सूड उगवला. तसेंच अर्जुनानें कर्णाचा मुलगा वृषसेन याला ठार मारिलें. शेवटीं कर्ण व अर्जुन यांची गांठ पडली. तेव्हां मात्र पुढें होणार व मागें झालें नाहीं असें युद्ध झालें. त्यांत प्रथम कर्णानें अर्जुनाचें किरीट खालीं पाडलें. कर्णानें दुसरा एक बाण धनुष्याला लाविला. त्यांत अर्जुनाचा एक वैरी अश्वसेन नांवाचा सर्प योगबलानें प्रविष्ट झाला होता. हें स्वतः कर्णालाहि माहीत नव्हतें. पण इंद्राला माहीत असल्यामुळें त्याला काळजी वाटली. तेव्हां ब्रह्मदेवानें त्याला म्हटलें घाबरूं नको, अर्जुनच विजयी होणार. शल्य म्हणाला, "या संधानानें अर्जुनाचा गळा चिरला जाणार नाहीं. तूं फिरून वेगळ्या प्रकारें बाणांचें संधान कर." कर्ण गर्वानें म्हणाला, "माझ्यासारखा योद्धा दोनदोनदां संधान करीत नसतो." तो बाण अर्जुनाच्या

गळयावर येईल अशा भीतीनें कृष्णानें अर्जुनाचा रथ थोडा पायानें दाबून जमिनींत घुसविला. तेव्हां रथाच्या घोडयांनीं गुडघे टेकले. त्यामुळें तो बाण अर्जुनाच्या मानेवर न लागतां किरीटावर लागला आणि तो किरीट खालीं पडला. तेव्हां अर्जुनानें आपलें शुभ्रवस्त्र डोक्याला गुंडाळून केस झाकले. त्या बाणांतील सर्पाची इच्छा अर्जुनाचा कंठ छेदण्याची होती. तें झालें नाहीं म्हणून तो परत कर्णाकडे आला व म्हणाला, "मला पुन्हां अर्जुनावर सोड." परंतु कर्ण म्हणाला, "मी एकच बाण दोन वेळां उपयोगांत आणीत नसतों." मग कृष्णानें रथ वर उचलला. आणि अर्जुनानें कर्णाचा मुकुट आणि कवचकुंडलें बाणानें उडविलीं. नंतर कांहीं वेळानें यमधर्मानें मनांत आणलें कीं आतां कर्णाचा अंतकाल आला ; म्हणून त्यानें कर्णाला सांगितलें कीं, "पहा तुझ्या रथाचें चाक पृथ्वीनें गिळिलें आहे." तेव्हां कर्ण खालीं उतरून तें चाक आपल्या बळानें वर उचलूं लागला. शिवाय त्याला अस्त्रांचे मंत्र आठवेनासे झाले. निराश होऊन कर्णानें इतक्या जोरानें रथाचें चाक वर उचललें कीं, त्या चाकासकट पृथ्वीच थोडी वर आली तरी चाक त्यांतून निघेना. व कलंडल्या रथांतून कर्णाला शरसंधान करितां येईना. तेव्हां कर्ण अर्जुनाला म्हणाला, "मी या अडचणींत सापडलों असतां तूं मजवर बाण सोडणें हें धर्मयुद्ध नव्हे." तेव्हां सारथी कृष्ण म्हणाला, "कर्णा, तुझ्यासह कौरवांनीं आजपर्यंत केलेलीं अधर्माचीं कृत्यें आठव. द्रौपदीला विवस्त्र करून सभेंत आणण्याला तुझी संमति मिळाली तेव्हां तुझा धर्म कोठें गेला होता ? द्रौपदी, आतां तूं दुसरे पती कर असें तूं तिला म्हणालास हें बोलणें काय धर्माचें होतें ?" हें ऐकून कर्णानें लाजून मान खालीं घातली. आणि अर्जुनावर ब्रह्मास्त्र सोडलें. त्यावर अर्जुनानें अग्निअस्त्र सोडलें. कर्ण आतां रथावर चढणार असें पाहून अर्जुनानें असा नेम धरून बाण मारला कीं, त्याच्या योगानें कर्णाचें मस्तक तुटून पडलें. त्याच्या शरीरांतून एक ज्योति निघाला व अंतरिक्षांत सूर्याला जाऊन मिळाली, आणि कर्णाचा मोकळा रथ घेऊन शल्य छावणींत परत गेला. कर्णवधाची वार्ता ऐकून कौरवांचें सैन्य ठिकठिकाणीं पळत सुटलें. कर्णाच्या चपल हस्तलाघवामुळें कृष्ण व अर्जुन या दोघांच्याहि शरीरांत अनेक बाण शिरले होते ते त्यांनीं काढून टाकले; आणि त्या रात्रीं सुखानें झोप घेतला. कर्णवधाची वार्ता

ऐकून धृतराष्ट्रानें तर जमिनीवर घालून घेतलें. दुर्योधनालाहि फार दुःख झालें. परंतु तो पडला हटवादी! म्हणून त्यानें युद्ध पुढें चालविण्याकरितां सैन्याला पुन्हां उत्तेजन दिलें. कृपाचार्य निरुत्साहाची भाषा बोलूं लागला, तिचा त्यानें निषेध केला आणि अश्वत्थाम्याच्या सांगण्यावरून कर्णाच्या जागीं शल्याला सेनापतीपद देऊन अभिषेक केला. उलट पांडवांनीं आज धर्माला पुढारी करून चढाई केली. शल्यानें आपणाकडून पराकाष्ठा केली; परंतु शेवटीं युधिष्ठिर हा अधिक पराक्रमी ठरला. मात्र त्याला इतर सर्व वीरांचें साहाय्य होतें. युधिष्ठिरानें शेवटीं एक शक्ति सोडली. तिनें शल्याचा प्राण घेतला व तो जमिनीवर कोसळला. नंतर शाल्वाचा वध झाला. सात्यकी व कृतवर्मा यांनींहि एकमेकांना गांठून युद्ध केलें. धृतराष्ट्राच्या आणखी आकरा पुत्रांचा पांडवांनीं वध केला. सुदर्शन व सुशर्मा हेहि रणांगणांत पडले. तीच गति शकुनी व उलुक यांची झाली.

## दुर्योधनाचें पलायन

अशा रीतीनें दुर्योधनाचे सर्व सहाय्यकर्ते वीर गतप्राण झाल्यामुळें त्याचें धैर्य गळालें. तो स्वतः ठिकठिकाणीं जखमी झाला. आणि आतां पृथ्वी शून्य झाल्यासारखी वाटून तो रणांगण सोडून निघाला. पण पांडवांना चुकवून जाणार कोठें? म्हणून बरोबर एकहि मनुष्य न घेतां केवळ एक गदा तेवढी घेऊन अकरा अक्षौहिणीचा तो सेनापती पायींच एका दूरच्या सरोवराकडे निघाला. याच वेळीं संजय त्याच वाटेनें निघाला असतां दुर्योधन त्याच्या दृष्टीला पडला. तेव्हां संजयाबरोबर दुर्योधनानें धृतराष्ट्राकडे निरोप पाठविला कीं, मी एका सरोवरांत शिरून मायेनें त्याचें उदक स्तंभित करून आंत गुप्तपणें राहाणार आहे. पण हें कोणाला सांगूं नका. संजय परत फिरला, तेव्हा कृपाचार्य, अश्वत्थामा व कृतवर्मा हे त्याला भेटले. तेव्हां त्यांनीं चौकशी केल्यावर दुर्योधन लपून बसला होता तें सरोवर त्या तिघांना दाखविलें. तेव्हां दुर्योधन सुरक्षित आहे असें पाहून त्यांनीं संजयाला रथावर बसविला व ते रणांतील राजस्त्रियांना घेऊन हस्तिनापुराकडे गेले. मोकळे रथ आणि दुःखी स्त्रिया परत आलेल्या पाहून नगरच्या लोकांना फार हळहळ वाटली. आणि आतां सर्व संपलें असें पाहून

युयुत्सु कौरव हाहि त्या राजस्त्रियांबरोबर राजधानीला परत गेला. धर्म व कृष्ण यांनींहि राजस्त्रियांना सुरक्षितपणें नगराला पोचविण्याला सहाय्य केलें. नंतर कृतवर्मा, कृपाचार्य व अश्वत्थामा परत सरोवराकडे निघाले. पांडवांनीं दुर्योधनाचा शोध चालविलेला पाहून ते कांहीं वेळ लपून बसले, आणि पांडव निघून गेल्यावर ते सरोवराजवळ जाऊन दुर्योधनाला म्हणाले, "राजा, पाण्यांतून बाहेर ये. तुम्ही आम्ही मिळून अजूनहि होईल तशी लढाई करूं." हें बोलणें चाललें असतां शिकारींत मारलेले पशुपक्षी खांद्यावर घेऊन थकून चाललेले पारधी त्या सरोवरावर पाणी पिण्याकरितां आले होते ; त्यांनीं आडून हें भाषण ऐकिलें. व त्यांनीं विचार केला कीं, भीमानें दुर्योधनाचा शोध चालविला आहे; तेव्हां त्याला आपण ही बातमी सांगू, म्हणजे तो आपल्याला पुष्कळ द्रव्य देईल. त्याप्रमाणें त्यांनीं भीमाची गांठ घेऊन सर्व सांगितलें. मग काय विचारतां, कृष्णाला घेऊन पांडव त्या सरोवराजवळ आले. तेव्हां त्यांना पाहून कृतवर्मा, कृपाचार्य व अश्वत्थामा हे पळून दूर गेले आणि अंधार पडल्यावर रथ सोडून एका पिंपळाच्या झाडाखालीं हात उशाला घेऊन लवंडून विचार करूं लागले. इकडे पांडवांनीं सरोवर गांठलें, व युधिष्ठिर पुढें होऊन दुर्योधनाला हांक मारून म्हणाला, "अरे, तूं एवढा शूर म्हणवीत होतास ना ? मग आतां लपून कां बसलास ? आणि तुला स्वतःच्या मृत्यूची इतकी भीति वाटते तर तूं एवढें युद्ध उभें करून लक्षावधि लोक कां मारविलेस ?" दुर्योधन सरोवरांतूनच म्हणाला, "मनुष्यमात्राला मरणाची भीति वाटणारच. पण मी एकटा राहिलों, थकून गेलों, म्हणून विश्रान्तीकरितां या पाण्यांत दडलों. पण विश्रान्ति घेतल्यावर मी बाहेर येऊन तुमच्याशीं लढेन व तुम्हांला जिंकीनहि. परंतु आतां मला एकट्याला राज्य घेऊन काय करावयाचें आहे. मीं हरिणाचें कातडें पांघरून वनांत जाऊन राहिलों तरी तें योग्यच होईल. वाटेल तर तुलाच हें सर्व राज्य देतों." धर्म म्हणाला, "समजलें तुझें वैराग्य ! पूर्वींच न्यायमार्गानें आमच्या राज्याचा अंश आम्हांला देतास तर हें युद्ध तरी कां होतें ?" दुर्योधन म्हणाला, "तुम्हीं इतके व मी एकटा ! तेव्हां लढायचेंच तर एकेकानें माझ्याशीं लढावें." तें युधिष्ठिरानें मान्य केलें. तेव्हां दुर्योधनानें गदायुद्धाकरितां भीमाला पाचारण केलें. आणि हातांत गदा घेऊन तो सरोवराच्या बाहेर आला. युधिष्ठिर म्हणाला, "तुला आतां धर्मयुद्ध आठवलें.

संकटांत पडलेला मनुष्य धर्माच्या व न्यायाच्या गोष्टी बोलूं लागतो आणि चांगल्या स्थितींत असला म्हणजे त्याला स्वर्गाचीहि आठवण रहात नाहीं. तथापि तुझें म्हणणें मान्य आहे. तूं एकट्या भीमाशीं युद्ध कर." तेव्हां ते दोघे वीर लढूं लागणार इतक्यांत बळराम आपल्या यात्रा संपवून त्या ठिकाणीं आले. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, "पहा हें भावांभावांचें युद्ध! दोघांनींहि युद्ध-कौशल्याची व वीरश्रीची शर्थ केली. निकाल लागेना. तेव्हां कृष्णाच्या लक्षांत आलें कीं, भीमसेन केवळ धर्मयुद्ध करीत राहील तर भीमाला यश कसें मिळणार? तेव्हां अर्जुनाला हें आठवलें कीं, दुर्योधनाचें मरण डाव्या मांडींत आहे. म्हणून त्यानें भीमाला खूण करून आपल्या डाव्या मांडीवर थाप मारली. ती खूण ओळखून भीमानें गदा फेकून दुर्योधनाच्या दोन्ही मांड्या मोडल्या. आणि दुर्योधन जखमी होऊन जमिनीवर पडला. तेव्हां युधिष्ठिर दुर्योधना-जवळ जाऊन म्हणाला, "आतां दुःख करूं नको. हें असें व्हावयाचेंच होतें." इतक्यांत भीमानें दुर्योधनाच्या मस्तकावर लाथ मारली. हें पाहून आणि भीमानें मांडीवर गदा मारून अधर्म युद्ध केलें हें लक्षांत येऊन बळरामाला अतिशय राग आला व तो आपल्या हातांतील नांगर उचलून भीमावर धांवला; तेव्हां कृष्ण पुढें झाला व त्यानें बळरामाला आपल्या बाहूंत धरून ठेविलें; आणि म्हणाला, "दादा, यांत अधर्म कांहीं झाला नाहीं. तुझ्या मांड्या मोडीन अशी भीमानें प्रतिज्ञाच केली होती तेव्हां ती प्रतिज्ञा त्यानें पुरी केली यांत काय चुकलें? प्रतिज्ञा पुरी करणें हें क्षत्रियांचें कामच आहे. शिवाय मैत्रेय ऋषीनें तसा शापच दुर्योधनाला दिला होता. शिवाय कौरव आणि पांडव आम्हांला सारखेच नव्हेत काय? तेव्हां त्यांतील एकानें एकाला मारलें तर आम्हीं कोणाचें अभिनंदन करूं नये किंवा कोणाचा शोकही करूं नये. आणखी असें कीं, अहो, आतां कलियुग प्राप्त झालें. द्वापारयुग संपलें." तें ऐकून बळराम म्हणाला, "ठाऊक आहे तुझा वितंडवाद! तूं माझ्याशीं असाच नेहमीं कुशल युक्तिवाद करून घोटाळा घालतोस." असें म्हणून बळराम खिन्न होऊन द्वारकेकडे निघून गेला. युधिष्ठिरानेंहि या वेळीं आपलें धर्मयुद्धाचें चऱ्हाट आवरतें घेतलें. आणि तो तत्वज्ञानी वेदांती माणसासारखें म्हणाला, "ठीक आहे. दुर्योधन मेला. आतां त्याच्या बरोबर आपल्या वैराचाहि अंत झाला. श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें आपण वागलों त्यामुळें आम्ही पृथ्वी जिंकली

आणि भीमसेना, तूंहि कुंती व द्रौपदी यांच्या ऋणांतुन मुक्त झालास, म्हणून मी आपला धर्माधर्माचा विवेक आवरता घेतों.''

## दुर्योधनावर पुष्पवृष्टि

दुर्योधन पडला असें पाहून पांडवांच्या बाजूचे लोक आनंदानें बेशुद्ध झाले व वाटेल तसें बडबडूं लागले. तेव्हां कृष्ण म्हणाला, ''शरीरानें मेला त्याला आणखी शब्दांनीं काय मारावयाचें. तर आतां याला येथेंच टाकून आपण शिबिराला जाऊं.'' हें ऐकून दुर्योधनानें कोंपरावरून वर मान करून श्रीकृष्णाकडे वाकडया मानेनें रागानें पाहिलें आणि तो म्हणाला, ''हे गवळयाच्या पोरा, कपटबुद्धि हाच तुझा पराक्रम. तूं क्षत्रिय नाहींस.'' तेव्हां कृष्णानें दुर्योधनाच्या कपटाचा ''पाडा घडघड म्हणून दाखविला. तेव्हां दुर्योधनाचें तोंड बंद झालें. मात्र तो अजूनहि मानी स्वभावाचा असल्यामुळें अहंकारानें म्हणाला, ''आम्ही स्वर्गाला जाणार. तुम्ही मागें उरला ते खुशाल रडत बसा, आणि डोळयाच्या पाण्यांत भिजवून राज्याचा घांस खा. स्वर्गांतील देवदेवतांना व अप्सरांना दुर्योधनाच्या या मानी स्वभावामुळें मोठें कौतुक वाटून त्यांनीं त्याच्या वर पुष्पवृष्टी केली. तें पाहून कौरव व पांडव यांना आश्चर्य वाटलें. कृष्ण मनांत म्हणाला, ''पृथ्वीवर शत्रूला कसें वागवावें लागतें हें आभाळांतल्या या लोकांना काय माहीत!''

नंतर पांडव निघून रिकाम्या पडलेल्यां दुर्योधनाच्या गोटांत पोचले. आणि कृष्ण व अर्जुन रथाखालीं उतरले. तेव्हां चमत्कार असा झाला कीं, हनुमान गुप्त झाला व रथ आपोआप पेटून दग्ध झाला. तेव्हां अर्जुन म्हणाला, '' देवा हें काय झालें?'' श्रीकृष्ण म्हणाला ''अनेक दिव्य अस्त्रें शत्रूनें फेंकली त्यानें हा रथ पूर्वींच जळून गेला होता. मी रथावर बसलों होतों म्हणून इतका वेळ तो तसाच राहिला. पण रथ जळाला हें दुश्चिन्ह नव्हे. त्याचा अर्थ चांगला म्हणजे असा आहे कीं, तूं व मी आतां कृतकृत्य झालों. रथाचें आतां कांहींच काम उरलें नाहीं.'' मग पांडवांनीं शिबिरांत शिरून तेथील द्रव्य व मौल्यवान वस्तू स्वाधीन करून घेतल्या आणि तेथें रक्षक ठेवून पवित्र नदीवर जाऊन राहिले. सकाळीं प्रश्न उपस्थित झाला कीं, दुर्योधनासह कौरव मारल्यावर आतां आम्ही पांडवांनीं दुःखी

धृतराष्ट्राला व गांधारीला कोणत्या तोंडानें भेटावें? भेटलों तर दुःखानें मरतील किंवा रागानें शाप देऊन आम्हाला दग्ध करून टाकतील. म्हणून प्रथम कृष्णानें त्यांना भेटावें असें ठरलें. त्याप्रमाणें कृष्ण रथावर बसून हस्तिनापुरास गेला. आणि धृतराष्ट्रांस वंदन करून म्हणाला, "आतां झाल्या गोष्टी विसरून जा. गेले ते पांडव, उरले ते कौरव अशा कृपादृष्टीनें पांडवांकडे पहा. धर्मराज हा तुम्हां दोघांना फार मान देतो व तो तुमच्या आज्ञेंत वागतो, व तुमच्या आज्ञेत राहील. झाल्या गोष्टीचें धर्मराजांस इतकें वाईट वाटत आहे कीं तो लाजेनें तुमच्याकडे येऊन भेटण्याचेंहि धैर्य त्याला होत नाहीं. म्हणून मीच आलों." नंतर गांधारीकडे जाऊन तिच्याशींहि तो असेंच प्रेमळपणानें बोलला. शेवटीं तो म्हणाला, "मला आतां अधिक येथें राहतां येत नाहीं कारण अश्वत्थामा तिकडे कांहीं भलतेंसलतें करील." तेव्हां, 'कृष्णा, तूं परत जाऊन पांडवांचें रक्षण कर. असें धृतराष्ट्र व गांधारी यांनीं म्हटलें व त्याला निरोप दिला.

## पांडव-आप्तवध

इकडे दुर्योधन दुःखानें व शरीरवेदनेनें अतिशय व्याकूळ झाला. इतक्यांत कृतवर्मा, कृपाचार्य व अश्वत्थामा दुर्योधनाचा शोध करीत तेथें येऊन पोहोंचले. दुःखाचीं व समाधानाचीं बोलणीं झालीं. मग अश्वत्थामा म्हणाला, "यापुढें युद्ध चालविण्याची आज्ञा दे." तें ऐकून दुर्योधनानें मान्य केलें. अश्वत्थाम्याला सेनापतीचा अभिषेक कृपाचार्यांच्या हस्तें करण्यांत आला. मग दुर्योधनाला तेथेंच सोडून ते तिघे परतले; आणि आपण पांडवांच्या हातीं सांपडूं या भितीमुळें अरण्यांत शिरले. तेथेंच त्यांना रात्र झाली. मग खाणें पिणें कुठचें? त्यांनीं फक्त संध्या-वंदन केलें आणि झोंप आल्यामुळें ते जमिनीवर आडवे झाले. ते ज्या झाडाखालीं निजले होते तो एक प्रचंड वडाचा वृक्ष असून त्याच्या फांद्याफांद्यावरून कावळे रात्रींच्या वस्तीकरितां राहिले होते. इतक्यांत प्रचंड व उग्र असें एक घुबड तिकडे आलेलें त्या तिघांना दिसलें. त्याचे डोळे चकचकीत हिरवे असून चोंच व नखें लाल होतीं. गरुडा-

सारखा खोल व भयंकर आवाज तें काढीत होतें. तेव्हां हा काय प्रकार आहे तें ते तिघे कौतुकानें डोळे उघडून पाहूं लागले. तेव्हां त्यांना असें दिसलें कीं घुबडानें आवाज मऊ करून त्या वटवृक्षाची प्रार्थना केली आणि मग खांद्याखांद्यावर जाऊन अनेक कावळ्यांचा संहार केला. कोणाचे पंख उपटले आणि कोणाचीं मुंडकीं तोडलीं. तिघांच्या आसपास मेलेल्या कावळ्यांचा खचच पडला. तें पाहून अश्वत्थाम्याला दुष्ट कल्पना सुचली. ती अशी कीं, अशा रात्रींत पांडवांच्या शिबिरावर जाऊन निजलेल्या लोकांवर असाच छापा घालून त्यांचा प्राण घ्यावा. म्हणजे चांगला सूड निघेल. मग त्यानें कृतवर्मा व कृपाचार्य यांना जागें करून तो बेत सांगितला. कृपाचार्य म्हणाला, ' पण हें मला वरें दिसत नाहीं. आपण जाऊन शहाण्या विदुराला सल्ला विचारूं. ' पण अश्वत्थाम्यानें त्याला मोडून काढलें. तेव्हां कृपाचार्यानें आपली संमति दाखविली व म्हणाला, ' आज रात्रा तूं विश्रांती घे. उद्यां स्वस्थपणें ही तुझी कल्पना तडीस ने. आम्ही तुझ्याबरोबर येऊन तुला साहय करूं. ' परंतु अश्वत्थाम्याला तेंहि खपलें नाहीं. तो म्हणाला, 'आतां विश्रांति कसली ! मी तर आजच्या आज पांडवशिबिरावर छापा घालणार. मग त्यांत अन्याय असेल तर असूं दे.' असें बोलून तो रथ जोडून निघालाहि. तेव्हां कृप आणि कृतवर्मा हेहि निघाले. पांडवांच्या शिबिराला पोंचले तेव्हां त्याच्या तोंडीं एक प्रचंड भयंकर भूत रखवाली करीत असलेलें दिसलें. तें आपल्या वेताच्या आड येतें असें पाहून अश्वत्थाम्यानें त्या भूतावर बाण सोडले पण ते त्यानें आ पसरून गिळून टाकले. तेव्हां हें भूत नसून ती कोणी देवता असावी, असें समजून अश्वत्थाम्यानें श्रीशंकराचें स्तवन केलें. तेव्हां शंकराचे गण व दूत अश्वत्थाम्यापाशीं आले. त्यांना पाहून अश्वत्थामा म्हणाला, ' हे देवते, तुला संतुष्ट करण्याकरितां मी आपला देह बळी देतों त्याचा स्वीकार कर.' तेव्हां शंकर संतुष्ट झाला व त्यानें अश्वत्थाम्याला दिव्य खड्ग दिलें. तें घेऊन तो शिबिराच्या द्वारांत शिरला, आणि कृप व कृतवर्मा यांना म्हणाला, ' आंत जाऊन संहाराचें कार्य काय करावयाचें तें मी करतों. तुम्ही इतकेंच करा कीं, आंतून जीव घेऊन पळून जाण्याकरितां दाराशीं येतील त्यांना तुम्ही

मारून टाका.' अश्वत्थामा आंत गेला. तों धृष्टद्युम्न तेथें निजला होता. तेव्हां त्याला अश्वत्थाम्यानें लाथ मारून जागें केलें, त्याचे केंस ओढून जमिनीवर पाडलें, व बुक्या मारून त्याचा जनावरासारखा जीव घेतला. मग तेथून बाहेर पडून दुसऱ्या बाजूनें आंत शिरून निज-लेल्या लोकांवर हत्यार चालविलें. त्यांत कोणी कांहीं प्रतिकार केला पण कांहीं झोंपेच्या गुंगींत प्रतिकार न करतां मारले गेले. पुष्कळांना वाटलें कीं, कोणी राक्षस किंवा यमदूत शिबिरांत शिरला आहे. आणि जे पळून गेले त्यांना कृप व कृतवर्मा हे शिबिराच्या तोंडाशीं मारीत. मग या दोघांनीं शिबिराला आगी लाविल्या. मग त्या प्रकाशांत अश्वत्थाम्याला अधिक संहार करायला आयतेंच सांपडलें. शेवटीं संहार पुरेसा करून अश्वत्थाम्यानें त्या दोघांना गांठून आनंदानें सांगितलें कीं, मीं धृष्टद्युम्न, द्रौपदीचे मुलगे, पांचाळ, सोमक हे सर्व ठार मारले, तरी ही आनंदाची बातमी दुर्योधनाकडे जाऊन त्याला कळवूं. त्याप्रमाणें त्यांनीं ती बातमी दुर्योधनाकडे जाऊन सांगितली. मरतां मरतां दुर्योधनाला फार आनंद झाला. अशा रीतीनें शेवटीं पांडवांकडचे सात, कौरवांकडचे तीन, असे शिल्लक राहिले. ते सात म्हणजे पांच पांडव, श्रीकृष्ण, सात्यकी; कौरवांकडचे तीन म्हणजे अश्वत्थामा, कृपाचार्य, कृतवर्मा एवढेंच. दुसरे दिवशीं सकाळीं धृष्टद्युम्नाच्या सारथ्यानें झालेला सर्व प्रकार व संहार धर्मराजाला कळविला आणि सांगितलें कीं शिबिरांत चाललेली गडबड दूर सैन्यांत एवढ्या मोठ्यानें ऐकूं आली कीं, जवळच्या एकाद्या अरण्यांत कुऱ्हाडींनीं कोणी झाडें तोडताहेत कीं काय असें भासलें. तें ऐकून युधिष्ठिरानें फार शोक केला. तो म्हणाला, 'जयानंतर झालेला हा दारूण प्रसंग अधिकच दुःख देतो. युद्धाच्या शेवटीं सर्व कार्यभाग साधला असें वाटलें पण मागोमाग एवढा अनर्थ दैवानें राखून ठेविला होता. या अनर्थानें युद्धांत मिळालेला जय हा पराजयच ठरतो.' मग नकुलाला धर्म म्हणाला कीं, 'तूं जाऊन द्रौपदीला व इतर स्त्रियांना घेऊन शिबिराकडे ये.' आणि त्या येण्याच्या आधीं स्वतः शिबिरांत गेला. पहातो तों तेथें मुलगे व मित्रमंडळी हीं मरून पडलीं होतीं. आणि त्यांच्या भोंवतीं

राक्षस पिशाचादिकांचा घोळका जमला होता. थोड्या वेळानें द्रौपदी-सह इतर पांडव स्त्रिया त्या ठिकाणीं आल्या. त्यांनीं तो प्रकार पहातांच स्वतःला धरणीवर घालून घेतलें. त्यांचीं अंगें थरथरूं लागलीं. देहभान नाहींसें झालें. द्रौपदी तर दुःखानें वेडी झाली. आपण काय बोलतों हें तिचें तिला कळेना. उपरोधिक शब्दांनीं ती म्हणाली, "मुलगे रणांत पडून आम्ही आतां राज्य भोगण्याला मागें उरलों हें आमचें केवढें सुदेव!' मग शुद्धीवर येऊन ती म्हणाली, 'या कृत्याचा सूड तुम्ही न घ्याल तर मी प्राण देईन. अश्वत्थाम्याच्या मस्तकांत एक दिव्य मणि आहे असें म्हणतात. त्याला मारून तुम्ही कोणी तो मणि मला आणून दाखवाल तर खरें!' हे शब्द ती विशेषतः भीमाला उद्देशून म्हणाली. तेव्हां नकुलाला रथावर सारथ्याचे जागीं बसवून भीम वेगानें निघाला. युधिष्ठिराचें सांत्वन करण्याकरितां म्हणून अश्वत्थाम्याला मिळालेल्या एका अस्त्राची कथा कृष्णानें त्याला सांगितली, आणि म्हणाला, "तो मूर्ख अश्वत्थामा तें अस्त्र मला देऊन त्याच्या बदलीं माझें सुदर्शनचक्रच मागूं लागला. पण त्यावेळीं तो आपला बाप द्रोणाचार्य यांच्या निंदेनें उदास होऊन पृथ्वीवर भटकत असतां द्वारकेस येऊन राहिला होता; म्हणून मी अधिक न बोलतां त्याला म्हणालों, 'ठीक आहे. तूं मला अस्त्र तरी कशाला देतोस? माझीं आयुधें हीं येथें आहेत. त्यांतून वाटेल तें खुशाल घे.' तेव्हां त्यानें सहस्रधारांचें वज्रनाभ चक्र मागितलें. पण तें त्याला जागचें उचलेना म्हणून तो खजिल झाला." पण अश्वत्थाम्या-जवळ आधींच असलेल्या ब्रह्मशिर नांवाच्या अस्त्राची आठवण होऊन कृष्ण म्हणाला, 'त्या अस्त्राचा आपणाला आधीं निकाल लाविला पाहिजे.' म्हणून कृष्ण धर्म, व अर्जुन या दोघांना बरोबर रथावर घेऊन अश्वत्थाम्याच्या शोधाला निघाला. भीमाच्या मागोमाग हे तिघे भागीरथीच्या तीरीं गेले. तेव्हां तुपानें माखलेला, अंगावर दर्भ धारण केलेला, आणि अंगाला चिखल फांसलेला असा तो त्यांना दिसला. ते पाहतांच अर्जुनानें धनुष्याला बाण लाविला. अश्वत्थाम्यानेंहि आपणा-जवळच्या अस्त्राचें अभिमंत्रण केलें, तेव्हां त्यांतून अग्नि प्रगट झाला. तेव्हां कृष्ण घाईनें अर्जुनाला म्हणाला, 'अर्जुना, आतां तुझ्याजवळचें

अस्त्र तूं सोडल्याशिवाय निभाव नाहीं.' या दोन अस्त्रांचें युद्ध जुंपलें तेव्हां आतां पृथ्वी नाश पावणार कीं काय असें वाटूं लागलें. जिकडे तिकडे आगच पेटली. तेव्हां पृथ्वीचें रक्षण व्हावें या हेतूनें नारद व व्यास मुनी प्रगट होऊन ते त्या दोन अस्त्रांच्या मध्यभागीं येऊन उभे राहिले. आणि म्हणाले, हे 'वीरांनो, तुमच्या या कृत्यानें सगळया पृथ्वीचा नाश होऊं घातला आहे तें तुम्हाला कसें कळूं नये?' अर्जुन म्हणाला 'असें घडलें खरें पण तुम्ही सांगाल तर माझें अस्त्र मी परत घेईन.' व तसें त्यानें केलेंहि. पण अश्वत्थाम्याला आपलें अस्त्र मागें घेतां येईना. तो म्हणाला, 'मी अविचार केला खरा. पण तो पांडवांच्या वधा-करितां असल्यामुळें पांडवांपैकीं कोणाचा तरी वध झाल्याशिवाय तें परत फिरणार नाहीं. म्हणून मी अविचाराचें प्रायश्चित्त म्हणून माझ्या मस्तकांतील मणी काढून देतों. पण माझें अस्त्र पांच पांडवांचा नसला तरी त्यांच्या एखाद्या स्त्रीच्या गर्भाचा तरी नाश केल्याशिवाय शांत होणार नाहीं.' त्या प्रमाणें विराटाची मुलगी, अर्जुनाची सून, व अभिमन्यूची स्त्री उत्तरा इच्या पोटीं जो मुलगा गर्भावस्थेंत होता त्याचा नाश त्या अस्त्रानें केला. उत्तरेवर ही केवढी आपत्ती! कारण नवरा अभिमन्यू युद्धांत पडला आणि पुढें मुलगा होईल, ही तरी आशा होती तीहि या अस्त्रानें घालविली. तेव्हां तिच्या दुःखाचें काय वर्णन करावें! परंतु कृष्णानें असा आशिर्वाद दिला कीं, तूं "आपलें काम केलेंस; परंतु उत्तरेच्या गर्भांतील मुलगा मृतावस्थेंत बाहेर येईल; परंतु माझ्या आशिर्वादानें लगेच जिवंत होईल. आणि पुढें पांडवांची वंश-वृद्धि करून परिक्षिती या नांवानें जगांत कीर्ति संपादील. आणि अश्व-त्थाम्या, तूं मात्र या जगांत तीन हजार वर्षें जिवंत राहाशील पण तुझ्या नशिबीं नित्य अरण्यवास व परिभ्रमण हीं येतील! संभाळ!" नंतर अश्वत्था-म्यानें आपल्या डोक्यांतील मणी काढून अर्जुनाजवळ दिला. तो घेऊन ते सर्व द्रौपदीकडे आले व त्यांनीं तो तिला अर्पण केला. आणि म्हणाले कीं, 'अश्वत्थामा हा ब्राह्मण पडला म्हणूनच आम्ही त्याला जिवंत सोडला.' मग द्रौपदीचें समाधान झालें व तिनें तो मणि धर्मराजाला अर्पण केला. इकडे धृतराष्ट्रहि असाच शोक करीत बसला होता. त्याला संजय

म्हणाला, 'बावा, आतां शोक करून काय उपयोग? चित्ताचा निरोध धैर्यानें कर.' व्यासानेंहि तसाच उपदेश केला. नंतर धृतराष्ट्रानें संजयाच्या सूचनेवरून युद्धांत पडलेल्या लहानथोर कौरवांचें उत्तरकार्य करण्याचें योजिलें. रथ जोडून आणवून तो निघाला. पाठोपाठ गांधारी व इतर भरतस्त्रिया यांना भागीरथीच्या तीरीं आणण्याविषयीं त्यानें सांगितलें. आणि आतां आपली ही शेवटचीच भेट असें समजून कृतवर्मा, व कृपाचार्य हें धृतराष्ट्राचा निरोप घेऊन आपापल्या मार्गानें गेले. पुढें त्यांचा बेत काय होता हें कळलें नाहीं. कृपाचार्य हस्तिनापुराकडे गेला. कृतवर्मा आपल्या राजधानीकडे गेला आणि अश्वत्थामा व्यासांच्या आश्रमाकडे गेला. धृतराष्ट्र हस्तिनापुरांतून निघून गेल्याचें कळल्यावर युधिष्ठिर, कृष्ण इत्यादि मंडळी द्रौपदीसह त्याच्या भेटीला निघाली. युधिष्ठिरानें गर्दींतून वाट काढून धृतराष्ट्राला प्रणाम केला. इतर पांडवांनींहि तसेंच केलें. पैकीं युधिष्ठिराला धृतराष्ट्रानें आलिंगन दिलें. पण त्या-नंतर भीमाची पाळी आली; तेव्हां श्रीकृष्णाला असें दिसून आलें कीं, धृतराष्ट्राच्या अंतःकरणांत भीमाविषयींचें वैर अग्नीप्रमाणें एकदम प्रज्वलित झालें असून तें त्याच्या चर्येवरहि दिसून येत आहे. म्हणून भीम आलिंगन देण्याघेण्याकरितां पुढें होणार तोंच कृष्णानें त्याला मागें ओढलें आणि भीमाचा लोखंडी पुतळा पुढें केला. तेव्हां कृष्णाची कल्पना खरी ठरली. कारण धृतराष्ट्रानें त्या पुतळ्याला इतक्या त्वेषानें कडकडून आलिंगन दिलें कीं त्या पुतळ्याचा तर चूरा झालाच पण स्वतः धृत-राष्ट्राची छाती फुटून त्याच्या तोंडांतून रक्त वाहूं लागलें. पण 'अरेरे, भीम मेला.' असें कोणी म्हणतांच धृतराष्टाची वृत्ती बदलली. त्याला पश्चात्ताप झाला व तोहि 'अरेरे !' असें म्हणाला. तेव्हां कृष्णानें पुढें होऊन खरा प्रकार सांगितला व धृतराष्ट्राचा दुष्ट हेतु त्याच्या पदरीं बांधला. मग धृतराष्ट्रानें इतर पांडवांना आलिंगन दिलें. तेव्हां कृष्ण म्हणाला, 'तूं आतां मनांतील राग व दुःख सोडून दे आणि पांडव हे जसे कांहीं तुझेच पुत्र आहेत अशा भावनेनें त्यांच्याकडे पहा.' मग सर्व मंडळी गांधारीकडे गेली. तीहि अशीच दुःखविलाप करीत होती. तिनें पांडवांना पुष्कळ दोष दिला. त्याला भीमसेनानें मोठ्या नम्रपणानें

पण प्रांजलपणें उत्तर दिलें. तो म्हणाला, 'आमचें मर्म तूं काढलेंस पण तुझ्या मुलांनीं आमचा छळ कसा केला हें मात्र तुला न समजावें काय?' पण त्यानें एक खुलासा मात्र मुद्दाम केला. तो म्हणाला, मी 'दुःशासनाचें रक्त प्यालों असा माझ्यावर अपवाद आहे पण तो खोटा. मी त्याचें रक्त कसें पिईन? त्याच्या रक्तानें भरलेले हात माझ्या तोंडाला लागले एवढीच गोष्ट खरी. शेवटीं गांधारीचें कसें तरी समाधान झालें. मग ती मंडळी तेथून कुंतीकडे गेली. तेथें द्रौपदीनें पुढाकार घेऊन आपल्या सासूचें सांत्वन केलें. गांधारी, कुंती, द्रौपदी सगळयाच समदुःखी. पण त्या सर्वांना एकमेकींबद्दल प्रेम असल्यामुळें प्रत्येकजण आपलें दुःख विसरून दुसरीचें सांत्वन करीत होती. मग गांधारीनें स्वतः जाऊन एकदां सर्व रणांगण पाहिलें. आणि कर्ण, भीष्म, द्रोण, अभिमन्यु, द्रुपद, शल्य, अशा वीरांची सरमिसळ प्रेतें पाहून आणि विशेषतः पशुपक्ष्यांकडून होणारी त्यांची दुर्दशा पाहून तिनें दुःखानें आपले डोळे झांकले. मग दुःख अनावर होऊन तिच्या तोंडून कृष्णाला उद्देशून शाप निघाला. ती म्हणाली, 'कौरव-पांडव मूर्ख ठरले. तूं तरी शहाणा होतास ना! तुझ्या शब्दाला त्यांनीं मान दिला असता. पण तूं आपलें सर्व बल खर्च केलें नाहींस. तेव्हां तूंहि असाच अनाथासारखा होऊन वनांत संचार करीत असतां निंद्य मार्गानें मृत्यु पावशील.' श्रीकृष्ण हंसून म्हणाला, 'देवी, तूं हें मला कशाल सांगायला हवेंस? तें मी अंतर्ज्ञानानें ओळखलेंच आहे.' नंतर धृतराष्ट्रानें विचारल्यावरून मेलेल्या वीरांपैकीं कोण कोणत्या लोकाला गेले हें युधिष्ठिरानें अंतर्ज्ञानानें सांगितलें. हें अंतर्ज्ञान त्याला लोमश मुनीकडून प्राप्त झालें होतें. नंतर धृतराष्ट्रानें आपले पुरोहित, संजय, विदुर इत्यादि लोकांना मृतांच्या प्रेतांना अग्नि देण्याची तयारी करण्याला सांगितलें. तेव्हां हातीं मिळेल तें लाकडी सामान वगैरे घेऊन त्यांची चिता रचून त्यांच्यावर तूप ओतून त्यावर प्रेतें ठेवून त्या चिता पेटविण्यांत आल्या. व त्या धडधडत असतां कोणी पितृयज्ञ केले, कोणी मृतांच्या आत्म्यांना सद्गति मिळावी म्हणून सामवेदाचें पठण चालविलें. पण या सर्वांवरहि ऐकूं येणारे स्त्रियांचे करूण विलाप ऐकणारांचीं मनें अत्यंत दुःखपूर्ण करीत होते. नंतर गंगेच्या काठीं गेल्यावर सर्वांनीं आपापल्या

अंगावरील वस्त्रें, दागिने इ० उतरून ठेविले आणि मृतांना उदकदान केलें. कुंतीला आपल्या समोर पांच पांडव जिवंत दिसत होते; पण त्यांचा एक भाऊ व आपला मुलगा कर्ण याची मात्र तिला यावेळीं विशेष आठवण होऊन दुःख झालें व तिनें त्याला आपल्या हातानें उदक दिलें. युधिष्ठिरानेंहि मग त्याची उत्तरक्रिया केली. शेवटीं सर्वांनीं स्नानें केलीं व ते सर्व पुरुष व स्त्रिया हस्तिनापुराला परत आल्या.

## मृतांचें श्राद्ध

अशा प्रकारें मृतांच्या उत्तरक्रिया समाप्त झाल्या तरी हीं सर्व मंडळी एकदम नगरांत परत गेलीं नाहींत. त्यांनीं मनानें हें सुतक लांबविलें आणि युद्धांत आपल्या हातून जे कांहीं दोष झाले असतील त्यांचें प्रायश्चित्त वनवासानें घ्यावें ह्या हेतूनें ते नगराबाहेर एक महिनाभर राहिले. या ठिकाणीं जवळचे व दूरचे व्यास, नारद इत्यादि मुनी व विद्वान ब्राह्मण त्यांना भेटून जात. हेतु हा कीं कांहीं शास्त्राचे, धर्मज्ञानाचे, इतिहासाचे विषय संभाषणांत निघतील आणि त्यामुळें झालेल्या दुःखकारक गोष्टींचें विस्मरण होऊन या दुःखपीडित लोकांना मनाची शांती लाभेल. तथापि युधिष्ठिराला कांहीं केल्या शांती मिळना. भेटीस येणाऱ्या लोकांनीं वेगळे विषय काढले तरी युधिष्ठिर हा मूळ-पदांवर येई, रडे, शोक करी. यामुळें मुनि व ब्राह्मण हे निराश व कष्टी होत. शेवटीं तर युधिष्ठिरानें असें बोलून दाखविलें कीं, ‘ सर्व पातकांचें सर्व प्रायश्चित्त संन्यासानें होतें आणि संन्यासानें मोक्षहि मिळतो. म्हणून मी आतां वनवासांत राहून संन्यासधर्माचें आचरण करण्याचें योजिलें आहे.’ हें ऐकून चार पांडवांना व द्रौपदीला नुसतें वाईट वाटलें नाहीं तर अतिशय राग आला. अर्जुनानें पर्यायानें त्याला म्हटलें कीं, ‘ तूं खरा विचार करण्याला अपात्र आहेस. तुझ्यासारख्या दीर्घसूत्री मनुष्याला राज्य कसें लाभणार? इतकें श्रमसायास करून, दुःखें सोसून जय मिळविला ; त्याचें फळ जें राज्य तें आपणा सर्वांनीं भोगणें हें योग्य आहे.’ भीम म्हणाला, ‘ दादा, तूं नुसता एकाद्या वैदिकासारखा जडबुद्धीचा आहेस. तुझी बुद्धि नष्ट झाली आहे. तत्त्वाचें खरें ज्ञान तुला

होणें शक्य नाहीं. तुला हा संन्यासच शेवटीं घ्यावयाचा होता हें पूर्वी आम्हांस समजलें असतें तर आम्ही शस्त्र कां घेतों? विहीर खणून पाणी लागल्यावर ओंजळभर न पितां जाणारा हाच खरा मूर्ख नव्हे काय? आपणास मारण्याकरितां आलेल्या शत्रूस ठार करावें. आणि तो मेला म्हणजे आपणच आपला गळा चिरून घ्यावा! तूं वडील बंधु म्हणून आम्ही तुझें ऐकत आलों. पण मंदबुद्धीच्या वडीलभावाचें आम्ही किती ऐकणार? वनवासानें उत्तम गति मिळती तर पर्वत आणि वृक्ष उत्तम गति मिळविते.' द्रौपदी पतिव्रता खरी, पण तिनेंहि मागें पुढें न पाहतां युधिष्ठिराचा निषेध केला व ती त्याला टाकून बोलली. व्यासांनीं त्याला परोपरीनें उपदेश केला. इतके प्रयत्न झाल्यानंतर धर्माला किंचित मनःशांति मिळाली. त्याचें मन उत्तेजित करण्याकरितां व्यासांनीं 'अश्वमेध इत्यादि यज्ञ केल्यानें तुझें मन अधिक शांत होईल,' असें सांगून पाहिलें. तेव्हां युधिष्ठिरानें वनवासाला जाण्याचा खुळा हट्ट एकदाचा सोडला आणि मोठ्या थाटानें त्यानें हस्तिनापुरांत प्रवेश केला. युधिष्ठिराची ही रडवेपणाची खोड प्रसिद्ध असल्यामुळें दुर्योधनाच्या एका राक्षसमित्रानें पांडवांना अपाय करण्याचा एक प्रयत्न करून पाहिला. तो असा कीं, त्या चार्वाक राक्षसानें एका विद्वान ब्राह्मणाचें रूप घेतलें आणि भरसभेंत युधिष्ठिराला पापी, हत्या करणारा, खोटें बोलणारा अशीं दूषणें लावून उघडपणें निंदा केली. हेतु हा कीं, या निंदेनें एकदम उपरति होऊन त्याचें मन उलट खाईल आणि तो वनवासाला निघून जाईल. इतर ब्राह्मणांनीं हें कपट ओळखून एका क्षणकाऱ्यानें त्या राक्षसाचा वध केला.

## युधिष्ठिराला राज्याभिषेक

असो. मग कृष्ण व सात्यकी यांनीं पुढाकार घेऊन युधिष्ठिराला राज्याभिषेक करविला. मग पांडवांनींहि कृष्णाची पूजा केली. आतां कोठें त्याचें अंतःकरण प्रसन्न होऊन समाधानाचा व धन्यतेचा उद्गार त्याच्या तोंडून चुकून निघाला. भीमसेनाची युवराज म्हणून नेमणूक झाली. संजयाला कोशाध्यक्ष करण्यांत आलें. सैन्याला सर्व

प्रकारचें सामान पुरवून सज्ज ठेवण्याचा अधिकार दिला. अर्जुन अर्थातच सेनापति झाला. धौम्याची नेमणूक धर्मखात्यावर झाली. आणि विदुर आणि युयुत्सु यांना असें सांगण्यांत आलें कीं, धृतराष्ट्र दुःखी, कष्टी, व त्यांतूनहि अंध म्हणून तुम्ही त्याच्याजवळ सेवेला राहून त्याला हवें नको तें विचारावें, पुरवावें आणि त्याला प्रसन्न ठेवावें. राजवाड्यांतल्या मंदिरांची निरनिराळी वांटणी करून त्यांच्या सोईप्रमाणें एक एक देण्यांत आलें. मग कांहीं दानधर्मांचीं कृत्यें करण्यांत आलीं. सत्काराला योग्य अशा लोकांचे सत्कार करण्यांत आले. मग कृष्ण म्हणाला, 'हें सर्व झालें पण आतां शरपंजरी पडलेल्या भीष्माकडे जाऊं या. कारण लवकरच उत्तरायणाला सुरवात होऊन तो परलोकीं गमन करील. तो इच्छामरणी असल्याकारणानें त्यानें हें पूर्वींच ठरवून ठेविलें आहे.' युधिष्ठिराला व सर्वांना हें बोलणें पटून, रणांगणावर भीष्म अर्धवट समाधीच्या स्थितींत चिंतन करीत होता, तिकडे गेले. कृष्णाला पाहिल्यावर भीष्मानें पडल्या पडल्या त्याला नमस्कार केला. कृष्णानें भीष्माला कुशल प्रश्न विचारिले व म्हणाला, 'भीष्मा देवाहूनहि तुझी योग्यता मी अधिक समजतों. तर आतां शेवटचें एवढें कर कीं हा हळुवार मनाचा युधिष्ठिर शोकांत बुडून गेला आहे. तेव्हां त्याला मार्गावर आणण्याकरितां कांहीं उपदेश कर. आणि राजधर्म आणि संसार करण्याकडे त्याचें मन वळीव.' इतकें बोलून कृष्ण परत आपल्या मंदिराला गेला. दुसरे दिवशीं कृष्ण व युधिष्ठिर एकटेच रथांत बसून भीष्माकडे गेले आणि त्यांनीं एकहि सैनिक बरोबर घेतला नाहीं; कारण भीष्माला कांहीं खाजगी व गुप्त असें बोलावेसें वाटलें तर तें दुसरें कोणीं ऐकूं नये. नंतर भीष्मानें धर्मज्ञान इत्यादि अनेक विषयांवर युधिष्ठिराला उपदेश करून ज्ञान दिलें. भीष्म किंचित् थकला असें पाहून त्यांनीं घरीं परत जावें व फिरून दुसऱ्या दिवशीं परत येऊन भीष्मानें केलेला उपदेश श्रवण करावा असा क्रम सुरू झाला. एक दिवस भीष्मानें युधिष्ठिराला उद्देशून राजधर्म सांगितला. हेतु हा कीं, त्यानें अधिक प्रवृत्तिमार्गी व्हावें. अनेक दिवस असा क्रम चालल्यावर भीष्मानें आपल्या मरणाचा क्षण आला असें जाणून आपलें बोलणें थांबविलें तें पाहून

सर्व प्रेक्षक एकदम स्तब्ध झाले. मग व्यास भीष्माला म्हणाला, " आपण आतां सर्व मंडळींना घरोघर जाण्याची आज्ञा करावी." शेवटचा उपदेश म्हणून भीष्मानें युधिष्ठिराला असा केला कीं, आतां यापुढें तूं कोणत्याहि प्रकारें शोक करून मन कष्टी होऊं देऊं नकोस. भीष्म शरपंजरी पडल्यावर सुमारें एकदोन महिन्यांनीं उत्तरायणाला प्रारंभ झाला. तेव्हां युधिष्ठिर, पांडव, कौरव सर्व मंडळी भीष्माकडे गेली. भीष्म म्हणाला 'मी या शरपंजरीं पडलों तेव्हांपासून अठ्ठावन्न रात्रीं झाल्या. आतां माघ महिन्याचा शुक्लपक्ष असून चौथा सप्ताह सुरू आहे. तेव्हां आतां मला परलोकीं जाण्याविषयीं तुम्ही संमती द्या.' असें म्हणून भीष्मानें बोलणें थांबविलें व प्राणांचें निरोधन केलें. प्राणवायु मनासह वर वर आणल्यावर ते ब्रह्मरंध्राचा भेद करून अंतर्धान गेले. बाणावरचें ओझें नाहींसें झाल्यामुळें ते भराभर खालीं पडूं लागलें. भीष्माच्या मस्तकांतून एक ज्योती बाहेर पडली व ती आकाशांत गुप्त झाली. मग सर्वांनीं सुगंध काष्ठांची चिता तयार करविली. मग त्यावर भीष्माचें शरीर ठेविलें, त्यांवर वस्त्रें व पुष्पमाळा घातल्या. अनेक पुरुषांनीं त्या मृत देहावर छत्र्या धरल्या. चौऱ्या ढाळल्या. स्त्रियांनीं ताडाचें पंखे घेऊन वारा घातला. गायकांनीं सोमगीतें म्हटलीं. चितेला सर्वांनीं उलटी प्रदक्षणा घातली. आणि नदीवर तिलांजलीसह तर्पण केलें. इतक्यांत भीष्माची आई देवी भागीरथी उदकांतून वर आली; तिनें आपल्या पुत्राचें शील व पराक्रम आठवून मोठा शोक केला. तेव्हां कृष्णानें तिचें सांत्वन केलें. नंतर ती उदकांत प्रविष्ट झाली. आणि नदीची पूजा करून सर्व मंडळी घरीं परतली. हें सर्व नदीच्या पैलतीराला झालें. नदी उतरून अलीकडे आल्यावर व्यासानें युधिष्ठिराला अश्वमेध करण्याचा उपदेश केला. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला 'पण आतां मजजवळ एवढा यज्ञ करण्याला द्रव्य कोठें आहे. या युद्धानें पृथ्वीचा व प्रजेचा नाश झाला आहे. कित्येक राजपुत्रांचे बाप मृत्यु पावले आहेत, प्रजाहि दरिद्री झाली तेव्हां त्यांच्याकडून धन कसें उभारावें ?' तेव्हां व्यास म्हणाले, "पूर्वी हिमालयावर कांहीं यज्ञ झाले. त्यांत बरोबर नेतां येईना म्हणून

ब्राह्मणांनीं द्रव्य टाकून दिलें. तें गोळा करून आणलें तरी पुरें." तें ऐकून युधिष्ठिराला बरें वाटलें व हें द्रव्य कसें आणवावें या विषयीं अमात्याचा विचार घेतला. मग ते सर्व हिमालय पर्वतावर गेले. अनेक ऋषी मुनींनीं त्याला पर्वतांतील बिकट मार्ग दाखविले. तेव्हां व्यासांनीं सांगितल्याप्रमाणें अपार द्रव्य लाभलें. तें घेऊन पांडव हस्तिनापुरीं परत आले. मग कृष्णानें द्वारकेला जाण्याची तयारी केली. कृष्ण नेहमीं आपल्या जवळ राहावा अशी पांडवांची इच्छा असल्यामुळें कृष्णाला ते सोडीत नसत आणि द्वारकेला जाण्याकरितां त्यांची अनुज्ञा मिळविणें हें काम मोठें कठीण होऊन बसलें होतें. पण आतां इकडे येऊन पुष्कळ दिवस झाले म्हणून शेवटीं पांडवांनीं अनुज्ञा दिली व कृष्ण निघून गेला. हस्तिनापुराहून मारवाडांतून द्वारकेकडे येतांना उत्तंक नांवाचा तेजस्वी मुनी कृष्णाला भेटला. तो म्हणाला "अलीकडील वार्ता मला माहीत नाहीं. ऐकण्यांत माझे असें आलें कीं, कौरव पांडवांत बिघाड झाला आहे तूं दोघांचा आप्त म्हणून त्यांच्याकडे सलोखा करण्याकरितां तिकडे बहुधा गेला असशील." तेव्हां कृष्ण म्हणाला "सलोखा करावा व वैर नाहींसें करावें, म्हणून मी परत गेलों होतों परंतु कौरवांनीं माझें न ऐकल्यामुळें युद्ध होऊन सर्व कौरव मारले गेले." हें ऐकून उत्तंक रागावला आणि म्हणाला "तूं कपटानें पांडवांचा पक्षपात व कौरवांची उपेक्षा केली असावीस. मी तुला शाप देणार आहे." तेव्हां कृष्ण हांसून म्हणाला "असला अविचार तपस्व्याला योग्य नाहीं. तूं शाप देणार असलास तर देईनास बापडा. पण लक्षांत ठेव कीं, त्यांत माझें कांहीं वांकडें न होतां तुझीच तपश्चर्या वांया जाईल." शेवटीं उत्तंकाला विश्वरूप दर्शन दिलें. तें पाहून उत्तंक लीन झाला. तेव्हां कृष्ण म्हणाला "असो. आतां तुला एकादा वर पाहिजे तर माग, देतों." तेव्हां उत्तंकानें असा वर मागितला कीं या मारवाडी देशांत पाणी नाहीं यामुळें संचार कठीण होतो. तेव्हां इच्छा होईल त्या ठिकाणीं पाणी मिळावें असा वर दे. कृष्ण द्वारकेला गेला. तेव्हां रेवतक पर्वताचा उत्साह सुरू होता. तिकडे वसुदेव आदि यादव गेले

होते. कृष्णानें पर्वतावर जाऊन वसुदेवाची गांठ घेतली तेव्हां सहजच कृष्णाला युद्धाचा दुःखकारक वृत्तांत वसुदेवाला सांगावा लागला. तें ऐकून वसुदेवाला फार दुःख झालें. मग त्यानें युद्धांत पडलेल्या आपल्या आप्तांचें श्राद्ध केलें. त्यांत आपला नातू अभिमन्यू याचेंहि केलें. अभिमन्यूचा व उत्तरेचा मुलगा परिक्षिती हा मात्र आशेला अंकुर उरलेला आहे हें पाहून वसुदेवाला त्यांतल्या त्यांत समाधान झालें इतकेंच. या कामीं अश्वत्थाम्याच्या अस्त्रानें कोणतें संकट आलें होतें, मग आपण जाऊन काय केलें उत्तरेचें शांतवन करून परिक्षितीला पुन्हां जिवंत केलें इत्यादि सर्व वृत्तांत सांगितला.

## अश्वमेध यज्ञ

अश्वमेध यज्ञाकरितां हवें तितकें द्रव्य हिमालयावर मिळाल्यामुळें त्या यज्ञाची तयारी सुरू झाली. यज्ञदीक्षा घेण्याची वेळ आली तेव्हां धर्मराज युधिष्ठिर म्हणाला " श्रीकृष्णा तूंच ही यज्ञदीक्षा घे. कारण वास्तविक तूंच आपल्या पराक्रमानें, बुद्धीनें ही पृथ्वी जिंकली आहेस." तेव्हां कृष्ण म्हणाला, "तें कांहीं असलें तरी तुलाच आम्ही खरा राजा व वडील भाऊ मानतों. त्याअर्थी यज्ञदीक्षा घेण्याचा अधिकार तुझाच आहे." मग त्याप्रमाणें युधिष्ठिरानें दीक्षा घेतली. हवन करण्याला चांगला असा घोडा पाहून आणविला व त्याला यथाविधि पुजून आपल्या इच्छेप्रमाणें, लहरीप्रमाणें पृथ्वीवर हिंडण्याला पाठविण्याचें ठरलें. आणि त्याच्या संरक्षणार्थ वीरश्रेष्ठ अर्जुनानें जावें असेंहि ठरलें. घरीं यज्ञानिमित्त पाहुणे येतील त्यांच्या व्यवस्थेचें काम सहदेवाला, आणि नगर रक्षणाचें काम भीम व नकुल यांना देण्यांत आलें. सुमुहूर्तावर पशुवध करून युधिष्ठिरानें दीक्षा घेतली. त्यावेळीं ती दीक्षा घेणारा युधिष्ठिर व दीक्षा देणारा ऋत्विज यांच्या अंगावर विशेष प्रकारची कांती चमकूं लागली. पुढें अश्व, मागें अर्जुन असें संचाराला निघाले तेव्हां नगरवासी लोकांची मोठी गर्दी त्यांना पाहाण्याला झाली. धर्म निरोप देतांना अर्जुनाला म्हणाला, " तूं दिग्विजय करण्याला निघालास हें ठीकच आहे. परंतु होतांहोईतों प्रत्यक्ष लढाई न करावी लागेल असें पहा. करावीच लागली तर उपाय नाहीं. आणि जाशील तेथें ज राजे तूं जिंकशील किंवा मित्रत्वाच्या नात्यानें जोडशील त्यांना यज्ञाला येण्याचें निमंत्रण कर."

यज्ञाचा घोडा निघाला तो प्रथम त्रिगर्त राजाच्या राज्यांत गेला. या त्रिगर्ताशीं अर्जुनाचें युद्ध पूर्वी अज्ञातवासांतून बाहेर पडतांना झालेंच होतें. त्या त्रिगर्तांचे मुलगे व नातू हे तेजस्वी असल्यामुळें त्यांनीं तो घोडा धरून युद्धाला आव्हान दिलें. पण या युद्धांत त्रिगर्त देशाचा राजा सूर्यवर्मा, त्याचा भाऊ केतुवर्मा, महारथी धृतवर्मा यांचा अर्जुनानें पराभव केला. तथापि स्वतः अर्जुनालाहि या युद्धांत हातांतून धनुष्य पडण्याइतकी एक वेळ जखम झाली. नंतर प्राग्ज्योतिषाचें राज्यांत घोडा शिरला. तेथेंहि युद्ध होऊन भगदत्ताचा मुलगा वज्रदत्त याचा पराभव अर्जुनानें केला. मग कौरवांच्या बाजूनें लढलेले कांहीं सैंधव वीर, त्या युद्धांत मेलेल्यांचे मुलगे यांचें व अर्जुनाचें युद्ध झालें. त्यांत सैंधवांचा पराभव झाला. या युद्धांत कौरवांची बहीण दुःशीला ही पुढें आली व तिनें आपल्या हातांतील नातू पुढें करून दयेची याचना केली. तेव्हां अर्जुनानें तिला अभय दिलें. आणि जयद्रथाच्या वधाबद्दल दुःख प्रकट केलें. मग त्या घोडयामागून अर्जुन मणिपूरच्या राज्यांत शिरला. त्या ठिकाणीं असलेला राजा बभ्रुवाहन हा वास्तविक अर्जुनाचा मुलगाच होता. कारण पूर्वीच्या दिग्विजयांत अर्जुन इकडे आला त्यावेळीं ज्या चित्रांगदेशीं त्यानें विवाह केला तिच्या पोटींच हा जन्माला आला होता. आणि आतां आपला बापच येऊन पोंचला हें पाहून बभ्रुवाहन अर्जुनाकडे नम्रपणें हात जोडून गेला. पण हें कृत्य क्षत्रिय वीराला शोभत नाहीं असें म्हणून अर्जुनाला त्याचा धिःक्कार करण्याची बुद्धि झाली. तेव्हां चित्रांगदेची सवत नागकन्या उलूपी ही पाताळांतून वर येऊन तिनें बभ्रुवाहानाचा निषेध करून अर्जुनाशीं युद्ध करणें हें यावेळीं धर्माचरण होय असें म्हणून त्याला युद्धाला प्रवृत्त केलें. तेव्हां बभ्रुवाहन धनुष्य घेऊन अर्जुनाशीं लढू लागला. कांहीं वेळ बाणांनीं लढाई झाल्यावर एकमेकांच्या बाणांनीं तें दोघेहि जखमी व मूर्च्छित होऊन पडले. हें वृत्त ऐकून चित्रांगदा रणभूमीवर आली, उलूपी तेथें जवळच होती. तिला पाहून म्हणाली, "तुझ्यामुळें माझा मुलगा युद्धाला उभा राहिला. तूं अर्जुनावरचा राग असा कां काढलास? पतीला पुत्राकडून मारवावें हें काय? अर्जुनानें तुला व मला

दोघींना आपल्या पत्नी केल्या हा कांहीं त्याचा मोठा दोष नव्हे. तुझ्या अंगीं त्याला जिवंत करण्याचें सामर्थ्य आहे तरी तसें कर." असें म्हणून चित्रांगदा अर्जुनाच्या पायाची सेवा करीत बसली. थोड्या वेळानें बभ्रुवाहन सावध झाला आणि पाहतो तों हा प्रकार. तेव्हां त्यानेंहि नागराजकन्या उलूपी हिला प्रार्थना केली, आणि म्हणाला "तुझ्या शब्दाला मान देऊन मी अर्जुनाशीं युद्ध केलें. पण गोष्टी या थरावर आल्या. आतां तूं त्याला जिवंत न करशील तर मला प्राणांतिक उपोषण करावें लागेल. एरव्ही प्रत्यक्ष बापाचा वध केल्याचें माझें पाप कसें हटणार?" तेव्हां उलूपीनें संजीवन मणि आणविला व तो बभ्रुवाहनाच्या हातीं देऊन अर्जुनाच्या हृदयावर ठेविला तेव्हां अर्जुन सावध झाला. मग त्यानें त्या दोघांना खरी हकीकत विचारिली. ती उलूपीनें सांगितली. त्यांत असेंहि सांगितलें कीं, शिखंडीला पुढें करून भीष्माला मारिलें या पापाबद्दल वसूंनीं व गंगेनें तुम्हांला शाप दिला होता त्याची निष्कृति तुमच्या अशा मरणानें व्हावी असें ठरलें होतें. म्हणून मी बभ्रुवाहनाकडून तुम्हांला मारविलें. अशा रीतीनें सर्वांचें समाधान झालें. 'अश्वमेध यज्ञाला तूं अवश्य ये, असें अर्जुनानें बभ्रुवाहनाला निमंत्रण दिलें.' आणि दीक्षा घेतल्यामुळें मणिपूर नगरांत तो न जातां तसाच पुढें निघाला. नंतर मगध देशाच्या राजाशीं प्रसंग पडला. पण अर्जुनानें मगध राजाला ठार न मारतां केवळ पराभूत व अंकित करून यज्ञाचें निमंत्रण दिलें. नंतर तो अश्व वंग, पुंड्र, कोसल, इत्यादि देशांतून शिशुपालाचा पुत्र शरभ याच्या राजधानीला पोंचला. तेथेंहि थोड्या लढाईनंतर अर्जुनाला करभार मिळाला. यानंतर चित्रांगद, निषादराज, यांना जिंकून द्रविड, आंध्र इत्यादि देशांतून द्वारकेला जाऊन पोंचला. तेथील यादवांच्या मुलांना अर्जुनाची ओळख नव्हती म्हणून त्यांनीं तो घोडा धरून ठेविला. पण उग्रसेन राजाला हें कळतांच त्यानें त्या मुलांना बाजूला करून अर्जुनाचा सत्कार केला. मग उग्रसेन व वसुदेव नगराबाहेर येऊन ते अर्जुनाला प्रेमानें भेटले. नंतर पंचनद व गांधार देशांतून त्या अश्वाचा संचार झाला. गांधार देशांत शकुनीचा मुलगा राजा होता. त्यानें अर्जुनाशीं युद्ध केलें. तेव्हां शकुनीची बायको

बरोबर मंत्री आणि करभार घेऊन तेथें आली व तिनें सामोपचारानें युद्ध थांबविलें. माघ शुद्ध १२ला पुष्य नक्षत्रीं युधिष्ठिराला समजलें कीं, अर्जुन अश्वासह समीप आला आहे. मग यज्ञ सुरू झाला. युधिष्ठिरानें यज्ञाला आलेल्या राजांची पूजा भीम नकुल सहदेव यांच्या हस्तें करविली. पूर्वी राजसूय यज्ञाच्या वेळीं घडला तसा कोणताहि अनिष्ट प्रकार यावेळीं घडला नाहीं. दुसरे दिवशीं अर्जुन येऊन पोंचला. तेव्हां अश्वमेध यज्ञाची समाप्ति यथाविधिपूर्वक व थाटानें करण्यांत आली. आणि दिग्विजय करून आलेल्या त्या अश्वाचें बलिदान करण्यांत आलें. मग व्यास विनोदानें युधिष्ठिराला म्हणाला, "आम्हांला दान दिलेली पृथ्वी मी तुझ्या स्वाधीन परत केली. तेव्हां तूं त्याच्याबदला मला काय देतोस? आम्हीं ब्राह्मण पडलों द्रव्यार्थी, राजार्थी नव्हे!" तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, "दिलेलें दान मी परत कसा घेऊं? तुम्ही इची व्यवस्था करा. मी वनांत जातों." तेव्हां हें देणेंघेणें औपचारिक होतें म्हणून तो व्यवहार तेथेंच संपला. ब्राह्मणांना व ऋत्विजांना अपार धनसंपत्ति देण्यांत आली. व्यासांनीं आपल्या वाटणीचा भाग कुंतीला दिला. हेतु हा कीं, या द्रव्यानें तिला मोठमोठीं पुण्यकृत्यें करतां यावीं. मग युधिष्ठिरानें यज्ञसमाप्तीकरितां अवभृत स्नान केलें. अवांतर लोकांना पक्वान्नांचें जेवण घातलें व ज्याला मद्य इष्ट होतें त्यांना तेंही भरपूर दिलें. मग कृष्णप्रमुख यादव द्वारकेला परत गेले. या यज्ञांत एक मौज अशी झाली कीं, एक मुंगुस यज्ञभूमीवर येऊन त्यानें या यज्ञकृत्याला दूषण देऊन धिक्कारिलें व असें दर्शविलें कीं, राजा संपन्न असतो म्हणून यज्ञ करूं शकतो. पण ऋषी हेही केवळ तपाच्या योगानें स्वर्गाला जातातच. एका दरिद्री ब्राह्मणाच्या हातून सातूचे बारीक कण धर्मकृत्यांत उडाले त्या कणांनीं त्या मुंगसाचें तोंड सोन्याचें झालें होतें. तात्पर्य दरिद्री लोकांनाहि धर्मबुद्धि असली तर त्यांनीं दिलेल्या लहानशा दानाला, राजेलाकांनीं दिलेल्या मोठमोठया दानाइतकें श्रेय असतें.

अशा रीतीनें पुन्हां स्थिरस्थावर झालें. पांडवांनीं धृतराष्ट्रालाच वडिलकीचा मान देऊन राज्यकारभार चालविला. कोणत्याहि गोष्टींत ते त्याची अनुज्ञा मागत. गांधारीचाहि त्यांनीं असाच मान ठेविला. द्रौपदी,

सुभद्रा व इतर पांडवस्त्रिया या कुंती व गांधारी यांच्यामध्यें भेद न करितां विनयशील सुनांप्रमाणें वागत. युधिष्ठिराचें सर्वांना असें सांगणें असें कीं, कोणीहि धृतराष्ट्राला दुखवूं नये. त्याप्रमाणें सर्व वागत; परंतु एकटा भीमसेन मात्र याला अपवाद ठरे. तो प्रामाणिक होता. त्याला ढोंग किंवा औपचारिकपणा माहीत नसे म्हणून तो धृतराष्ट्राची अवज्ञा करीत नसे तरी त्याच्याशीं प्रेमानें वागत नसे. कित्येक वेळीं आपल्या सेवकांकडून त्याचा अपमानहि करवी. ही गोष्ट धृतराष्ट्राच्या लक्षांत आलीहि असेल. परंतु आपणाला भीमाशीं काय करावयाचें आहे ? इतर पांडव, विशेषतः युधिष्ठिर हा आपल्याशीं प्रेमानें वागतो यावर दृष्टि देऊन तो कसातरी काळ काढी. युधिष्ठिराच्या प्रोत्साहनानें त्यानें ब्रह्मदेव, अग्रहार इत्यादि दानें देण्यांत अपरिमित द्रव्य खर्चलें. कोणतेंहि धर्मकृत्य करण्याचें त्यानें बाकी ठेविलें नाहीं. तोहि नित्य पांडवांचे कल्याण चिंतून त्यांना आशीर्वाद देत असे. त्यांना विजय मिळो, त्यांचें आयुष्य वाढो असें म्हणत असे. अशा रीतीनें दुःख आठवीत असतांहि युधिष्ठिराच्या सौजन्यामुळें धृतराष्ट्राची पंधरा वर्षें शांततेंत व बऱ्याचशा समाधानांत गेल्यावर त्याला वाटूं लागलें कीं, आपण आतां वानप्रस्थाचा आश्रम स्वीकारावा.

## धृतराष्ट्राचा वानप्रस्थाश्रम

त्यानें आपल्या आप्तेष्टांना बोलावून आपला हा निश्चय कळविला. त्याचें त्यांना दुःख झालें. धृतराष्ट्रानें गुप्तपणें उपोषणें चालविलीं होतीं पण त्यामुळें तो फार कृष झाला होता. तो लोकांना सांगे कीं; मी खातों, पितों सुखी आहे. पण आंतून तो आपल्या शरिराची उपासमार करी. मग त्याला अशा रीतीनें आत्मघात करावयाचा होता कीं काय कोणास ठाऊक ? आपला वनवसाला जाण्याचा बेत युधिष्ठिराला कळविण्याचें त्याच्या जिवावर आलें पण शेवटीं तें त्यानें केलें. युधिष्ठिर दुःखानें म्हणाला "तुम्ही वनांत जाणार तर मीहि तुमच्या मागोमाग येईन. मला तरी राज्य करण्यांत काय सुख आहे ?" पण आपला चुलता उपोषणें करतो असें कळल्यावर युधिष्ठिरानें त्याला आधीं जेऊं घातलें आणि निरुपायानें

त्याच्या वनगमनाला संमति दिली. व्यासांनींहि तसेंच सांगितलें. मग धृतराष्ट्रानें सर्व प्रजाजन बोलावून त्यांचाहि निरोप मोठ्या प्रेमानें घेतला. आणि युधिष्ठिराला तुम्ही मान द्या, सुख द्या, त्याची आज्ञा सदैव मानीत जा असा आदेश देऊन, व झाल्या गेल्या अपराधाची क्षमा मागून वन-गमनाचें प्रस्थान ठेविलें. त्यावेळीं मोठी स्वारी सजविण्यांत आली होती. सर्वांच्यापुढें अग्निहोत्र चालविलें होतें. धृतराष्ट्रानें घराची पूजा करून निघतांना त्याचें दान केलें. अनेक वाद्यें वाजत होतीं. पुरोहित, विद्वान् ब्राह्मण त्यांचे मागें पांडव, त्यांच्या मागें लहान मोठीं मुलें, सैन्य असा मोठा थाट होता. धृतराष्ट्र पायानेंच चालत असून त्यानें आपल्या पत्नीच्या खांद्यावर हात ठेवून आधार घेतला होता. गांधारीनें कुंतीच्या खांद्यावर हात ठेवून आधार घेतला. कुंतीहि त्यांच्याबरोबर वनाला जाऊन राहाण्याला निघाली होती. ही मोठी मिरवणूक फुललेल्या गजबजलेल्या मार्गानें वर्धमान राजवाड्यांतून बाहेर पडली होती. पूर्वी पांडवहि याच वर्धमान दरवाज्यानें निघाले होते. हें लक्षांत आलें म्हणजे देवाची लीला अशी अघटित असते हें कळून पांडवांनीं व कुंतीनेंहि वनवासाला जाऊं नये अशी आग्रहाची विनंती केली. युधिष्ठिर म्हणाला "तूंच युद्धास आम्हांस प्रोत्साहन दिलें." भीम म्हणाला "तूं आमच्या जवळ राहून सुख भोगावेस. आजवर आमच्या जवळ राहून दुःखच भोगिलेंस. आम्हीं जन्मलों त्यावेळीं दुःखच भोगिलें. आम्ही नगरास कां जावें?" तेव्हां कुंती म्हणाली "बाळांनो, तुम्हाला युद्ध करण्याच्या भरीस मीच घातलें. मला स्वतःला राजमाता म्हणून सुखोपभोग मिळावा या इच्छेनें तें केलें नाहीं. पंडूराजाचा वंश पुढें चालावा. तुम्ही लोकांच्या ताडाकडे पाहूं नये. तुम्ही क्षत्रिय असतां स्वधर्म टाकून शांतता स्वीकारिली असें म्हणून लोकांनीं तुमची निंदा करूं नये. तुमचे गुण वाया जाऊं नयेत. द्रौपदीवर दुःखकारक प्रसंग येऊं नये म्हणून विदुलेची कथा सांगून युद्धाला उत्तेजित केलें. मला भोगण्याकरितां माझ्या मुलांनीं राज्य मिळवावें अशी कधींच इच्छा नव्हती. मी तें तुमच्या कल्याणाच्या इच्छेनें केलें. आतां मला वनवासच प्रिय वाटूं लागला आहे. आणि या वृद्ध सासूसासऱ्यांची सेवा या वनांत राहून करावी. आतां यांवाचून कर्तव्य कोणतें?" नंतर पवित्र नदीच्या कांठीं तपोवनांत अग्नि पेटविण्यांत

आला. उपासना व होमहवन झालें. आश्रमवजा दोन झोंपड्या बांधण्यांत आल्या. त्यांत विदुर व संजय या वनवासी लोकांची राहाण्याची सर्व व्यवस्था केली होती. सकाळपासून आसपासचे लोक त्यांना भेटावयास येऊं लागले. त्यांचा परामर्श घेऊन त्यांनीं गंगास्नान केलें. नंतर शतयूप नामक राजऋषींची व त्यांची गांठ पडली. तोही राजा असाच राज्य भोगल्यावर वृद्धपणीं पुत्राची स्थापना राज्यावर करून स्वतः वानप्रस्थ म्हणून येऊन राहिला होता. विदुर व संजय हेही त्याच्याबरोबर राहिले. नंतर नारदानें भेटीला येऊन अनेक राजांनीं असाच वानप्रस्थ स्वीकारल्याची जुनी माहिती सांगितली. धृतराष्ट्रहि त्याच मार्गानें जाणार असें इंद्र-सभेंत मला कळलें असें नारद म्हणाला. असो. धृतराष्ट्रानें केवळ वनवास पत्करला होता तर विदुरानें केवळ वायू भक्षण करून घोर तपश्चर्या चालविली होती. त्यानें देह ठेवण्याचा निश्चयच केला होता. हें ऐकून युधिष्ठिर त्यांना जाऊन भेटला तूं व मीं दोघेंहि एकाच धर्मदेवतेच्या अंशानें जन्मलों आहों तेव्हां तूं राहा म्हणजे मीच राहिल्यासारखा आहे असें म्हणून योगबलानें आपलें प्राण युधिष्ठिराच्या प्राणांत मिळविले व झाडास टेकून मृत्यु स्वीकारला. फिरून व्यास ऋषी येऊन धृतराष्ट्राला भेटले. तेव्हां सोळा वर्षें झालीं तरी त्याच्या मनाला शांति मिळत नाहीं असें पाहून व्यासांना अशी विनंती करण्यांत आली कीं, त्या वृद्ध व अंध मातापितरांना एकदां पुत्रांचें दर्शन घडवावें. तें व्यासांनीं कबूल केलें व खालील प्रमाणें पूर्वीची माहिती दिली. धृतराष्ट्र हा त्याच नांवाच्या गंधर्व राजाचा अवतार आहे. पंडू मरुत्‌गणांपैकीं अच्युत नांवाचा मरुत् होता. युधिष्ठिर हे पमधर्माचें अंग होतें. दुर्योधन हा कलीचा अवतार, शकुनी द्वापारयुगाचा अवतार होता. दुःशासनादि कौरव हे मूळचे राक्षस होते. भीमसेन हा एक मरुत् होता. अर्जुन हा एक नर नामक ऋषी होता. कृष्ण हा नारायण ऋषी होता. नकुल सहदेव हे अश्विनि-कुमार होते. अभिमन्यू हा चंद्राचा अंश, कर्ण हा सूर्याचा अंश, धृष्ट-द्युम्न हा अग्नीचा अंश, द्रोण हा बृहस्पतीचा अंश, भीष्म हा वसूंचा अंश, शिखंडी हा राक्षस होता. अशी व्यासांनीं माहिती दिली. मग सर्वांनीं गंगास्नान केलें व आपापली जागा धरून बसलें. तेव्हां

गंगेच्या उदकांत मोठा ध्वनि होऊन युद्धांत पडलेले राजे यांनीं उज्ज्वल देहांनीं वर येऊन कांहीं वेळ दर्शन दिलें. धृतराष्ट्रानें तें सर्व दिव्यदृष्टीनें पाहिलें. मृत व जिवंत होते, मित्र होते ते एकमेकांना भेटलेच. वैरी होते तेहि वैर विसरून एकमेकांना भेटले. ते परत जातांना त्यांच्या स्त्रियांनीं भागीरथींत उड्या घेतल्या व आपल्या पतीबरोबर परलोकास गेल्या. अशा या प्रसंगीं मृतांचें दर्शन घेऊन युधिष्ठिर हा हस्तिनापुराला परत आला. कारण "तू आतां परत जाऊन राज्याची व्यवस्था पहा. आमची काळजी करूं नकोस. तूं येथें राहिल्यानें पुत्रप्रेमानें तपांत अडथळा होतो. आतां आमचे होण्याचें कांहीं राहिलें नाहीं. आतां तुला सांगावयाचें मला कांहीं उरलें नाहीं. असें म्हणून धृतराष्ट्रानें युधिष्ठिराला आग्रहाचा निरोप दिला."

## धृतराष्ट्राचा अंत

यानंतर सुमारें दोन वर्षांनीं नारद युधिष्ठिराच्या भेटीला आले व म्हणालें "धृतराष्ट्रादि कौरव आश्रमांतून निघून गांधारीकुंतीसह गंगाद्वाराला गेले. ती सर्व मंडळी उपोषणानें व तपाचरणानें अगदीं कृश झाली होती. एके दिवशीं गंगेहून परत येतांना मोठा वारा सुटून वणवा पेटला. तें महारण्य जळूं लागलें. त्यांतून बाहेर पडून पोंचण्याइतकी शक्ति त्यांना उरली नव्हती. संजय बरोबर होता. त्याला मोठी चिंता पडली. तें पाहून धृतराष्ट्र म्हणाला "आतां योग्य तेंच होत आहे. आम्ही अनायासें अग्निमुखांत पडत आहोंत." मग तो, कुंती व गांधारी यासह पूर्वेकडे तोंड करून आसनमांडी घालून मरण्याला सिद्ध होऊन बसला. अशा रीतीनें ती सर्व पुण्यवान मंडळी दहन पावून मृत्युलोकाला गेली. ही वार्ता ऐकून पांडवांना व नागरिकांना किती दुःख झालें असेल याची कोणीही कल्पना करावी. या दुःखानें व आक्रोशानें तो राजवाडा दणाणून गेला. नारद म्हणाला "धृतराष्ट्राच्या याजकांनीं अग्निहोत्राकरितां जो अग्नि पेटविला तोच वाढून त्यानें सगळें वन जाळलें. यामुळें स्वतःच्या अग्निहोत्रांत जळून मेल्याचेंच पुण्य धृतराष्ट्राला लाभलें यांत वाईट काय झालें?" मग सर्वांचें उत्तरकार्य करण्याचें एवढेंच उरलें. तें पांडवांनीं यथासांग केलें.

## यादवांचा शेवट

यानंतर लौकरच यादवांनाहि परलोकाला जावें लागलें. युधिष्ठिर राज्यावर बसल्यावर छत्तीस वर्षांनीं असा प्रसंग घडला. त्याचा प्रकार असा. कांहीं ऋषी मुनी एकदां द्वारकेंत येतांना दिसले. त्यांना पाहून कांहीं यादवांच्या मनांत त्यांची कुचेष्टा करावी अशी कुबुद्धि आली. त्याप्रमाणें सांब नांवाच्या तरुणाला यादवांनीं स्त्रीवेश दिला व त्यांना असें विचारिलें कीं, महाराज या गरोदर स्त्रीला पुत्र व्हावा अशी इच्छा आहे तो तिला होईल काय ? हें कपट ओळखून त्या ऋषीनें असा शाप दिला कीं, कृष्णाचा पुत्र सांब याला स्त्रीवेष दिला तो खरोखरच गरोदर राहून मुला ऐवजीं तिला मुसळ होईल व तें सर्व यादवांचे कांडांत काढील. हें वर्तमान ऐकून कृष्णाला वाईट वाटलें. त्याला ही गोष्ट होणार हें आधींच कळलें होतें तथापि त्याचा प्रतिकार करण्याची इच्छा मनुष्याला होते म्हणून कृष्णानें यादवांचा कलह टाळण्याकरितां दोन उपाय केले. एक असा कीं, सांबाच्या पोटीं आलेल्या मुसळाचें चूर्ण करून तें समुद्रांत फेकून दिलें आणि अशी दंवडी पिटवून दिली कीं, आजपासून कोणाहि यादवानें मद्यपान करूं नये. कारण मद्यपानामुळें कलह होतात. तथापि काळपुरुष द्वारकेंत हिंडून फिरून आपलें बळी न्याहाळीत होता. मद्यपान न करितां यादवां-मध्यें कलहबुद्धि उत्पन्न झाली. पृथ्वीवर व अंतरिक्षांत अशुभ चिन्हें होऊं लागलीं. तेव्हां त्याचा परिहार करावा म्हणून यादव नागरिकांनीं तीर्थयात्रेकरितां समुद्रावर जावें अशी इच्छा कृष्ण व बळीराम यांनीं केली. कृष्णाचें चक्र वर उडून गेलें. त्याचा रथ व घोडे समुद्रावर जाऊन अदृश्य झाले. त्याचे ध्वज अप्सरांनीं उपटून नेले. यादव मंडळी समुद्र–कांठीं जाऊन त्यांनीं स्नानें करून भोजनाची तयारी केली. वाद्यांचें गजर होऊं लागलें. भोजनें झाल्यावर नाचरंग व मद्यप्राशन सुरू झालें. स्वतः बळिराम, कृतवर्मा, सात्यकि यांनींहि मद्यप्राशन केलें. ती निशा चढून सात्यकीनें व प्रद्युम्नानें कृतवर्म्याचा अपमान केला. दोघांनीं एक-मेकांची वर्में काढलीं. कृष्ण मध्यें पडला. तेव्हां कृष्णावर स्यमंतक मण्याचा चोरीचा आरोप केला तें ऐकून सत्यभामा रागावली. सात्यकि कृतवर्म्यावर चाल-

करून गेला. त्यानें त्याचें मस्तक तलवारीनें उडविलें. कृतवर्म्याच्या मित्रानें सात्यकीला धरलें व तो त्याच्यावर उष्टि भांडीं फेकूं लागला. मग प्रद्युम्नाची भोजाबरोबर, सात्यकीची अंधकाबरोबर लढाई जुंपली. सात्यकि व प्रद्युम्न कृष्णाच्या डोळ्यादेखत मरून पडले. तेव्हां कृष्णासह अनेक यादवांनीं मूठभर गवत उपटून घेतलें तों पूर्वीच्या शापामुळें त्याच्या मूळांतील मुसळाच्या अंशांनीं मोठ्या मुसळांचीं रूपें धारण केलीं. अशा रीतीनें परस्परांचा नाश करून सर्व यादव नाश पावले. मग दारुकानें येऊन कृष्णाला बळीरामाची आठवण केली. दोघांनीं जाऊन पाहिलें तों बळीराम एका वृक्षाखालीं डोळे मिटून बसला होता. इतक्यांत जवळच एक मुसळ येऊन पडलें. कृष्ण म्हणाला, "बाकी कांहीं होवो. आतां स्त्रियांचें रक्षण प्रथम केलें पाहिजे" म्हणून कृष्णानें द्वारकेंत जाऊन तें काम वसुदेवाला सांगितलें. तो म्हणाला "अर्जुन येऊन स्त्रियांचें रक्षण करील." कृष्ण बळीरामाजवळ गेला. कृष्ण येतांच बळिरामाच्या तोंडांतून एक प्रचंड नाग बाहेर पडून तो समुद्रांत शिरला. कारण बळिराम हा त्या नागाचाच अवतार होता. मग कृष्ण एकाकी रानांत भटकूं लागला. शेवटीं आपल्या संक्रमणाची वेळ आली असें जाणून एका वृक्षाखालीं बसून त्यानें योगसमाधि लाविली. इतक्यांत दुरून एक शिकारी भिल्ल हरणाच्या मागें धांवून येत होता. त्याला कृष्णाचा तळपाय हरणाच्या कातड्यासारखा वाटून त्यानें बाण मारला. तो कृष्णाच्या पायांत घुसला तेव्हां त्या जखमेचें निमित्त करून कृष्ण निजधामास गेला.

हें सर्व वर्तमान दारुकानें हस्तिनापुराला पोंचविलें. तें ऐकून अर्जुन द्वारकेला आला व ती नगरी उध्वस्त झालेली पाहून त्याला रडूं कोसळलें. मग सत्यभामेला भेटून अर्जुन वसुदेवाकडे गेला. तोहि पुत्र-वियोगामुळें दुःख करीत होता.

अर्जुनाच्या स्वाधीन सर्व स्त्रियांना करून वसुदेवानें प्राणत्यागाचा निश्चय केला. मग अर्जुन यादव सभेंत गेला व म्हणाला लौकरच द्वारका समुद्राच्या पुरांत बुडणार आहे तरी सर्व यादव मंडळी इंद्र-प्रस्थाला जा व तेथें वज्र नामक यादवाला राजा करा. नगराबाहेर वसुदेवाच्या प्रेताला व इतर प्रेतांना अर्जुनानें अग्नि दिला. तेव्हां यादव स्त्रिया

त्याच्याबरोबर परत फिरल्या. इकडे एका क्षणांत समुद्र वाढून तींत द्वारका बुडाली. द्वारका बुडाल्यामुळें अर्जुनाला यादव स्त्रियांना आपल्या बरोबर नेणें प्राप्त झालें. उत्तरेकडे जातांना वाटेंत पंचनद नांवाचा देश लागला. तो फार संपन्न होता. तेथील लोक अभीर नांवाचे रानटी घष्टपुष्ट व सुखावलेले होते. इतक्या स्त्रियांबरोबर एकटा अर्जुन असें पाहून त्या स्त्रिया हस्तगत कराव्या अशी बुद्धि त्या अभीरांना झाली, व ते आरडाओरडा करून त्यांच्या अंगावर धाऊन आले. तेव्हां अर्जुनानें धनुष्य घेऊन त्या-वर बाण चढविले. पण हें करण्याला त्याला फार श्रम पडले. धनुष्य उभें करण्याला अर्जुनाला यापूर्वी कधीं तरी श्रम पडले होते काय ? पण आतां भवितव्य उभें राहिलें त्याला तो काय करणार ? मग त्याला अस्त्रें आठ-वेनाशी झालीं. धनुष्य वांकवावें तितकें वाकेना. यामुळें अर्जुनानें कांहीं अभीरांना ठार केले तरी पुढें त्याचें कांहीं चालेना. कारण भात्यांतील बाण संपले. अर्जुनाच्या भात्यांतील बाण संपणें यालाहि भवितव्यताच कारण ! यामुळें अभीरांनीं अनेक यादव स्त्रिया पळविल्या. मग उरलेल्या स्त्रिया घेऊन अर्जुन कुरुक्षेत्राला कसाबसा आला. आणि तेथें त्यानें त्या स्त्रियांना ठेविलें. कांहींना इतर ठिकाणच्या मित्र राजांकडे पाठविले. कांहींना इंद्रप्रस्थाला आणले. सात्यकीच्या मुलाला सरस्वती नदीकांठच्या प्रदेशाचें राज्य दिलें व यादवांना त्याच्या स्वाधीन केलें. वज्राला इंद्रप्रस्थाचें राज्य दिलें. रुक्मिणी, शैब्या, हैमवती, जांबवती यांनीं अग्निप्रवेश केला. सत्यभामा व इतर कांहीं कृष्णस्त्रिया तपश्चर्येकरितां वनांत निघून गेल्या.

## पांडवांचा स्वर्गवास

नंतर अर्जुन व्यास ऋषीकडे गेला. तेव्हां व्यासांनीं त्याची सर्व हकीकत ऐकून घेऊन त्याचें समाधान तत्त्वज्ञानानें केलें. आणि तुम्हां पांडवां-च्याहि निर्याणाचा काल आला आहे अशी सूचना दिली. ती सूचना घेऊन युधिष्ठिर म्हणाला, ‘ मी आतां मृत्यूचा अंगिकार करणार आहे,’ अर्जुनानें त्याला संमति दिली. मग युयुत्सु कौरवाला बोलावून आणून त्याला मुख्य कारभारी करून अभिमन्यूचा मुलगा परिक्षिती याला राज्याभिषेक करविला. परिक्षितीला सर्व प्रकारचें शिक्षण देण्याचें काम कृपाचार्यांकडे सोपविलें

मग महाप्रस्थानाची तयारी झाली. वस्त्रालंकार उतरून द्रौपदीसह पांडवांनी वल्कलें धारण केलीं. घरादाराचें दान केलें. गृह्याग्नि उदकांत बुडविला. मग पांच पांडव सहावी द्रौपदी आणि त्यांचा पाळीव कुत्रा अशी हस्तिनापुरांतून बाहेर पडली. अर्जुनाची स्त्री उलूपी हिनें गंगेंत उडी घेतली. चित्रांगदा मणिपुराला गेली. व कांहीं स्त्रिया परिक्षितीजवळ राहिल्या. लौहित्य नांवाच्या सागराजवळ येतांच अग्नि हा पुरुषरूपानें त्यांना आडवा आला. त्यानें पूर्वी खांडववन जाळलें होतें. तो अर्जुनाला म्हणाला, "कृष्णाचें चक्र जसें वर गेलें तसें तुझें हें गांडीव धनुष्य आतां माझ्या स्वाधीन कर. तें मी वरुणापासून आणून तुला दिलें होतें तें त्याचें त्याला दिलें पाहिजे." तेव्हां अर्जुनानें तें धनुष्य व भाते समुद्रांत फेंकले. मग ते उत्तरेस हिमालयाकडे निघाले. तो ओलांडल्यावर मेरू पर्वत लागला. वाटेंत द्रौपदी ध्यानयोगापासून भ्रष्ट होऊन भूमीवर पडली. भीम म्हणाला 'असें कसें झालें? ही तर पुण्यवान्!' युधिष्ठिर म्हणाला 'तुला माहीत नाहीं. ती मनांतून अर्जुनाचा पक्षपात करी.' नंतर सहदेव भूमीवर पडला. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, 'हा अत्यंत अहंकारी, स्वतःला शहाणा समजणारा होता त्या दोषामुळें त्याचें पतन झालें.' नंतर नकुल पतन पावला. युधिष्ठिर म्हणाला, 'त्याला सौन्दर्याचा गर्व होता म्हणून असें झालें.' नंतर अर्जुन पतन पावला. युधिष्ठिर म्हणाला, 'अर्जुन हा शूरपणाचा अभिमान बाळगी पण त्याच्या हातून प्रतिज्ञा पुऱ्या होत नसत. तसेंच तो इतर वीरांना तुच्छ मानी हा दोष त्यामध्यें होता.' मग भीमसेन पतन पावला. त्याचेंहि कारण धर्मानें असेंच कांहीं सांगितलें. शेवटीं एकटा युधिष्ठिर व त्याचा कुत्रा हे पुढें निघाले. त्यांना इंद्र भेटला व त्यानें युधिष्ठिराला आपल्या रथावर बोलाविलें. युधिष्ठिर म्हणाला "माझ्या भावांनाहि बरोबर नेतां येईल काय?" इंद्र म्हणाला, "त्यांचे देह पतन पावले तरी आत्मे स्वर्गलोकाला गेले आहेत. तूं अधिक पुण्यवान् म्हणून मात्र देहासह स्वर्गाला जाशील." मग युधिष्ठिर म्हणाला, हा कुत्रा मजबरोबर आला पाहिजे. इंद्र म्हणाला, 'तो तुझ्या बरोबर आतां कशाला?' युधिष्ठिर म्हणाला 'कुत्र्यासारखा स्वामिनिष्ठ प्राणी नाहीं म्हणून आपण स्वर्गांत जाऊन त्याला मागें ठेवणें हा

अधमपणा होईल.' इंद्र म्हणाला 'पण बरोबर कुत्रे बाळगणाराला स्वर्गांत स्थान नाहीं. कारण कुत्र्याच्या सहवासानें मनुष्य अपवित्र होतो,' युधिष्ठिर म्हणाला, 'भक्ताचा त्याग करणें हें पाप होय. म्हणून मी वाटेल तर स्वर्गांत जाणार नाहीं पण त्याचा त्याग करणार नाहीं.' इंद्र म्हणाला 'अरे, भाऊ आणि बायको यांचा त्याग केलास आणि कुत्र्याबद्दल एवढा आग्रह ? ' युधिष्ठिर म्हणाला, 'मला त्यांना जिवंत करतां आले असतें तर त्यांनाहि बरोबर आणिलें असतें.' तेव्हा युधिष्ठिराचें हें न्यायाचें भाषण ऐकून त्या श्वानानें तें रूप टाकून देवतेचें रूप घेतलें. ती देवता यमधर्म हा होता. तो म्हणाला 'मागें द्वैतवनांत मी तुझी अशीच परीक्षा पाहिली होती.' नंतर देव, सिद्ध व योगी इत्यादिकांबरोबर युधिष्ठिर स्वर्गाला पोंचला. तेथें नारदानें त्याचें स्वागत केलें. तेव्हा युधिष्ठिर म्हणाला, 'मी येथवर आलों खरा, पण माझे बंधु व द्रौपदी जेथें गेले असतील तेथेंच मला जाणें आहे. मी त्यांना सोडून येथें राहूं इच्छित नाहीं.' इतक्यांत दुर्योधन युधिष्ठिराच्या दृष्टीला पडला. त्याला पाहून युधिष्ठिराला राग आला व तो म्हणाला, 'माझ्या भावांना प्रतिबंध आणि या दुष्ट दुर्योधनाला मुक्तद्वार कसें ? ' नारद म्हणाला, 'युधिष्ठरा, आतां भूलोकचें वैर विसर. तें येथें आणूं नको. दुर्योधनानें क्षात्र धर्म चांगला गाजविला म्हणूनच त्याला स्वर्गलोक मिळाला.' युधिष्ठिर म्हणाला, 'बरें तें असो. पण माझ्या भावांची ताटातूट मला सोसवत नाहीं. तेव्हां देवांनीं एक देवदूत बरोबर देऊन इतर पांडवै जेथें गेले होते तिकडे युधिष्ठिराला पाठविलें. तो मार्ग अति बिकट होता. त्या मार्गाच्या शेवटीं नरक होता. पण युधिष्ठिर तेथें जातांच नरकाची दुर्गंधी जाऊन सुगंधी आली आणि तेथील लोकांच्या यातना संपल्या. म्हणून ते म्हणाले, 'युधिष्ठिरा, येथेंच रहा जाऊं नको' त्याला आपले बंधु तेथें दिसले. तेव्हां तो देवांना दूषण देऊं लागला आणि देवदूताला म्हणाला 'तूं परत जाऊन इंद्राला कळीव कीं मला येथेंच राहाणें आहे.' तो निरोप ऐकून इंद्रादि देव तेथें आले. आणि ते येतांच त्या नरकाचा स्वर्ग झाला. देव म्हणाले, "तुम्ही, पांडव, तुमच्या पक्षाचे इतर राजे ज्या नरकांत तुला दिसले ती माया होती. वस्तुतः तें सर्व स्वर्गांतच आहेत. आतां राजे लोकांना नरकच योग्य. पण यांची गोष्ट वेगळी आहे. मग युधिष्ठिर गंगेच्या तीरीं गेला आणि स्नान केल्यावर त्याचा मनुष्यदेह जाऊन त्याला दिव्य देह प्राप्त झाला. मग कृष्णाचो व त्याची भेट झाली.

# महाभारतांतील उपकथा व उपाख्यानें

## धौम्य व त्याचे शिष्य ✤ ✤

धौम्य ऋषीचें तीन शिष्य होते—आरुणी, उपमन्यू व वेद. तिघेहि आज्ञाधारक होते. तथापि गुरूनें त्यांची निरनिराळया रीतीनें परीक्षा घेतली. शेतांतील पाटाचें पाणी आडविण्याचें काम गुरूनें सांगितलें. ते इतर रीतीनें साध्य होईना तेव्हां आरुणी स्वतः पाटांत आडवा पडला. गुरूनें त्याची सोडवणूक केली नसती तर तो गारठून मेला असता. दुसरा शिष्य उपमन्यू याला रानांत गाई राखण्याचें काम धौम्यानें दिलें. आणि आज्ञा अशी केली कीं, तिच्यामुळें त्याला कडकडीत उपोषण घडावें. शेवटीं भूक निभेना म्हणून त्यानें रुईचीं पानें खाल्ली. पण त्या पानाच्या चिकानें त्याचें डोळे गेले व तो विहिरींत पडला. तिसरा शिष्य वेद. याला गुरूनें गाडीला, नांगराला बैलाप्रमाणें जुंपला. पण तीही सेवा त्यानें मान लववून केली अशा रीतीनें तीन्ही शिष्य परीक्षेत उतरले असें पाहून धौम्य ऋषीनें त्यांच्यावर कृपाकरून पूर्ण विद्याप्रदान केलें.

## उत्तंकाची गुरुदक्षिणा ✤ ✤ ✤

वरील पैकीं तिसरा शिष्य वेद. तो पुढें स्वतः गुरूपद पावला. परंतु गुरुसेवेंत आपणाला कष्ट किती पडले याची आठवण असल्यामुळें तो शिष्यांना कष्टदायक काम सांगत नसे. त्याचा शिष्य उत्तंक नांवाचा होता. त्याची विद्या संपूर्ण झाल्यावर त्यानें तुम्हांला कोणती गुरुदक्षिणा देऊं असें विचारिलें. गुरु म्हणाला "तुझी गुरुपत्नी मागेल ती दक्षणा दे." तिला विचारतां ती म्हणाली "पौष्य राजाची राणी दिव्य कुंडलें धारण करते. तीं मला आणून दे. पुण्यक नांवाचा एक धर्मविधि मी करणार आहे त्यांत त्या कुंडलाचें दान ब्राह्मणाला द्यावें असें मीं योजिलें आहे." तरी हीं कुंडलें या ब्राह्मणाला कशीं मिळावी? परंतु त्याचें दैव थोर. कारण पौष्य राजाच्या राणीनें कृपा करून तीं कुंडलें त्याला दिलीं. ती घेऊन तो निघाला. परंतु वासुकी नांवाचा सर्पाचा राजा होता. त्यालाहि तीच कुंडलें पाहिजे होतीं.

म्हणून वासुकीनें उत्तंकाला वाटेंत गांठलें आणि उत्तंक पाणी पिण्याला गेला असतां एका बौद्ध भिक्षूच्या रूपानें त्यानें ती पळविलीं आणि आपलें खरें नाग सर्पाचें रूप घेऊन पाताळाइतक्या खोल बिळांत शिरला. तेव्हां इंद्रानें दिलेल्या वज्राच्या सहाय्यानें उत्तंक भूमि खणून पाताळांत गेला. तेव्हां वासुकीनें भिऊन तीं कुंडलें त्याला परत दिलीं. तीं घेऊन परत येऊन त्यानें गुरुपत्नीला तीं कुंडलें गुरुदक्षिणा म्हणून दिलीं आणि गुरुचा आशीर्वाद घेऊन तो हस्तिनापुराला गेला.

## परीक्षिति व सुशोभना

इक्ष्वाकु वंशांतील परीक्षिति राजा अयोध्येंत राज्य करीत असतां एकदां शिकारीला गेला. तेथें एक सुंदर स्त्री त्याला दिसली. तिच्याशीं त्यानें लग्न केलें. पण तिनें अट अशी घातली कीं, मला कोठेंहि पाण्याचें दर्शन घडतां कामा नये. तें घडल्यास मी निघून जाईन. तें मान्य करून राजानें तिला पाण्याचें दर्शन न होईल अशा बंदोबस्तानें एका उपवनांत ठेविलें. पण एक दिवस तिला पाण्याचें दर्शन घडलें व ती निघून गेली. ती नाहींशीं होतांना विहिरींत उतरली व नाहींशी झाली म्हणून राजानें सर्व विहीर उपसली तेव्हां एक बेडूक दिसला. त्यानें आपली बायको खाल्ली असें वाटून त्याला बेडूक दिसला कीं तो मारूं लागला. तेव्हां बेडकांचा राजा परीक्षितीकडे येऊन त्यानें अभय मागितलें आणि सांगितलें कीं, तुमची बायको होऊन अदृश्य झाली ती सुशोभना माझीच मुलगी होय. तिनें आजपर्यंत पुष्कळ राजांना असेंच फसविलें आहे. तरीहि राजानें फिरून सुशोभनेचीच मागणी केली व ती त्याला मिळाली. तिला शल, दल, बल नांवाचे तीन पुत्र झाले. शल मोठा झाल्यावर शिकारीला गेला. एका हरिणाच्या मागें लागला असतां तो चपळाईनें निघून गेला. तेव्हां सारथी म्हणाला कीं, "वामदेवाजवळ हरिणांना मागें टाकतील अशा चपळ घोड्या आहेत. त्या मिळवा." वामदेवाला मागितल्यावरून त्या त्यानें दिल्या, व काम झाल्यावर परत द्या म्हणून सांगितलें. तें काम झालें पण शल राजानें घोड्या परत दिल्या नाहींत. तो म्हणाला "असल्या घोड्या राजालाच योग्य." तेव्हां वामदेवानें राक्षस उत्पन्न करून शल राजाचा वध करविला. शलामागून दल राजा

झाला. परंतु त्यानेंहि घोड्या परत दिल्या नाहींत. पण वामदेवानेंच माघार घेतली व राजा व राणी यांना वर दिले. शेवटीं दल राजानें संतुष्ट होऊन वामदेवाला घोड्या परत दिल्या.

## परीक्षितीला सर्पदंश

पांडवापासून चौथ्या पिढीची गोष्ट. अभिमन्यूचा मुलगा परीक्षिति हा एक दिवस शिकारीला गेला असतां त्याच्या बाणानें जखमी झालेला हरिण पळून गेला व दिसेनासा झाला. त्याचा शोध करतांना शमीक ऋषी मौन धरून तपाला बसला होता असें दिसलें. तेव्हां त्या हरिणाची वार्ता ऋषीला विचारली पण तो कांहीं उत्तर देईना म्हणून जवळच पडलेलें एका मेलेल्या सापाचें वेटोळें परीक्षितीनें त्या ऋषीच्या गळ्याभोंवतीं घातलें व आपण निघून गेला. थोड्या वेळानें शमीकाचा पुत्र शृंगी आला. त्याला ही गोष्ट समजली. तेव्हां आजपासून सात दिवसांत तक्षक सर्प तुलाच चावेल व तूं मरशील असा शाप त्यानें परीक्षितीला दिला. पण शमीक ऋषीला याचें वाईट वाटलें. तो अत्यंत क्षमाशील होता. त्यानें शापाचें हें वृत्त परीक्षितीला पाठवून कोठें साप न येईल अशी व्यवस्था करण्याला सुचविलें. त्याप्रमाणें पाण्यांत एक खांब उभा करून त्यावर बांधलेल्या घरांत राजा राहूं लागला. आणि विषाचा प्रतिकार करण्याची सर्व सिद्धता ठेविली. त्या शापाप्रमाणें तक्षक सर्प आपलें काम करण्याला निघाला. त्यानें कांहीं नागांना तपस्वी ब्राह्मणांचा वेष देऊन फळांची एक परडी भरून राजाला भेट म्हणून ती त्यांचेबरोबर पाठविली. सातव्या दिवशीं सूर्यास्ताच्या वेळीं परीक्षितीला वाटलें कीं आतां शापाची अवधि संपली आणि आपण निर्भय झालों. असें वाटून त्यानें एक फळ फोडलें व खाऊं लागला. त्यांत तक्षक अळीच्या रूपानें बसला होता. त्यानें आपलें उग्र स्वरूप धारण केलें आणि परीक्षितीला कडकडून दंश केला. तेव्हां राजा मृत्यु पावला व शृंगीचा शाप सफळ झाला.

## जनमेजयाचें सर्पसत्र

परीक्षितीचा मुलगा जनमेजय हा तक्षशिला देश जिंकून हस्तिनापुराला परत आल्यावर उत्तंक ऋषी येऊन राजाला भेटला, व त्यानें तक्षकाविरुद्ध आपली

कागाळी राजाला सांगितली. तसेंच हेंहि सांगितलें कीं, तुझ्या बापाला चाऊन मारणारा हा तक्षकच. तेव्हां सर्पसत्र करून तक्षककुलाचा नाश तूं केलास तर आपणा दोघांचाहि सूड उगविलासें होईल. हें ऐकून जनमेजयानें सर्पसत्राची तयारी केली. ऋषी, ऋत्विज, पुरोहित सर्व जमविले आणि सर्पांचें हवन करण्यास सुरवात केली. तेव्हां तक्षक इंद्राकडे गेला. परंतु जनमेजयानें पुरोहिताला सांगितलें कीं, इंद्रानें तक्षकाला पाठीशीं घालून माझा अपराध केला, त्याअर्थी इंद्रासह तक्षकाची आहुती द्या. तेव्हां इंद्रानें तक्षकाला आपणांपासून ढकलून दिलें. पण इकडे वासुकीसर्पाला ही सत्राची वार्ता कळल्यामुळें आणि आपला भाचा जो आस्तिक त्याच्या हातून नागकुलावरील संकट टळावयाचें आहे असें माहीत असल्यानें त्यानें आस्तिकाला सत्राच्या ठिकाणीं पाठविलें. आणि आस्तिकानें जनमेजयाची स्तुती करून त्याजकडून "वर माग" असें शब्द निघतांच त्यानें सर्पसत्र थांबविण्याचा वर मागितला. तो वचनीं गुंतून गेल्यामुळें राजाला यज्ञ पुरा करावा लागला. आणि तक्षक यज्ञकुंडांत पडणार होता तो वांचला. अशा रीतीनें आस्तिकानें सर्पकुल वांचविल्यामुळें वासुकीनें त्याला असा वर दिला कीं, "सर्प चावलेल्या कोणाहि मनुष्यानें तुझें नामस्मरण केलें म्हणजे त्याचें विष उतरेल."

## पुलोमेचें तेज

पुलोमा नांवाची एका ऋषीची मुलगी होती. तिच्या बापानें प्रथम तिला पुलोम नामक राक्षसाला देण्याचें कबूल केलें परंतु शेवटीं भृगु ऋषीला दिली. पुढें एक दिवस पुलोम राक्षसानें भृगूच्या आश्रमांत जाऊन अग्निशाळेंतून तिला पळवून नेलें आणि तिच्यावर बलात्कार केला. परंतु त्या वेळीं पुलोमा गरोदर होती. त्या गर्भानें आपल्या तेजानें राक्षसाला जाळून मारिलें. राक्षसानें अग्निशाळेंतून अग्नीच्या साक्षीनें पुलोमेला उचलून नेलें यामुळें भृगूनें अग्नीला शाप दिला. तेव्हां अग्नीनें विझून जाऊन आत्महत्या केली. तेव्हां सर्व होम व यज्ञ थांबले, म्हणून ब्रह्मदेवानें चातुर्यानें त्या शापाचें निराकरण केल्यामुळें अग्नि आपलें काम पूर्वीप्रमाणें करूं लागला.

## रुरू व प्रमद्वरा

वरील कथेंतील भार्गवाच्या तिसऱ्या पिढीला रुरू नांवाचा मुलगा झाला. या रुरूनें स्थूलकेश ऋषीच्या आश्रमांत प्रमद्वरा नांवाची सुंदर मुलगी पाहिली. ही मुलगी पूर्वी मेनका नांवाच्या अप्सरेला विश्वावसू गंधर्वापासून झाली होती. पण तिनें त्या मुलीला टाकून दिलें असें पाहून या ऋषीनें तिला आश्रमांत वाढविलें होतें. रुरूच्या मागणीवरून ऋषीनें प्रमद्वरा त्याला देण्याचें मान्य केलें. परंतु लग्नापूर्वी एक दिवस साप चावल्यामुळें ती मेली. तेव्हां त्यानें आपलें अर्धें आयुष्य तिला देऊन जिवंत केलें. रुरूनें तेव्हांपासून रागानें असें ठरविलें कीं, साप दिसला कीं तो मारावयाचा. एके दिवशीं डुंडुभ जातीचा म्हणजे वीष नसलेला साप रुरूला दिसला. तो त्याला मारणार इतक्यांत सापाला वाचा फुटून तो म्हणाला, "जनमेजयाच्या सर्पसत्रांत सर्पांच्या कांहीं जातींना जीवदान मिळालें आहे, त्या जातींतलाच मी एक आहे म्हणून मला मारूं नकोस. शिवाय तुझ्यासारख्यानें सर्पाचीहि हत्या करूं नये."

## जरत्कारू पतिपत्नी

जरत्कारू या नांवाचा एक ऋषी मायावर नामक कुलांत जन्मला होता. याच्र कुलांतील कांहीं ऋषींचे देह अगदीं लहान अंगठ्याएवढें असून ते मृत्यूपंथाला लागले होते. त्यांची व याची गांठ पडली. तेव्हां ते ऋषी म्हणाले, "लग्न करून पुढें संतति चालवशील तरच तिच्या पिंड-दानावर आम्ही जगूं. नाहींतर मरणें आहे. म्हणून तूं आमच्या कुळांतलें ब्रह्मचर्याचें व्रत टाकून देऊन लग्न कर व तुला मुलें होऊं देत." तेव्हां जरत्कारूनें वनांत जाऊन अशी घोषणा केली कीं, जरत्कारू याच नांवाची मुलगी कोणाला असेल आणि ती मला इच्छा म्हणून तो देईल तर मी तिच्याशीं लग्न करीन. तें ऐकून वासुकी नामक नागानें आपली जरत्कारू नांवाची बहीण भिक्षार्थ देऊं केली. त्याला हें माहीत होतें कीं, आपल्या बहिणीच्या पोटीं आस्तिक नांवाचा मुलगा जन्माला येणार असून तो आपल्या आजोळच्या सर्पकुलाचें रक्षण जनमेजयाच्या सर्पसत्रांत करणार आहे.

म्हणून त्यानें आपली बहीण जरत्कारूला दिली. शेवटीं तिच्या पोटीं आलेल्या आस्तिकानें जनमेजयाकडून वर घेऊन सर्पांचा संहार थांबविला. वास्तविक जरत्कारू ऋषी रूपानें कोणाहि कुमारिकेला आवडण्यासारखा नव्हता. परंतु आपण या जरत्कारू नामक ऋषीशीं लग्न केल्याकारणानें आपल्या माहेरच्या सर्प कुळावरचें संकट टळेल या उपकारीबुद्धीनेंच केवळ तिनें या विवाहाला संमति दिली होती.

## कद्रु व विनता

मेरू पर्वतावरील देवांना अमृताची इच्छा झाली. तेव्हां नारायणानें असा उपाय सांगितला कीं, “देव व दैत्य यांनीं मिळून समुद्राचें मंथन केलें तर त्यांतून अमृत निघेल.” त्याप्रमाणें देवांनीं दैत्यांना अमृताचें आमिष दाखवून समुद्र घुसळून काढला. तेव्हां त्यांतून अमृत निघालें. तें ज्याच्या हातीं जितकें लागलें तितकें कांहीं देवांनीं व दैत्यानीं पळविलें. उरलेलें अमृत इंद्रानें स्वाधीन करून घेऊन लपवून ठेविलें. त्यामुळें देव–दैत्यांमध्यें युद्ध झालें आणि दैत्यांचा पराभव होऊन ते पाताळांत जाऊन राहिले. याच समुद्रमंथनांतून उच्चैश्रवा नांवाचा दिव्य अश्व निघाला. त्या अश्वाचा रंग कोणता याविषयीं कश्यप ऋषीच्या दोन स्त्रिया कद्रू व विनता यांच्यामध्यें वाद माजला. विनता म्हणे ‘घोडा पांढरा आहे.’ कद्रू म्हणे ‘घोडा काळा आहे.’ मग समक्ष जाऊन पाहून ठरवावें, पण जिचें म्हणणें खोटें ठरेल तिनें दासी व्हावें अशी पैज ठरली. कद्रूच्या पोटीं एक हजार काळे नाग जन्मले होते. त्यांना ती म्हणाली “तुम्ही जाऊन त्या अश्वाच्या अंगावर चढून तो काळा दिसेल आणि मी पैज जिंकीन असें करा.” कांहीं पुत्रांनीं आईचें तें म्हणणें मान्य केलें. पण कांहीं मुलांनीं कपटानें पैज जिंकू नये असें सांगितलें. तेव्हां तिला त्यांचा राग येऊन जनमेजयाच्या सर्पसत्रांत तुमचा नाश होईल असा शाप तिनें त्यांना दिला. दुसरे दिवशीं काळे नाग अश्वाच्या शेंपटीवर लोंबत राहिले त्यामुळें तो अश्व काळा असें ठरून विनता ही कद्रूची दासी झाली. तेव्हां विनतेचा मुलगा जो गरूड त्याला वाईट वाटलें. पाताळांतील नागांना तो म्हणाला “काय घेऊन तुम्ही माझ्या आईला दासीपणांतून मुक्त कराल.” ते म्हणाले, “सोम नांवाचें

अमृत आणून देशील तर तसें करूं.'' तें मान्य करून गरूड इंद्रलोकाकडे धावून गेला. हेतु हा कीं, इंद्रानें लपवून ठेवलेलें अमृत आणून तें नागांना देऊन आपल्या आईला दासीपणांतून सोडवावें. अमृताच्या कुंभावर झडप घालीत असतां देवांनीं गरूडाशीं युद्ध केलें. परंतु गरुडानें त्यांचा पराभव केला, आणि तो कुंभ चोंचींत धरून अमृत उष्टें न करितां पाताळांत नागलोकीं नेला. आणि तें देऊन आपल्या आईची दासीपणांतून सुटका केली. पण या सर्व प्रकरणाचा राग त्या नागांपैकीं शेष नांवाच्या नागाला आला व त्याला वैराग्य उत्पन्न होऊन वायु भक्षण करून तप आचरलें. तेव्हां ब्रह्मदेव म्हणाला "यापुढें तुला त्या दुष्ट आईशीं व भावांशीं संगतच नको असें मी वरदान देतों. तुझ्या ठिकाणीं परोपकार बुद्धि आहे म्हणून पृथ्वी धारण करून तिला स्थिर कर.'' इकडे कद्रूच्या कपटी कृत्याला मान्यता न दिल्यामुळें तिनें रागावून जनमेजयाच्या सर्पसत्रांत जळून मराल असा शाप दिला होता, त्यांनीं विचार केला कीं, आतां उपाय काय करावा? तेव्हां असें समजलें कीं, या सत्रांत दुष्ट सर्पांचाच तेवढा नाश होईल आणि जे सर्प धार्मिक व सद्बुद्धीचे असतील त्यांचें संरक्षण जरत्कारूच्या पोटीं येणारा आस्तिक ऋषी हा करील. आणि त्या प्रमाणेंच शेवटीं घडलें.

## गरुडाचें गर्वहरण

इंद्राचा सारथी मातली याला गुणकेषी नांवाची सुंदर कन्या होती. तिला पृथ्वीवर अनुरूप वर मिळेना. तेव्हां नारदाच्या सांगण्यावरून पाताळांत जाऊन सुमुख नांवाच्या तरुण सुंदर नागाला मुलगी द्यावी असें त्यानें ठरविलें. पण सुमुखाचा आजा म्हणाला, "गरूडानें वैर धरून या सुमुखाच्या बापाला नुकतेंच मारलें आहे, तसें तो या सुमुखाला मारील अशी भीति वाटते. तेव्हां मुलीला अशा धोक्यांत कशाला घालतां?'' तेव्हां मातली म्हणाला, 'कांहीं चिंता नाहीं. मी त्याचें निवारण करीन.' मग मातली व नारद सुमुखाला घेऊन इंद्राकडे गेले मग इंद्रानें त्याला अभय व दीर्घायुष्य दिलें आणि सुमुख आणि गुणकेषी यांचा विवाह झाला. पण गरूडानें याविषयीं तक्रार केली. व तो म्हणाला, "नाग व सर्प हे माझे स्वाभाविक

भक्ष्य आहेत. मीं सुमुखाला खाण्याचें ठरविलें होतें. मग त्याला तुम्ही अभय कां द्यावें?'' असें म्हणून इंद्र व विष्णु यांना उद्देशून तो गरूड घमेंडीची व अपमानाची भाषा बोलूं लागला. तेव्हां विष्णूनें आपलें बळ दाखविण्याकरितां गरूडाच्या खांद्यावर नुसता उजवा हात ठेवला. तो सहन न झाल्यामुळें गरूड शरण गेला. तेव्हां गरुडाला कायमची अद्दल घडून आठवण राहावी म्हणून ज्या नागाला तो खाणार होता त्यालाच गरूडाच्या छातीवर कायमचा ठेवून घेतला. हेतु हा कीं, त्याच्याकडे पाहून आपली घमेंड कशी जिरली याचें गरूडाला स्मरण होत जावें.

## खांडववन–दहन

पूर्वीं श्वेतकी नांवाचा राजा होऊन गेला. त्याला यज्ञ करण्याचें वेड होतें. तें इतकें कीं, कितीहि दक्षणा देऊं केली तरी त्याला पुरोहित मिळेनासे झाले. तेव्हां त्यानें तप करून शंकराला विनविलें कीं तूं येऊन माझें यज्ञकृत्य कर. पण शंकर म्हणाला "मी ब्राह्मण नसल्यानें मला तो अधिकार नाहीं. पण दुर्वास ऋषी तुझे याजन करील.'' त्याप्रमाणें राजानें यज्ञ करून बारा वर्षेंपर्यंत अग्नीवर सतत तुपाची धार धरिली. त्यामुळें अग्नीला अजीर्ण झालें. त्याचा परिहार अनेक वन्यप्राण्यांची चरबी खाण्यानें होईल असें ब्रह्मदेवानें त्याला सांगितल्यावरून त्यानें खांडववन जाळण्याला प्रारंभ केला. परंतु त्या अरण्यांतील लोकांनीं सात वेळां अग्नीचा तो प्रयत्न हाणून पाडला. मात्र पुढें पांडवांच्या सहाय्यानें अग्नीला खांडववन पूर्णपणें जाळतां आलें.

## नहुषाचें इंद्रपद

प्रजापतीचें व इंद्राचें वैर होतें म्हणून प्रजापतीनें एक त्रिशिरा नांवाचा पुत्र उत्पन्न केला. त्या पुत्रानें इंद्रवधाकरितां त्यांजकडे अप्सरा पाठविल्या. पण तो अढळ राहिला. तेव्हां इंद्रानें त्याला मारून त्याचीं तिन्ही शिरें कापविलीं. मग प्रजापतीनें वृत्र नांवाचा राक्षस निर्माण केला. त्यानें इंद्राला जिंकून आपल्या तोंडांत टाकलें तेव्हां देवांनीं त्याला जांभयी आणविली आणि त्यामुळें तोंड उघडलें आणि त्यांतून इंद्र बाहेर पडला. मग

इंद्रानें तप सुरू केलें. त्याला श्रीविष्णु म्हणाला, "तूं वृत्राशीं समेट कर." त्याला वृत्र एका अटीवर तयार झाला. ती अशी कीं, 'मला ओल्या-सुक्या वस्तूनें दिवसा किंवा रात्रीं मृत्यु येऊं नये.' नंतर एके संध्याकाळीं इंद्रानें समुद्राच्या फेसांत शिरून वृत्राचा वध केला. पण या कपटी आचरणामुळें ब्रह्महत्या पाठीस लागली. तेव्हां इंद्र पाण्यांत दडून बसला. नंतर इंद्रपद रिकामें राहूं नये म्हणून देवांनीं नहुषाला तें पद दिलें. तें मिळतांच तो उन्मत्त व विलासी बनला व त्यानें इंद्राणीचा अपमान केला. तो म्हणाला "इंद्र तरी काय करतो? त्यानें अशा किती तरी स्त्रियांचा छळ केला आहे." मग बृहस्पतीचा व देवांचा सल्ला घेऊन इंद्राणी नहुषाकडे गेली. पण तिनें मुदत मागून घेतली. त्या अवधींत ती इंद्राच्या शोधाला निघाली. तिला कमळ-तंतूंत लपून बसलेला इंद्र भेटला. तो म्हणाला "नहुषाला कपटानें मारलें पाहिजे. म्हणून तूं असें कर कीं, नहुषाची पुष्कळ स्तुति करून त्याला असें म्हण कीं, तुम्ही आपल्या रथाला ऋषी जुंपून थाटानें मजकडे या म्हणजे मी तुमची आहे." नहुषानें तें मान्य केलें. आपण पालखींत बसला. पालखी ऋषींच्या खांद्यावर दिली व ते ऋषी आपापसांत संस्कारांत वेदमंत्र कोणते म्हणावेत याविषयीं वाद करूं लागले. त्यावेळीं नहुषानें अगस्ति ऋषीच्या डोक्यावर लाथ मारली. तेव्हां त्याचें पुण्य नष्ट होऊन तो अजगर होऊन पृथ्वीवर पडला. तो त्या स्थितींत दोन हजार वर्षें राहिला.

## अष्टावक्र-कथा

कहोड नांवाच्या ऋषीची पत्नी गरोदर होती. तिच्या गर्भाला एक दिवस वाचा फुटून तो बापाला म्हणाला, "तुमचें वेदपठण बरोबर होत नाहीं." हा अपमान वाटून तूं आठ ठिकाणीं वांकडा होशील असा शाप कहोडानें त्याला दिला. पुढें कहोड हा जनक राजाच्या राजधानींत गेला असतां बंदी नांवाच्या सूतानें त्याच्याशीं विद्येंतील वाद मांडिला. आणि तो जिंकून पैजेंत ठरल्याप्रमाणें कहोडाला पाण्यांत बुडविलें. ही हकीकत कळल्यावर त्या बंदीसूताला वादांत गांठून तीच पैज लावून वाद जिंकून त्याला पाण्यांत बुडवून सूड घेण्याचा निश्चय आठ ठिकाण

वांकडा झालेला कहोडाचा पुत्र अष्टावक्र यानें केला. नंतर सभेंत जाण्याचा अधिकार जनकाच्या कांहीं प्रश्नांना योग्य उत्तरें देऊन मिळविला. आणि बंदीसूत याच्याशीं वाद करून आतां त्याला पाण्यांत बुडविणार तों बंदी म्हणाला, "मी वादांत जिंकून पाण्यांत बुडविलेले ऋषी मेलेले नाहींत. ते एका विशेष यज्ञाचें काम संपवून आतां येथें येतील." त्याप्रमाणें घडलें, आणि बंदी हा पाण्यांत शिरून वरुणाकडे गेला. कहोडानें आपल्या पुत्राचें कौतुक करून आपला शाप परत घेतला. तेव्हां अष्टावक्राचा वांकडेपणा जाऊन तो सुस्वरूप झाला.

## अगस्त्य-लोपामुद्रा

अगस्त्य ऋषीनें पुष्कळ दिवस लग्न केलें नाहीं. परंतु पितरांचा उद्धार होणार नाहीं असें पाहून विदर्भ देशाचा राजा यज्ञ करीत असतां अग्नींतून लोपामुद्रा नांवाची सुंदर कन्या निघाली. तिला ऋषींनीं मागणी घातली. ती राजानें मान्य केली. पण ऋषींनीं असा आग्रह धरिला कीं, लोपामुद्रेनें राजवैभवाचा त्याग करून तपस्विनी होऊन आपणांबरोबर आश्रमाला आलें पाहिजे. पुढें लोपामुद्रेला अलंकाराची फारच अनिवार इच्छा झाली. पण ते आतां कोठून येणार? तेव्हां तो इल्वल राजाकडे गेला. त्या राजानें कपट केलें. असें कीं, नित्यक्रमाप्रमाणें आपला भाऊ वातापि याला मेंढा करून त्याला मारून तें मांस ऋषीला खावयास घातलें. आणि वातापि ये अशी हांक मारतांच तो मांसरूपी राक्षस ब्राह्मण ऋषीचे उदर फोडून बाहेर येईल अशी त्याची अपेक्षा होती. पण हें कपट ओळखून ऋषीनें वातापीला जठरांतल्या जठरांत पचवून टाकिलें. मग तो ऋषीचें उदर फोडून त्याला कसा मारणार? आपलें कपट फुकट गेलें असें पाहून इल्वलानें शरण जाऊन अगस्त्य ऋषीला पुष्कळ द्रव्य व अलंकार दिले व ते घेऊन ऋषीनें लोपामुद्रेचे मनोरथ पूर्ण केले. नंतर त्या दोघांना पितरांचा उद्धार करणारा मुलगा झाला.

## ऋष्यशृंगाची कथा

कश्यप कुलांत विभांडक नामक ऋषी होता. त्याला मुलगा झाला. तो हरिणासारखा अर्धमनुष्य व अर्धपशू असा झाला. त्याचे डोळे पिंगट व

अंगावर केस लांबलांब होते आणि डोक्यावर एक शृंग उमटलें होतें म्हणून त्याचें नांव ऋष्यशृंग असें ठेविलें. पुढें लोमपाद राजाच्या असत्य भाषणाच्या पापामुळें त्याच्या राज्यांत पाऊस पडेना. त्यानें पापाचें प्रायश्चित्तहि घेतलें. परंतु स्त्रियांची ओळखहि नाहीं अशा ऋष्यशृंग ऋषीला तू आपल्या देशांत आणशील तर पाऊस पडेल असें त्याला कोणी ऋषींनीं सांगितलें. तेव्हां आपली राजधानी चंपा नगरी इच्यांतील कांहीं चतुर व तरुण वेश्या गोळा करून व त्या एका वृद्ध वेश्येच्या हाताखालीं देऊन हरप्रयत्नानें ऋष्यशृंगाला लोभवून आणण्याकरितां पाठविल्या. त्या चतुर वृद्ध वेश्येनें एका नांवेवर आश्रमाची सजावट केली. ऋषीच्या आश्रमाशीं नदींत नांव लावून विभांडक बाहेर गेला असें पाहून त्या वेश्या आश्रमांत आल्या व आम्ही आमच्या आश्रमांतून आलों आहों असें त्यांनीं ऋषीला सांगितलें. त्या ऋषीनें यापूर्वी कोणी स्त्री किंवा आपल्या बापाशिवाय दुसरा पुरुष मनुष्य पाहिला नव्हता. तेव्हां या स्त्रिया हें आपल्यासारखे ऋषीच आहेत असें त्याला वाटलें व बालभावाच्या संगतिप्रियतेमुळें तो त्यांशीं मोकळ्या मनानें खेळूं लागला. त्यांनीं दिलेले पदार्थ खाऊं लागला. पेयें पिऊं लागला. आणि थोड्या वेळांत त्या स्त्रियांच्याा लीलांनीं मोहित झाला. विभांडक परत येण्याची वेळ येण्याच्या आंत त्या दिवशीं त्या स्त्रिया निघून गेल्या. विभांडक परत आल्यावर त्यानें पाहिलें तों ऋष्यशृंगाचें हातून होमशाळेचें काम कांहींच झालें नव्हतें. तेव्हां आपण नसतांना येथें कोण माणसें आलीं होतीं? असा शोध त्यानें केला. तेव्हां ऋष्यशृंगानें त्या स्त्रियांचें वर्णन करून हे ऋषी आले होते, पण ते माझ्या पूर्वपरिचयाचे नव्हते तथापि त्यांची संगत मोठी आनंददायक व खाण्यापिण्याला दिलेले पदार्थ अति रुचकर असें सांगितलें आणि म्हणाला, "त्यांच्या संगतींत राहून तप करावें असें वाटतें." तेव्हां 'विभांडकाला स्त्रियांची कल्पना व त्यांच्या हेतूचा संशय आला. दुसरे दिवशीं पुन्हां विभांडक बाहेर गेल्यावर त्या वेश्या आल्या व आमच्या आश्रमांत तुला नेतो असें म्हणून त्याला नावेंत बसवून चंपा नगरीला घेऊन गेल्या. हें घडतांच सर्वत्र पाऊस पडून आनंद झाला. आणि लोमपाद राजानें आपली कन्या शांता देऊन ऋष्यशृंगाला जांवई केलें.

विभांडक परत येऊन पहातो तों ऋष्यशृंग नाहीं. तेव्हां शोध काढतां हें कृत्य चंपा नगरींतील स्त्रियांचें असें कळलें व तो तेथें गेला. पहातो तों आपला मुलगा राजाचा घरजांवई होऊन मोठें ऐश्वर्य भोगीत आहे. आणि त्याला स्त्रीहि फार चांगली मिळाली आहे. पुढें ऋष्यशृंगाला मुलगा झाला तो त्यानें आपल्या सासऱ्याच्या स्वाधीन केला आणि शान्तेसह परत आपल्या आश्रमांत येऊन पुष्कळ वर्षें तपाचरण केलें.

## और्वकथा

कृतवीर्य राजाचा पुरोहित भृगु या नांवाचा होता. त्याच्याद्वारें राजानें पुष्कळ यज्ञ करून ब्राह्मणांना पुष्कळ दक्षिणा दिली. त्याच्या मृत्यूनंतर राजाच्या मुलांना द्रव्याची गरज लागला. यज्ञांतील पुष्कळ धन भृगूंच्या घरीं असेल असें समजून त्या मुलांनीं त्यांच्या आश्रमावर हल्ला केला. आणि जं ब्राह्मण मुकाट्यानें द्रव्य काढून देईनात त्यांचा वध करूं लागले तेव्हां त्यांच्या स्त्रिया हिमालयांत पळून गेल्या. एका स्त्रीनें आपला गर्भ मांडींत लपवून ठेविला होता. तिला मारण्याकरितां कार्तवीर्य राजपुत्र आले तेव्हां त्या गर्भानें बाहेर पडून त्या अत्याचारी लोकांना आंधळे केलें. या गर्भपुत्राचें नांव और्व असें होतें. त्यानें कार्तवीर्यासह सर्व क्षत्रियांना मारण्याची प्रतिज्ञा केली. परंतु त्याच्या पितरांनीं त्याला असें सांगितलें कीं तूं असा सूड घेऊं नकोस. आणि आपला क्रोधाग्नि समुद्रांत टाक. तेव्हां और्वानें तसें केलें आणि तो अग्नि 'वडवानल' झाला.

## कल्माषपाद

इक्ष्वाकु वंशांत कल्माषपाद नांवाचा राजा होता. तो एके दिवशीं वनांतून जात असतां त्याचा व वसिष्ठपुत्र शक्ति यांचा कलह झाला. तेव्हां शक्तीनें त्याला शाप दिला कीं, तूं नरमांसभक्षक राक्षस होऊन पृथ्वीवर संचार करशील. त्या शापाप्रमाणें तो राक्षस होऊन नरमांस खाऊं लागला. आणि ज्यानें शाप दिला तो शक्ति ऋषी भेटतांच त्यालाहि मारून त्या राक्षसानें खाल्लें. विश्वामित्राचें वसिष्ठाशीं जुनें वैर होतेंच. म्हणून त्यानें या राक्षसांकडून वसिष्ठाचे शंभरहि पुत्र मारविले. तेव्हां वसिष्ठानें दुःखानें

आत्महत्येचे अनेक प्रयत्न केले. परंतु ते विफल होऊन आश्रमाला परत आल्यावर, आपली सून, शक्तीची बायको, इच्या पोटीं गर्भ आहे असें त्याला कळलें. पुढें वसिष्ठाची व कल्माषपादाची गांठ पडल्यावर वसिष्ठानें त्याला शापमुक्त केलें. तेव्हां तो राजा वसिष्ठाला घेऊन अयोध्येला गेला व वसिष्ठाकडून पुढें इक्ष्वाकु वंशाची वृद्धि झाली. इकडे वसिष्ठाची सून प्रसूत होऊन तिला पराशर नांवाचा मुलगा झाला. त्या मुलाला पुढें आपल्या बापाच्या मृत्यूचा प्रकार कळल्यावर त्यानें राक्षससत्र सुरू केलें. तेव्हां अनेक ऋषी जमून त्यांनीं त्याला परावृत्त केलें. तेव्हां त्यानें तें सत्र थांबविलें व तो अग्नि हिमालयावरील अरण्यांत टाकून दिला. तो अग्नि पुढें पांडवांच्या काळापर्यंत जळतच होता.

## कुबलाश्वाचे पुत्र

सूर्यवंशांतील इक्ष्वाकु राजानंतर अनेक राजे व शेवटीं बृहदश्व कुबलाश्व असे झाले. कुबलाश्वाला एकवीस हजार मुलगे होते. एकदां उत्तंक ऋषी राजधानीला येऊन म्हणाला, "मी वालुकामय प्रदेशांत राहातो तेथें एक राक्षस लपलेला असून दर वर्षाच्या अखेरीस तो भयंकर निःश्वास सोडतो. त्यामुळें धूळ, धूर, ज्वाला, निखारे बाहेर पडून दूर फेकले जातात." तेव्हां ही पिडा निवारण करण्याचें काम कुबलाश्व व त्याचे पुत्र यांना सांगण्यांत आलें. त्यांनीं त्या वाळवंटांत जाऊन खणण्याला सुरुवात केली. सातव्या दिवशीं दडून बसलेला धुंधू दैत्य प्रकट झाला व त्यानें कुबलाश्वाचे पुत्र तीन खेरीज करून सर्व मारले. शेवटीं कुबलाश्वानें दैत्याला मारून त्याचे तोंडांतून निघणारा अग्नि शांत केला. अशा-रीतीनें लोकांना सुख देण्याकरितां राजानें हजारों पुत्र खर्ची घातले.

## च्यवन व सुकन्या

भृगु ऋषीला च्यवन नांवाचा तेजस्वी मुलगा होता. या च्यवनानें वीरासन घालून अतिदीर्घकाल तप केल्यामुळें त्याच्या अंगावर वारूळ चढलें व तेंहि वेलींनीं झाकून गेलें. एक दिवस शर्याती राजा सुकन्या नामक आपल्या मुलीसह या वनांत आला. सुकन्या या वारूळाजवळ आली व

हें चमत्कारिक काय दिसतें असें म्हणून तिनें एक काटा घेऊन वारूळाच्या लहान छिद्रांतून आंत घातला. त्यानें च्यवनाचे डोळे फुटले. तेव्हां च्यवन खळवळून उठला व त्यानें शर्यातीच्या सर्व सैन्यांत एक गुप्त रोग पसरविला. त्यावेळीं हें कसें झालें याची चौकशी शर्यातीनें केली. तेव्हां सुकन्येनें झालेला प्रकार सांगितला. मग शर्यातीनें च्यवनाकडे येऊन त्याची क्षमा मागितली, व सुकन्या हीच त्याला अर्पण केली. पुढें अश्विनीकुमार त्या आश्रमाशीं आले आणि तूं त्या वृद्ध ऋषीला टाकून देऊन आमच्याशीं लग्न कर म्हणजे आम्ही तुझ्या पतीला तारुण्य देतों असें त्यांनीं सांगितलें. च्यवन हा आतां वृद्ध झाला होता. तेव्हां पतीपत्नींनीं मनांत विचार केला कीं, आपण अश्विनीकुमारांना फसवूं. मग अश्विनीकुमारांनीं च्यवनाला तारुण्य देऊन आपल्या दोघांसारखेंच हुबेहुब रूप दिलें. तेव्हां त्याचा फायदा घेऊन सुकन्येनें आपला पति मनानें हेरून काढून हा पहा मीं अश्विनीकुमार वरिला असें म्हणून त्या दोघांची फजिती केली. मग च्यवनानें कृतज्ञताबुद्धीनें अश्विनीकुमारांना असें वचन दिलें कीं, यज्ञांत मी तुम्हांला बोलावून सोम अर्पण करीन. पण अश्विनीकुमार हे आपले सेवक. त्यांना यज्ञांत सोमाचा अंश मिळतां कामा नये असा इंद्रानें हट्ट धरला. तेव्हां च्यवनानें इंद्राचा पराभव आपल्या तपोबलानें केला.

## जरिता व मंदपाल

मंदपाल नांवाचा ऋषी निपुत्रिक होता. त्याला पुत्र होण्यासारखी स्त्रीं मिळेना. तेव्हां त्यानें शार्ंग पक्षाचा देह धारण करून जरिता नामक पक्षिणीशीं संसार केला. तेव्हां त्याला चार मुलें झालीं. पुढें मंदपाल दुसऱ्या एका वनांत गेला आणि लपिता नामक पक्षिणीशीं त्यानें संगत धरिली. इकडे अर्जुनाच्या सहाय्यानें अग्नि खांडववन जाळूं लागला तेव्हां जरितेला आपले व मुलांचे जीव वांचविण्याची चिंता पडली. तिला जवळ एक उंदरांचें बीळ दिसलें. त्यांत शिरा असें तिनें मुलांना सांगितलें. परंतु उंदराच्या भयानें ती बिळांत जाईनात. तेव्हां जरिता एकटीच निघून गेली. पुढें वन जाळीत जाळीत अग्नि अगदीं जवळ आला असें पाहून तिनें प्रार्थना केली. तेव्हां अग्नीनें तिला अभय दिलें. कांहीं वेळानें जरिता व मंदपाल दोघेहि त्या

मुलांपाशीं पोहोचले. तेव्हां आपणां सर्वांना टाकून गेल्याबद्दल जरितेनें मंद-पालाचा निषेध केला. तो म्हणाला, "तुम्ही आपल्या तेजानें व गुणांनीं अग्नीपासून अभय मिळवाल हें मला माहीत होतें म्हणूनच मी तुमची काळजी केली नाहीं."

## तपती व संवरण

सूर्याला दोन कन्या, सावित्री व तपती या नांवाच्या होत्या. तपती मोठी झाल्यावर ती संवरण राजाच्या दृष्टीला पडली. पण तो तिच्याशीं बोलूं लागतांच ती अदृश्य झाली. त्यामुळें तो वेडा झाला. तेव्हां ती फिरून प्रगट झाली व 'माझ्याकरितां माझ्या बापाजवळ मागणी घाला.' असा सल्ला तिनें राजाला दिला. तेव्हां राजा सूर्याची आराधना करीत बसला. मग वसिष्ठाच्या मध्यस्थीनें संवरणाशीं तपतीचा विवाह झाला. पण याला राज्याचा विसर पडून बायकोसह त्या वनांतच फार वर्षें राहिल्यामुळें संवरणाच्या राज्यावर अनावृष्टी इत्यादि संकटें आलीं. तेव्हां वसिष्ठऋषींच्या सूचनेवरून तो राजधानीला गेला. तेव्हां वृष्टी होऊन प्रजा सुखी झाली. तपतीच्या पोटीं कुरू या नांवाचा पुत्र झाला.

## दधीचीचा परोपकार

कृतयुगांत वृत्र नांवाच्या दैत्यानें देवांचा वारंवार पराभव केला. तेव्हां ब्रह्मदेवाच्या सूचनेवरून देव सरस्वती नदीच्या तीरीं दधीची ऋषी राहात होता त्याजकडे गेले आणि दैत्याला मारण्याकरितां लागणारे वज्र बनविण्याकरितां ऋषीजवळ त्याचीं हाडें मागितलीं. तीं त्यानें परोपकार बुद्धीनें दिलीं व मृत्यु स्वीकारला. मग त्या वज्रानें वृत्रासुराचा वध झाला. आणि दैत्यांना पळून जाऊन समुद्रांत दडून राहावें लागलें. ते दिवसां समुद्रांत राहात व रात्रीं बाहेर पडून आश्रम भेटल तेथें शिरून ऋषी व ब्राह्मण यांचा संहार करीत. यामुळें समुद्रतीरीं हाडांच्या राशी पडूं लागल्या. तेव्हां देवांना नारायणानें अशी युक्ति सुचविली कीं, "दैत्य समुद्रांत लपून राहातात तेव्हां तो कोरडा झाला म्हणजे दैत्यांना बाहेर पडावें लागेल. हा समुद्र कोरडा करण्याचा पराक्रम केवळ अगस्त्य ऋषीच्या हातून

होईल. कारण त्यानें पूर्वी विंध्य पर्वताला ठेंगणा करून नमविलें होतें." त्याप्रमाणें देव ऋषीकडे गेलें आणि ऋषीनेंहि त्यांची विनंती मान्य करून समुद्राचें सर्व पाणी पिऊन टाकून तो कोरडा केला. तेव्हां दैत्य दृष्टीस पडले व देवांनीं त्यांचा वध केला. मात्र ऋषीला कोरडा केलेला समुद्र भरून देतां आला नाहीं. तें काम पुढें भगीरथानें केलें.

## दीर्घतमाख्यान

दीर्घतम नांवाचा एक जन्मांध ऋषी होता. तो अति बुद्धिमान् आणि वेदवेत्ता असल्यामुळें प्रद्वेषी नामक एका सुरूप ब्राह्मणकन्येशीं त्याचा विवाह झाला, व तिच्या पोटीं त्याला गौतमादि अनेक पुत्र झाले. पण तिला आपल्या नवऱ्याच्या अमर्याद लज्जास्पद वर्तनाचा वीट पुढें पुढें येऊं लागून ती त्याच्यावर अतिशय रागावली. व आतां दुसरा पती करते येथपर्यंत तिच्या बोलण्याची मर्यादा गेली. पण एक पती जिवंत असतां दुसरा होऊं शकत नाहीं अशी अडचण त्यानें पुढें आणल्यामुळें तिनें आपल्या मुलाच्या हातून दीर्घतम्याला नदीवर नेऊन एका फळीवर बांधून नदींत सोडून दिलें. त्याला बली नामक राजानें अनेक कोसावर नदींतून काढून वांचविलें आणि त्याजकडून अंग, वंग इत्यादि पुत्र निर्माण करविले.

## दंभाचा निरास

दंभ नांवाचा एक उन्मत्त राजा होता. तो नित्य बाहेर पडून असें आव्हान देई कीं, 'छाती असेल त्यानें माझ्याशीं लढावें' या बढाईचा वीट येऊन एक ऋषी म्हणाला, "गंधमादन पर्वतावर जा, तेथें नरनारायण ऋषी आहेत. ते तुझा समाचार घेतील." त्याप्रमाणें तो तेथें गेला. नर-नारायण म्हणाले, 'व्यर्थ कलह कां करतोस?' पण दंभ राजा ऐकेना तेव्हां नरनारायणांनीं नुसत्या बोरूची कांडी फेंकून त्याचा पराभव केला. तेव्हां अहंकार टाकून राजा आपल्या नगराला परत गेला.

## निवातकवच व अर्जुन

इंद्रानें अर्जुनाला बरींच दिव्य अस्त्रें दिलीं आणि म्हणाला. "समुद्राच्या पोटांत निवातकवच नामक दैत्य राहातात. त्यांचा तूं संहार कर." अर्जुन इंद्राच्या रथांत बसून समुद्रतीरीं गेला. तों दैत्यांच्या अनेक नौका रत्नांनीं भरलेल्या समुद्रावर फिरतांना दिसल्या. जवळच असलेलें सुवर्णनगर पूर्वीं इंद्राचेंच होतें. पण निवातकवच दैत्यांनीं देवांना हांकून देऊन तें मिळविलें होतें. पुढें अर्जुन व निवातकवच यांच्यामध्यें अनेक प्रकारचें युद्ध झालें व दैत्यांना जिंकून परत जातांना त्याला हिरण्यपूर नांवाचें शोभिवंत नगर दिसलें. त्यांत पौलोम व कालकेह दैत्य राहात. त्यांनीं अर्जुनाशीं युद्ध करून फार त्रास दिला. पण शेवटीं अर्जुनानें रौद्र अस्त्र सोडून त्याचा पराभव केला. इंद्रानें त्याचा मोठा सत्कार करून अंगावरील जखमा बऱ्या होईपर्यंत ठेवून घेतलें व नंतर अनेक देणग्या देऊन भूलोकावर पाठविलें.

## नीलराजा व अग्नि

माहिष्मती नगराच्या राजाला एक सुंदर कन्या होती. ती राजाबरोबर नित्य अग्निशाळेंत जाऊन तोंडानें फुंकर घालून अग्नि पेटविण्यास सहाय्य करी. तिचें रूप पाहून अग्नि मोहित झाला. आणि ब्राह्मणाचें रूप धरून तिची संगत करू लागला. राजाला तें आवडलें नाहीं म्हणून त्या ब्राह्मणाला यथाशास्त्र शासन केलें. तेव्हां अग्नि भडकून अनावर झाला. त्या वेळीं राजा शरण गेला व त्यानें आपली मुलगी ब्राह्मणाला दिली, व अग्नीनेंहि प्रतिवचन दिलें कीं, या नगरांत नील राजाचा वंश असेपर्यंत त्यावर कोणी शत्रू आला तर मी त्याचा नाश करीन.

## परशुरामाचा पराक्रम

हैहय नामक क्षत्रियकुलांत कार्तवीर्य नांवाचा राजा झाला. तो अतिशय उन्मत्त होता. तो देवांचाहि अपमान करी. परंतु देवांच्या योजनेमुळें त्याची गांठ जमदग्नीचा मुलगा परशुराम याच्याशीं पडली

तेव्हां त्याचा नाश झाला. त्याचा प्रकार असा : परशुरामाचा पिता जमदग्नी हा क्षत्रिय वृत्तीचा ब्राह्मण होता. त्याला रेणुका नांवाच्या स्त्रीपासून परशुरामाशिवाय आणखी चार मुलगे झाले होते. एक दिवस रेणुका नदीवर स्नानाला गेली असतां तिला चित्ररथ राजाची जलक्रीडा दिसली. हें मनोमय पाप तिच्या नवऱ्याच्या लक्षांत आलें. तेव्हां त्यानें आपल्या पहिल्या चार पुत्रांना रेणुकेचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. ती गोष्ट त्यांनीं नाकारिली. तेव्हां त्यानें त्या चारहि मुलांचा शिरच्छेद केला. मग पांचवा मुलगा परशुराम याला तीच आज्ञा केली. तेव्हां त्यानें हातांतील परशूनें आईचें शिर उडविलें. तें पाहून जमदग्नी संतुष्ट झाला व त्यानें परशुरामास वर दिला. तेव्हां परशुरामानें असा वर मागून घेतला कीं, रेणुकामाता जिवंत व्हावी. तिच्या मनोमय पापाचा निरास व्हावा आणि मीं तिचा शिरच्छेद केला ही गोष्ट तिच्या स्मरणांतून जावी. आणि माझे सर्व बंधू जिवंत व्हावेत. त्याप्रमाणें घडलें. पुढें एके दिवशीं जमदग्नीचे मुलगे बाहेर गेले असतां कार्तवीर्य आश्रमांत आला व त्यानें आश्रम उध्वस्त करून होमधेनूचें वासरूं पळवून नेलें. ही हकीकत परशुरामास कळल्यावर त्यानें कार्तवीर्याला गांठून त्याचे सहस्र हात तोडले. याचा सूड म्हणून जमदग्नीला आश्रमांत एकटा गांठून कार्तवीर्याच्या लोकांनीं जमदग्नीचा वध केला. तेव्हां परशुरामानें कार्तवीर्यासह सर्व क्षत्रियांचा नाश करण्याची प्रतिज्ञा केली आणि एकवीस वेळां दिग्विजय करून पृथ्वी निःक्षत्रिय केली. आणि सर्व पृथ्वी कश्यप ऋषींना अर्पण केली व स्वतः महेंद्र पर्वतावर जाऊन तपश्चर्येला प्रारंभ केला.

## भगीरथ व गंगा नदी

इक्ष्वाकूकुलांत सगर नांवाचा राजा होता. त्याला दोन स्त्रिया होत्या. पैकीं एकीच्या (वैदर्भीच्या) पोटीं एक भोपळा जन्मला. त्यांतील बिया राणीच्या दासींनीं तुपाच्या भांड्यांत घालून ठेविल्या. त्यांतून साठ हजार पुत्र निर्माण झाले. पुढें सगरानें अश्वमेध यज्ञ करून घोडा दिग्विजयाकरितां सोडला. त्याच्या रक्षणाकरितां हे सर्व पुत्र त्याच्या मागें निघाले. पण एके दिवशीं तो घोडा एका निर्जन समुद्रापाशीं येऊन त्यांतच गुप्त

झाला. ते परत आल्यावर सगरानें रागावून त्यांचा निषेध केला व 'घोडा घेऊन परत आल्याशिवाय मला तोंड दाखवूं नका' असें रागानें म्हणाला. तेव्हां ते परत गेले. त्यांनीं तो समुद्र खणून काढला आणि तो यज्ञाचा घोडा दिसतांच त्याला घेऊन परत निघाले. परंतु सगराचें हे मुलगे सर्व जगाला अतिशय उपद्रव देणारे असल्यामुळें त्यांना कोणत्यातरी योगानें मारून टाकावें अशी देवांची योजना असल्यामुळें तो घोडा ज्याच्या आश्रयाला गेला होता त्या कपिलमुनीनें देवाची इच्छा जाणून आपल्या दृष्टीच्या तेजानें त्या साठ हजार सगरपुत्रांना जाळून टाकलें. याचें सगराला प्रथम दुःख झालें. पण देवांची योजना लक्षांत आल्यामुळें त्यानें मनाचें समाधान करून घेतलें. सगराच्या एका राणीच्या मुलाची ही गोष्ट झाली. पण दुर्दैवानें त्याच्या दुसऱ्या राणीचा मुलगा असमंजा हाही दुष्ट व क्रूर निघाला. तेव्हां नागरिकांच्या विनंतीवरून राजानें त्याला हद्दपार केलें. परंतु असमंजाचा मुलगा अंशुमान होता; तो अत्यंत चांगला होता. त्याला बोलावून घेऊन सगरानें यज्ञाचा घोडा परत आणण्याची कामगिरी त्याला सांगितली. त्यानें जाऊन कपिलमुनीची भेट घेतली. तेव्हां मुनींनीं घोडा परत दिला. आणि सांगितलें कीं, तुझा नातू भगीरथ स्वर्गातून गंगा मृत्यूलोकावर आणील तेव्हां जळून मेलेले साठ हजार सगर पुत्र पवित्र होतील. याप्रमाणें घोडा परत आल्यावर सगरानें यज्ञ पुरा केला. त्याच्यानंतर अंशुमानानें राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा मुलगा दिलीप राज्यावर बसला. त्यानें गंगा मृत्यूलोकीं आणण्याचा प्रयत्न केला. पण तो साधला नाहीं. पण पुढें त्याचा पुत्र भगीरथ याच्या हातून तें कार्य तडीस गेलें. त्यानें एक हजार वर्षें हिमालयावर तप करून गंगेला प्रसन्न करून घेतलें. तिनें आपल्या उदकानें साठ हजार सगर पुत्रांची राख भिजवून पवित्र केली. नंतर गंगा नदी खालीं येणार तिचा वेग सहन होण्याकरितां भगीरथाच्या प्रार्थनेवरून ती शंकरानें आपल्या मस्तकीं घेतली. आणि तेथून खालीं पडल्यावर भगिरथानें मार्ग दाखविल्याप्रमाणें पूर्व समुद्रापर्यंत गेली. आणि पूर्वी कोरडा झालेला समुद्रहि तिनें भरून काढला.

## भीष्मजन्म

प्रतीप नांवाचा राजा हरिद्वार येथें गंगेच्या काठीं तपश्चर्या करीत राहिला होता. त्याला पाहून गंगा मोहित झाली. परंतु तो म्हणाला, "तूं अशी इच्छा करूं नको. माझ्या मुलाशीं तूं लग्न करावें हें मला मान्य होईल." त्याप्रमाणें लग्न ठरलें. मात्र गंगेनें अट घातली कीं, मी विवाहानंतर जें जें करीन तें माझ्या पतीनें मला करूं द्यावें. पुढें प्रतीपाला महाभिष नांवाचा मुलगा झाला. त्यालाच शांतनु असें म्हणत. या कुरुकुलोत्पन्न शांतनुनें अनेक पुण्यकर्में केलीं. गंगेला शांतनुपासून आठ मुलगे झाले. पण मुलगा जन्मतांच ती त्याला गंगा नदींत बुडवी. राजानें सात मुलांच्या मृत्यूपर्यंत हें सोसलें. परंतु आठव्या वेळीं त्याला तिचा निषेध केल्याशिवाय राहवेना. तेव्हां आपली अट मोडली म्हणून ती त्याला टाकून निघाली. पण मुलगा त्याच्या स्वाधीन केला. या आठव्या मुलाचें नांव देवव्रत. तोच भीष्म. नंतर शांतनु एके दिवशीं यमुना नदीच्या कांठीं हिंडत असतां त्याला एक सुंदर धीवरकन्या दिसली. तीच सत्यवती. व तिचा मुलगा व्यास.

## मनु व मत्स्यरूपी ब्रह्मदेव

वैवस्वत मनु हा चीरीणी नदींत उभा राहून तप करीत असतां एक मासा त्याच्याकडे येऊन म्हणाला, "मोठे मासे लहान माशांना खातात. मी तुम्हांला शरण आलों आहे. माझें रक्षण करा." मनूला दया येऊन त्या माशाला त्यानें घरीं नेलें आणि रांजणांत सोडलें. लगेच माशानें मोठें रूप घेऊन रांजण व्यापला. मग मनूनें त्याला विहिरींत, नंतर गंगेंत, नंतर समुद्रांत नेऊन सोडलें. तेव्हां मासा मनूला म्हणाला, "आतां जलप्रलय होईल तेव्हां मी येईन. मध्यंतरीं तुम्ही एक मोठी नाव बांधा आणि त्यांत बसा. बरोबरं अनेक धान्यांचें बीं घ्या. मग जलप्रलय वाढला म्हणजे मी येईन. तेव्हां माझ्या शिंगाला ती नाव जखडून बांधा." त्याप्रमाणें घडल्यावर त्या माशानें ती नांव समुद्रांतून अनेक वर्षें ओढून नेऊन शेवटीं हिमालयाच्या शिखराजवळ ती खुंटविली, आणि म्हणाला, "मी

मत्स्य नसून ब्रह्मदेव आहे. आतां तुम्ही येथेंच राहून तप करा व नवी प्रजा निर्माण करा."

## माधवीची कथा

एकदां यमधर्माच्या मनांत आलें कीं, विश्वमित्राची परीक्षा पहावी म्हणून तो विश्वामित्राकडे जाऊन भोजन मागूं लागला. विश्वामित्रानें भात शिजविला, यमधर्माकडे नेला, व म्हणाला "माझें जेवण झालें. तूं वायू भक्षण करून ती तपेली भात भरून शंभर वर्षें उभा राहा." त्याप्रमाणें तो शंभर वर्षें उभा राहिला. शेवटीं यमधर्मानें उनउन्ह भात खाल्ला व क्षत्रिय विश्वामित्राला ब्राह्मणत्व दिलें. या शंभर वर्षांत गालव नांवाच्या शिष्यानें आपली सेवा उत्तम केली असें पाहून गालवाला त्यानें शिष्यत्वांतून मुक्त केलें. पण गुरुदक्षिणा मागितल्याशिवाय शिष्यत्व कसें संपेल? तेव्हां विश्वामित्र रागावला व म्हणाला "ठीक आहे. पांढऱ्या अंगाचें व काळया कानाचे असे आठशें घोडे मला दे." तेव्हां गालवाला मोठी चिंता पडली. ते पाहून त्याचा मित्र गरूड म्हणाला "मी तुला पाठीवर घेऊन जगभर हिंडवितो. असे घोडे कोठें मिळतील तें पहा." परिभ्रमणांत ते दोघे ऋषभ पर्वतावर उतरले. तेथें शांडिली नांवाची एक ब्राह्मणी तप करीत बसली होती. तिला भेटून ते पुढें निघाले. वाटेंत गरूड गालवाला म्हणाला, "प्रतिष्ठान नगरींत नहुष पुत्र ययाति आहे तो तुला आठशें घोडे विकत घेण्याइतकें द्रव्य देऊं शकेल. मग ते ययातीकडे गेले. तो म्हणाला, "माझी सर्व संपत्ति यज्ञांत खर्च झाली आहे. तुला विन्मुख पाठवूं नये. माझी सुंदर कन्या माधवी तुला देतों. ती जो कोणी असले घोडे देईल त्याला कांहीं दिवस देत जा. मात्र तिला कोणापासून पुत्र झाले तर ते माझे होतील व माझा वंश चालवतील." त्याप्रमाणें तिला घेऊन गालव प्रथम हर्यश्व राजाकडे नंतर दिवोदास राजाकडे नंतर औशिनर राजाकडे गेला व माधवीला त्यांच्याजवळ कांहीं दिवस ठेवून प्रत्येकाकडून दोनशें याप्रमाणें सहाशें घोडे मिळविले. तरी दोनशें उरले. त्याकरतां स्वतः विश्वामित्रानेंच माधवीला आपल्याजवळ ठेवून घेऊन कांहीं दिवसांनीं गालवाकडे परत दिली व आठशें घोड्यांच्या

गुरुदक्षिणेची पावती दिली. अशा रीतीनें चौघांकडून पुत्रप्रदान होऊनहि वरप्रदानानें कुमारी राहिलेली माधवी गालवानें ययातीला परत दिली. आतां कोणाशीं मी लग्न करीत नाहीं असें म्हणून वनवासांत राहून तिनें तपश्चर्या केली.

## मुद्गलाची सत्त्वपरीक्षा

मुद्गल नांवाचा एक गृहस्थाश्रमी ब्राह्मण कुरुक्षेत्रांत होता. तो शेतांत किंवा बाजारांत पडलेले दाणे वेंचून त्यावर कुटुंबपोषण करून शिवाय नित्यनैमित्तिक धर्मकृत्येंहि करी. हें पाहून दुर्वासऋषीला त्याची सत्त्वपरीक्षा करण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें मुद्गलाच्या घरीं किंचित् धान्य जमलें म्हणजे दुर्वासानें त्याच्या घरीं जावें, पोटभर जेवावें व उरलें अन्न आपल्या अंगाला फासून नासून टाकावें. याप्रमाणें तीन महिने क्रम चालला. त्यामुळें त्या कुटुंबाला कडकडीत उपास पडला. तरी त्यांनीं कोणताहि विकार दर्शविला नाहीं. तेव्हां दुर्वासानें संतुष्ट होऊन त्याला स्वर्गप्राप्तीचा वर दिला. त्याप्रमाणें त्याला स्वर्गात नेण्याला विमान आलें. तेव्हां तो म्हणाला "येथें केलेल्या पुण्याच्या बळावर मी स्वर्गात जाईन खरा. पण तें संपल्यावर पुन्हां खालीं यावें लागेल. मग इतका खटाटोप कशाला?" मी आहे तो भूलोकावरच बरा आहे असें म्हणून त्यानें देव-दूताबरोबर आलेलें विमान परत पाठविलें!

## मांडव्य कथा

मांडव्य नांवाचा एक ब्राह्मण आपल्या आश्रमांत तपश्चर्या करीत होता. एक दिवस कांहीं चोर आपली लूट घेऊन त्या आश्रमांत आले व दडून राहिले. पण राजदूत पाठोपाठ येऊन त्यांनीं त्यांना पकडलें. पण हा तपस्वी खोटा व चोरांचा साथीदार असें वाटून त्या दूतांनीं मांडव्यालाहि पकडून नेलें व सुळीं दिलें. पण चमत्कार असा झाला कीं, तो आपल्या तपोबलामुळें सुळावर मृत्यु पावला नाहीं. तेव्हां त्याला खालीं काढण्यांत आलें. तथापि सुळाचें एक टोंक त्याच्या अंगांत घुसलेलेंच राहिलें. यामुळें त्याला अणिमांडव्य असें नांव मिळालें.

त्यानें 'ही शिक्षा आपणाला कां झाली?' असें यमधर्माला विचारलें. तेव्हां यम म्हणाला "तूं लहानपणीं पक्षाच्या अंगांत काडी टोचली होतीस." पण मांडव्य म्हणाला, "ती गोष्ट माझ्या हातून चवदा वर्षांच्या वयाच्या आंत घडली व या वयांत मुलाच्या हातून चूक झाली तर त्याकरितां त्याला कोणी शिक्षा देत नाहींत. ती तूं मला अन्यायानें दिलीस म्हणून तूं शूद्र जातींत जन्म घेशील असा शाप मी तुला देतों." आणि त्या शापामुळें यमधर्म हस्तिनापुरांत विदुराच्या रूपानें जन्माला आला.

## यवक्रीताचा अत्याचार

भारद्वाजऋषीला यवक्रीत नांवाचा मुलगा होता. दोघेहि केवळ तप करणारे. त्यांना वेदविद्या येत नव्हती. याचें वाईट वाटून गुरु-मुखावांचून स्वतंत्रपणें आपली आपण वेदविद्या मिळवावी या हेतूनें त्यानें तपश्चर्या सुरू केली. पण या तपानें वेदविद्या पदरांत न पडतां तो उन्मत्त झाला व त्या भरांत त्यानें शेजारच्या रैभ्य ऋषीच्या सुनेवर बलात्कार केला. तेव्हां रैभ्यानें राक्षस उत्पन्न करून यवक्रीताला ठार मारविलें. भारद्वाजानें तें पाहिल्यावर त्याला खरा प्रकार उमजला व त्यानें यवक्रीताबरोबर स्वतःला जाळून घेतलें. परंतु पुढें अर्वावसू हा ऋषीपुत्र धर्मात्मा निघाल्यामुळें त्यानें तपश्चर्येनें सूर्याला प्रसन्न करून घेतलें. भारद्वाज, यवक्रीत यांना पुन्हां जिवंत केलें. सूर्यानें जातांना सांगितलें कीं वेदविद्या संपादण्याच्या कामीं गुरुमुख हें अवश्य असतें त्याचा अव्हेर करून चालत नाहीं.

## शिबिराज कथा

शिबी राजानें अनेक यज्ञ केले. एका यज्ञांत बहिरी ससाण्याला भिऊन एक कपोत पक्षी शिबि राजाच्या मांडीवर लपून बसला. ससाणा म्हणाला, "कपोत हें माझें भक्ष्य आहे तें माझें मला दे." शिबि म्हणाला, "तो पक्षी मला शरण आला आहे, शरणागताला अभय देणें हा माझा धर्म आहे." ससाणा म्हणाला, "माझें भक्ष्य मला न मिळालें तर मी उपाशी मरेन याची वाट काय?" शिबि म्हणाला, "त्या ऐवजीं तुला दुसरें मांस देतों."

ससाणा म्हणाला, " इतर प्राण्यांचें मांस मला अन्न होऊं शकत नाहीं. तुला द्यावयाचेंच तर कपोताइतकें तुझ्या स्वतःच्या शरीरांतील दे. मला चालेल." शिबीनें तें कबूल केलें. मग ताजव्याच्या एका पारड्यांत कपोताला घालून आपल्या शरीरांतलें मांस कापून दुसऱ्या पारड्यांत तो घालूं लागला. पण सगळ्या शरीरांतलें मांस संपत आलें तरी एका कपोताच्या वजनाइतकी बरोबरी होईना. शेवटीं सर्वच्या सर्व शरीरानें शिबी दुसऱ्या पारड्यांत बसला तरी तेंच. ससाण्याचें रूप घेणारा इंद्र व कपोताचें रूप घेणारा अग्नि प्रगट झाले. आणि म्हणाले, "राजा तूं धर्मबुद्धीच्या सत्त्वपरीक्षेंत पूर्ण उतरलास." मग शिबि राजाचें शरीर पूर्वीप्रमाणें अखंड झालें.

## सुंदोपसुंद

हिरण्यकशिपु राक्षसाच्या वंशांत निकुंभ नांवाचा एक दैत्य झाला. त्याला सुंद व उपसुंद असे दोन मुलगे होते. त्यांनीं उग्र तप केलें. त्या दोघांच्यामध्यें बंधुप्रेम अतिशय होतें. त्यांच्या तपानें तापलेला विंध्य पर्वत निवावा म्हणून देवांनीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु त्यांनीं आपलें तप सोडिलें नाहीं, आणि ब्रह्मदेवापासून असा वर मिळविला कीं, एका अमरत्वाशिवाय ते दोघे ज्याची इच्छा करतील तें त्यांना मिळेल. तें तप टाकून देऊन त्यांनीं राज्यकारभार हातीं घेतला. मोठें सैन्य हातीं घेऊन अनेक लोक जिंकले, प्राण घेतले. देश उध्वस्त केले. शेवटीं शेवटीं ते कुरुक्षेत्राजवळ आल्यावर ब्रह्मदेवाला आपली चूक लक्षांत येऊन त्यानें विश्वकर्म्याकडून तिलोत्तमा नांवाची एक सुंदर स्त्री निर्माण केली. तिनें सुंदोपसुंदांना दर्शन देऊन मोहित केलें. दोघाहि भावांना इच्छा झाली कीं, ही स्त्री एकट्याला असावी. अर्थात दोघांचें युद्ध जुंपलें, आणि गदाप्रहारानें दोघेहि एकमेकांच्या हातून मरण पावले. अशा रीतीनें हातचें गेलेलें राज्य इंद्राला परत मिळालें.

## शाल्ववध

राजसूय यज्ञामध्यें कृष्णानें शिशुपालाचा वध केला. याचा राग येऊन त्याचा वडील भाऊ शाल्व एकदां कृष्ण द्वारकेंत नाहीं असें पाहून

त्या नगरावर चालून गेला. त्याचें व यादव वीरांचें युद्ध झालें. त्यांत प्रद्युम्न मूर्च्छित झाला. उलट प्रद्युम्नाच्या बाणानें शाल्वही मूर्च्छित झाला. पुढें कृष्ण राजसूय यज्ञ आटोपून परत आला तेव्हां त्याला कळलें कीं, युद्धांत शाल्व व यादव यांची बरोबरी झाली. पण शाल्वानें वेढा उठवून जाण्यापूर्वी द्वारकेचा फार नाश केला. तेव्हां कृष्ण शाल्वावर चालून गेला. शाल्वानें आसुरीमाया प्रकट करून कृष्णाला फसविण्याचा प्रयत्न केला. परंतु शेवटीं कृष्णानें शाल्वाचा वध केला.

## श्वेतकेतूची माता

उद्दालक नांवाचा तपस्वी होता. त्याला श्वेतकेतू म्हणून पुत्र होता. एक दिवस एक ब्राह्मण येऊन त्यानें उद्दालक व श्वेतकेतू यांच्या देखत उद्दालकाच्या स्त्रीला हाताला धरून नेलें. तेव्हांपासून श्वेतकेतूनें स्त्रीधर्माची मर्यादा घालून दिली. मात्र पुत्रप्राप्तीकरितां पतीनें कोणतेंहि कृत्य करण्याला पत्नीला सांगितलें तर तिनें ती आज्ञा मानावी असाहि दंडक घालून दिला.

## सोमकपुत्र जंतू

सोमक नांवाचा एक धर्मनिष्ठ राजा होता. त्यानें शेंकडों स्त्रिया केल्या तरी पुत्र होईना. शेवटीं एका वृद्ध राणीला जंतू नांवाचा मुलगा झाला. पण तो मुंगी चाऊन आतां मरणार कीं काय इतका घाबरा झाला. राजा म्हणाला "तें कांहीं नाहीं. आपणाला शंभर पुत्र होतील असा कांहीं उपाय असेल तर तो मी करीन." तो उपाय म्हणून पुरोहितानें सांगितलें कीं, जंतू पुत्रालाच बळी देऊन त्याची आहुती यज्ञकुंडांत दिली तर शंभर पुत्र होतील. राजानें आपल्या सर्व राण्यांना दूर लोटून त्याची आहुती दिली. तेव्हां चरबी जळाल्याच्या घाणीनें त्या सर्व राण्या मूर्च्छित पडल्या व त्याच स्थितींत गरोदर राहिल्या. मग पुरे दिवस भरल्यावर जंतूसह शंभर पुत्र त्या राण्यांच्या पोटीं जन्माला आले. पुढें शंभर पुत्रांचें सुख भोगून सोमक राजा व पुरोहित वारले. तेव्हां त्यांना त्या पूर्वीच्या हत्ये-बद्दल नरकवास घडला. तथापि कालांतरानें राजाला पुरोहितासह उत्तम गती प्राप्त झाली.

## स्कंद व देवसेना

देव व दैत्य यांच्या युद्धांत देवांना हार खावी लागे. तेव्हां ते आपला सेनानायक होण्याला एकादा बलाढ्य पुरुष हुडकूं लागले. या शोधांत असतां इंद्राला केशी दैत्य दिसला. तो देवसेना नामक प्रजापतीची मुलगी पळवून नेत होता. हें पाहून इंद्रानें केशी दैत्याला मारिलें व देवसेनेला घेऊन ब्रह्मलोकीं गेला. या कन्येला लवकरच इष्ट असा वर मिळेल व तोच देवांचा सेनापती होईल असें ब्रह्मदेवानें इंद्राला आश्वासन दिलें. पुढें एका सोमयज्ञाचें कार्य संपवून परत जातांना अग्नीला कांहीं ऋषीपत्नी दिसल्या. तेव्हां त्यांच्याविषयीं त्याच्या मनांत अभिलाषा उत्पन्न झाली. हें कळतांच दक्षकन्या स्वाहा हिनें त्या ऋषीपत्नीचें रूप घेऊन अग्नीची एकांतीं गांठ घेतली, व नंतर पक्षिणीचें रूप घेऊन ती श्वेतपर्वतावर गेली. आणि तेथें तिला अग्नीपासून स्कंद या नांवाचा मुलगा झाला. तिनें हा प्रकार सहा वेळां केला. त्यामुळें त्या मुलाला सहा मस्तकें आणि बारा बाहू फुटले. लहानपणापासूनच तो स्कंद इतके भयानक खेळ करूं लागला कीं, त्रैलोक्य त्याला भिऊं लागलें. त्यानें बाण मारून हिमालयास बोगदा पाडला. स्वाहानें ऋषीपत्नींचीं रूपें घेऊन अग्नीशीं एकांत केला ही बातमी पसरून पण त्या खऱ्याच ऋषीपत्नी होत्या असें वाटून त्या सहा ऋषींनीं आपल्या पत्न्यांचा त्याग केला. त्यावर विश्वामित्रानें खरी गोष्ट सांगितली. परंतु ऋषींचें मन बदलेना. स्कंद (कुमार कार्तिकेय) अतिप्रबल झाला असें पाहून इंद्रानें त्याला मारण्याचें काम ब्राह्मी प्रभृती लोकमातांवर सोपविलें. पण त्याजवळ जातांच त्यांना पुत्रवात्सल्याची भावना उत्पन्न होऊन पान्हा फुटला. आपला हा उपाय फसला असें पाहून स्वतः इंद्रच स्कंदाशीं लढण्याला गेला. परंतु पराभव पावून तो स्कंदाला शरण गेला. तेव्हां ऋषी स्कंदाला म्हणूं लागले कीं, आतां तूंच इंद्र हो. "पण माझें तेज परोपकाराकरितां आहे. स्वार्थाकरितां नाहीं" असें म्हणून त्यानें इंद्रपद इंद्राकडेच कायम केलें. मात्र त्याचा सेनापती होण्याचें कबूल केलें. नंतर इंद्रानें केशी दैत्यापासून सोडविलेली देवसेना स्कंदाला अर्पण केली व त्या दोघांचा विवाह झाला. इकडे कपटी स्वाहेनें ऋषी-

पत्नींचीं सोंगें घेतल्यामुळें खऱ्या ऋषीपत्नींची अपकीर्ति झाली. व त्यांच्य नवऱ्यांनीं त्यांना टाकून दिलें. म्हणून त्या स्कंदाकडे गेल्या आणि म्हणाल्या कीं, "आमच्या पतींचीं मनें आमच्याविषयीं शुद्ध कर नाहींतर तूं आपल्या माता म्हणून आमचा स्वीकार कर." पैकीं दुसरी गोष्ट स्कंदानें कबूल केली. त्या ऋषीपत्नी आकाशांत जाऊन कृत्तिका नांवाच्या चांदण्या होऊन राहिल्या म्हणून स्कंदाला कार्तिकेय हें नांव प्राप्त झालें. मग देवसेना सज्ज करून कार्तिकेय दैत्यावर चालून गेला. प्रथम देवसेनेचा मोड झाला. पण कार्तिकेयानें त्वरेनें येऊन महिषादि दैत्यांचा वध केला.

## शकुन्तला आख्यान

कुरुवंश दुष्यंतापासून झाला. हा राजा एकदां सैन्य घेऊन अरण्यांत शिकारीला गेला असतां मालिनी नदीच्या तीरीं कण्व ऋषीचे आश्रमांत आला. त्यावेळीं कण्वाची धर्मकन्या शकुन्तला आश्रमांत होती. विश्वामित्राचा तपोभंग करण्यासाठीं इंद्रानें पाठविलेल्या मेनकेच्या पोटीं विश्वामित्रापासून शकुन्तलेचा जन्म झाला होता. परंतु मेनकेनें तिला उपजतांच टाकून दिल्यामुळें प्रथम शकुन्त पक्षांनीं आणि नंतर कण्व मुनींनीं तिचें रक्षण केलें होतें. दुष्यंताचें शकुन्तलेवर प्रथम दर्शनींच प्रेम बसलें. आणि त्याच्या आग्रहावरून शकुन्तलेनें दुष्यंताशीं गांधर्वविधीनें विवाह केला. राजा गेल्यावर कण्व घरीं आला. त्यालाहि शकुन्तलेचा विवाह मान्य झाला. कालांतरानें शकुन्तला आश्रमांतच प्रसूत होऊन तिला सर्वदमन नांवाचा पुत्र झाला. परंतु सुमारें तीन वर्षें झालीं तरी दुष्यंत शकुन्तलेला राजधानीला घेऊन जात नाहीं असें पाहून कण्वानें आपल्या शिष्यावरोबर शकुन्तलेला तिकडे पाठविलें. परंतु दुष्यंत तिला व आपल्या मुलाला ओळखीना. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, 'राजा, हा तुझाच मुलगा आहे. शकुन्तलेशीं तूं विवाह केला होतास असें असून तिचा अव्हेर तूं कां करावास ?" मग दुष्यंतानें त्या दोघांचा स्वीकार केला व मुलाचें नांव भरत असें ठेविलें. ह्या भरतापासून पुढें भारत कुलाची स्थापना झाली.

## ययाति कथा

पूर्वी स्वर्गातील देवांनीं आपलें पुरोहितपद अंगिरस (बृहस्पति) मुनीला दिलें. तसेंच दैत्यांनीं तें पद शुक्राचार्याला दिलें. शुक्राचार्याला संजीवनी विद्या येत होती. तिच्या योगानें तो मेलेल्या राक्षसांना जिवंत करी. ही विद्या हस्तगत करण्यासाठीं देवांनीं गुरुपुत्र कच याला शुक्राकडे पाठविलें. त्याप्रमाणें कचानें शुक्राचें शिष्यत्व पत्करिलें आणि त्याची सेवा करीत असतांच त्याची मुलगी देवयानी हिचीही कृपा संपादली. हा गुरुपुत्र येथें कां आला याचें राक्षसांनीं आपल्या ठिकाणीं अनुमान करून कचाला ठार मारण्याचे अनेक प्रयत्न केले. परंतु प्रत्येक वेळीं देवयानीच्या प्रेमामुळें शुक्रानें त्याला जिवंत केलें. शेवटीं राक्षसांनीं कचाला मारून जाळून त्याची राख मद्यांतून शुक्राला पाजली. तेव्हां मोठीच अडचण उत्पन्न झाली. पोटांतील कचाला देवयानीसाठीं जिवंत करावा तर शुक्राचार्य स्वतः मृत्यु पावणार. आणि कचाला विद्या न शिकवावी तर शुक्राचार्य फिरून जिवंत होणार नाहीं. अशा अडचणीमुळें अखेर कचाला विद्या प्राप्त झाली. विद्या घेऊन कच परत निघाला. तेव्हां त्याच्यावर प्रेम बसलेल्या देवयानीनें त्याजवळ लग्नाची याचना केली. परंतु "शुक्राच्या शरीरांतून तूं जन्मलीस तसाच आतां मीहि जन्मलों अर्थात मी तुझा भाऊ. यामुळें तुझा माझा विवाह होणें शक्य नाहीं असें" म्हणून कचानें नकार दिला.

देवयानी प्रेमळ तशीच रागीट होती. तिचा राग अनावर होऊन तिनें कचाला शाप दिला कीं, तूं संजीवनी विद्या मिळविलीस पण तुला ती फलद्रूप होणार नाहीं. तेव्हां कचहि तिला उलट शाप देऊन म्हणाला, 'एरव्हीं तुझें ब्राह्मण पुत्राशीं लग्न व्हावें परंतु माझ्या शापामुळें तुला क्षत्रियच नवरा मिळेल. ऋषीपुत्र मिळणार नाहीं" आणि पुढें तसेंच झालें. इंद्राच्या मनांत राक्षस व शुक्राचार्य यांच्यामध्यें भेद पाडावा असें आलें. तो राक्षसनगरीजवळ आला. पाहतों तों राक्षस राजाची मुलगी शर्मिष्ठा व देवयानी जलक्रीडा करीत होत्या. त्यांच्यांत भांडण लावावें म्हणून इंद्रानें तळयाकांठीं ठेविलेल्या त्यांच्या वस्त्रांची आदलाबदल केली. बाहेर

आल्यावर दोघींच्या वस्त्रांची उलटापालट झाल्यामुळें इंद्राच्या अपेक्षे-प्रमाणें त्या एकमेकींशीं भांडल्या. देवयानी शर्मिष्ठेचें लुगडें हिसकाऊन घेऊं लागली तेव्हां शर्मिष्ठेनें देवयानीला विहिरींत ढकलून दिलें, आणि आपल्या मैत्रिणी घेऊन ती घरीं परत आली. मग आतां देवयानीला वर कोण काढणार ? इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें ययाति राजा शिकार करीत असतां त्या विहिरीजवळ आला. त्यानें तिच्यावर दया करून देवयानीला वर काढलें व तो निघून गेला. ह्या प्रकारामुळें चिडलेल्या देवयानीनें "शर्मिष्ठेनें आपल्या सर्व दासींसह माझी बटिक झालें पाहिजे नाहींतर तुम्ही दैत्यांचें गुरूपद सोडा" असा बापापाशीं हट्ट धरला. अखेर शर्मिष्ठेनें मन थोर करून देवयानीची अट कबूल केली. पुढें एके दिवशीं देवयानी व शर्मिष्ठा जुनें भांडण विसरून वनामध्यें क्रीडा करीत होत्या. इतक्यांत ययाति राजा मृगया करीत तेथें आला. देवयानीनें त्याला ओळखलें आणि त्याला पाणिग्रहणाची मागणी घातली. फिरून शुक्रा-चार्यानें मुलीच्या प्रेमाखातर त्यांच्या प्रतिलोम विवाहाला संमति दिली. पुढें देवयानीसह शर्मिष्ठाहि ययातीच्या राजधानीस गेली. कालांतरानें देवयानीस तर पुत्र झालाच पण शर्मिष्ठेवर राजाचें मन बसून तिलाहि पुत्र झाला. तेव्हां देवयानी फिरून रागावली व तिची कड घेऊन शुक्रानें ययातीला असा शाप दिला कीं, तुला एकदम वृद्धदशा येईल. पण नंतर दया येऊन उःशाप दिला कीं, तुला आपलें वार्धक्य दुसऱ्या कोणाला देतां येईल व त्याचें तारुण्य घेतां येईल. शापाप्रमाणें ययाति लागलाच वृद्ध झाला. त्यानें पुत्रांना विचारतां यदु व द्रुहु यांनीं वार्धक्य घेण्याचें नाकारिलें. परंतु त्याचा लाडका मुलगा पुरु यानें मात्र तें म्हातारपण स्वीकारिलें व आपलें तारुण्य बापाला दिलें. तेव्हां ययाति प्रसन्न होऊन त्यानें त्यालाच राज्याभिषेक केला. मात्र कालांतरानें त्या दोघांनीं तारुण्य व वार्धक्य यांची अदलाबदल केली. आणि राजमंत्री व इतर लोक यांनींहि बापाचें हित करणारा म्हणून बापाच्या राज्याला पात्र असें ठरवून त्याच्या राज्याभिषेकाला संमती दिली.

या ययातीच्या पुत्रांपैकीं यदुपासून यादव, तुर्वसुपासून यवन, द्रुह्यु-पासून भोज, अनुपासून म्लेंच्छ आणि पुरुपासून पौरव झाले. या पौरव कुळांतच कौरव पांडव हेहि जन्मले.

## पुरूंची उत्पत्ति

विषितास्व नांवाचा राजा होता. त्याच्याचपासून पुढें पुरूवंशाचा विस्तार झाला. भद्रा नामक आपल्या सुंदर पत्नीवर त्याचें अतिशय प्रेम होतें. परंतु त्याला क्षयरोग होऊन तो मरण पावला. त्याच्या प्रेताला कवटाळून भद्रा ही विलाप करीत असतां आकाशवाणी झाली कीं, "तूं हें शव आपल्याजवळ सांभाळ त्यापासूनच तुला पुढें संतती होणार आहे" आणि त्याप्रमाणें पुढें घडून आलें.

## नलदमयन्ती

निषध देशचा राजा वीरसेन याला नल नांवाचा पुत्र होता. विदर्भ देशचा राजा भीम याची कन्या दमयंती नांवाची होती. नल व दमयंती यांनीं परस्परांचीं रूपगुणांची कीर्ति ऐकून एकमेकांस मनानें वरिलें होतें. पुढें दमयन्तीचें स्वयंवर घडून नल–दमयन्ती विवाह झाला. पण खरें दुःख पुढेंच वाढून ठेविलेलें होतें. दमयन्तीच्या स्वयंवराला कली व द्वापर चालले होते. स्वयंवर होऊन गेल्याचें कळतांच त्यांना राग आला. पुढें संधि साधून कली नलाच्या शरीरांत शिरला व नलाचा भाऊ पुष्कर याचे-बरोबर द्यूत खेळण्यास त्यानें नलास प्रवृत्त केलें. इकडे द्वापारानेंही द्यूताच्या फाशांत शिरून नलावर डाव केला. त्यामुळें राज्य व संपत्ति घालवून नल दमयन्तीसह वनांत हिंडूं लागला. परंतु कलीनें त्याचा पिच्छा पुरवून नलाचें वस्त्र पक्षांकरवी हिरावून नेलें. तेव्हां तीं दोघें एका वस्त्रावर राहूं लागली. पुढें एके रात्रीं निम्में वस्त्र कापून दमयन्तीला एकटीच टाकून नल निघून गेला. पुढें रानावनांत हिंडत असतां कर्कोटक नांवाच्या एका नागसर्पाला नलानें वांचविलें. त्यामुळें रूप बदलण्याची कला कर्कोटकानें नळाला दिली आणि अयोध्येच्या ऋतुपर्णाकडे त्यानें जावें असा सल्लाहि दिला. त्याप्रमाणें नल ऋतुपर्णाकडे जाऊन चाबुकस्वार व स्वयंपाकी म्हणून

रूप पालटून राहिला. इकडे दमयन्तीही शोक करीत हिंडत असतां चेदी देशाच्या राजधानींत आली. राजमातेनें तेथें तिची विचारपूस करितां "आपण सैरन्ध्री जातीची एक स्त्री" इतकेंच दमयन्तीनें खोटेंच सांगितलें. राजमातेनें तिला ठेवून घेऊन आपली कन्या सुनंदा हिच्या स्वाधीन केलें. पुढें दमयन्तीचा बाप भीमराज यानें पाठविलेल्या दूतांपैकीं सुदेव नांवाच्या दूताला दमयन्तीचा शोध लागला व दमयन्ती परत विदर्भास आली. पण आतां नलाचा शोध कसा लागणार? याकरितां नलाच्या अनेक गुणांच्या खुणा सांगून दमयन्तीनें देशोदेशीं ब्राह्मणदूत पाठविले. त्यांपैकीं पर्णादानें बातमी आणली कीं, या खुणांना पटणारा कोणी सारथी व स्वयंपाकी ऋतुपर्णाच्या परिवारांत आहे. दमयन्तीला कांहीं आशा वाटून तिनें सुदेवाला अयोध्येस पाठविलें व "दमयन्ती फिरून दुसरें स्वयंवर मांडणार आहे" अशी बातमी ऋतुपर्णाचे कानावर घातली. नल व ऋतुपर्ण यांनीं आपल्या अलौकिक विद्यांची ओळख परस्परांना करून दिली होती. त्यामुळें नलाला द्यूतविद्या प्राप्त होऊन कली नलाच्या शरीरांतून बाहेर पडला होता. आतां ऋतुपर्ण स्वयंवरास निघाला व त्यानें नलासहि बरोबर घेतलें. दोघे विदर्भ नगरीस पोहोंचले. दमयन्तीनें चातुर्यानें नलाच्या खरेपणाविषयीं खात्री करून घेऊन त्याची गांठ घेतली. परस्परांना परस्परांची ओळख पटली. तेव्हां नलानें आपलें मूळचें रूप घेतलें. स्वयंवराची बातमी खोटी असल्यानें ऋतुपर्ण परत आपल्या नगरास गेला. पुढें नवीन विद्येच्या जोरावर नलानें पुष्कराशीं द्यूत खेळून आपली संपदाही परत मिळविली. व पुढें अनेक वर्षें सुखानें राज्य केलें.

## सावित्री आख्यान

मद्र देशांमध्यें अश्वपती नांवाचा एक धर्मनिष्ठ राजा होता. त्याला राजपत्नी दृढव्रतीचें पोटीं सावित्रीदेवतेच्या प्रसादानें झालेली सावित्री या नांवाचीच अतिसुंदर मुलगी होती. शाल्व देशामध्यें द्युमत्सेन म्हणून अंध झालेला व राज्य नष्ट झालेला एक राजा वनांत जाऊन राहिला होता. त्याचा मुलगा सत्यवान नांवाचा सुस्वरूप व सुगुणी होता. त्यास सावित्रीनें पति म्हणून पसंत केलें व एक वर्षानें त्याचा अपमृत्यु आहे हें नारदाकडून

कळलें असतांहि आपला विचार बदलला नाहीं. अश्वपतीनेंहि तिच्या इच्छेप्रमाणें यथाविधी कन्यादान केलें. त्या दिवसापासून सावित्रीनें ऋषी-पत्नीस योग्य अशीं वल्कलें धारण करून पती व सासुसासरा यांची सेवा एकनिष्ठेनें करण्यास प्रारंभ केला. शेवटीं कालगणनेप्रमाणें तो मृत्यूचा दिवस उगवणार तों आधी तीन दिवस सावित्रीनें उभे राहून तपश्चर्या आरंभिली व चौथे दिवशीं आपला नवरा खांद्यावर परशु घेऊन अरण्यांत फळें मुळें आणण्याकरितां निघाला असें पाहून ती त्याच्या बरोबर निघाली. मृत्यूचा क्षण येतांच सत्यवान कासावीस झाला, आणि तांबडें वस्त्र नेसलेला, किरीट घातलेला, आरक्त नेत्र असा यमराज पाश टाकून सत्यवानाचा अंगुष्ट-मात्र देह काढून घेऊन दक्षिण दिशेला चालूं लागला. तेव्हां सावित्रीहि निमूटपणें त्याच्या मागें जाऊं लागली. यम म्हणाला 'मुली आतां मागें येऊन काय उपयोग? तूं परत जाऊन आपल्या पतीचें उत्तरकार्य कर.' तरी सावित्री पुढेंच चालली आणि लाघवीपणानें म्हणाली, 'पतिव्रतेची पति-सहगमनाची गति अकुंठित असते. सात पावलें बरोबर चालून जातांच कोणाहि दोघांची मैत्री होते. त्याप्रमाणें यमराज तुम्ही माझे मित्र झाला आहां. तरी माझें ऐका, माझ्या पतीला नेऊन आमच्या गृहस्थाश्रमाचा उच्छेद करूं नका.' तिचें तें मृदु, लाघवी आणि धर्मविचारपूर्ण पांडित्य ऐकून यमधर्माला तिच्याविषयीं आस्था वाटूं लागली.

तो म्हणाला "सावित्री तुला मी प्रसन्न झालों आहे. मात्र पतीच्या प्राणदानाशिवाय इतर हवा तो वर मागून घे." तेव्हां त्या बुद्धिमान् सावित्रीनें एक वर मागावा, यमानें तो दिल्यावर फिरून त्याच्या मागून चालूं लागावें व त्याच्याशीं बोलूं लागावें. फिरून त्यानें वर माग म्हटलें म्हणजे त्यापुढचा इष्ट वर मागावा व तो मिळाल्यावर फिरून यमाच्या मागें चालूं लागावें. या क्रमानें प्रथम तिनें आपल्या सासऱ्याचें अंधत्व जाऊन त्याला दृष्टि यावी, त्याचें राज्य परत मिळावें, आपल्या पित्याला शंभर पुत्र व्हावे इत्यादि वर मागून घेऊन हळूंच चवथा वर मागितला कीं, मलाहि पण शंभर पुत्र व्हावे. आणि यमहि तिच्या कौतुकांत इतका मग्न झाला कीं, त्यानें तोहि वर दिला. तेव्हां मात्र ती उभी राहिली व म्हणाली, "हा वर खरा करावयाचा तर यमराज, तुम्ही माझ्या पतीला जीवदान दिलेंच

पाहिजे. एरव्ही तुमचा वर सफल कसा होणार?" हें तिचें चतुर भाषण ऐकून यमाला मनापासून आनंद झाला व त्यानें आपले पाश काढून घेऊन सत्यवानाची मुक्तता केली. व स्वतः दक्षिणेकडे निघून गेला. तेव्हां सावित्री परत सत्यवानाच्या मृत देहाजवळ आली व पहाते तों झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें सत्यवान उठून बसला व म्हणाला, 'मला एकादें भयंकर स्वप्न पडल्यासारखें वाटलें इतकेंच.' मग ती रात्र वनांत काढून दुसरे दिवशीं तीं दोघे द्युमत्सेनाच्या आश्रमाला गेली. यमधर्माच्या वराप्रमाणें द्युमात्सेनाला दृष्टि आली व नष्ट झालेलें राज्यहि मिळालें. तेव्हां चतुरंग सैन्यासह द्युमत्सेन, सत्यवान व सावित्री यांनीं आपल्या नगरींत प्रवेश केला.

समाप्त

२५८

# सूचि


अ, आ

अगस्त्य १३७
अग्नि २१
अधिरथ ८४
अनु २
अभिमन्यु ७३, ९३
असमंजा १२६
अर्वावसू १५०
अश्वपती १५८
अश्वत्थामा ९५
अश्वसेन २२
अष्टावक्र १३७
आयु २
आरुणी १२८
आर्ष्टिषेण ५१
आस्तिक १३१

इ ई

इला ४

उ ऊ

उपरिचर २
उलूपी १९, ११७
उत्तर ७०
उत्तरा ७३
उपप्लव्य ८३
उलूक ८८, ९९
उत्तंक ११४, १२८
उग्रसेन ११७
उपमन्यू १२९
उद्दालक १५२
ऊर्वशी ४, ४५

ऋ

ऋष्यशृंग १३८
ऋषभ १४९

ए ऐ

एकचक्रा १४

औ

और्व १३९
औशीनर १४८

अं अः

अंबा ६
अंबालिका ६
अंबिका ६
अंशुमान १४६
अंधक १२४
अंगिरस १५५

क

कश्यप ४
कणिकनीति १२
कलियुग १०१
कद्रू १३३
कश्यप १३३
कहोड १३६

कल्माषपाद १३९
कपिल १४६
कच १५५
काम्यक ४२
कांबोज ८७
कालकेह १४४
कार्तवीर्य १४५
किरमिर १२
कीचक ६६
कुवलाश्व १४०
कुरु १४२
कृतवर्मा ८७
कृत्तिका १५४
केतुवर्मा ११६
केशी १५३
कंक ६४

ख

खांडववन २१, २२

ग घ

गरुड १३४
गालव १४८
गुढी पाडवा ३
गिरिका ३
गुणकेशी १३४
गंधमादन ४३
गांडीव २२
गांधारी १०३
घटोत्कच ९४

च छ

चारण
चाक्षुणी विद्या
चार्वाक
चारिणि
चित्रांगद
चित्ररथ
चित्रांगदा
चित्रसेन
चेदीदेश
चेकितान
चंद्रवंश
चंद्र
च्यवन

ज झ

जरासंघ
जटासुर
जयद्रथ
जनमेजय
जरत्कारू
जरिता
जमदग्नि
जंतु
जीमूत

त थ

तक्षक
तपता
तुर्वश
तिलोत्तमा